# चाळीसगावडांगाणी

(खंड १)

## लोकवाङ्मय

(१९८० पर्यंत)

डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

सा विद्या या विमुक्तये

वीहा पब्लिकेशन

**चाळीसगावडांगाणी (खंड १) (लोकसाहित्य) Folk lore**
**लोकवाङ्मय (१९८० पर्यंत)**

**लेखक**
**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.in

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : वीहा पब्लिकेशन्स,
प्लॉट नं. २१, अजिंक्यनगर, बोरुडे मळा,
भुतकरवाडी, सावेडी रोड, अहमदनगर ४१४००३

**प्रथम आवृत्ती** १ डिसेंबर २०१३
(ISBN-13-978-81-927963-0-7)
**द्वितीय आवृत्ती** २०२४

**प्रकाशन क्र.** : २

**टाईपसेटींग** :
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : वीहा पब्लिकेशन्स, अहमदनगर

**सेवा मूल्य** ३००/–

(या पुस्तकातील मतांशी प्रकाशक सहमत असेलच असे नाही.)



**कै . पू. गुरुवर्य ह. वि. फडके आणि**
**कै. पू. गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे**
**यांच्या पवित्र स्मृतीनिमित्त**

**गोपालन सेवेस**

अनिल सहस्रबुद्धे

**चाळीसगावडांगाणी खंड १**

**लोकवाङ्मय (१९८० पर्यंत)**

**अनुक्रमणिका**


१) ग्रंथलेखन भूमिका व लोकवाङ्मयाच्या क्षेत्रीय संशोधन पद्धतीतील महत्त्वाची कार्ये

१) संकलन

२) संपादन

३) वर्गीकरण

४) संकलित लोकसाहित्याचे प्रातिनिधिक संग्रहरूप

२) लोकगीते (१९७६ ते १९७९ च्या क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार प्रातिनिधिक)

१) जात्यावरच्या ओव्या

२) नवरात्रातील गाणी

३) सणा-उत्सवांची गाणी

४) दैवतांविषयी गाणी

५) पांडुरंगाची भक्ती व संत संदर्भ

६) लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंबंधीची गीते

७) भलरीगीते

८) संकीर्ण

३) लोककथा (१९७६ ते १९७९ च्या क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार प्रातिनिधिक)

१) अद्भुत कथा

२) प्राणीकथा

३) आख्यायिका

४) दैवतकथा

५) हास्यकथा

६) संकीर्ण

४) वाक्प्रचार व म्हणी (१९७६ ते १९७९ च्या क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार प्रातिनिधिक)

१) वाक्प्रचार

२) म्हणी

५) शब्दकोश

६) परिशिष्ट : चाळीसगाव डांगाण विषयक ऐतिहासिक दस्तऐवज




# १.

# ग्रंथलेखन भूमिका व लोकवाङ्मयाच्या क्षेत्रीय संशोधन पद्धतीतील महत्त्वाची कार्ये

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुका हे जिल्ह्याचे टोक आणि नाशिक, पुणे व ठाणे जिल्ह्यांच्या सरहद्दीचा भाग. सह्यद्रीच्या सर्वोच्च शिखर रांगांच्या उतरणीवरचा हा प्रदेश. हरिश्चंद्रगड, रतनगड, कळसुबाई, अलंगकुलंग, बितानगड, पट्टागड अशी ही शिखरे आणि गडकोट किल्ले असलेली डोंगर रांग. यांच्या उतरणीवरचा पठारभागापर्यंतचा प्रदेश डांगाण म्हणून ओळखला जातो. पूर्वी सुमारे चाळीस गावांचा अगदी उतरणीवरचा भाग 'चाळीसगावडांगाण' म्हणून ओळखला जात असे. आता अकोले तालुक्यातील सुमारे एकशे पंचवीस गावे डांगाणची ओळख सांगणारी आहेत. या प्रदेशात आदिवासी महादेव कोळी बहुसंख्येने आहेत. त्यांची सलग गावेच्या गावे येथे आहेत. त्यांच्या जोडीने वाड्या, वस्त्या आणि काही गावे या स्वरूपात आदिवासी ठाकर जमातीचे लोक आहेत. या दोन आदिवासी जमातींबरोबरच गवळी समाज म्हणून परंपरेने ओळखला जाणारा 'तलवार कानडे' हा आदिवासी सदृश्य मराठमोळा समाज दिसतो. याबरोबरच कानडी-तेलगु संमिश्र भाषिक असा हेटकर कानडे / हटकर कानडे असा पृथक समाज अल्प प्रमाणात आपली स्वतंत्र ओळख सांगतो. अठरापगड जाती, बलुतेदार आणि मराठमोळा आदि समाज या आदिवासी पट्ट्यात अगदी तुरळक परंतु पठार भागापासून सलग आणि बहूल प्रमाणात आहे. असा हा महाराष्ट्रात स्वतंत्रपणे ठळक उठून दिसणारा आदिवासी पट्ट्यातील, व्यामिश्र स्वरूपात

समाज असलेला डांगाण प्रदेश. येथील भाषा डांगाणी-मराठी. प्रवरा, मुळा, कृष्णवंती, अढळा, म्हाळुंगी अशा नद्यांच्या अर्थात गोदावरी खोऱ्याचा उपविभाग प्रवरा मुळा खोरे असलेल्या भागाचा भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक परिचय पृथक स्वरूपात प्राचीन भारतीय संस्कृतीशी जोडलेला आढळतो.

**i) भूमिका–**

लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने अतिमहत्त्वाचा असा हा व्यामिश्र समाजजीवन जगणारा 'लोक' 'सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' या स्वरूपात अभ्यासावा असे ठरविले. अकोले हे माझे जन्मगाव आणि तालुक्याचे ठिकाण त्यामुळे 'डांगाण' भागाचा थेट संबंध अकोल्याशी असलेला, अनुभवत होतो. शिक्षण घेताना सर्वोदय योजनेअंतर्गत सत्यनिकेतन संस्थेच्या एकमेव 'कोळी बोर्डींग'मधील मुले तालुक्यातील प्रथम एकमेव असलेल्या 'हिंद सेवा मंडळा'च्या 'मॉडर्न हायस्कूल'मध्ये शिकायला येत त्यांचा मी सहाध्यायी. त्यामुळे सांस्कृतिक, भाषिक दर्शन सहज होत होते. पुढे गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे यांच्या मार्गदर्शनाखाली 'पीएच.डी.'साठी संशोधन करायचे ठरविले. महाराष्ट्राच्या 'अक्का' डॉ. सरोजिनी बाबर यांच्या प्रेरणेने 'चाळीसगाव डांगाण' परिसरातील लोकसाहित्याचा अभ्यास करावा असा प्रस्ताव डॉ. मोरजे यांच्यापुढे ठेवला तेव्हा त्यांनी ''चाळीसगाव डांगाण परिसर सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'' असा क्षेत्रीय संशोधनात्मक अभ्यास विषय देऊन अभ्यासास प्रवृत्त केले. खरेतर हा समग्र 'लोक'चाच अभ्यास होता. तसाच तो आंतरज्ञानशाखीय स्वरूपाचा होता. अतिकठीण विषय, संपर्कासाठी सर्वदृष्ट्या अतिकठीण असा हा अभ्यास! मी निश्चय केला. कामाला लागलो. दोन वर्षे सर्व ऋतुंत क्षेत्रात पायी भ्रमंती केली. यात तत्कालीन वसतिगृहातील माझ्या आदिवासी विद्यार्थ्यांनी माझी माझ्या घरापासून त्यांच्या घरापर्यंत साथसंगत केली. गाड्याघोडे नाहीत, टेप नाही, टीव्ही-मोबाईल नाही, लाईट नाही, कॅमेरे नाहीत तरी देखील पाय, डोळे, कान आणि हातात लेखणी यांचा वापर करीत, घराघरात नाते जोडत, लोकवाङ्मयाचे अर्थात वर्तनपरंपरा, साधन आणि वस्तुपरंपरा आणि वाङ्मय किंवा मौखिक परंपरांच्या, तेथील जीवनासंबंधीच्या सर्व अंगांविषयी नोंदी; मिणमिणत्या दिव्याच्या उजेडात किंवा चांदणे आणि दिवसउजेड यात लक्षपूर्वक नोंदी करायच्या आणि त्यातून सांस्कृतिक अभ्यासाची, लोकसाहित्य शास्त्रीय आणि भाषावैज्ञानिक सामग्री संशोधित करायची असा हा जगड्व्याळ खटाटोप. परंपरा, वर्तमान आणि



भविष्यक्रम यातील बदलते संदर्भ, बदलती रूपे यांसह नमुने गोळा करायचे असा हा संशोधन उद्योग. अतिश्रमविणारा आणि अतिश्रीमंत! जिद्दीने आणि स्नेहाने ताटस्थ्यपूर्वक उदंड सामग्री नोंदीच्या स्वरूपात गोळा झाली. त्या सामग्रीच्या आधारे प्रातिनिधिक स्वरूपात संग्रहरूप प्रबंधात मांडले.

अशा प्रकारचा क्षेत्रीय अभ्यासाचा नमुना अगदीच दुर्मिळ असल्याचा निर्वाळा पूर्वसूरींनी आणि त्या मार्गात संशोधक नवागतांनी नोंदवला. काही आदरणीय अशा ज्येष्ठांनी, समवयस्कांनी आणि नव्या संशोधन मार्गदर्शकांनी हा नमुना ग्रंथरूपात सर्वांना उपलब्ध व्हावा म्हणून आग्रह धरला. १९७९-८० मध्ये पुणे विद्यापीठाची 'पीएच.डी.' प्राप्त केल्यानंतर आता जवळपास तेहतीस वर्षानंतर संशोधन साधनांची हायटेक भरमार झाल्यानंतर देखील हा क्षेत्रीय संशोधनाचा वस्तुपाठ उपयुक्त ठरेल या दृष्टीने लोकाग्रहास्तव हा अभ्यास दोन खंडात प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला त्यातील हा लोकवाङ्मय खंड होय.

यानिमित्ताने क्षेत्रीय सर्वेक्षण पद्धतीतील महत्त्वाची कार्ये येथे नमूद करणे आवश्यक वाटते. वास्तविक पहाता 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' ह्या मी लिहिलेल्या ग्रंथात संपूर्ण संशोधन पद्धती मांडली आहे. जिज्ञासूंनी हा ग्रंथ मुळातून पाहणे आवश्यक वाटते. लोकसाहित्य म्हणजे काय? हे अगोदर समजून घेणेही तेव्हढेच महत्त्वाचे वाटते. 'लोकबंध' या ग्रंथात मी लोकसाहित्याची सैद्धांतिक चर्चा केली आहे. तोही ग्रंथ मुळातून पाहाणे आवश्यक आहे. येथे क्षेत्रीय संशोधन पद्धतीतील महत्त्वाची कार्ये 'लोकसाहित्य संशोधन पद्धती'च्या ग्रंथातून दिली आहेत.

**ii) लोकवाङ्मयाच्या क्षेत्रिय संशोधन पद्धतीतील महत्त्वाची कार्ये–**

पद्धती अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने पद्धतीतील महत्त्वाच्या कार्याचा विचार व पद्धती समजावून घेणे इष्ट होईल. येथे आपण संकलन, संपादन, वर्गीकरण, संकलित लोकसाहित्याचे प्रातिनिधिक संग्रहरूप या गोष्टींचा विचार करणार आहोत.

**१) संकलन –**

लोकसाहित्याचे संकलन ही लोकसाहित्य संशोधन क्षेत्रातील सर्वात महत्त्वाची व अत्यंत जिकिरीची गोष्ट होय. दुर्गाभागवत यांनी संकलकांना महत्त्वाचा इशारा दिलेला आहे. 'लोकसाहित्याचे संकलन' या नावाचे स्वतंत्र प्रकरण लिहून डॉ. मांडे यांनी भारतातील व महाराष्ट्रातील संकलन कार्याचा आढावा थोडक्यात घेतलेला आहे. संकलनाच्या 'क्षेत्रीय पद्धती' आणि 'स्तरीय पद्धती' यांचा विचार


मांडलेला आहे. त्याचबरोबर संकलनातील अडचणींचा विचार केला आहे. अभ्यासकांनी ते लेखन मुळातून वाचणे इष्ट होय. 'लोकसाहित्याचे वर्गीकरण' या प्रकरणात डॉ. मांडे यांनी श्रीमती बर्न यांच्या ''Handbook of folklore'' या ग्रंथाच्या आधारे लोकसाहित्याचे वर्गीकरण दिले आहे ते संकलनाच्या सोयीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. हे वर्गीकरण तीन भाग कथन त्यातील घटकांची सूची दिली आहे. हे पुढीलप्रमाणे–

(i) लोकविश्वास, लोकभ्रम, समजुती वगैरे (सर्वसाधारणपणे या समजुती पुढील बाबींशी संबंधित असतात) –


(१) पृथ्वी, आकाश, पाताळ (२) वनस्पती, वृक्ष, डोंगर, नद्या; (३) प्राणी ; (४) मानव; (५) मानवनिर्मित वस्तू; (६) आत्मा, परलोक, स्वर्ग–नरक इत्यादी; (७) अतिमानवी शक्ती ज्यात राक्षस, भूत, देवदेवता आणि या स्वरुपाच्या इतर व्यक्ती; (८) शकुनापशकून, भविष्यवाणी, आकाशवाणी, साक्षात्कार, दृष्टांत इ. (९) यातु, मंत्र, यंत्र, तोडगे इ. (१०) बाध, दृष्टी, रोगावरील पारंपारिक उपाय.

(ii) रितीरिवाज, रूढी विधी इत्यादी –

(१) सामजिक, धार्मिक किंवा राजनैतिक संस्थाशी संबंधित (२) व्यक्तिगत






जीवनासंबंधी जसे संस्कार, नवस इत्यादी; (३) व्यवसाय, उद्योग यांशी संबंधित; (४) व्रत, सण, उत्सव; (५) नृत्य–खेळ, क्रीडा, मनोरंजनात्मक

(iii) लोककथा, लोकगीत, म्हणी इत्यादी –

(१) लोककथा – १. अशा कथा खऱ्या समजल्या जातात. २. अशा कथा ज्या केवळ मनोरंजन करण्यासाठी सांगितल्या आणि ऐकल्या जातात.


(२) सर्व प्रकारची लोकगीते (३) म्हणी, उखाणे; (४) पद्यबद्ध म्हणी आणि स्थानिक स्वरूपाचे वाक्प्रचार.

या वर्गीकरणावरून लोकसाहित्याचे संकलन करावयाचे म्हणजे नेमके कोणत्या गोष्टीचे संकलन करावयाचे याची स्थूलमानाने माहिती होईल. येथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की 'लोक' ची जी म्हणून विविध अंगे करता येतील त्या सर्व अंगांच्या संबंधाने होणारे सर्व प्रकारचे प्रकटीकरण हे लोकसाहित्यच असते. त्यामुळे लोकसाहित्याचे अनेक भाग कल्पिता येतील, गट करता येतील. 'लोक' च्या अस्तित्वातील समग्र दर्शन लोकसाहित्य संकलित करता येईल – (१) पारंपरिक स्वरूपातील (२) परिवर्तनाच्या संक्रमण अवस्थेतील (३) नव्याने उदित होणारे. डॉ. मोरजे यांनी लोकसाहित्य संकलनाविषयी उपयुक्त मार्गदर्शन केले आहे. तेही मुळातून वाचणे इष्ट होईल.

संकलनाची पद्धती पुढीलप्रमाणे सांगता येईल–

(१) संकलनासाठी निवडलेल्या क्षेत्राची व्याप्ती व सीमा निश्चित करावी, ही निश्चिती विषय निवडीनुसार भौगोलिक, ऐतिहासिक व लोकव्यवहार यांचा विचार कथन करावी येथे इतिहास, भूगोल किंवा शासकीय सेन्सस बुक पेक्षा संशोधन क्षेत्र वेगळेपणाने लक्षात घ्यावे लागेल. त्यानुसार क्षेत्राचा नकाशा तयार करावा. उदा. अशा प्रकारे नकाशा तयार कथन क्षेत्रीय संकलन करण्याचा प्रस्ताव करण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथ लेखकाने केलेला आहे. ''चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन भाषिक अभ्यास'' असा विषय होता. त्यासाठी चाळीसगाव डांगाण परिसराचा नकाशा तयार करण्याचा प्रयत्न केला. (प्रत्यक्ष नकाशा स्वतंत्र कागदावर दिलेला आहे.)

(२) क्षेत्राचा व्याप पाहून दिशा लोकसंख्या, लोकव्यवहाराच्या दृष्टीने (बाजारहाट) भर पाहून उपक्षेत्रे तयार करावीत. त्या उपक्षेत्रांमध्ये तारतम्याने लोकसंख्या व लोकव्यवहार लक्षात घेऊन प्रातिनिधिक संशोधन केंद्रे निवडावीत त्या प्रातिनिधिक केंद्राच्या जोडीला लोकसाहित्य पाहणीच्या विशेष शक्यतेनुसार विशिष्ट केंद्रे निवडावीत. या संदर्भात पुढील आकृतीवरून क्षेत्रह ल्पना स्पष्ट होईल.




संशोधन क्षेत्राची आखणी –

(३) सर्वप्रकारच्या ऋतुत, जत्रायात्रा, सणोत्सव, पारंपरिक उत्सव, इ, गोष्टी लक्षात घेऊन व्यवसायाच्या दृष्टीने विशेष कालावधी व कौटुंबिक, सामाजिक लोकरुढी लक्षात घेऊन क्षेत्रातील प्रवास व निवासाची आखणी करावी.

(४) प्रवाससाधनांचा तारतम्याने वापर करावा. शक्यतो पायी किंवा दुचाकी वाहनाने, क्षेत्राचा मगदूर पाहून प्रवास करावा. निवासाची व्यवस्था जमेलतशी परंतु त्या त्या क्षेत्रातील कुटुंबामध्येच करावी.



(५) क्षेत्रात प्रवास, निवास करताना ओळखपत्र जवळ असावेच. क्षेत्रीय स्तरावरील विविध शासकीय अधिकारी, लोकनेते यांच्याशी पत्राद्वारे स्वतंत्र संपर्क साधावा, संशोधन कार्य सुरू आहे हे या लोकांना माहित असावे. म्हणजे संकलनात अडचणी येत नाहीत. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीनेही ते उपयुक्त ठरते. मात्र सर्वेक्षण पाहाणी संकलनासाठी त्यांच्या माध्यमांचा उपयोग करू नये. (उदा. वाहने सरकारी कार्यालये, शाळा, कर्मचारी इ.) सर्वसाधारण लोकात निवास करावा. (राजकीय क्षेत्रातील लोकसाहित्याचा अभ्यास करावयाचा असेल तर – राज्य शास्त्रीयदृष्ट्या –यात अपवाद होईल.)

(६) टेपरेकॉर्डर, व्हिडिओ कॅमेरा, कॅमेरा यासारख्या साधनांबरोबरच नोंदीसाठी पुठ्ठीका तयार असाव्यात. पुठ्ठीकेवर (कार्ड) –क्षेत्र, उपक्षेत्र, केंद्र, ग्रामनाम/शहर/विभाग, लोकसाहित्य प्रकार, व्यक्तीनावे, सादरीकरणाची वेळ ऋतु, महिना, तिथी, वार, नक्षत्र, दिनांक वेळ इ. संदर्भ–विधी प्रसंग, रूढी इ. अशी नोंद करणे आवश्यक असते. सादरीकरणातील समूहभावना अशीही स्वतंत्र नोंद करता येईल.

(७) मिळतील त्या, मिळतील तेवढ्या सर्वप्रकारच्या नोंदी करणे आवश्यक असते. संकलन करताना तोचतोपणा वाटला तरी त्या सर्व नोंदी स्थानिक पाठासह घेणे आवश्यक आहे. मात्र असे करताना संवगतेपासून सावध राहिले पाहिजे. उदा. आपली काही नोंद होते आहे. गाणे टेप केले जात आहे म्हणून व्यक्ती पुढे येतात संशोधकाने खुबीने आवश्यक तेवढ्याच नोंदी ठेवायला हव्यात. काही व्यक्ती मुद्दाम पाठात बदल कथन काही म्हणून दाखवतात. कथा किंवा आख्यायिका सांगताना किंवा स्थान माहात्म्य सांगतान हे विशेषतः घडते. मात्र निरीक्षणातून बारीकसारीक गोष्टीही सुटता कामा नयेत. पारंपारिकता, परिवर्तन यांच्या नोंदी महत्त्वाच्या असतात. उदा. सत्यनारायणाच्या पूजेचा पोथीतील पारंपारिक मांडणी आणि प्रत्यक्ष परिवर्तन. लग्नप्रसंगीची गाणी यातील परंपरा आणि परिवर्तन इ. नोंदी घेताना प्रत्येक कालातील व स्तरातील अधिकाधिक नोंदी घ्याव्यात. जत्रायात्रा, उत्सव या संदर्भातील नोंदी एकाच घटकाविषयी अनेकांकडून घ्याव्यात. उदा. निघोज येथे देवीच्या जत्रेप्रसंगी कुंडातून पाण्याने भरलेली घागर आपोआप वर येते; ही अद्‌भुत घटना; या संदर्भातील समजुती, कथा यांच्या नोंदी अनेकांकडून घेणे आवश्यक आहे.

(८) व्हिडिओफिल्म, कॅमेरा याद्वारे घेतलेल्या नोंदी लिखित रुपात पुठ्ठिकांवर (कार्ड) घेतल्या पाहिजेत. या नोंदी, नोंदी घेतल्यादिवशीच वा अगदी वेळ न घालवता परंतु एकांतात निवांतपणाने, वर्णनात्मक तऱ्हेने केल्या जाव्यात. या प्रकारच्या नोंदीनाही क्रमांक व पुठ्ठिकांवरील सर्व प्रकारचे संदर्भ देणे आवश्यक असते.

(९) नोंदी घेत असताना लोकाविष्काराला बाधा येणार नाही किंवा नोंद घेतली जात असल्याची जाणीव 'लोक'ला झाल्यामुळे कृत्रिममपणा येणार नाही. याची दक्षता घेणे आवश्यक असते. संशोधनाचे विशेष अवसान असता कामा नये. शक्यतो नोंदी नकळत स्पष्ट करणे इष्ट असते. नोंदी करताना निरीक्षण आणि स्मरण यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र निरीक्षणाचे लेखन केल्यानंतर पडताळून पाहणे आवश्यक असते.

(१०) नोंदी जमा करीत असतानाच नोंदींची यादी तयार होत जाणे आवश्यक असते. ही यादी करताना दिनांक, केंद्र, नोंदींचा संदर्भप्रकार यादीत समाविष्ट असावा.

(११) नोंदी घेण्यासाठी प्रयोगाची तारतम्याने निवड करावी लागते.

अशाप्रकारे संकलन करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते म्हणून अशा अडचणींची माहिती असणे उपयुक्त होय. डॉ. मांडे यांनी संकलनातील अडचणींनचा पुढीलप्रमाणे आढावा घेतला आहे.– (१) समूहांतर्गत लोकसाहित्याच्या घटकांची संकेतामुळे अनुपलब्धी (२) संकलनाचे सामग्री देण्याच्या दृष्टीने महत्त्व नसणे. (३) संकलनाच्या हेतूविषयी शंका (४) सामग्री देणाऱ्याची शारिरीक किंवा मानसिक अनुकूलता नसणे (५) विशिष्ट विधीच्या प्रसंगीच म्हणावयाची गाणी किंवा पाळावयाच्या रूढी, त्यामुळे अडचणी. त्या संबंधाचे काही संकेत. (६) संकलनाच्या मर्यादा– अ) शारीर मर्यादा, आ) बोली माहित नसणे इ) तेथील संस्कृती व रितीरिवाजाविषयीचे अज्ञान (७) स्त्रियांचे सहकार्य न मिळणे. डॉ. मोरजे यांनी प्रयोगसिद्ध वाङ्मयकलेच्या दृष्टीने नोंदी घेताना प्रयोगसाधनांमुळे (संगीताच्या अंगाने) येणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला आहे. प्रस्तुत शोधनिबंध लेखकाने लोकसाहित्य संपादनातील गैरसमजांचा आढावा घेतला आहे. तो या संदर्भात महत्वाचा आहे.–

(१) ग्रामीण भागातील स्त्रीगीते म्हणजेच लोकसाहित्य (२) लोकसाहित्य म्हणजे जुन्यात जुने. ते केवळ वृद्धांनाच ज्ञात असते. (३) भरमसाठ पर्याय आढळून होणारा गोंधळ (४) लोकसाहित्य, गाणी व कथा एवढ्या मर्यादित अर्थानच गोळा करणे. (५) चांगल्या (सुष्ट) गोष्टींचेच संकलन करावे. (६) 'लोक'कल्पनेच्या संकोचाने होणारा गैरसमज– लोक म्हणजे ग्रामीण मागासलेले इ. अशा अडचणींमुळे लोकसाहित्याच्या वर्तमानकालीन रुपाकडे दुर्लक्ष होते. काही पर्याय दुर्लक्षित राहतात.

''बोलीभाषांचा अभ्यास' या लेखात 'संकलनातील विधीनिषेधांचा विचार' डॉ. सु. बा. कुलकर्णी यांनी केला आहे. त्यातील पुढीलभाग हा सर्वच क्षेत्रात विचारात घेतला पाहिजे.–''साहित्य संकलनास लागणारा कालावधी नियोजित संशोधनप्रकार व संरचनेची गुंतागुंत या दोन्हीवर अवलंबून असल्याने संकलनास किती काळ लागावा हे निश्चितपणे सांगता येत नाही. संशोधकापाशी उपलब्ध असणारी सवड, त्याचप्रमाणे रोज किती तास काम होत आहे यावरही हा कालावधी अवलंबून असतो.'' शिवाय संकलकाची क्षमताही कालावधी निश्चित होण्यास कारणीभूत होते.

संकलनाचे काम जोखमीचे व जिकीरीचे आहे. ज्ञानेंद्रिये हे संकलनाचे सर्वात महत्त्वाचे व प्रमुख साधन आहे. त्याचबरोबर तारतम्य, विवेक यांनाही महत्त्व आहे. संकलनातील अडचणींवर संकलकांची वर्तणूक, विवेक आणि जिद्दच मात करू शकेल हे लक्षात ठेवले पाहिजे.

**२) लोकसाहित्याचे संपादन –**

संकलनाची पुढची पायरी म्हणजे केलेल्या संकलनाचे संपादन करणे होय. संपादन म्हणजेच संकलनाचे संशोधकार्याच्या दृष्टीने व्यवस्थापन होय. या संपादनात लोकसाहित्याच्या संकलित नोंदीत किंवा पाठात कोणतेही शाब्दिक किंवा रचनात्मक अथवा जुळणीच्या दृष्टीने फेरफार चालत नाहीत. ह्या दृष्टीने प्रस्तुत शोधनिबंध लेखकाने पुढील मार्गदर्शक तत्वे (सूत्रे) दिली आहेत – ''(१) अनेक पर्यायातून एक पर्याय निवडणे महत्त्वाचे अशी निवड करताना भाषा, नैसर्गिकता (सहजता) रचना या दृष्टीने सर्व पर्यायांचे जास्तीत जास्त प्रतिनिधित्व त्या पर्यायाने करावे. ठरविलेल्या परिसरातील केंद्राच्या ठिकाणी असलेला पर्याय या दृष्टीने म हत्त्वाचा असतो. त्याचा विचार करावा. (२) संग्रहण करताना घेतलेल्या नोंदीची नीट मांडणी करावी. (३) जास्तीत जास्त वर्गीकरण कथन संपादन करण्याचा प्रयत्न करावा. (४) संपादन करताना कोणतेही फेरफार संपादकाने करू नयेत. या दृष्टीने लोकसाहित्याचे संपादन नेहमीच्या संपादनापेक्षा भिन्न प्रकारचे असते हे लक्षात येऊ शकेल. (५) ज्या प्रकारच्या शास्त्रीय पद्धतीने लोकसाहित्याचा अभ्यास करावयाचा असेल त्यादृष्टीने शक्यतो, लोकसाहित्याची संहिता तयार

करण्याचा प्रयत्न करावा. (६) आवश्यक तेथेच लगेचच स्पष्टीकरण करणे सोयीचे असते. (७) एकाचवेळी अनेक प्रकारांमध्ये मोडणारे पर्याय संकीर्णमध्ये मांडावेत. (८) एखाद्या लोकसाहित्यवस्तुचे पर्याय आढळलेच नाहीत तर त्याची निराळी नोंद करावी. (९) पर्याय निवडल्यानंतर आपल्या अवलोकनातील पर्यायांची संख्या खाली दिल्यास अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल'' वरील मार्गदर्शक तत्त्वांची क्रमवार उदाहरणे घेतल्यास ही मार्गदर्शक तत्त्वे अधिक स्पष्ट होतील. – उदा. (१)

(i) 'गारुळा'– माशी किंवा किडा चावल्यानंतर येणारी गाठ. चाळीसगाव डांगाण परिसरात क्षेत्रीय अभ्यास करताना २५ उपकेंद्रांवर नोंदी करण्याचा प्रयत्न झाला. यात एकूण १०० गावे समाविष्ट झाली. २५ उपकेंद्रांपैकी १६ उपकेंद्रांवर 'गारुळा' हा शब्द विशेषतः मधमाशी चावल्यामुळे येणारी गांधी किंवा गाठ या अर्थाने मोठ्या प्रमाणावर वापरला जाताना दिसला. दोन केंद्रांवर कोणी गारुळा तर कोणा गाठ म्हणताना आढळले तर एका केंद्रावर पुटकुळी असा शब्द काहींनी तर 'गारुळा' शब्द काहींनी वापरला. ६ केंद्रांवर गाठ हा शब्द मोठ्या प्रमाणावर तर 'गारुळा' हा शब्द काहींनी वापरला. लोककथेमध्ये 'गारुळा' हाच शब्द मोठ्या प्रमाणात आढळला त्यामुळे 'गारुळा' हाच पर्याच निवडला.

(ii) इहीर तू उकारली म्हनू काय पानी तू आनला? या म्हणीवर आधारित 'शेतकऱ्याची फजिती' ही संकीर्ण विभागाला दिलेली लोककथा २५ उपकेंद्रांपैकी जवळ जवळ कोणीस केंद्रांवर व परिसरात आढळली. या कथेत 'पाखरू पाणी प्यायला आले' या घटनेला पर्याय मिळाले. साप पाणी प्यायला आला हे पर्याय ४ उपकेंद्र परिसरात मिळाले तर २ उपकेंद्र परिसरात गाय असा पर्याय आढळला. विहिरीतील पाणी पिण्यास येणारे प्राणी विचारात घेतले तर पाखरू आणि साप यांचा विचार करणे आवश्यक होते. शेतकरी पाखराला सरकारात नेतो असा उल्लेख अधिक स्वाभाविक वाटला म्हणून तो पर्याय निवडून प्रबंधात संग्रहात संपादित केला. हा पर्याय मधुकर रामभाऊ थिगळे या कथानिवेदकाकडे संग्रहित असल्याचे नोंदविले. कारण त्याचे कथानिवेदन स्वाभाविक, प्रभावी व नाट्यमय वाटले.

(२) नामदेव मुसाळ धरी
जनाबाई साळी साडी
''नामदेवा मुसाळ सोड
हाता येतील तुह्या फोड''
''फोड आले तर येऊं द्या



साळी कांडून घेऊं द्या''
साळी कांडऊन केली रास

नामदेव भरीतोय पोत–वत्सलाबाई तुकाराम मुठे मु. शेलविहीरे यांच्याकडील मौखिक परंपरेतील संग्रहात मिळाले. २५ उपकेंद्रांपैकी सुमारे एकवीस उपकेंद्रांवर हे गीत साळी सडतानाचे श्रमगीत म्हणून आढळले. त्याची गाव, दिनांक, वेळ, प्रसंग इ. सह पर्यायाची निवड कथन गीत संपादित केले.

(३) 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधात भाग २ मध्ये परिसरातील संकलित लोकसाहित्याची निवडपूर्वक संपादित संहिता केली आहे. त्यात जास्तीत जास्त विशेषांचा विचार कथन वर्गीकरण केले आहे. यात– परिसरातील लोकगीते– (१) जात्यावरच्या ओव्या (२) नवरात्रीतील गाणी (३) सण–उत्सवांची गाणी (४) दैवतांविषयीची गाणी (५) पांडुरंगाची भक्ती व संत संदर्भ (६) लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंबंधी गीते (७) भलरीगीते (श्रमगीते) (८) संकीण४ – (अ) गावांविषयी गाणी (ब) भारुडातील गाणी (क) तमाशातील गाणी–परिसरातील लोककथा (१) अद्भुत कथा (२) प्राणीकथा (३) आख्यायिका (४) दैवतकथा (५) हास्यकथा (६) संकीर्ण–परिसराची नाम व चतुःसीमा निश्चिती विषयी नोंदी–कागदपत्रे इ. गावगन्ना पाटील व तक्षीमा इ.– शब्दकोश–वाक्प्रचार (भाग १ मध्ये पृ. ३३१) – म्हणी (भाग १ मध्ये पृ. ३३३) अशा तऱ्हेने जास्तीत जास्त विशेषांची दखल घेऊन संपादन केले आहे.

(४) वरील उदाहरणांत कोणतेही फेरफार केलेले नाहीत.

(५) स्वीकृत प्रबंधात सांस्कृतिक व वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यासाचा दृष्टिकोन स्वीकारला होता त्या दृष्टिकोनास अनुसरून संहिता तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

(६) 'चाळीसगाव डांगाण परिसर' या प्रबंधात आख्यायिकांना व अन्य आवश्यक ठिकाणी खाली स्पष्टीकरण केले आहे. उदा. आख्यायिका क्र. ९ – ''हरिश्चंद्र पान्याचा रांजन''

''ह्या हरिशचंदराचा डोंगर हाये आन त्यो त्येची रानी तारामती. त्यो लांब हाये त्यो त्येचा पोऱ्या रोहीदास. ह्या डोंगरामंदी सात राजन असं. ह्या त्येली भराया सांगातलं असं. त्या राजानाली खालून का भोक असं. त्या मंदुन पानी वाहाताय पर हरिशचंदर काय थकला नाही. तो मातेर पानी भरत रयला. तवा त्यातून यक नदी निंगाली. तीचा मूळ या राजनात हाये. तवा तीला मूळा म्हनत्यात. आज

पोहत राजा हरिशचंदर पानी भरतां. आन त्ये सारखाच वाहयतोय. रोहिदासाला सर्प डसला आन तो का अजून यंठ हिंडतो. आज हरिशचंदराच्या पाया पडाया येतो. आज हरिशचंदराचा राखन कराया रोज रोज वाघ येत्यात. त्या को बराबर रातच बारा वाजेला येत्यात.''

संदर्भ : हरिश्चंद्र नावाचा गड आहे. तेथे तीन डोंगर, (शिखरे), हरिश्चंद्र तारामती आणि रोहिदास या नावाने दाखवितात. येथून मुळा नदीचा उगम आहे. बाबू महादु हिले, साकिरवाडी याने ही आख्यायिक सांगितली.– ही आख्यायिका सोमलवाडी, तळे, विहिर, कोथळे, आंबित, पाचनाई या गावातील सर्वच लोक सांगतात. वाटाडेही हीच आख्यायिका सांगतात.

(७) घुटे वाडी ग पेढ्याचा डावा
मधी सोमठाना कशाला हवा
आंब्येची फुलती लागन ती खावा
पाचपट्याच्या रानीना रातवा घ्यावा
येंची बोंब तिरड्याला न्येवा
तिरड्याच्या पाटलानं पैसं खावा –

हे लोकगीत राजाराम सखाराम गोडे यांच्या मौखिक संग्रहातून घेतलेले आहे. गावांची नावे. व्यभिचारी वृत्ती सांगणारे गीत होळीवर (परिसरात) गातांना ही आढळली. या गीताला परिसरामधील वृत्तीप्रवृत्तींचा परिवर्तनाचा अर्थही आहे. भौगोलिक, सामाजिक आणि सणोत्सव या सर्व विशेषांचे एकत्रीकरण येथे झालेले आहे. म्हणून ते संकीर्णमध्ये घातले आहे.

(८)(i) गुजरात आला वाणी कळेना बोली
मानीक चौकात दुकान मांडी
नार गेली दुकानावरी बसना खाली
नाकी सरजेची नथ झुरक मारी
दंडी कुसुबी येला वरवर सारी
जरीचा रुमाल वारा घाली
वाण्याला मुरसड आली पडला खाली
जी ऽ ग ऽ जी

भागा शंकर घाणे–वारणघुशी, याने या परिसरातील तमाशातील गाणे म्हणून दिले परंतु त्याचे पर्याय अन्य मंडळांमध्ये आढळले नाहीत. दोन तीन गावातील हौशी पोरे हे गीत म्हणताना मात्र आढळले.



(ii) सीताची गोष्ट– नावाची एक रामकथा कोदनी येथील रामदास संतु बांबेरे याने संपूर्ण रामायण एक लोककथा म्हणून ऐकवले. असे कोदनी, शेलविहिरे व रंधा या गावातच म्हणजे उपरोक्त 'तातोबाचा मठ' भोवतीच्या गावातच ऐकविले जाते. म्हणून त्याची स्वतंत्र नोंद केली आहे.

(९) पर्यायांच्या नोंदी (संख्या) संकलनात दिलेल्या आहेत. त्या प्रबंधात दिल्या असत्या तर अधिक शास्त्रशुद्ध झाले असते. येथे उदाहरणे देताना त्या देण्याचा प्रयत्न केला आहे.

(उपरोक्त सर्व उदाहरणे प्रस्तुत शोधनिबंध लेखकाच्या ''चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास'' या टंकलिखित प्रबंधातील असून १९७६ ते १९७७ या दोन वर्षात केलेल्या क्षेत्रीय अभ्यासाच्या आधाराने प्रबंधासाठी तयार केलेल्या संहितेतून दिलेली आहेत. ऑक्टोबर १९७९ या वर्षी या प्रबंधास पुणे विद्यापीठाने मान्यता देऊन पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.)

लोकसाहित्याच्या संकलन आणि संपादनावेळी अभ्यासाचा किंवा संशोधनाचा हेतु किंवा विषय व दृष्टिकोन संकल्पित अथवा निश्चित असेल तर संपादनाला नेमकी दिशा प्राप्त होते. मात्र हेतू साध्य करण्यासाठी किंवा दृष्टिकोनानुसार पर्यायांची निवड, वर्गवारी, स्पष्टीकरण, निरीक्षण नोंदींची जुळणी ओढून ताणून करता कामा नये. संपादन अत्यंत ताटस्थपूर्वक, विवेकाने व जास्तीत जास्त सूक्ष्म वर्गीकरणावर आधारित असणे अभिप्रेत असते.

**३) लोकसाहित्याचे वर्गीकरण –**

संपादनाच्या व मुख्यतः संशोधनाच्या किंवा अभ्यासाच्या दृष्टीने वर्गीकरणाला विशेष महत्त्व आहे. साधारणतः दोन प्रकाराने वर्गीकरण करणे शक्य आहे. आकृतीबंध किंवा रचनाबंध (मौखिक, परंपरेतील, वाङ्मयीन घटकातील, आशय द्रव्याची मांडणी) आणि लोकसाहित्यातून कोणता आशय प्रगट करावयाचा आहे. (विषय आणि त्याचा अनेकविध अंगांनी विस्तार). परंतु वर्गीकरणाला मौखिक किंवा भाषिक मर्यादा पडतात कारण लोकसाहित्य हे 'लोक'चे लोकबंधात्मकतेने समग्र प्रकटीकरण असते त्यामुळे केवळ शब्दरूपाकडे किंवा शब्दमांडणीकडे लक्ष देऊनच भागत नाही. लोकसाहित्याचे व्यामिश्ररूप लक्षात घेऊनच वर्गीकरणाचा प्रयत्न करावा लागतो. उदा.–

सीताला सासुरवास । आडवा लई लोट ।।
सीतालाना बोलतो । पाप्या दारातून उठ ।।

सीताला सासुरवास । केला कस केशी ।
वाटून काय दिला । सगळा देशो देशी ।।

रचनाबंधाच्या दृष्टीने या चार चरणी ओव्या आहेत परंतु त्यांना जात्याची, खुरपण्याची, कांडणाची किंवा पाणी वाहण्याची लय प्राप्त होताना दिसते. त्या त्या वेळी सादरीकरणात फरक पडतो. शब्द तेच, मांडणी तीच ठेका बदलला. ही एक बाजू. दुसरी बाजू समाजशास्त्राच्यादृष्टीने सासुरवासाची प्रथा उलगडून दाखवावी लागेल तर ऐतिहासिकतेच्या अंगाने सीता ही स्त्री जीवनाची पुराण प्रतिमा बनते. आशयाच्या अंगाने विचार करतानाही असा फरक पडत असतो. त्यामुळे वर्गीकरण करताना रचनाबंधाच्या अंगाने किंवा आशय सूत्राच्या अंगाने वेगवेगळे वर्गीकरण होऊ शकेल. त्याचबरोबर कृतीशी हे सादरीकरण निगडीत आहे. त्याचा वर्गीकरण करताना विचार करावा लागतो त्यामुळे वरील गीताचे रचनेच्या दृष्टीने 'ओव्या' तर कृती किंवा सादरीकरणाच्या अंगाने श्रमगीते (भलरी गीते) आणि केवळ आशयाच्या अंगाने स्त्रीगीते असे वर्गीकरण होऊ शकेल.

हेतु किंवा प्रयोजन किंवा संशोधन ध्येय व दृष्टिकोन यांचे वरील स्पष्टीकरणाप्रमाणे जेवढे शक्य घटक मानता येतील त्या त्या शक्य घटकांनुसार वर्गीकरण करणे संशोधन कार्याच्या स्वीकृत उद्देशानुसार अनुमाने काढण्यास उपयुक्त होते. असे स्वीकृत हेतुनुसार लोकसाहित्याचे वर्गीकरण करणे, स्वीकृत संशोधन कार्यात सुलभ व उपयुक्त ठरते. तरीसुद्धा शास्त्रीय वर्गीकरण पद्धतीविषयी संदिग्धता राहतेच. वर्गीकरणाचे अनेक प्रयत्न कथनही लोकसाहित्य विशारद नेमक्या एकमेव व अंतिम वर्गीकरण पद्धतीपर्यंत पोहचू शकलेले नाहीत. आंतरज्ञानविषया संबंधाने स्वतंत्र पायाभूत असे अस्तित्व हे लोकसाहित्याचे स्वरूप लक्षात घेतले तर अंतिम वर्गीकरणपद्धतीपर्यंत न पोहोचता येणेच स्वाभाविक म्हणावे लागते. प्रस्तुत शोधनिबंधात श्रीमती बर्न यांनी केलेले वर्गीकरण संकलनाच्या सोयीच्या दृष्टीने विचारात घेतले आहेच. परंतु असे वर्गीकरण लोकसाहित्य संशोधनपद्दतीच्या दृष्टीने विविध परंपरांना किंवा उपयोजित दृष्टिकोनांना कितपत उपयोगी पडेल याविषयी संदिग्धताच राहते.

लोकसाहित्याच्या अनेकविध वर्गीकरणांचा उल्लेख डॉ. सरोजिनी बाबर व डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपापल्या ग्रंथांतून केला आहेच. तो अभ्यासकांनी मूळातून पाहावा.

लोकगीत व लोककथा यांचे वर्गीकरण अभिव्यक्ती, आशय व रचनाबंध यादृष्टीने मराठीत बहुतेक अभ्यासकांनी दिलेले दिसते. उदा. डॉ. सरोजिनी बाबर



यांनी संपादिलेले, 'लोकसाहित्य समिती, महाराष्ट्र'ची ग्रंथमाला पाहावी. प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखकाने अशा प्रकारे वर्गीकरण कथन आपल्या 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधाची संहिता तयार केली आहे. त्याचे उदाहरण या अगोदर आले आहेच.

उदाहरणासाठी एक विषय निवडून लोकसाहित्याचे वर्गीकरण करता येऊ शकेल. उदा. 'नाशिक परिसरातील आदिवासींच्या लोकसाहित्याचा सांस्कृतिक अभ्यास' असा विषय समजा आपण निवडला तर पुढील प्रकारे वर्गीकरण करता येईल.- (१) देवाधर्मासंबंधी (२) सणोत्सवा संबंधी (३) लोकसंस्कारासंबंधी- जन्म विवाह, मर्तिक इ. (४) कला संबंधी वाङ्मय नृत्य, नाट्य, मनोरंजन, खेळ इ. संबंधी (५) सामाजिक व्यवहार (६) सांस्कृतिक अंगाने भाषिक अभिव्यक्ती.

वर्गीकरण हे अभ्यासाचे सादन आहे. साध्य नव्हे. हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. वर्गीकरण म्हणजे संशोधन किंवा अभ्यास नव्हे. मात्र वर्गीकरणासाठी निश्चित विचार दिशा असणे आवश्यक असते. वर्गीकरणामुळे लोकसाहित्याची चिकित्सा सुलभ होण्यास मदत होते. त्यादृष्टीने वर्गीकरण अधिकाधिक सूक्ष्म घटकांपर्यंत होणे आवश्यक ठरते.

वर्गीकरणाच्या सूत्रानुसार वर्गीकरण करणे शक्य असते म्हणून सूत्र स्पष्ट हवे व त्याची स्वतंत्र नोंद असावी.

संशोधकांनी आपल्या उद्दिष्टानुसार वर्गीकरण करतांनाही कोणत्याही एका सूत्रानुसार वर्गीकरण कथन संकलित लोकसाहित्याला क्रमांक द्यावेत व या क्रमांकानुसार विविध घटकांनुसार वर्गीकरण हे केवळ सांकेतिक स्वरूपात करावेत म्हणजे वर्गीकरणाचा पसारा वाढत तर नाहीच परंतु व्यामिश्रतेची जाण येते व गोंधळ टळतो. अनेक संशोधक वर्गीकरणप्रसंगी गोंधळात पडतात उदा. उपरोक्त 'सीताला सासुरवास' हे गीत वर्गीकरणात कोठे टाकायचे याची निश्चिती करणे. अशावेळी वर्गीकरणाचे शक्य घटक मानून १, २, ३, ४ असे क्रमांक दिले तर गीत त्यापैकी कोणकोणत्या घटकात मोडते ते देता येईल. रचनेनुसार 'ओव्या' असे म्हणून सामाजिक आशयानुसार म्हणताना पुढे नुसते क्र. ३ व श्रमगीते म्हणून क्र. २ या प्रमाणे जसे क्रमांक ठरविले असतील तसे दिल्यास पर्यायातील व्यामिश्रता स्पष्ट होऊन स्वीकृत हेतुनुसार वर्गीकरणही होईल. अर्थात केवळ रचनांनुसारी वर्गीकरण करणे एवढाच हेतू असेल तर तेवढेच वर्गीकरण कथन थांबता येऊ शकेल.

वर्गीकरण करताना निरर्थक वाटणाऱ्या बडबडगीतांचा, पालुपदांचा किंवा निरर्थक वाटणाऱ्या कृती इ. ची मोठीच अडचण होते. ही अडचण दूर करण्यासाठी संकीर्ण असे स्वतंत्र दालन करावे. उदा. अगोदर उल्लेखिलेल्या 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधाच्या संहितेत असे दालन केले आहे. येथेच एक इशारा देऊन ठेवला पाहिजे. बडबडगीते किंवा निरर्थक वाटणाऱ्या गोष्टी ह्याही परंपरांचे किंवा विशेष घटकांचे लोकम ानसातील अवशेष असतात. उदा. 'नीळी घोडी' हा उल्लेख निरर्थक नसून तो गावपंचायतीची म्हणजे शिवतत्त्वाची प्रतिमा आहे. चावडीत पाचामुखी परमेश्वर व तयचे अमर्याद अधिकार म्हणूनच–

त्याल नही चावडीत जाय
चावडीत व्हती नीळी घोडी
लाथामारी फडाफडी ।।

असा उल्लेख येतो. महादेव कोळ्यांच्या या दिवाळी विषयीच्या गीतातील हा उल्लेख थेट शिवतत्त्वाशी जोडता येतो. त्यातील रंग प्रतिमा परमेश्वरविषयक तर घोडी ही प्रतिमा अधिकारविषयक आहे. त्यातून गावपंचायतीचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते. वरवर पाहता मात्र गीतातील उल्लेख अगदीच निरर्थक वाटतो.

**४) संकलित लोकसाहित्याचे प्रातिनिधिक संग्रहरूप –**

कोणत्याही परंपरेने किंवा दृष्टिकोनानुसार अभ्यास करीत असताना संशोधकाने आपले संशोधन निष्कर्षाप्रत नेताना व लिखितरूपात मांडताना त्या निष्कर्षाला लोकसाहित्याचा संदर्भ (आधार) स्पष्ट व ठोस स्वरूपात देणे आवश्यक असते. त्यासाठी संहिता किंवा संग्रह स्वरूपात संकलित सामग्री मांडताना पुढीलप्रमाणे व्यवस्था स्वीकारल्यास सोयीचे ठरेल.– (१) संहिता/संग्रह तयार करण्यासाठी स्वीकृत दृष्टिकोन विषय किंवा हेतु स्पष्ट लिहावा उदा. 'लोकसाहित्याचा मानसशास्त्रीय अभ्यास', 'लोकसाहित्याचा लोकसाहित्य शास्त्रीय अभ्यासन याप्रमाणे. (२) संहिता किंवा संग्रह करताना वर्गीकरणा कोणती पद्धती स्वीकारली आहे ती स्पष्टपणे वर्णन कथन सांगावी. उदा. सांस्कृतिक आशयनिष्ठ पद्धती असेल तर धर्मकल्पना, सणोत्सव, विधिविधाने, कला, संस्कार, विविधशास्त्रे असे घटक होतील त्यानुसार ढोबळपणे वर्गीकरण कथन त्या प्रत्येक घटकात लोकसाहित्याचे प्रकारानुसार (रचना प्रकारानुसार) वर्गीकरण करता येईल. उदा. गीते, कथा, वाक्प्रचार, म्हणी, शब्दसंकेत, मंत्र, तंत्र, मांडणी वस्तु इ. (३) अशा वर्गीकरणाबरोबरच संग्राहक, स्थल, काल, प्रसंग, मनोवृत्ती, सहभागी



लोक, केंद्र इ. गोष्टी खाली स्पष्टपणाने नमूद कराव्यात. (४) अभ्यासात क्षेत्रीय केंद्रे, घटक यांना सांकेतिक चिन्हे किंवा क्रमांकही देता येतील त्यामुळे संहितेतील किंवा संग्रहातील पसारा वाढणार नाही व अधिक सुटसुटीतपणा येण्यास मदत होईल. (५) प्रातिनिधिक नोंदीबरोबरच पर्यायसंख्या देणे महत्त्वाचे असते. या पर्यायांमध्ये जर विशिष्ट अपवादात्मक (एकमेव) पाठ आढळला तर त्यांच्या नोंदी खाली स्पष्टपणे करणे अगत्याचे असते. (६) तुलनात्मक अभ्यासासाठी अशाच प्रकारची अन्य क्षेत्रातील कौश, संग्रह, संहिता वापरावयाची असेल तर त्याची नोंद स्वतंत्रपणे केलेली असावी. त्या संहिता संकलनाचा काल इ. नोंदी देणे अत्यावश्यक असते. (७) अशी संहिता/संग्रह स्वतंत्रपणे सादर करता येण्यासारखे साधन म्हणून उपयोगात येणार असल्याने त्यांच्या काटेकोरपणाला, नेटकेपणाला व सुरक्षणाला विशेष महत्त्व द्यायला हवे. (८) निष्कर्षानुसार शोधनिबंध, प्रबंध लेखनकार्य सुरू करण्यापूर्वी ही संहिता किंवा संग्रह तयार होणे गरजेचे असते. संहिता/संग्रह हाय त्या निष्कर्षांना आधार होय. लोकसाहित्याचे संपादन या मथळ्याखाली चर्चा करताना प्रस्तुत शोधनिबंध लेखकाच्या 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधाला जोडलेल्या संहितेचा उल्लेख व तीतील उदाहरणे आली आहेतच.

* * *

# २.

# लोकगीते

## (१९७६ ते १९७९ च्या क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार प्रातिनिधिक)

| गाण्याचे नांव | गायक / गायिका संग्राहक | गांव |
|---|---|---|
| **१) जात्यावरच्या ओव्या :** | | |
| (१) जाऊया पंढरी | सीताबाई शिवराम डगळे | चिंचवणे |
| (२) कृष्ण क्रिडा | वत्ससाबाई तुकाराम मुढे | शेलविहीरे |
| (३) दंडवत घालिते | अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते | सोमलवाडी |
| (४) वथीचे रान | विठाबाई भदू पटेकर | रणद बु. |
| (५) मारवती लालतोंड्या | सखुबाई तुकाराम बांबेरे | कोदनी |
| (६) मुख पाह्यला गायीचा | मंदाबाई गंगाराम बांबेरे | कोदनी |
| (७) अबंड गंगुबाई | सखुबाई तुकाराम बांबेरे | कोदनी |
| (८) नाशीक बहरी | सखुबाई तुकाराम बांबेरे | कोदनी |
| (९) रामकुंडावरी | कळसाबाई बारकु खाडे | कातळापूर |
| (१०) पहिल्या विराणी | मंजुळाबाई पुणाजी खोलके | पाचपट्टे |
| (११) पाटलाचा वाडा | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (१२) वधाली सीतानार | धवळाबाई त्र्यंबक खोकले | पाचपट्टे |
| **(२) नवरात्रातील गाणी :** | | |
| (१) आजा बाजा बेंड बाजा | शेवंताबाई संतु बांबेरे | कोदनी |
| (२) फुगडी फू | कळसाबाई बारकु खाडे | कातळापूर |
| (३) फुलली जाई | दुंदाबाई खंडू खोकले | पाचपट्टे |
| (४) बाभूल बाईचा हिरवा पाला | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (५) बाई मी खेळते गे खेळ त्या वाटाला | शांताबाई काशिनाथ सारुक्ते | सोमलवाडी |
| (६) यवढा खळा सारवू | कोंडाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (७) कळसाईचा बस घट | कळसाबाई बारकु खाडे | कातळापूर |
| (८) कोरी तबली कुंभाराची | पार्वताबाई त्र्यंबक खोलके | पाचपट्टे |
| (९) रंगाण रंगाण (कांबडावण्याचे गाणे) | काळु भोरू मघे | ठाकरवाडी चिचोंडी |
| (१०) धरते तू मात | लका रामा मघे | –''– |
| (११) भूवनी डोंगर | काळु भोरू मघे | –''– |
| (१२) डवणा | काळु भोरू मघे | –''– |
| (१३) डोंगराची कळसाई | काळु गंगाराम गांगड | –''– |
| (१४) डोंगरी नगरी | चंदर सोमा मेंगाळ | –''– |
| (१५) पाय मी कसा द्यावा | नवसू ढवळा पथवा | –''– |
| (१६) सीता गुफी मोती हार | लक्ष्मण बहीरू मेंगाळ | –''– |
| (१७) रामकुंडावर | पांडु भोरू मघे | –''– |
| (१८)असा टेंभा ना पेटला | लक्ष्मण कुषा मघे | –''– |
| (१९) लंकेचा रावन | नावजी कुसा मघे | –''– |
| (२०) सखा मारवती | भाऊ बुधा गिरे | –''– |
| (२१) सोन्याच्या डोंगरी | भाऊ बुधा गिरे | –''– |
| **(३) सणा–उत्सवांची गाणी : दिवाळी, शिमगा व इतर :** | | |
| (१) वनवा डोंगर मेघीला | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (२) दिन दिन दिवाळी | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (३) बुलिसिक वाटी | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (४) दिन दिन दिवाळी | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (५) काळ्या वावरी बेलाचे झाड | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (६) तातोबा चिंता | रामदास संतु बांबेरे | कोदनी |

| | | |
|---|---|---|
| (७) जानीगाय विली | सावळेराम रामा बांबेरे | कोदनी |
| (८) चांदोमा | रखमा तुकाराम बांबेरे | शेलविहीरे |
| (९) अटमट बाळ्या | शंकर अमृता लेंडे | पाभूळवंडी |
| (१०) काळा कोळसा झिकझिकमाव | रामनाथ अनाजी बांबेरे | कोदनी |
| (११) म्हतारी जशी डोबाडी | रामदास विठोबा करवर | बाभुळवाडी |
| (१२) हेलग्या हेलग्या | रामदास विठोबा करवर | बाभुळवाडी |
| (१३) कपीला गाय | रामदास विठोबा करवर | बाभुळवाडी |
| (१४) गायख्या | रामदास विठोबा करवर | बाभुळवाडी |
| (१५) शिमगा | शिवाजी श्रावणा भांगरे | साकीरवाडी |
| (१६) चैताची चांदणी | कोंडाबाई धर्मा भांगरे | साकीरवाडी |
| (१७) नेटकूच लागलाय डोळा गेंदबा | नारायण म्हसू दरेकर | पाचपट्टे |
| (१८) नाग्या गोसायी | पोपट रामा डगळे | पाचपट्टे |
| (१९) चाणाबाई चाणा | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (२०) गायख्या गायख्या | श्रीराम त्र्यंबक खोकले | पाचपट्टे |
| (२१) झोका खेळूया ओवी गाऊया | अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते | सोमलवाडी |

**(४) दैवतांविषयी गाणी :**

| | | |
|---|---|---|
| (१) तातोबाचा मठ | जनाबाई भदु पटेकर | रणद बु. |
| (२) दैवू मसराज | अनुसया महादु खोकले | पाचपट्टे |
| (३) लंगर लोखंडाचा | श्रीराम त्र्यंबक खोकले | पाचपट्टे |
| (४) लगीन देवाचं लागत | श्रीराम त्र्यंबक खोकले | पाचपट्टे |
| (५) गौप | श्रीराम त्र्यंबक खोकले | पाचपट्टे |
| (६) गण | पोपट रामा डगळे | पाचपट्टे |
| (७) देवा तुझा घोडा नाचतो अंगणी | नामदेव पुणाजी खोकले | पाचपट्टे |
| (८) बाणे खेळती फुगडी | दशरथ पांडुरंग पट्टेकर | रणद बु. |
| (९) कपाळी केशरी गंध | दशरथ पांडुरंग पट्टेकर | रणद बु. |
| (१०) कलाम शार शेराची पायरी | दशरथ पांडुरंग पट्टेकर | रणद बु. |
| (११) देव वाघराज | विठ्ठल बारकू खाडे | कातळापूर |
| (१२) नागदेव | लिलाबाई चिंधु पटेकर | रणद बु. |
| (१३) कारे कावळ्या | दत्तु तुकाराम कोरडे | रणद बु. |
| (१४) दान पावलं | पोपट शिवराम ढगळे | चिंचवणे |
| (१५) चिल्या बाळाचा जेवण | पोपट रामा ढगळे | पाचपट्टे |
| (१६) दार उघड बया | खंडु भदु मघे | ठाकरवाडी, चिचोंडी |
| (१७) बयाचा दार उघड | नावजी कुसा मघे | ठाकरवाडी |
| (१८) उधे ग अंबे उधे | रघुनाथ संतु खाडे | बारी |
| (१९) नवसाला पावली | रघुनाथ संतु खाडे | बारी |

**(५) पांडुरंगाची भक्ती व संत संदर्भ :**

| | | |
|---|---|---|
| (१) येरे बा विठ्ठला | अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते | सोमलवाडी |
| (२) पंढरी गाय | अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते | सोमलवाडी |
| (३) पंढरी करावी | सिताबाई शिवराम डगळे | चिंचवणे |
| (४) पंढरीचा विठू | सिताबाई शिवराम डगळे | चिंचवणे |
| (५) तुका बोलं जीजा | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (६) जीजाला पावण | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (७) विठ्ठल बोलतो | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (८) विठ्ठल मुराळी | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (९) रुसली रुखमिणी | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (१०) भाऊ बोले बहिणीशी | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (११) पंढरपुरी चोरी झाली | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (१२) वन्या गायी तुका बोले | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |

**(६) लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंबंधी गीते :**

**(i) विवाह प्रथेतील गाणी**

| | | |
|---|---|---|
| (१) हळद दळ ग | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (२) बाईला मांगना | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (३) बाईला मांगना | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |

| | | | |
|---|---|---|---|
| (४) | मैनाला मांगना | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (५) | साकाराचं पुड | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (६) | मैनाचा बहूला | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (७) | मी त मांगत नही काही | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (८) | मला कळित नाही केले ग | ठकुबाई संतु बांबेरे | कोदनी |
| (९) | दादा मी लग्नाला येते | ठकुबाई संतु बांबेरे | कोदनी |
| (१०) | राजहौसान केला येही | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (११) | गंधटीळा | अनुसयाबाई महादु खोकले | पाचपट्टे |
| (१२) | जोडा नाही तुझ्यासारखा | सखुबाई संतु खाडे | बारी |
| (१३) | किसन देवाच लगीन निगाल | पार्वतीबाई श्रावणा भांगरे | साकिरवाडी |
| (१४) | अहो विहीणबाई | हिराबाई गंगाराम बांबेरे | कोदनी |
| (१५) | हळद लावितो कोन कोन | मंदा गंगाधर पिढे | साकिरवाडी |
| (१६) | झाड हळदीच लव | मिरा गंगाधर पिढे | साकिरवाडी |
| (१७) | धुळ राजाना तोडली | आशाबाई नामदेव भांगरे | साकिरवाडी |
| (१८) | खाड्याची कन्या केली | सखुबाई भागा बांबेरे | कोदनी |
| (१९) | भीमराजाचा अर्धाराज | सखुबाई संतु खाडे | बारी |
| (२०) | इहिनींनो इनविते तुम्हाला | पार्वताबाई गंगाराम बांबेरे | कोदनी |
| (२१) | बोळवण | सिंधुबाई गंगाराम म्हशाल | भोजदरी |
| (२२) | माझ्या बांधवाचा मळा | आशाबाई नामदेव भांगरे | साकिरवाडी |
| (२३) | मामाच्या नगरी जावय काय मांगतो | ठकुबाई संतु बांबेरे | कोदनी |
| (२४) | गाडी बनवरे | आशाबाई नामदेव भांगरे | साकिरवाडी |
| (२५) | गाडी का कलली | जनाबाई भदु पटेकर | रणद बु. |

**(ii) जन्मप्रथेतील गाणी**

| | | | |
|---|---|---|---|
| (२६) | देवयबाई बाळवंतीन | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (२७) | माझ्या अंगणी बाई रंगणी | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (२८) | पाळणा | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (२९) | बाळ टाकीले पाळणी | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (३०) | विठूच्या दरुज्यावर | ठकुबाई संतु बांबेरे | कोदनी |
| (३१) | झोका देती | ठकुबाई संतु बांबेरे | कोदनी |

**(७) भलरीगीते (श्रमगीते) :**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | देते तांदळाला धाऊ | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (२) | पाती माग चाली पात | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणीत |
| (३) | रामराम म्हणू आवण्या करताना | नामदेव पुणाजी खोकले | पाचपट्टे |
| (४) | सीताला सासुरवास | सीताबाई शिवराम खोकले | पाचपट्टे |
| (५) | सीताला वनवास | विठाबाई गणपत शिळकंदे | पाभुळवंडी |
| (६) | मशा डुबात निघाला | पोपट रामा डगळे | पाचपट्टे |
| (७) | जनी जाते ओ शेनाला | अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते | सोमलवाडी |
| (८) | नामदेव मुसाळ धरी | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (९) | गाईख्यारं बाळा | वसंत धोंडु रेंगडे | गोंदुशी |
| (१०) | नांदया चालुंदी आऊत | रघुनाथ संतु खाडे | बारी |

**(८) संकीर्ण :**

**(अ)**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | आमची गांवा | विठ्ठल गणपत शिळकंदे | पाभुळवंडी |
| (२) | अस माझ गाव | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (३) | कूट संवाद | धोंगडे रामदास हनुमंता | शेणीत |
| (४) | डांगाण गावांची ओळख | पोपट रामा डगळे | पाचपट्टे |
| (५) | वाड्या | दत्ताराम सखाराम गोडे | तिर्ढे |
| (६) | बाळ लष्करी गेला | अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते | सोमलवाडी |
| (७) | केळी सांगी | सुरेश डुंढा खोकले | पाचपट्टे |
| (८) | पाटलाना पैसं खावा | राजाराम सखाराम गोडे | तीर्ढे |
| (९) | वाढी | नामदेव पुणाजी खोकले | पाचपट्टे |

| | | |
|---|---|---|
| (१०) कोडे | श्रीराम त्र्यंबक खोकले | पाचपट्टे |
| (११) गावाच्या पीपळा | हरीदास भाऊ बांबेरे | कोदनी |
| (१२) धन्य धन्य लक्षे पती | सावळेराम रामा बांबेरे | कोदनी |
| **(ब) भारूडातील गाणी : (कथागीते)** | | |
| (१३) श्रावणबाळ | देवराम रामा पटेकर | रणद बु. |
| (१४) सिरीयाल राजेच्या घरी महादेव | हिराबाई पांडु पटेकर | रणद बु. |
| (१५) वैराळ रूप | लिलाबाई चिंधु पटेकर | रणद बु. |
| (१६) वाल्मिक झाला | जनाबाई भदु पटेकर | रणद बु. |
| (१७) दामुशेटी | हरीभाऊ वाघु भोईर | शेलद |
| (१८) नामदेव | रामभाऊ बुधा साबळे | शिळवंडी |
| **(क) तमाशातील गाणी :** | | |
| (१९) इचारान | सखाराम शिवराम डगळे | चिंचवणे |
| (२०) घरी जायाची लजा मला वाटली | देवराम भाऊ डगळे | चिंचवणे |
| (२१) किती शिकाऊ येनु तुला | पांडुरंग भगवंता लगड | पिंपळगाव नाकविंदे |
| (२२) उभी राय उभी राय | वामन भाऊ लिले | गोंदोशी |
| (२३) मई आली | हरीदास भाऊ बांबेरे | कोदनी |
| (२४) बागां मंधी पिकली संत्री | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (२५) सुंदरा गराणी | संपत तुकाराम चव्हाण | शेणीत |
| (२६) गण | लेंडे शंकर अमृता | पाभुळवंडी |
| (२७) गण | नामदेव पुणाजी खोकले | पाचपट्टे |
| (२८) शुभाचा कंटाळा येतो | बाळु महादेव ठिले | साकिरवाडी |
| (२९) उलट्या कलीचा न्यायी | राजाराम चिंधु आंबेरे | कोदनी |
| (३०) ऐका पंडिता | संतु धोंडीबा बांबेरे | कोदनी |
| (३१) चाकरी सोन्याची सूरी | संतु धोंडीबा बांबेरे | कोदनी |
| (३२) भाऊ माझा हावशी | संतु धोंडीबा बांबेरे | कोदनी |
| (३३) गुजरातून आला वाणी | भागा शंकर घाणे | बावनघुशी |



# (१) जात्यावरच्या ओव्या

## (१) जाऊया पंढरी

सकाळी उठूनी जाऊया पंढरी
पंढरी जाऊन उभे राहू विटेवरी ।।
जाईल पंढली उभी राहील धोंड्यावरी
नजर गेली माझी रुक्मीनीच्या गोंड्यावरी ।।
जाईल पंढरी उभी राहील चीचावरी
नदार गेली माझी विठ्ठलाच्या तुऱ्यावरी ।।
माझ्या ना दर्शेनाची चीता पडली हारीला
पंढरी जाऊनी नाग्या यड्याला पाहीला ।।
आईबापा घरी पंढरी ग्येलं याड
तीरीत नही झालं पायाचा दिलं भाड ।।
पंढरी करावा आईबापाच्या पुन्याना
अंघूळ करावा चंद्रभागीच्या पान्याना ।।

**– सीताबाई शिवराम डगळे, चिंचवणे**

* *

## (२) कृष्ण क्रिडा

दुडीवरी दुडी गवळणी आल्या लई
सोड किसणां वाट दुधाची झाली कोयी ।।
दुडीवरी दुडी गवळणी आल्या बारा
सोड किसणा वाट दुधाच्या झाल्या तारा ।।
दुडीवरी दुडी गवळणी आल्या पाच
सोड किसणा वाट दुधाची झाली नाव ।।
दुडीवरी दुडी गवळणी आल्या घोड्या
कळंबणाच्या खोडी किसणा मारी तोई खड्या ।।
दुडीवरी दुडी गवळण चालली येकली
कळंबाच्या खोडी किसना आरूळी ठोकली ।।

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

## (३) दंडवत घालिते

पहिला माझा दंडवत बाई पहीला माझा दंडवत
विसया पासून बाई विसया पासून
सावळ्या पांडुरंगा बाई सावळ्या पांडुरंगा
यावे रथात बसून बाई रथात बसून ।।
दुसरा माझा दंडवत बाई दुसरा माझा दंडवत
चंद्रभागच्या अलकड बाई चंद्रभागच्या अलकढ
सावळ्या पांडुरंगा बाई सावळ्या पांडुरंगा ।।
हात जोडीत बाई हात त्येला जोडीत ।।
तिसरा माझा दंडवत बाई तिसरा माझा दंडवत
चंद्रभागच्या वाळवंटी बाई चंद्रभागच्या वाळवंटी
असा बोलत नामदेव बाई असा बोलत नामदेव
पुंडलीकाना दिल्या भेटी बाई पुंडलीकाना दिल्या भेटी ।।
चौथा माझा दंडवत बाई चौथा माझा दंडवत
चढे घाटाच्या पायिऱ्या बाई का घाटाच्या पायीऱ्या
अशी देयाई रे भेट देयाई रे भेट
इट्या वरील्या सोयीऱ्या बाई इट्या वरील्या सोयीऱ्या ।।
पाचवा माझा दंडवत बाई पाचवा माझा दंडवत
नामाची पयली पायरी बाई नामाची पयली पायरी
असा सन्मुख दिसतो असा सन्मुख दिसतो
चोखा मेळा तो बाह्येरी चोखा मेळा तो बाह्येरी ।।
सावा माझा दंडवत बाई सावा माझा दंडवत
मी त बसले बारीली मी त बसले बारीली
माझ्या दर्शनाची चीता बाई माझ्या दर्सनाची चीता
चीता हारीला पडली बाई चीता हारीला पडली
सातवा माझा दंडवत बाई सातवा माझा दंडवत
ग्येले राऊळाच्या कोना बाई ग्येला राऊळाच्या कोना
अशी दीये मला भेट बाई दीये मला भेट
इट्या वरील्या मोहना इट्या वरील्या मोहना ।।



**– अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते , सामलवाडी**

* *

## (४) ववीचे रान

पयली मही ववी ग ववीचेही रान
जाईल शरन अीठलाच्या जाईल शरन अीठलाच्या ।।
दुसरी मही ववी ग दूर नही कोठे
जनी मधी भेटे पांडुरंग पांडुरंग ।।
तिसरी मही ववी ग तिरकमठाई
परतुन येना नही सहुंसारी सहुंसारी ।।
चवथी मही ववी ग वारी चवऱ्यांशी
सारा चित हारी नामापाशी नामापाशी ।।
पांची मही ववी ग पाची पारबती
ववाळीला पती रुखमीनीचा रुखमीनीचा ।।
साही मही ववी ग साहीया साटूला
जाईल राऊळा इंठलाच्या इठलाच्या
साती मही ववी ग सातीया सूरती
पाहील्या मूरती अीठलाच्या अीठलाच्या ।।
आठी मही ववी ग आळंदीला जाया
अीटेवरी उभा देवूराया देवूराया ।।
नयी मही ववी ग नऊ लाख सोना
अीठल म्हन रुखमीना लेना लियाच्या लेना ।।
दाही मही ववी ग दाही आवुतारी
परतुन येमानही संहुसारी सहुंसारी ।।
आकारायी मही ववी ग आकरा यकादशी
घाला येरझरा पंढरीशी पंढरीशी
बारावी मही ववी ग बारा पीठ मीट
वाट धरा नीट पंढरीची पंढरीची ।।

**– विठाबाई भदु पटेकर, रणद बु.**

* *

## (५) मारवती लाल तोंड्या

सकाळ उठूनी उघडीते कडी खोंड्या
देवू मारवती नदर पड लालतोंड्या ।।
सकाळ उठूनी मी निघाले बाह्येरी
देवू मारवतीची नदर पडली पायरी ।।
सकाळ उठूनी मी करी झाड लोट
देवू मारवतीची मह्या दारातून वाट ।।
सकाळ उठूनी मला येशीकं जायाबा
देवू मारवती मला दर्शन दीयावा ।।
देवूजीना दिलंमला दैवना दासीच
घुसळाया दिलं दूध पाराठ्या म्हसीचं ।।
देवू मारवती धरीते तुझं पायी
आंधी करमही सोयी मंग आंघुळीला जायी ।।
पान्हवटेच्या वाट शेंदूर सांडला नवा
देवू मारवती आंघुलीला ग्येला कवा ।।
पान्हवटेच्या वाट शेंदूर सांडत जाया जाया
देवू मारवती तू चाल मह्या वाड्या
शेंदराच्या पुड्या टाखीते पायी घड्या ।।
दळान दळून मी त दळला शेंदूर
देवू मारवती कसा येयीना आजून ।।
दळान दळून ठ्येवली परात भरून
मह्या ग वाड्याला येता नही कूपकाटी
देवू मारवती गस्त घालितोय राती ।।
मह्या ग वाढ्याला नकु कुपकाटीचा गराडा
देवू मारवती हाये शिपाई रोकडा ।।
सोन्याची घरा दारा चांद्याची इंद्रबाह्या
देवू मारवती निंगाला लंका पाह्या ।।
सोन्याची घरदार चांदीची कवाडा
देवू मारवती करी लंकाचा निवाडा ।।
तपामंदी तप तप आंजनीचा मोठा
जलमीला मारवती आंजनीच्या कानावाटा ।।
तपामंदी तप अंजेनीचा भारी



देवू मारवतीना ऊचलीला गीरी ।।
आंजनी माता डोळं उघडुनी पाह्ये
गेली पताका लाल अंजनीचा हाये ।।
भरलेही सभा ढवला मुंढेचेही लोक
देवू मारवती लाल बनातीचा यक ।।
दळण दळीता जात फीरं भरा भरा
देवू मारवतीचा गाडा चालतो भराभरा

**– सखुबाई तुकाराम बांबेरे, कोदनी**

* *

## (६) मुख पाह्यला गायीचा

सकाळ उठूनी मुख पाह्यला गायीचा
माझ्या अंगणात झाड तुळशीबाईचा ।।
सकाळ उठूनी मुख पाह्यला एकीचा
माझ्या अंगणात झाड तुळशी सखीचा ।।
सकाळ उठूनी झाडीते अंगणवाडा
मह्या अंगणात तुळशीबाई तुही झाडां ।।
सकाळ उठूनी झाडीते मी पायरी
तुळशीबाईना दारी आनली पंढरी ।।
सकाळ उठूनी काढी दाराचीया कडी
तुळशीच्या रानी किसना मारीतोयी दडी ।।
मह्या अंगणात तुळशीबाईचा बंगला
देऊ इठलबाई शिड्या लावून यंगला ।।
तुळशीबाई नको हिंडूत रानोरानी
मह्या अंगणात तुला घालीत्ये मी पानी ।।
तुळशीबाई नकु हिंडू तु लवाला
आईचा तान्हा बाळ तुझ्या ठ्येविला सेवला ।।

**– मंदाबाई गंगाराम बांबेरे, कोदनी**

* *

## (७) अभंड गंगुबाई

विणा खांढीमंदी विंणा बाजाता सवई

तीरमक राजाचा नीळ परभात जाबाई ।।
निंगाली गंगुबाई झाड उंबराच्या खोडी
परगंधा झाली कुशावर्ता थोडी घोडी ।।
निंगाली गंगुबाई जाग जाग कपारीली
तीरमक राजाना अंघुळीला व करली ।।
निंगाली गंगुबाई दुधतुपाच्या उकळ्या
तीरमक राजाना जटा सोडल्या मोकळ्या ।।
तीरमक राया जटा आपटी रागा रागा
अभंड गंगुबाई ग्येली गोसायाच्या मागा ।।
तीरमक राया जटा आपटी ठाई ठाई
अभंड गुंगुबाई येला आकाळली नही ।।
किल्या मंदीकिला बरमकिला आवघड
गंगा दारामंदी हाये कुरुडाचा झाड ।।
किल्या मंदी किला बरम किला हाये सोपा
गंगा दारामंदी लवलाही मोटा चाफा ।।
किल्या मंदी किला बरम किला हाये उंच
गंगा दारामंदी कोना लावली हे चींच ।।
पडतो पाऊस शीरीहाराच्या गावात
पाणी गढूळीचा गंगा चालली धावत ।।
पडतो पाऊस शीरीहारीच्या मुलकात
पाणी गढुळीचा गंगा चालली फुगत ।।
कुशावर्ती तळा पानी कशाना आटला
तीरमक रायाना इचा लगीन थाटला ।।
अभंड गंगुबाई तांब्या घेई सकामाजा
तीरमक राजाप चुडा मागील काकनाचा ।।
कुशावर्ती तळा पानी मिळना पियाला
साला आष्टांगाची आलं गोसायी नह्याला ।।
कुशावर्ती तळा पानी मिळ वाटी वाटी
साल आष्टांगाची निगं गोसायाची दाटी ।।
कुशावर्ती तळा पानी दिसं काळा निळा
अंघुळीला आली नंगी गोसायाची बाळा ।।



अड्याल पड्याल बामन करी सेवा
गंगुसत्वधार पान्यामंदी जळ दिवा ।।
अड्याल पड्याल दोनी बामन बोलती
गंगुसत्वधार मंदी नागीन डुलती ।।
अड्याल नासिक पड्याल हाये पंचेवटी
गोऱ्या रामजीचा मला दर्शन घीयाची ।।
तीरमक राया म्हन गंगु माझी ती पहेली
अभंड मागती गांव नासीकी आहेली ।।
तीरमक राया म्हन गंगु माझी पहेली भेटी
आलीन मागती गांव नाशीक पंचेवटी

**– सखुबाई तुकाराम बांबेरे, कोदनी**

✻ ✻

## (८) नाशीक चहरी

नाशीक चहरी काय पहावा ख्येडाला
लावल्या आरस्या शीरीमंताच्या वाड्याला ।।
नाशीक चहरी कोन्या गलीनामी जावा?
आईचा तानाबाळ सीता गुफा मला दावा ।।
नाशीक चहरी गलीगलीना कसार
सीता चुड्याली दिली रामानं इसार ।।
नाशीक चहरी गल्यागल्यानी घायपता
सीताच्या चुड्याली नही रामाला आयपता ।।
नाशीक चहरी गल्यागल्याना खंदील
सीताला पाताळ रामरायाला मंदील ।।
नाशीक चहरी कशाचा कालाम्येला
कारंज्याचा पानी उदतायी माला माला ।।
नाशीक चहरी अहील्या बाईचा माह्येर
जरीचा पाताळ केला सिंध्यानी आह्येर ।।

**– सखुबाई तुकाराम बांबेरे, कोदनी**

✻ ✻

## (९) रामकुंडावरी

राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा कोणा बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा कोळणी बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा ठाकरणी बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा गुजरणी बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा कानड्या बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा मराठणी बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा बामण बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा कुंभारनी बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा सुतारनी बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा
बाई हिरवा मंडप जाईचा
आंघुळीला आला मेळा बेलदारनी बायांचा ।।
राम कुंडावरी हिरवा मंडप जाईचा



बाई हिरवा मंडप जाईचा

आम्रिता परीस बाई पानी ह्या कुंडाचा ।।

**– कळसाबाई बारकु खाडे, कातळापूर**

* *

## (१०) पहिल्या विराणी

पह्यला माझा दंडवत बाई पह्यला माझा दंडवत
पह्यल्या विराणी
लागले भजनी कळसाईच्या ।।
कळसाईचा डोंगर कड्यानी येंगना
निश्चेय ढळना दर्सन घियाचा ।।
दुसरा माझा दंडवत बाई दुसरा माझा दंडवत
हीरीचंदराच्या महादेवा
लागले भजनी महादेवाच्या ।।
महादेवाच उपास करीता करवनी
निश्चेय ढळनी उपासाचा ।।
तीसरा माझा दंडवत बाई तीसरा माझा दंडवत
रणदाच्या खालती
लागले चरणी घोरपड्याईच्या।।
घोपरड्याईचा नवस फेडता फेडवनी
सोन्याचा जावाळ काढीला जाऊनी ।।
चवथा माझा दंडवत बाई चवथा माझा दंडवत
कोदनीच्या जवळी
तातुबाची सावूली माला मीळाली ।।
तातुबाची सावूली मीळता मीळानी
तींठम्या पाह्यली साताई मावली ।।
पाचा माझा दंडवत बाई पाचा माझा दंडवत
अम्रीतेश्वराला
अम्रितेश्वराचा तीरथ मीळावा ।।
अम्रितेश्वराचा तीरथ घ्येतला

संवसार सांढीला आवडीना ।।
साहा माझा दंडवत बाई साहा माझा दंडवत
टाकारीच्या आईला
भवानीमातालापाहीला तेथ ।।
भवानीमाताचा देवूळ पाह्येला
अनभाव फिटला जलमीचा ।।
साता माझा दंडवत बाई साता माझा दंडवत
टाकेदा खालती
तीरतात नहाले काशीच्या मी ।।
काशीचा तीरत रामाना आणीला
मरान चुकला जटायुचा ।।
आठा माझा दंडवत बाई आठा माझा दंडवत
नासकाच्या खालती
पाहीन डोळ्यानी तीरमकाला ।।
देवाचा प्रसाद माहेना घरात
महादेव दारात येती माझ्या ।।
नवा माझा दंडवत बाई नवा माझा दंडवत
मनाच्या मनात
लागले चरणी आत्मारामा ।।
जलमाचा फेरा चुकावा येऊन
आले मी शरन आत्माराम ।।

**– मंजुळाबाई पुणाजी खोकले, पाचपट्टे**

* *

## (११) पाटलाचा वाडा

पाटलाचा वाडा कसा गावत उठतो
साऱ्याना गावावं साया आपली धरितो ।।
वाड्याच्या दाराला येलबुटीची किनार
येल्यांमंदी सोबे बाई सोग्याच मोठ मोरं ।।
त्या मोराच्या ग डोई बाई सोबतो मोठा तुरा
विठूग पाटलाचा बाई उभ्या गावाला दरारा ।।



वाड्याच्या ना भिती जस किल्याच ग तट
वाड्याचीना माडी दिसती कसी नीट ।।
वाड्याच्या वाड्यामंदी गाईगुराच सपार
सांज सकाळूच काना काढीतोय धार ।।
मोठ बाई घर दळण लागन मणाचं
रोजच्या रोज पावन हालना दाराचं ।।

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

## (१२) वधाली सीता नार

रामजी बोलते, ''लेक्षमणा माझ्या भावा
वधाली सीता नार तिला वनमाला ठ्येवा'' ।।
सीताबाई बोले ''मला वधाने नेमात
लक्षेमणा दिरा मला नेता कोनत्या वनात ।।''
''वधाली सीता नार तीला वनमाला द्यावा
नऊ महिन्याचा आन वज कुडतो रामाचा ।।
तान लागली वनात सुरुच्या काड्या पानी
पळसाच्या डवऱ्यात सुरुच्या काड्या पानी ।।
लक्षेमण दिरा तान लागली आगळी
सुरडाच्या काड्या पानी केळीच्या आगळी ।।
वधली सीता नार आणला इचा घट
केगची केसान जेवली दुध भात ।।
वधली सीता नार आणला इचा हात
केगयी केसानं जेवली दुध भात ।।
वधली सीता नार आनिला इचा पाई
केगयी केसानं वनातून वागतई ।।
रामाचा वचन बाई मोडीलं जोडील
सीताच मरान बाई कसा ग घडील ।।
रामाचा ग वज वाढला दिस दिस
सीताच्या ना पोटी जलमलं लव कुस ।।
लवकुस बाई बाई मांडलाग युद्ध

केगई केसान राम खेळलाची युद्ध
रामचा युद्ध बाई चाललायी सात दिस
के वाई केसान जिकीलं लवकुस ।।

**– धवळाबाई त्र्यंबक खोकले, पाचपट्टे**

* *

## (२) नवरात्रातील गाणी

### (१) आजा बाजा बेंडबाजा

आजा बाजा बेंडबाजा
आजा बाजा बेंडबाजा
कुठं वाजतो बेंडबाजा
कुठं वाजतो बेंडबाजा
झुनुक राजाच्या माडीवरी
झुनुक राजाच्या माडीवरी
झुनुक राजा तुझी कन्या
कन्या कोनाला देऊ केली
कन्या कोनाला देऊ केली
दशरथ राजाला देऊ केली
दशरथ राजाला देऊ केली
दशरथ राजाच्या खांद्यावरी
दशरथ राजाच्या खांद्यावरी
नवरी गेली त्येच्या घरी
नवरी गेली त्येच्या घरी
मी आल्ये मपल्या घरी
मी आल्ये मपल्या घरी

**– शेवंताबाई संतु बांबेरे, कोदनी**

* *

### (२) फुगडी फू

सांदीकोंदीना पडल्यात गहू
त्याच्या चपात्या केल्यात नवू
यक चपाती काय गे क्येली
मझ्या भावाला निऊन दिली
तुझ्या भावाना काय ग दिली
मझ्या भावाना भिंगरी दिली
भिंगरीची तार तुठ
मझ्या फुगडीचा दनका उठ

**– कळसाबाई बारकु खाडे, कातळापूर**

* *

### (३) फुलली जाई

फुलली जाई येल मांडवी ग्येला ग जाई
आईबापानी तुला माह्येरी न्येला
काय काय बोळवण क्येली ग सई
आईबापानी माला माह्येरी नेला
नतीची बोळवण गेली ग सई ।।१।।
फुलली जाई येल मांडवी ग्येला ग जाई
आईबापानी तुला माह्येरी न्येला
काय काय बोळवण क्येली ग सई
आईबापानी माला माह्येरी नेला
लुगड्याची बोळवण गेली ग सई ।।२।।
फुलली जाई येल मांडवी ग्येला ग जाई
आईबापानी तुला माह्येरी न्येला
काय काय बोळवण क्येली ग सई
आईबापानी माला माह्येरी नेला
चोळीची बोळवण गेली ग सई ।।३।।
फुलली जाई येल मांडवी ग्येला ग जाई
आईबापानी तुला माह्येरी न्येला
काय काय बोळवण क्येली ग सई
आईबापानी माला माह्येरी नेला
चुड्याची बोळवण गेली ग सई ।।४।।
फुलली जाई येल मांडवी ग्येला ग जाई

आईबापानी तुला माह्येरी न्येला
काय काय बोळवण क्येली ग सई
　　आईबापानी माला माह्येरी नेला
　　फडकीची बोळवण गेली ग सई ।।५।।
फुलली जाई येल मांडवी ग्येला ग जाई
आईबापानी तुला माह्येरी न्येला
काय काय बोळवण क्येली ग सई
　　आईबापानी माला माह्येरी नेला
　　येलाची बोळवण गेली ग सई ।।६।।
फुलली जाई येल मांडवी ग्येला ग जाई
आईबापानी तुला माह्येरी न्येला
काय काय बोळवण क्येली ग सई
　　आईबापानी माला माह्येरी नेला
　　वटीची बोळवण गेली ग सई ।।७।।

**– दुंदाबाई खंडु खोकले, पाचपट्टे**

* *

## (४) बाभूळ बाईचा हिरवा पाला

बाभूळ बाईचा ग
　　बाईचा हिरवा पाला
कोण्या देशाचा ग
　　देशाचा जोगी आला ।।
त्येच्या खांद्यावरी ग
　　खांद्यावरी मोहरी पवा
आई त्येनी ग
　　नाटकी बाजा क्येला ।।
आई मला देशील ग
　　देशील कोनत्या घरी?
बाई तुला देईल ग
　　देईल ग गवळ्या घरी ।।
आई नकु ग
　　नकुग गवळ्या घरी ।।
ताकपाणी ग
　　करीता जीव महा जाई ।।
आई मला देशील ग
　　देशील कोनत्या घरी?
बाई तुला देईल ग
　　देईल कोळ्या घरी ।।
आई नकु ग
　　नकुग कोळ्या घरी
भाता कांडता ग
　　कांडता जीव महा जाई
आई मला देसील ग
　　देशील कोनत्या घरी?
बाई तुला देईल ग
　　देईल ठाकरा घरी ।।
आई नकु ग
　　नकु ग ठाकरा घरी
डोंगर यंगता ग
　　यंगता जीव महा जाई ।।
आई मला देशील ग
　　देशील कोनत्या घरी ?
बाई तुला देईल ग
　　देईल मराठ्या घरी ।।
आई नकु ग
　　नकुग मराठ्या घरी
भाकर थापिता ग
　　थापिता जीव महा जाई ।।
आई मला देशील ग
　　देशील कोनत्या घरी?
बाई तुला देईल ग
　　देईल राजाच्या घरी

आई नकु ग
        नकु ग राजाच्या घरी
पलंगी लोळता ग
        लोळता जीव महा जाई ।।
बाई तू जाशील ग
        जाशील कोनत्या घरी?
आई मी जाईल ग
        जाईल तीकोल्या घरी
जोग्या संग ग
        संगच सुखी राही ।।

**– अनुसयाबाई महादु खोकले, पाचपट्टे**

* *

## (५) बाई मी खेळते ग खेळ त्या वाटाला

बाई मी खेळते गे खेळ त्या वाटाला
तीकून आली वाऱ्याची झुळूक
        वाऱ्याची झुळूक
नेली माझी सुपली ग सुपली
        सुपली ग सुपली
तीकून आला गायख्या ग गायख्या
        गायख्या ग गायख्या
सपरावरची सुपली काढली ग काढली
        काढली ग काढली
गायख्या ग्येला वाटाला ग वाटाला
        वाटाला ग वाटाला
सुपली आली हाताला ग हाताला
        हाताला ग हाताला
सुपलीत बयेला तळाण ग तळाण
        तळाण ग तळाण
त्येचा बयेचा फुलवरा ग फुलवरा
        फुलवरा ग फुलवरा



फुलवरा बाहांदला नवसाचा गा नवसाचा
        नवसाचा ग नवसाचा
नवसाचा नवस फीटला ग फीटला
फेरा वाऱ्याव सुटला ग सुटला

**– शांताबाई काशिनाथ सारुक्ते , सोमलवाडी**

* *

## (६) यवढा खळा सारवू

यवढा खळा सारवू सारवू
सेंगा वाळात घालू घालू
येक शांग उडाली उडाली
खिडकीत जाऊन बुडाली बुडाली
खिडकीला आला लोंढा लोंढा
भिजलाय माझा गोंडा गोंडा
गोंड्याच्या हाती रुपाया रुपाया
भाऊ महा सीपाया सीपाया
सिपाय सीपायाची बायकू बायकू
तीचा नका आयकू आयकू
केशर गोंडा केशाचा केशाचा
भाऊ माझा देशाचा देशाचा
देश कथन भागला भागला
डाया चुलीत हागला हागला
त्येच्या केल्या रेवड्या रेवड्या
यक देऊ काशीला काशीला
यक देऊ भाशीला भाशीला
भाशीच्या पायात तांब्या तांब्या
मह्या भावाने बैल घ्येतला
        त्येचा नाव नांद्या नांद्या
मह्या पायाव भाशी भाशी
मह्या भावान बायकू केली
        तीला नाव काशी काशी
काशीचा कुकू लाल ग लाल ग

म्हतारे पकव घाल ग घाल ग

**– कोंडाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

## (७) कळसाईचा बस घट

चाणी म्हन मी कयाची रानी
अना सवय गंगाच पानी
मला सवय साळीचा भात
बंधु ज्येवत रघुनात
त्याची जेवनात निघाली काडी
त्यायी काडीची बांधीली माडी
त्यायी माडीचं रंगीत खांब
त्यायी खांबीला काढल मोरं
त्याची मोराचं उलीले पायी
बंधु बोलतो कळसाईला जाई
कळसाईला बसला घट
कळसाईचा आवघाड घाट
त्याची घाटाना चालले नीट
बंधवाना मारीला गाठ
गाठीव गाठी बसल्या सात
कळसाईला जात्ये धरून हात
हाता हाताना धरीला दोन
सहूसाराचा उतारला भार

**– कळसाबाई बारकु खाडे, कातळापूर**

* *

## (८) कोरी तवली कुंभाराची

कोरी तवली कुंभाराची सके ग
त्येच्यात भाजी निंबाऱ्याची कसे ग
इहीन आली टवकाऱ्याची सके ग
मनाचा केला भाव सके ग
इहीन म्हणे शीत शीत सके ग
मनाची केली दाळ सके ग



इहीन म्हने झाली दाळ सके ग
अशी इहीन जेवली जेवली
कोरी तवली फुटली फुटली

**– पावईतीबाई त्र्यंबक खोकले, पाचपट्टे**

* *

## (९) रंगाण रंगाण (कांबडावण्याचे गाणे)

रंगाण रंगाण ऽऽ हे
मातीच रंगाण ऽऽ हे
येई रं रंगणात
    आजुच पायी दिला ऽऽ हे
    आजुच नाच केला ऽऽ हे
धुळवडा उठईला ऽऽ हे
गंगणाला गेला ऽऽ हे
गंगणाला गेला ऽऽ हे
चंद्र सूर्या झाकोळला ऽऽ हे

**– काळू भोरू मघे, ठाकरवाडी चिचोंडी**

* *

## (१०) धरते तू मात

धरते तू मात
    रूसवा ना धरी जो ।।
रूसवा ना धरी जो
    तुझ्या पाया मी पडितो
तुझी किरपा मी पाह्यतो
तुला कपाळी लायीतो
धरते तू मात
    रूसवा ना धरी जो ।।
रूसवा ना धरी जो
    तुला नाक मी घासीतो
तुझ्या पाया मी पडितो

**– लका रामा मघे, चिचोंची–ठाकरवाडी**

### (११) भुवनी डोंगर

भूवनी डोंगर
आहे तीन रं माजल्या
पहील्या मजल्यात
अशी सोनकी पूजीली
अशा दुसऱ्या मजल्यात
अशीवंबी उबळले
अशा तीसऱ्या मजल्यात
आईबाईचा ठाणा क
आईबाई कळसाबाई
असा यावा रींगणात
असा भूवनी डोंगर
आहे तीन रं माजल्या

**– काळू भोरू मघे, ठाकरवाडी–चिचोंडी**

✻ ✻

### (१२) डवणा

दऱ्यान दिली ह्याच रं
आन उटी बा बसविली
तीळ्या का उटीला
आन उवणा पेरीला
असा तो ही का डवणा
वाढीला रोढीला
अशा ती ही का डवणा
फुलाया लागलं
ते डवण्याच्या फुलं
बहीरीच्या पूजाला

**– काळू भोरू मघे, ठाकरवाडी–चिचोंडी**

✻ ✻

### (१३) डोंगराची कळसाई

डोंगराची कळसाई
बया कळसाई ग
दुधाना ना नली बया
दुधाना ना नली या ग
पीतांबरी नटली बया
पीतांबरी नटली ग
दागाना फुलली बया
दागाना फुलली

**– काळू गंगाराम गांगड, ठाकरवाडी–चिचोंडी**

✻ ✻

### (१४) डोंगरी नगरी

डोंगरी क नगरी काटी पीवळी रं
इंद्याचा भार झाला खाली बाई लवली गं
गावची सुपारी मला मूळ
इठून आजुबा किती दूर
घोड्याव घातील जीन, राघुबा
घोड्याव घातील जीन
पळशीला पानां तीन राघुबा
पळशीला पानां तीन
आनली ग पळवूनव, राघुबा
आनली ग पळवून
डोंगरी क नगरी काटी पीवळी रं
इंद्याचा भार झाला खाली बाई लवली गं

**– चंदर सोमा मेंगाळ, ठाकरवाडी–चिचोंडी**

✻ ✻

### (१५) पाय मी कसा द्यावा

डांगरीच्या आळ्याव
पाय मी कसा द्याव
शके माझ्या मेव्हणीच
नाव मी कस घ्याव

माझी मेव्हणी रुपाची
कशी सोन्याची चांदीची
तीळ्या नावाना भरली
मह्या मनाची ग दरी
डांगरीच्या आळ्याव
पाय मी कसा द्याव
शेके माझ्या मेव्हणीच
नाव मी कस घ्याव

**– नवसू ढवळा मधवा, ठाकरवाडी–चिचोंडी**

* *

## (१६) सीता गुफी मोती हार

दऱ्याच्या कडलं सीता गुफी मोती हारं
उघड सीता दार
मला पाहुंदी मोती हार
कसा उघडू मी दार
घरी लक्षेमण दीर
सीता येबुंदी ग मला
हार घालीन तुझ्या गळा
कसा येऊ देऊ मी तुला
दारी लक्षेमण पाह्यला
सीता उघड कवाडा
तु ग महा हात डावा
कसा उघडू कवाडा
दारी लक्षेमण उजवा
दऱ्याच्या कडलं सीता गुंफी मोती हारं
उघड सीता दारं
मला पाहुंदी मोती हार

**– लक्ष्मण बहीरू मेंगाळ, ठाकरवाडी–चिचोंडी**

* *

## (१७) रामकुंडावर

राम कुंडावर
असं घातलं मांडव
आंघुळीला येती अस ल्येण्याच पांडव
असा त्याला का भोजन
सीता क जानकीना
असा का भोजन
सीता र जानकीना
पाची पांडवाच्या आहे
अशा पंगती कसल्या आहे
वाढीत वाढीत ग्येले
गाठ चोळीची सुटल्ये
लजा कोनाला वाटले
लक्षेमण दिराला वाटले
सीताच्या लजाला आहे
कोना सावरीला आहे
सीताच्या लजाला आहे
धरतीना सावरीला आहे

**– पांडु भोरू मघे, ठाकरवाडी–चिचोंडी**

* *

## (१८) असा टेंभा ना पेटला

असा नाचू व निंगाला
असा टेंभा ना पेटला
असा ढोल ग वाजला
संमदा ठाकर नाचला
आईबाईच्या सनाला
आईबाईच्या पुंजाला
असा ठाकर नाचला आहे
ठाकरना बाई आजूच नाच केला आहे
आजूच पायी दिला आहे

**– लक्ष्मण कुषा मघे, ठाकरवाडी–चिचोंडी**

## (१९) लंकेचा रावन

असा लंकाचा रावन
कसा दाही तोंड्या दिस
त्येच्या मना मंदी राम
कसा खुलीनीया दिस
असा रामाचा रावन
अस संगतीना चाल
सात दिस युध झाल आहे
कस गंगणाला गेल आहे
त्येही अंगणात बाई आहे
रामाच बान दिस आहे
त्यायी बानाला का बाई
रावन छाती वरी झेलं
आन छाती वर बान
कस पडत्याती फुलं
राम मारी यक बान
रावन जातुय गंगान
असा लंकाचा रावन
रींगनात आला
आजुच्या दिसाला
नाच त्येना केला आहे

**– नाबाजी कुसा मघे, ठाकरवाडी–चिचोंडी**

* *

## (२०) सखा मारवती

सखा ना मारवती
बाई रींगनात आला
कसा झ्याप मारी का
चंद्रसूऱ्यापासी गेला
चंद्रसूऱ्या हात लाईला
असा लंकाला जाळीला
असा रावन माजला
सीताला सोडीला
असा आंजेलीचा बाळ
आज रंगणी नाचला
आजूच पायी दिला
आजूच नाच क्येला

**– भाऊ बुधा गिरे, ठाकरवाडी–चिचोंडी**

* *

## (२१) सोन्याच्या डोंगरी

सोन्याच्या डोंगरी
सोन्याचा ना देवू
त्येची पालकी चालली
कशी भंडार उधळी
त्येची सोनीयाची काटी रं
माळानं वाकली रं
सोन्याच्या घोड्याव
देव चालला बसून
आज रींगणात आला
असा नाच त्येना केला
असा भंडारा उधळिला
संमदा रींगाण उजवला
रंगाण रंगाण हे
सोन्याच रंगाण
आजुच पायी दिला
आजूच नाच केला

**– भाऊ बुधा गिरे, ठाकरवाडी–चिचोंडी**

* *

## (३) सण–उत्सवांची गाणी

### (१) वनवा डोंगर मेघीला

नांद्या बैल बघीली
वनवा डोंगर मेघीला
चला रं जाऊ वनवा पाह्या
वनवा विस्तूनं पेटीला
चला रं जाऊ विस्तू पाह्या
विस्तू पाण्यानं विझतो
चला रं जाऊ पानी पाह्या
पान्यात मासा खेळतो
चला रं जाऊ मासा पाह्या
मासा गंगा न हिंडतो
चला रं जाऊ गंगा पाह्या
गंगान फासे मांडीले
चला रं जाऊ फासे पाह्या
फासे लांडोर तोडिले
चला रं जाऊ लांडोर पाह्या
लांडोर रानाना पळीले
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– रामदास संतु बंबारे, कोदनी**

* *

### (२) दिन दिन दिवाळी

दिन दिन दिवाळी
गायीमाची ववाळी
गायी कुनाच्या
लक्षेमनाच्या
चोळून मोळून केली हारका
हारका हारका दळले गहू
आमच्या गायाचे पंडित पवू
पंडिताचे उभे टिळे



न्हायाच्या बोचात ठोकले खिळे
खिळे वाजे कराकर
न्हायी पादे परापर
पराच्या हाती परसकांदा
नराच्या हाती नरस
दे ग माई पळीभर त्याल
त्याल नही चावडित जाय
चावडित व्हती निळी घोडी
लाथा मारी फडाफडी
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– रामदास संतु बांबेरे, कोदनी**

* *

### (३) वुलिसिक वाटी

वुलिसिक वाटी
चमचम वाटी
नवट्या घोडा
बागुल तोडा
बागुल तोडेचे उली उली पाय
त्यावर बसली इंद्रीआई
इंद्रीआईची कंबर सूरी
ती सूरी वैदापूर
वैदापूरच्या हाडाळ्या
यक थीर मारला
लांडा उंदीर ताकात पडला
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– रामदास संतु बांबेरे, कोदनी**

* *

### (४) दिन दिन दिवाळी

दिन दिन दिवटी
सोनेची कवटी

पाच गायी पाच म्हशी
यवढा दुबता कोण खायी
नरसे येऊन घेऊन जाई
दे ग माई पळीभर त्याल
त्याल नही चावडित जाय
चावडित व्हती निळी घोडी
लाथा मारी फडाफडी
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– रामदास संतु बांबेरे, कोदनी**

* *

## (५) काळ्या बावरी बेलाचा झाड

काळ्या बावरी बेलाचा झाड बेलाचा झाड
त्येच्याव बसला सोग्यामोर सोग्यामोर
सोग्यामोराच लाम लाम पक लाम लाम पक
यक यक आखाडला आखाडला यक यक लांबवला लांबवला
त्याला जुपीले गंभीरी गाडे गंभीरी गाडे
पडत्या पाण्यात हाकित गाडे हाकित गाडे
गाडा गेलाय गाड वाटाला गाड वाटाला
चीपूर ग्येला आडवाटाला आड वाटाला
चीपूरीचे तोंड सडे तोंड सडे
ज्यानही त्याल देनार त्याला घालू बेडे
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– रामदास संतु बांबेरे, कोदनी**

* *

## (६) तातोबा चिंता

तातोबा चिंता चवळ्याचा घोंगता
चवळ्याच्या घातल्या घुगऱ्या घुगऱ्या
तातो म्हन्तो मला घोड्या दिल्या
घुगऱ्या घुगऱ्या पोट फुग फुग

ज्या नही त्याल देनार त्येच्या घराव हाग
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– राजाराम चिंत्रु बांबेरे, कोदनी**

* *

## (७) जानी गाय विली

जानी गाय विली गणेबा जानी गाय विली
जानीला झालाय गोरा गणेबा जानीला झालाय गोरा
गोरेच्या गळ्यात गेठा गणेबा गोऱ्याच्या गळ्यात गेठा
गेठाला मोडलाय काटा गणेबा गेठाला मोडलाय काटा
काट्याकुट्याचा वेणु गणेबा काट्याकुट्याचा वेणू
वेणू फुटतो फांद्या गणेबा वेणू फुटतो फांद्या
वैल उरतो नांद्या गणेबा वैल डरतो नांद्या
नांद्या वैलाची वेसण गणेबा नांद्या वैलाची वेसण
निळ्या घोडीव बसून गणेबा निळ्या घोडीव बसून
निळ्या घोडीचा हडबा गणेबा निळ्या घोडीचा हडबा
गायी पांगल्या करडा गणेबा गायी पांगल्या करडा
करडा होता लवू गणेबा करडा होता लवू
त्याना शिळाकले पवू गणेबा त्याला शिळाकले पवू
पयापयाची किकळी गणेबा पयापयाची किकळी
जानी बोलावली पुतळी गणेबा जानी बोलावली पुतळी
हाणा बुकी फोडा कांदा
उघड गायीचा कवाडा
घरी आहे डुबा ताना त्येला देवू पैला पान्हा
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– सावळेराम रामा बांबेरे, कोदनी**

* *

## (८) चांदोमा

चांदोमा चांदोमा गटोळा गटोळा
तुई बायकू वाटोळी
देग नारी सुपारी सुपारी

सुपारी पडली दैह्यात दैह्यात
यवढा दही नाशला नाशला
फुटक्या डेऱ्यात ओतला ओतला
फुटका डेरा दयोवाढ दयोवाढ
हाताला आलं पवाड पवाड गं
हाताच पवाड फुटतणी फुटतणी
दारच पावन उठतणी उठतणी
तेनी घेतली म्हैस ग म्हैस ग
म्हशी म्हशी दिवा लाव दिवा लाव
दिवा ग्येला वाऱ्याना वाऱ्याना
म्हैश नेली चोराना चोराना
चोराच्या हातातून निफाटली निफाटली
कड्या कड्याच्या मावल्या मावल्या
वाटू घेऊन धावल्या धावल्या
वाटू पडला उताना उताना
मावल्या हानल्या भूताना भूताना
भूत जेवला तुपाशी तुपाशी
चांदोमा ग्येला उपाशी उपाशी

**– रखमा तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

## (९) अट मट बा÷.ा

अट मट बाळ्या घाटकराचं दोन तुकडं
त्याच्या मळ्या ग्येलाय डोबाड
त्या डोबाडाना खालय वांगा
जाऊन त्या हावालदाराला सांगा
त्यान दावला घराचा आरसा
तो सोनार मोठा सरसा
त्या सोनाराची वादी
तो चांभाराचा जोडा
तो परीट केलाय येडा
त्या परटाना धरली फळी
त्यो शंकऱ्या गाढवा वळी

**– शंकर अमृत लेंडे, पाभुळवंडी**

* *

## (१०) काळा कोळसा झिकझिक माव

काळा कोळसा झिक झिक माव
घरात खेळे चिमण बाळ
शिलक दोरी
ती दोरी बैदापुरी
तीकून आनला यक भींग
त्येच्या अंगाला स्वयेचा तीर
यक तीर मारला मारला
यत तीर उबरल्या उबरल्या
तीसाळ्या घराव बोळ्या बोळ्या

**– रामनाथ अनाजी बांबेरे, कोदनी**

* *

## (११) म्हतारी जशी डोबाडी

आमच्या गावच्या पोरी कशा
    पोरी कशा
लांब लांब थानाच्या शेळ्या जशा
आमच्या गावाचे पोरे कसे
    पोरे कसे
गावातून हिंडतात जाने जसे
आमच्या गावचे म्हतारे कसे
    म्हतारे कसे
नितीव बसून लामलाम दाढीचे बोकड जसे
आमच्या गावच्या म्हताऱ्या कशा
    म्हताऱ्या कशा
पान्यात बसल्या डोबाडी जशा

**– रामदास विठोबा करवर, बाभूळवंडी**

## (१२) हेलग्या हेलग्या

हेलग्या हेलग्या टकर लागुंदे
        टकर लागुंदे
घरच्या धन्या धावू नको
        धावू नको
घराचा धनी नाथा घुता
        नाथा घुता
घराच्या धन्याला काय देऊ
        काय देऊ
घराच्या धन्याला शेळदेव केला
        शेळदेव केला
शेळाच्या केल्या बारा वाती
        बारा वाती
त्याला जाळा चांदण्या राती
        चांदण्या राती
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– रामदास विठोबा करवर, बाभुळवंडी**

* *

## (१३) कपीला गाय

काग कपीला गाय दुध देईना?
मला गायखा चराला नेईला
का र गायख्या चराया नेईना?
मला म्हातारी भाकर देईना
का ग म्हतारी भाकर देईना?
मह्या सूनाचा दळन व्हईना
का ग सूना दळन व्हईना?
माह जातय चालत नहीना
का रं जात्या तू चालत नहीना?
मला टाकारी टाकून देईना
का रं टाकाऱ्या टाकून देईना?



मह्या पोराचा पगार व्हईना
का रं पोऱ्याचा पगार व्हईना?
मला साह्यब खूर्ची देईना
का रं साह्यब खूर्ची देईना?
मला वरून हुकूम नहीना

**– राधाबाई विठोबा करवर, बाभुळवंडी**

* *

## (१४) गायल्या

गायख्या गायख्या झोपाटा उघड
        झोपाटा उघड
गायी जाऊंदे वरल्या माळी
        वरल्या माळी
वरल्या माळीला माह्या कुंदा
        माह्या कुंदा
गायी जाऊंदे नदीच्या कडा
        नदीच्या कडा
गायीला झालाय काळा नंदी
        काळा नंदी
गायी येऊंदी घरल्या घरी
        घरल्या घरी
काळ्याच्या वावरात नेऊन टाकला
        नेऊन टाकला
त्येच्याव आला बेलाचं झाड
        बेलाचं झाड
त्येचाव आला सोग्या मोर
        सोग्या मोर
सोग्या मोराच लाम लाम पक
        लाम लाम पक
यक प्रख आखडला
        आखडला

त्येला लावील गंभीरे गाडे
गंभीरे गाडे
आमच्या गावचे कुंभी येडे
कुंभी येडे
भरील पाण्यात हाकीले गाडे
हाकीले गाडे
गाडी गेली गाडी वाटाना
गाडी वाटाना
पितूर आला आड वाटाना
आड वाटाना
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– रामदास विठोबा करवर, बाभुळवंडी**

* *

## (१५) शिमगा

महिन्या मधी ग महिना
शिमगा उगविला
सारंग पती ग पती माझा
कोन्या वनी ग्येला
माखतीच्या ग हावदावर
देवू आंघुळीला
जायाची घाई ग जायाची घाई
दर्सेनाला
सारंग पती ग पती माझा
कोन्या वनी ग्येला
महिन्या मधी ग महिना
शिमगा उगविला
पुराण घातीला ग घातीला
होळीच्या सणाला
सारंग पती ग पती माझा



कोन्या वनी गेला

**– शिवाजी श्रावणा भांगरे, साकिरवाडी**

* *

## (१६) चैताची चांदनी

''शिमग्या चैताची चांदनी बाई चांदनी
सईबाई निंगाली ग निंगाली आंगणी
बाई खेळता खेळता रात्र झाली
बाई खेळता खेळता ग रात्र झाली
भडताऱ्याच्या व भडताऱ्याच्या पलंगी गेली
भडताऱ्याच्या व भडताऱ्याच्या पलंगी गेली''
''दंडनाढ्या येला येला ग कायी केला?''
''खेळता ग बाई खेळता ग हारवल्या''
''नाकी नथ ग नथ ग कायी केली?''
''बाई खेळता खेळता ग हारवली''
''हाती काकना काकना काय ग केली?''
''बाई जोडी ग जोडवी काय गे केली?''
''बाई खेळता खेळता ग हारवली''
''शिमग्या चैताची चांदनी बाई चांदनी
सईबाई निंगाली निंगाली ग आंगनी''

**– कोंडाबाई धर्मा भांगरे, साकिरवाडी**

* *

## (१७) नेटकूच लागलाय डोळा गेंदबा

नेटकूच लागलाय डोळा गेंदबा
नेटकूच लागलाय डोळा
आला श्रावणी पोळा गेंदबा
आला श्रावणी पोळा
पोळ्याची काढल्यात चित्रा गेंदबा
आयवडलांची पित्रा गेंदबा
आयवडलांची पित्रा
पित्राची झालय डाळ गेंदबा

पित्राची झालय डाळ
आली घराची माळ गेंदबा
आली घराची माळ
गेंदबा घराची गाठी गेंदबा
दिवाळीना केलेय दाटी
दिवाळीचा दिवा गेंदबा
दिवाळीचा दिवा
नामदेव घ्येतोय पवा गेंदबा
नामदेव घ्येतोय पवा
नामदेवाची बाजरी गेंदबा
नामदेवाची बाजरी
संक्रातीची ओंबी गेंदबा
संक्रातीची ओंबी
शिमगा घेतोय झोंबी गेंदबा
शिमगा घेतोय झोंबी
शिमग्याची कशी व गेंदबा
शिमग्याची कशी
पाडवा देतोय ढुशी गेंदबा
पाडवा देतोय ढुशी
पाडव्याची गुढी गेंदबा
पाडव्याची गुढी
आकाजाची डवणी गेंदबा
आकाजाची डवणी
पाऊस आला उजुनी गेंदबा
पाऊल आला उजुनी
पावसाचा पानी गेंदबा
पावसाचा पानी
भाताची आवणी गेंदबा
भाताची आवणी

**– नारायण म्हसू दरेकर, पाचपट्टे**

* *



## (१८) नाग्या गोसावी

नाग्या गोसायी आला गेंदबा
नाग्या गोसायी आला रं
जटा झाडीत ग्येला गेंदबा
जटा झाडीत ग्येला रं
जटा झाडीली ताकू गेंदबा
गायी मारितो वाघु गेंदबा
वाघू पिलांनी जाळी गेंदबा
गायी लागल्या भाळी गेंदबा
गायी लागल्या वाटा गेंदबा
वाटा तोटाचा पाणी गेंदबा
गायी परातल्या वनी गेंदबा
पानी पितुळका मासा गेंदबा
गायी लागल्या देशा गेंदबा
देशा देशाचा वेळू गेंदबा
वेळू फुटतो फांद्या गेंदबा
वैल डरतो मांद्या गेंदबा
नांद्या वैलाची वेसण गेंदबा
निळ्या घोडीव बसून गेंदबा
निळ्या घोडीचा हाडा गेंदबा
गायी पोकळ्या करडा गेंदबा
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– पोपट रामा डमळे, पाचपट्टे**

* *

## (१९) चाणाबाई चाणा

चाणाबाई चाणा टिपुऱ्या बाणा
चांदण्या घातीला बाजा
त्या बाजाव कोन झोपीला
गौळण किसन राधा
घेऊन वटी घालून घाटी

किसनाच्या गवळणी बारा
शीरी किस्नाला घालीती वारा
माळणी मळ्यात गेल्या
शीरी किस्नाला घालती गजरा
राधाना पोबारा केला
बाई किस्नाना पोबारा केला

**– अनुसयाबाई महादु खोकले, पाचपट्टे**

* *

### (२०) गायल्या गायल्या

गायख्या गायख्या झोपाटा उघड
झोपाटा उघड
गाय जाऊंदी वरल्या माळी
वरल्या माळी
वरल्या माळीचा कुंदा माता
कुंदा माता
गाय जाऊंदी नदिच्या कडा
नदिच्या कडा
नदिचा पानी झिरी मिरी
झिरी मिरी
गायीला झालाय काळा नंदी
काळा नंदी
काळ्या नंद्याची बाशींग
बाशींग
त्या बायी घडवल्या हौशीन
हौशीन
हौशी हौशी हास ग
हास ग
झाडाव जाऊन बस ग
बस ग
झाडा झाडाची साल ग साल ग



साला सालाची दोरी दोरी
त्याना आकळली पुतळी पुतळी
पुतळीना उभारल्या शिंगा
शिंगा
वैल डरतो नांद्या नांद्या
हांडुरले हांडुरले हांडुरले

**– श्रीराम त्र्यंबक खोकले, पाचपट्टे**

* *

### (२१) झोका खेळूया ओवी गाऊया

पहिली माझी ओवी ग आली परतूनी
देखिले दृष्टीनी निजरूप
निजरूप ।।
दुसरी माझी ओवी ग दुजे नाही मनी
लक्ष तुझे चरणी लागईले
लागईले ।।
तिसरी माझी ओवी ग शीरी सरूपता
हात तुझ्या माथा सद्‌गुरू नाथा
सद्‌गुरू नाथा ।।
चौथी माझी ओवी ग शुन्य हाये जेधे
वस्तू धन दाटे मागे पुढे
मागे पुढे ।।
पाचवी माझी ओवी ग पाचवा आरसा
रीधनाही सताइसाचा
सताइसाचा ।।
साही माझी ओवी ग सहस्त्र देखणे
वरकड बोलणे फोल झाले
फोल झाले ।।
साती माझी ओवी ग सत बाहे मनी
आंतरीच्या खुणी काय सांगू
काय सांगू ।।

आठी माझी ओवी ग आठवण नाही
निर्गुन सोयरा मनी याला
मनी याला ।।
नवी माझी ओवी ग नांदुजे लागली
परपुरुसरते जीवभावे
जीवभावे ।।
दाही माझी ओवी ग घाले माझे मन
डोळा दिसे गुन रात्र माझी
रात्र माझी ।।

**– अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते , सोमलवाडी**

* *

## (४) दैवतांविषयीची गाणी

### (१) तातोबाचा मठ

प्रवराच्या कडाला – कडाला बाई तातोबाचा मठ ।
त्याही मठात – मठात बाई झाडाचेना खांब ।।
त्याही खांबाला – खांबाला बाई पाळना टांगीला
त्याही पाळण्यात पाळण्यात बाई सीताची फडकी
त्याही फडकीत – फडकीत बाई निजे लव कुश ।।
त्याला हालवाया – हालवाया बाई वालमिक रीषी
त्याही पाळण्याला – पाळण्याला बाई रेषमाचे दोर ।।
त्याही दोरीला – दोरीला बाई चापीची घुंगरा
घुंगुराच्या नांदा – नांदा बाई निजे लव कुश ।।

**– जनाबाई भदु पटेकर, रणद बु.**

* *

### (२) देव मसराज

देव मसराज सत्याचा सागर
येंगून देईना गर्विया नारीला डोंगर ।।
गाव पाचपट्टा तुझ्या येशीत बागुल
पहिल्या खेपाची मसराजाला आंघुळ ।।
देवू मसराज पयली पायरी नेमाची
येंगून देयीनी जोडी पहेलवानाची ।।
नवस बोलीले मी मनीच्या मनात
देवूमसराजा मला पावला जनात ।।
देवूमसराजा तुझी करीतो सेवा
मनी उमजावा गादीला धनी देवा ।।
नवस बोलले चत्रीशिंगीच्या लाडीला
सर्पाचे कासरे वाघ जुतले गाडीला ।।
देवूमसराजा मी झाडितो झिनानी
उसरून गेले जोडीचे मोती दोनी ।।
देवूमसराजा तुझा निंबवाचा मांडव
सुखी ठेव देवा पाचपट्ट्याचा मांडव

**– अनुसया महादू खोकले, पाचपट्टे**

* *

### (३) लंगर लोखंडाचा (गोंधळ्याची गाणी)

झेंडा रोविला काळ्या लोकांचा
खांद्यावरी घोंगडी लंगर लोखंडाचा
जी अ रे जी
पुढे काय कुतरा भूकतो
कुतरा भूकतो
भवान्या आईचा वजीर नाचतो
वजीर नाचतो
हातामधी माळा गळ्यामधी माळा
हातामधी खंडार गळ्यामधी भंडार
हातामधी सोना गळ्यामधी मोहना
हातामधी काठी डोयवरी पाटी
हातामधी तोडा बसायला घोडा
हातामधी घुंगरू बसायला शींगरू
शिंगराच्या गळ्याला घंटा लोखंडाचा
झेंडा रोविला काळ्या लोकांचा
खांद्यावरी घोंगडी लंगर लोखंडाचा

जी अ रे जी जी

**– श्रीराम त्र्यंबक खोकले, पाचपट्टे**

✻ ✻

## (४) लगीन देवाचं लागत (गोंधळ्याची गाणी)

नाशिक शहरात कायी वाजत वाजत
सोनेरी बाशींग लगीन देवाचं लागत
इथून तिथून गंगा पसरली
नाही आकळली गेली
नाशिक शहरात शिरी भरला घडा
जाई तडा आम्हा गरीबाची नुकसान होई
इथून तिथून गंगा पसरली
नाही आकळली
गंगा संगट संगट लगीन निंगाल
वाजत वाजत संबळ रामापाशी आलं
नाशिक शहरात लगीन देवाचं लागल
पानी गंगाच गंगाच देवाच्या डोक्यावरी गेलं

**– श्रीराम त्र्यंबक खोकले, पाचपट्टे**

✻ ✻

## (५) गोप

तेलकट बंडी अंगाला २
हिऱ्याची अंगठी बोटाला २
कवड्याची माळ गळ्याला २
कवड्याची टोपी डोक्याला २
उद्ये शब्द बोलीला २
जोऊन भिडला कोळवाडेला
विठ्या कोळी बोले गोपाला
''लेका कोण रे गोंधळी आला?''
आला बाबा नवसाला
फेड दर वर्षाला



जी र दाजी जीर

**– श्रीराम त्र्यंबक खोकले, पाचपट्टे**

✻ ✻

## (६) गण (गोंधळातील)

आज गण नमविला सोमवार
आली सोग्या देवाची स्वारी
रे रामा देवा रे रामा देवां जी रं जी
आज गण नमविला मंगळवार
आली म्हसोबाची स्वारी
रे रामा देवा रे रामा देवां जी रं जी
आज गण नमविला बुधवार
आली बुध्या देवाची स्वारी
रे रामा देवा रे रामा देवां जी रं जी
आज गण नमविला गुरुवार
आली गुरु देवाची स्वारी
रे रामा देवा रे रामा देवां जी रं जी
आज गण नमविला शुक्रीरवार
आली भवान्या आईची स्वारी
रे रामा देवा रे रामा देवां जी रं जी
आज गण नमविला शनिवार
आली शनी देवाची स्वारी
रे रामा देवा रे रामा देवां जी रं जी
आज गण नमविला रविवार
आली बहिरोबाची स्वारी
रे रामा देवा रे रामा देवां जी रं जी

**– पोपट रामा डगळे, पाचपट्टे**

✻ ✻

## (७) देवा तुझा घोडा नाचतो अंगणी

देवा तुझा घोडा नाचतो या अंगनी
भानू तुझा घोडा नाचतो या अंगनी

देवा तुझ्या घोड्याला सोन्याची लगाम
भानू तुझ्या घोड्याला सोन्याची लगाम
देवा तुझा घोडाना इंगीला डोंगरी
तिकून आली वाघेया मुरुळी
बारा वर्षांच्या वयात बाळ साळात
देवाची माळ त्येच्या अक्षयी गळ्यात
देवा नको मानू या जन्माला
मानव जन्म वर काळची जीवाला

**– नामदेव पुणाजी खोकले, पाचपट्टे**

* *

## (८) बाणे खेळती भुगडी

नदी किनारी किनारी
बाणे खेळती फुगडी
तीची हारावली बुगडी
माझ्या बंधूनी घडली
लाळ चालली रे चालली तोंडाला
सर्प यंगीले गडाला
सर्प आरध्या गडाला
शेपरी पलंगावरी पलंगावरी
देव झोपले मलारी झोपले मलारी
वर माळसा सुंदरी माळसा सुंदरी

**– दशरथ पांडुरंग पट्टेकर, रणद बु.**

* *

## (९) कपाळी केशरी गंध

कपाळी केशरी गंध
केशरी गंध
लाभला बानूचा छंद
कपाळी गंद काळा निळा
गंध काळा निळा
माळसा शिकविती देवाला
छंद बानूचा लागला

**– दशरथ पांडुरंग पट्टेकर, रणद बु.**

* *

## (१०) कलम शार शेराची पायरी

कलम शार शेराची पायरी
मलारी माझ्या ये रं लवकरी
मला व पुण्याच पाताळ आणलं
कितीव राया हाये त्ये चांगलं
कारभारी तुमी व मलारी
माळसाची कोड पुरविली
चंभार वाड्यामधी व चांभार वाड्यामधी
देवा हाक रे मेंडी
तुला भानूची काय रं गोडी

**– दशरथ पांडुरंग पट्टेकर, रणद बु.**

* *

## (११) देव वाघराजा

देव वाघराज नवसाला पावत
शंबर शेरडा त्येच्या नवसाला लागत ।।
देव वाघराज पयली पायरी नेमाची
यंगून देईना डोंगर गर्विया मनाली ।।
देवू वाघराज आमच्या येशीत नकू येऊ
आमची गुरांढोरां नको वायाला जाऊ देऊ ।।
देवू बापुराजा तुला मानाची आरती
गावाच्या येशीला तुही चंदनी मुरती ।।
देवू वाघराजा तुही बारस घालितो
तुला देतो टिळा उभा गाव जेवतो ।।
देवू वाघराजा तुही रावदे सावली
चांदण्याराती तुझी सवारी पायली ।।
देवू वाघराजा उभ्या रानाचा राखन
तुझ्या विना देवा आमची कसाई राखन ।।

यव्हढी गुरांढोरां तुही आह्यात लेकरां
तुह्या किरपेना अवघ्या रानी कशी जाती चारा ।।
तुहा केला टिळा नको शिवेला येऊ
तुह्या गणाला आवर नकू गुरां खाऊ ।।
लांडग्या खोंडग्या तुला वाघाची र आण
जरी खाली माझी गायी तुला वाघाची रं आण ।।

**– विठ्ठल बारकू खाडे, कातळापूर**

* *

## (१२) नागदेव

पाच झोकं खेळावा खेळावा
नागदेव भेटावा भेटावा ।।
नागदेव भेटला भेटला
नवसाला मह्या पावला पावला ।।
महानवस नवऱ्याचा नवऱ्याचा
साईत्रीच्या बापाचा बापाचा ।।
नागदेवाला दुध ग दुध ग
नवऱ्याला आली सुध ग सुध ग ।।
नागदेव कोणाचा कोणाचा
पारवतीच्या देवाचा देवाचा ।।
देवाना देव आकाळला आकाळला
कपिलाचा दुध उपाळला उपाळला ।।
मया फुगडीचा दनका उठतो उठतो
नागदेव डोलतो डोलतो ।।

**– लिलाबाई चिंधु पटेकर, रणद बु.**

* *

## (१३) कारे कावळे (पितर पाठातील)

कारे कावळ्या का – का – का करीसी
का – का – का करीसी
सिळे तुकडे मोडून खासी, मोडून खासी ।।
सिळ्या तुकड्यांची रं धरली धडाडी धडाडी
तुही माझी रे होऊंदे लढाई होऊंदे लढाई ।।
पित्राच्या येळला आजेपंजेचा मान राखीसी
मान राखीसी
पोरांच्या हातातल्या रे भाकऱ्या चोरीसी
भाकऱ्या चोरीसी ।।

**– दत्तु तुकाराम कोरडे, रणद बु.**

* *

## (१४) दान पावलं (वासुदेव)

दान पावलं दान पावलं
पंढरपुरात इट्टोबा रायाला
जेजुरीमंदी खंडोबा रायाला
नासिकमंदी शिरी रामाला
तीरमकेशराच्या म्हादेवाला
दान पावलं दान पावलं
रणदाच्या घोरपड्याआईला
पाचपट्ट्याच्या म्हसूबाला
शिरपुंज्याच्या बहीरूबाला
शिखरावरच्या कळसाईला
दान पावलं दान पावलं
टाकाहारीच्या भवानीला
हरिचंद्राच्या म्हादेवाला
म्हाळादेयीच्या म्हाळसाईला
अकूल्या खालच्या अगस्ती बाबाला
दान पावलं दान पावलं

**– पोपट शिवराम डगले, चिंचवणे**

* *

## (१५) चिल्या बाळाचा जेवन (गोंधळीगीत कथा)

सिरीयाल राजेच्या घरी महादेव
होऊन गेले गोसायी
हाती चिपळ्या आनं पायी खडावा ‘‘भिक्षा वाडा माई’’

सुवर्णांच सूप भरूनी ठिवले गुरूच्या पायी
''तीन दिवसाचा आहे उपासी भिक्षा लागत नाही''
''साळी डाळीचा केला भोजन उठा गुरू जेवाया
उठा गुरू जेवाया''
''रांधशील तुझा चिल्या तरी उठन जेवाया''
चांगूनाला पानी डोळ्याला आन गाग दिली
चिल्याला
अंगनी खेळ चिल्याबाळा आन धावत धावत
आला
जीवाचा पानी आन बाळ शिजनी, कशी वाढ
गोसायाला''
गोसाया म्हन, ''शीर राहीला आन रांधून देग
त्येला तरी करीन भोजनाला''
''साळीवानी सीर काडींले देवाच्या सत्वाला
आन म्हनि काय सवताच्या पुन्याला''
''साळीवानी सीर कांडील सवताच्या पुनाला
आन म्हनि काय देवाच्या सत्याला
निपुता घरी जेवन म्या कंदीच नाही क्येला''
ग्येली चांगूना शरन देवाला म्हन देवाला
''बाळ कसाव आनू मी वक्ताला''
म्हादेवाला निवद झाला काय
चिलया बाळाचा
मान पूर्वजन्मीचा कारभार आला
आताच फळाला
देव म्हन, ''आण चांगून हाक मार बाळाला
घेऊन संगती जेवन कराया खोळुंबा ग झाला''
चांगुनाना गाग दिली मंग चिलया बाळाला
बाळ आंगनी खेळत व्हता आन तसाच धावला
चिलया संगती ज्येवन कथन देव ग्येले व डोंगराला
सिरीयालाचा सत्व पावला



चिलया बाळाला

**– पोपट रामा डगळे, पाचपट्टे**

✻ ✻

## (१६) दार उघड बया (मरीआई)

बया, दार उघड, बया दार उघड
मरआई, बया दार उघड
लक्ष्मीआई, बया दार उघड,
पट्याई, बया दार उघड
घोरपड्याई, बया दार उघड
कळसाई, बया दार उघड
वनीचीआई, बया दार उघड
तुळजापूरची आई, बया दार उघड
कोळी भक्त आले दार उघड
ठाकूर भक्त आले दार उघड
भगताच्या वाड्याव बया दार उघड
बया दार उघड बया दार उघड
आये मरी आई दार उघड

**– खंडु भदु मघे, ठाकरवाडी**

✻ ✻

## (१७) बयाचा दार उघड (मरीआई)

मरी आईचा दरूचा
भक्त जमले कसे कोळी
आईच्या मोरं उभरल्या पोता साळी
मरीआईचा दरुचा
भगत जमले समंदे
आई मराआई नवस शेवटा जाऊंदे
आई मरीआई नवस बोलला घाईघाई
आईच्या पिरतीसाठी फटकं आसूडाच खाई
आसूडाचं फटकं कसे वाजत कडाडा
बोलला नवस कसा जावो शेवटाला

आईच्या किरपेना कोळी वाडा राह्यतो
आईचा रुसवा कसा कसानी काढीतो ।
आईचा रुसवा साळीडाळीना काढीतो ।
आईचा रुसवा मिठामिरचीना काढीतो ।
आईचा रुसवा गुळात्येलाना काढीतो ।
बया दार उघड
रुसू नकू बया दार उघड
नवस घे बया दार उघड
दार उघड बया दार उघड
बयाना दार उघाडला
कोळवाडेचा फेरा फिटला
ठाकरवाडीचा फेरा फिटला

**– नावजी कुसा मघे, ठाकरवाडी**

* *

### (१८) उधे ग अंबे उधे

आई भवानी आई मी ग तुझा भुत्या
नाचतो घेऊनी डंका तुझा
चहुदिशाना उधे बोलतो तुझा
तुझा ठाणा वनी
तुझा ठाणा टाहाकारी
तुझा ठाणा तुळापुर
तुझा ठाणा पट्टागड
आई ग अंबाबाई तुझा ठाणा उंचावरी
आई ग कळसुबाई तुझा ठाणा डोंगरावरी
आई ग अंबाबाई तुझा उधे बोलतो
तुझा लाल कुकु उभा डांगाण फिरतो
आई ग अंबाबाई तुझा उधे बोलतो
तुझा लाल कुकु कोळ्याड्यानी कसा जातो
आई ग अंबाबाई तुझ्या सायाची ग आस
जमला भक्त गण पुरा भाविक हा देस

**– रघुनाथ संतु खाडे, बारी**



### (१९) नवसाला पावली

आई ग अंबाबाई पावली नवसाला
आई ग अंबाबाई तुझा उधे उजीला
आई ग अंबाबाई आली कोणत्या देशाहून
आई ग अंबाबाई आली घाटाळ्या वरून
आई ग अंबाबाई जाती कोणत्या देशाला
आई ग अंबाबाई जाती भक्ताच्या देशाला
आई ग अंबाबाई पावती कल्याना
आई ग अंबाबाई पावती दर्सनाच्या आशान
आईचा दर्सन संध्याकाळी घडतो
आईचा दर्सन सकाळसकाळी घडतो
आईचा दर्सन माध्यानीली घडतो
आंबाबाईच्या नवसाला दिलायी कायीकायी
आईच्या नवसाला साळीडाळी दिली राशी
आईच्या नवसाला नांगलीची बारा पोती
आईच्या नवसाला दुधाचा दिला हांडा
आईच्या नवसाला दिला भाताचा ना उंडा
आंबाबाईचा नवस फेडीला ठाईठाई
आंबाबाई आली भगतासाठी घाईघाई

**– रघुनाथ संतु खाडे, बारी**

* *

## (५) पांडुरंगाची भक्ती व संत संदर्भ

### (१) ये रे बा विठ्ठला

पहिली माझी ओवी ग तुळशीच्या पाना
सेवा करी कृष्ण काना तू ये रे बा विठ्ठला ।।
दुसरी माझी ओवी ग तुळशीचा नेम
तुळशीखाली झोपे राम तू ये रे बा विठ्ठला ।।
तिसरी माझी ओवी ग तुळशीचा भार
वैष्णवाच्या गळ्यात हार तू ये रे बा विठ्ठला ।।
चौथी माझी ओवी ग तुळशीचे चरण

तेहतीस कोटी देव शरण तू ये रे बा विठ्ठला ।।
पाचवी माझी ओवी ग तुळशी पतीवर्ता
बरमाविष्णावरीसता तू ये रे बा विठ्ठला ।।
साही माझी ओवी ग तुळशीचे गुण
भक्त गाती मुखातून तू ये रे बा विठ्ठला ।।
साती माझी ओवी ग तुळशीचे सरदार
दास लोळे चरणावर तू ये रे बा विठ्ठला ।।
आठवी माझी ओवी ग तुळशीचे माह्यार
वैकुंटीचा बाजार तू ये रे बा विठ्ठला ।।
नववी माझी ओवी ग तुळशीचे प्राण
देह केला अर्पण तू ये रे बा विठ्ठला ।।
दहावी माझी ओवी ग तुळशीच्या पायी
तुळशी माझी आधीमाया तू ये रे बा विठ्ठला ।।
अकराई माझी ओवी ग तुळशीचे नाव
पंचप्राण माझे भाव तू ये रे बा विठ्ठला ।।
बाराई माझी ओवी ग तुका म्हणे तैसी
तुळी माह्या गळ्याशी तू ये रे बा विठ्ठला ।।

**– अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते , सोमलवाडी**

* *

## (२) पंढरी गाय

पंढरी गाय बरी व बरी ह्या भिमाच्या तीरी
पंढऱ्या गायीचा पोट जसी कापसाची म्वाट ।।
पंढऱ्या गायीच्या मांड्या जस्या पालखीच्या दांड्या ।।
पंढऱ्या गायीचा कान जस नागेलीचा पान ।।
पंढऱ्या गायीचा डोळं जसं लोनियाचं गोळं ।।
पंढऱ्या गायीची शिंगा जसी महादेवाची लिंगा ।।
पंढऱ्या गायचा दुध जस जेवन झालय शुद्ध ।।
पंढऱ्या गायीचा दही जेवान झालाया लयी ।।
पंढऱ्या गायीची शेप जसी नागीन मारी झ्याप ।।
पंढऱ्या गायी बरी व बरी या भीमाच्या तीरी ।।

**– अहिल्याबाई सावळेराम सारुक्ते , सोमलवाडी**



## (३) पंढरी करावी

पंढरी करावी आईबापाच्या पासूनी
अंघूळ करावा चंद्रभागेत बसूनी ।।
चंद्र ना भागे नदी निसरती माझे पायी
मला ना हात देवी विठ्ठलाची जनाबाई ।।
चंद्र ना मागे नदी निसरती माझी बोटं
मला ना हात देयी विठ्ठलाची जने उठ ।।
जाईल पंढरी पाहील पायरी नामाची
विठ्ठलाच्या आंधी भेट गरूड खांबाची ।।

**– सीताबाई शिवराम डगळे, गोंदुशी**

* *

## (४) पंढरीचा विठू

पंढरीचा विठू ग किती आहे काळा
अवघ्याना सुरष्टीच्या उभ्याउभ्या पड गळा ।।
पंढरीचा विठू किती आहे घट्ट
अवघ्याना सुरष्टीला उभ्याना देतो भेटा ।।
विठ्ठला शेजारी राही रुक्मीन बसानं
अबीर बुक्याची हिला गरदी सोसानं ।।
पंढरपुरात कुका विकतो शेरानं
विठ्ठला शेजारी रुक्मीन बसना भाराना ।।
पंढरपुरात पैशाच्या माळा नऊ
पुरानं माझा हात विठला रं खाली लवू ।।
पंढरपुरात पैशाच्या माळा वीस
पुरान माझा हात विठ्ठला खाली बस ।।
पंढरपुरात घरुघरी एकादशी
रताळाच्या काही पाट्या गरुड खांबाशी ।।
पंढरपुरात एक वाडा वाणीयाचा
विठ्ठलाच्या घरी गरूडखांब सोनीयाचा ।।
जाईल पंढरी वाळवंटात राहील
वाळवंटात राहील चंद्रभागेत न्हाईल ।।

**– सीताबाई शिवराम खपले, चिंचवणे**

## (५) तुका बोलं जीजा

तुका बोले, ''जीजा, कुकू लाव उभा
आले इमाईन, बसून जाऊ दोघा ।।''
तुकाराम बोलें, ''जीजा, कुकू लाव तु टिकला
आले इमाइन कसा जाऊ मी एकला ।।''
तुकाराम बोले, ''जीजा आला इमाईन नियाला
इसानला पानी कशी बसली नाहायाला ।।''
जीजाला फणी आणी हातीच्या दंताची
तुकाराम बोले जीजा कुरुळ्या केसांची ।।
तुकाराम बोले जीजाला नाही कोणी
घेतली फणी घातली जीजाची येणी ।।
तुकाराम बोले, ''जीजा, तू माझी बायकू
इमानाची जाया नकू जनाचा आयकू ।।''
तुकाराम बोले, ''जीजा इमाईनात चाल,
मांग राहिल्याना व्हतील तुझं हाल ।।''
तुकाराम बोले, ''जीजा इमाईनात बस''
''कसी बसू इमानात? घरी यीली म्हस'' ।।
तुका निघं वैकुंठी त्याच्या खांद्याव घोंगडी
तुका गायान गायी कसा भंडाऱ्या घोंगडी ।।
तुका चाले वैकुंठी जीजा बसली दारात
नाकातली नथ ठेवी इन्याच्या तारात ।।
तुका चाले वैकुंठी जीजा बसली जीन्यात
नाकातली नथ तुकारामाच्या इन्यात

**– अनुसयाबाई महादु खोकले, पाचपट्टे**

* *

## (६) जीजाला पावण

जीजाच्या मंदिरात कोणाचे पायी वाज
जीजाला पाहूण देऊचे हरिदास ।।
जीजाच्या मंदिरात पायतानाची वेचली
जीजाला पाहूण आळंदीचे वारकरी ।।
खांद्यावरी इना तुका हिंडे घरोघरी
तुकाबरोबरी संत आले वारकरी ।।
आकाडी एकादस पंधरा दिसाच्या पाळीला
तुकाचा गजर साधुसंताच्या आळीला ।।
जीजाच्या मंदिरात आला दिंडीची घोळखं
देवू तुकारामाच्या गळा साधूची ओळख ।।
आळंदिला जाती खालल्या आळीचे गोपाळ
देवू तुकाराम गळा साधुचा नितळ ।।
जिजाच्या मंदिरात साधू करती आंगोळी
चंदनाचे पिढीपाठ अभिर बुकेची रांगोळी ।।
आळंदीच्या वाटे तुका नाचतो दमाना
खांद्यावरी इन मंदिल भीजला घामाना ।।
आळंदीच्या वाटा तुका नाचे घाईघाई
टाळमुरदुंगाचा नाद येतो मोठ्या जयी जयी ।।
देवू तुकारामाची दिंडी कशाना फुटली
देवू तुकारामाची इन्याची तार तुटली ।।

**– अनुसयाबाई महादु खोकले, पाचपट्टे**

* *

## (७) विठ्ठल बोलतो

विठ्ठल बोलतो, ''दे ग रूखमिणी काठी
आले साधुसंत झाली देवळात दाटी'' ।।
विठ्ठल बोलता, ''दे ग रुखमिणी जोडा
आले साधुसंत पडे देऊळाला वेढा'' ।।
''किलबिल रुखमिणी देऊळाच्या कुंजात
आले साधुसंत उभे राहिले उन्हात'' ।।
विठ्ठल बोलतो, ''दे ग रुखमिणी काठी
आले साधुसंत झाली राऊळात दाटी'' ।।
रुखमिणी बोले, ''विठ्ठला, कथाला नको जाऊ
चिरेबंदी वाडा मी यकली कशी राहू ''।।

**– अनुसयाबाई महादु खोकले, पाचपट्टे.**

## (८) विठ्ठल मुराळी

सांगुण धाडिते रुखमिणी मावशीला
विठ्ठल मूळ धाड आखाड्या बारशीला ।।
विठ्ठल माझा पिता मला बोळवण करी
रुखमिणी माता कुकाने वटी भरी ।।
विठ्ठल मुराळी मला झोपाच्या भरात
अभिरबुकेची खूण ठेवली दारात ।।
विठ्ठल मुराळी अवघी केलेयी तयारी
विठ्ठल मुराळी थाटी करीतो नयेरी ।।
पंढरी जायाला तयारी केली राती
विठ्ठल मुराळी मला माह्येराला नेती ।।
पंढरी जायाला तयारी केली काल
विठ्ठल बोलतो बाई मह्यासंगं चाल ।।
पंढरीच्या वाट मोकळे माझे केस
विठ्ठल बरूबर घडली एकादस ।।
पंढरीच्या वाट मोकळी माझी येणी
विठ्ठलबाया संगं आखाड्या केल्या दोनी ।।

**– अनुसयाबाई महादु खोकले, पाचपट्टे.**

* *

## (९) रुसली रुखमिणी

रुसली रुखमिणी जाऊन बसली मळ्यात
विठ्ठल पिरती हात घालितो गळ्यात ।।
रुसली रुखमि जाऊन बसली वावरी
देवू विठ्ठल अंगी पलंग सावरी ।।
रुसली रुखमिणी जाऊन बसली डोंगरी
येंगून डोंगरी देवू डोळ्यावरी हात धरी ।।
रुसली रुखमिणी गेली रानाच्या रानात
विठ्ठल फिरफिरे झाडा झाडा झुडपात ।।
रुसली रुखमिणी जाऊन बसली दरीत
देवू विठ्ठल जातो नदीनदीना उतरत ।।
रुसली रुखमिणी गेली कड्याच्या कड्याला
देवू विठ्ठल जोडी हात तीची समजूत काढाया ।।
पाही विठ्ठल देवू कशी गालात हासली
माया विठ्ठल देवाची तीला नही उमगली ।।

**–अनुसयाबाई महादु खोकले पाचपट्टे**

* *

## (१०) भाऊ बोले बहिणीशी

भाऊ बोले बहिणीशी
''का ग उभी संतापाशी?''
''संत सुखाचे ना घर
म्हणून व्हते खिनभर''
भाऊ म्हन, ''धांगड झाली
फुगडी संतापाशी केली''
आप म्हन, ''मारा मारा
पाजा विषयाचा प्याला''
विष पियाली मिराबाई
जन्मोजन्मी मराण नही
मिराबाईचा अभंग
तुकाराम झाले दंग

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

## (११) पंढरपुरी चोरी झाली

पंढरपुरी चोरी झाली
विठ्ठलाची पताका नेली
आळ आला जनीवरी
जनी गेली सूळापाशी
सूळाचा ग झाला पाणी
जनी पळ आडरानी

पताका पड धरणीवरी
जनी पळ आडरानी

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

### (१२) वन्या गायी तुका बोले

वन्या गायी तुझी शिंगा महादेवा तुझी लिंगा
तुका बोले ।।
वन्या गायी तुझं कान जसा नागेलीचं पान
तुका बोले ।।
वन्या गायी तुझं डोळं जसं लोणीयाचं गोळं
तुका बोले ।।
वन्या गायी तुझं नाक जसं पंढरीचा माप
तुका बोले ।।
वन्या गायी तुझं तोंड जसं अम्रिताचा कुंड
तुका बोले ।।
वन्या गायी तुझी जीभ चहुमुलकी चमकं ईज
तुका बोले ।।
वन्या गायी तुझं दात राईभोग जसा भात
तुका बोले ।।
वन्या गायी तुझं व्हट जसी अमृताची लाट
तुका बोले ।।
वन्या गायी तुझी पाठ जसी पंढरीची वाट
तुका बोले ।।
वन्या गायी तुझा आडा महादेवा तुझा घोडा
तुका बोले ।।
वन्या गायी तुझी शेप जसी नागीन मारी झ्याप
तुका बोले ।।
वन्या गायी तुझ्या मांड्या जस्या पालखीच्या दांड्या
तुका बोले ।।

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *



## ६) लग्न, पाचवी, बारसे इत्यादी विधी संदर्भातील गीते :

### i) विवाह प्रथेतील गाणी

### (१) हळद दळ गं

पाची दळती हळद हळद जात्यात माहेयना
लगीन मैनाच निंगाल मह्या भावाचा मांगना ।।
भाऊ केला येही बाप म्हन नको बाई
आताच्या भावजया मान राखायच्या नही ।।
भाऊ तो आपला भाऊजयी परायाची
बंधुराया माझा ईहीण करायाची ।।
मोठं माझ घर दळण लागत पायली
बंधुराया लेक देवू ती पहेली ।।
भाऊ केला येही म्या केला उमतीचा
बंधुराया माझा कौळा कोंभ शेवंतीचा ।।
भाऊ केला येही केला म्या वालीचा
बंधुराया माझा हिरवा डोंगर पालीचा

**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

### (२) बाईला मांगना

माझ्या बाईला मांगना आम्हा कोनावाची देई
तीच्या आजोळा जाऊन पूस मामावाची घेई ।।
बाईला मांगना आल दडत लपत
गवळ्या माझी उभी चंदन सोपयात ।।
बाईला मांगना मुंगी पैठणीचा राजा
आन शिंगी स्वार झाला माझ्याबाई तुझा आजा।।
बाईला मांगना मुंगी पैठणीचा लोक
शिंगी स्वार झाला माझ्याबाई तुझा बाप ।।
माझ्या बाईला मांगना मुंगी पैठणीका गावू
शिंगी स्वार झाला माझ्या बाई तुझा भाऊ ।।
बाईला मांगना मुंगी पैठणी खालत

शिंगी स्वार झालं माझ्या बाईच चुलत ।।
**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

* *

### (३) बाईला मांगना

बाईला मांगना गल्या गल्यानी झालं थव
गवळण माझी ढगामंदी ईज लव ।।
बाईला मांगना आलं जव्हारीच राज
बाप म्हन लेकी अवल सोना माझं ।।
बाईला मांगना आलं राजुरा वरूनी
गवळण माझी लेक मोठीशी म्हणूनी ।।
बाईला मांगना सैन बैसली उन्हात
बंधवाच्या माझ्या कसं येईना ध्यानात ।।
बाईला मांगना सोयीरेली सांगा नका येऊ
गवळण माझी मोठी व्हईल मंग देऊ ।।
बाईला मांगना सोयीरली सांगा नकू येरझरा
गवळण माझी लक्षुमबाई नवरी गेली मामघरा ।।
**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

* *

### (४) मैनाला मांगना

मैनाला मांगना शेळूच्या मुलकाच
चुलत्यानी बोली केली बाळं तोडंकुलुपाच ।।
मैनाला मांगना घाटाखालची टाकळी
चुलत्याना बोली केली सरी खालली साकळी ।।
मैनाला मांगना गावू चाटूरी चांडुरी
चुलत्याने बोली केली चहरी बस्ता पितांबरी ।।
**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

* *

### (५) साकाराचं पुड

साकाराचं पुडं गंगापलिड मव्हारी
साकाराचं पुडं तिच्या मामाच्या देव्हारी ।।



हौस मला मोठी समंगनेराच्या याह्याची
केला मनाचा ईचार लेक नंदाला देयाची ।।
मैनाला मांगना दोह्यादारी झाली दाटी
कंबरी कोऱ्हाशेला चुलता इचा पान वाटी ।।
लहान नवरी गादीवरी उभी राहे
गवळ्या माझी वाट मामावाची पाहे ।।
**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

* *

### (६) मैनाचा बहुला

लहान नवरी इची कुकाची पावूलां
गवळणीच्या माझ्या मामा घालती बहुला ।।
बहुल्याची माती वजवती बेलदार
गौळणीचा माझ्या मामा इचा शिलेदार ।।
बव्हल्याची माती बनवी हातोपाती
गवळणीच्या माझ्या नवऱ्याचे मामा किती ।।
ये ये बंधुराया तुही इहीण व्हईन
तुपा पोळ्याचा उल्फा तुह्या गावाला देईन ।।
**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

### (७) मी त मांगत नाही काही

राजा हौसान केला येई
　　मी त मांगत नही काही ।।
मी त मांगते थोडा थोडा
　　नवरदेवाला कंठी कडा ।।
कंठी गड्या सोना फिका
　　माझ्या कंगण्या जोग रुपा ।।
चंद्रहार चाईला गळ्या
　　इला घडवा बोंडबाळ्या ।।
बोंडबाळ्याच दांड रूंद
　　इला हिरायी शेलू दंड ।।
हिरायी शेलूची काळी दशी

मी त मागते गाई म्हशी ।।
गाय म्हशीचा दुध खर
मी त मांगते हाती घोडं ।।
हाती घोडयाव नवरी बस
साऱ्या नगरी मंदी फिरं ।।
ये रे ये रे माझ्या दादा
दादा चाल रे मधल्या घरा ।।
मधल्या घराची पाह्य रीत
जेवाण वाढीते दुधभात ।।
जेवाण वाढीते दुधभात
याही जेवतो रघुनाथ ।।

**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

* *

## (८) मला कळित नाही केले ग

माझ्या बापानी मला दिले मला दिले ग
मला कळित नाही केले नाही केले ग
बाप कशाला लोभी झाला लोभी झाला ग
बाप पैसेली लोभी झाला लोभी झाला ग ।।
माझ्या आईनी मला दिले मला दिले ग
मला कळीत नाही केले नाही केले ग
आई कशाला लोभी झाली लोभी झाली गं
आई लुगड्याला लोभी झाली लोभी झाली ग ।।
माझ्या भावानी मला दिले मला दिले ग
मला कळीत नाही केले नाही केले ग
भाऊ कशाला लोभी झाला लोभी झाला ग
भाऊ अंगठीला लोभी झाला लोभी झाला ग ।।
माझ्या बहिनीना मला दिले मला दिले ग
मला कळीत नाही केले नाही केले ग
बहिन कशाला लोभी झाली लोभी झाली ग
बहिन चोळीला लोभी झाली लोभी झाली ग ।।

**– ठकुबाई संतु बांबेरे , कोदनी**



## (९) दादा मी लग्नाला येते

''कळस तांब्या मी घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''तुला नथ भी नाही
लग्नाला नको येऊ बाई'' ।।
''नथ भाड्याची घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''तुला पोलका बी नाही
लग्नाला नको येऊ बाई'' ।।
''पोलका भाड्याने घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''तुला बाजीबंद नाही
लग्नाला नको येऊ बाई'' ।।
''बाजीबंद भाड्याने घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''तुला लुगडा बी नाही
लग्नाला नको येऊ बाई'' ।।
''तुला साकळ्या बी नाही
लग्नाला नको येऊ बाई'' ।।
''साकळ्या भाड्याच्या घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''तुला जोड्या बी नाही
लग्नाला नको येऊ बाई'' ।।
''जोड्या भाड्याच्या घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''तुला गोठ बी नाही
लग्नाला येऊ नको बाई ।।
''गोठ भाड्याचा घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''तुला गजरा बी नाही
लग्नाला नको येऊ बाई ।।

''गजरा भाड्याचा घेते
दादा मी लग्नाला येते'' ।।
''भाड्याचा साज आनिते
दादा मी लग्नाला येते'' ।।
कळसतांब्या मी घेते
दादा मी लग्नाला येते ।।

**– ठकुबाई संतु बांबेरे , कोदनी**

* *

## (१०) राजाहौसान केला येही

राजाहौसानं केला येही
का जाई भीमवाला
नथीच्या उझणी मी लोळे
का जाई भीमवाल्या
बाळ्याच्या उझणी मी ल्याले
का जाई भीमवाल्या
राजाहौसानं केला येही
का जाई भीमवाल्या
नही नव येही मी केला
का जाई भीमवाला
येळाच्या उझणी मी लोळे
का जाई भीमवाल्या
जोड्याच्या उझणी मी लोळे
का जाई भीमवाल्या
नहीनव येही मी केला
का जाई भीमवाला

**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

* *

## (११) गंधटिळा

नवऱ्याला नवर केला
अना ग लावू टिळा

आल्या नवऱ्याच्या वरमाया
आल्या ग नखरंवाल्या
आले नवऱ्याचे वऱ्हाडी
आले सारेच कोटफेटंवाले
आल्या नवऱ्याच्या कलवऱ्या
साऱ्या आल्या ग गोल लुगड्यावाल्या

**– अनुसयाबाई महादु खोकले, पाचपट्टे**

* *

## (१२) जोडा नाही तुह्या सारखा

मांडवा खालून गेल्या उसाच्या गाड्या
मोहरे बापा माझ्या सारखा ग माझ्या सारखा
जोडा फिरलो ग बाई साऱ्या मंबई शहरा
नाही ग बाई जोडा जोडा तुह्या सारखा
मांडवा खालून गेल्या गेल्या उसाच्या गाड्या
मोहरे भाऊ माझ्या सारखा र माझ्या सारखा
जोडा फिरलो ग बाई साऱ्या नासीक शहरा
नाही ग बाई जोडा जोडा तुह्या सारखा
मांडवाखालून गेल्या उसाच्या गाड्या
माहरे आई माझ्या सारखा र माझ्या सारखा
जोडा फिरलो ग बाई साऱ्या पुण्या शहरा
नाही ग बाई जोडा जोडा तुह्या सारखा

**– सखुबाई संतु खाडे, बारी**

* *

## (१३) किसन देवाचं लगीन निघाल

किसनदेवाचं लगीन निघाल
पत्रिहा छापल्या जलदीत
वाटून दिल्या या नगरीत
की देवा, वाटून दिल्या या नगरीत
बस्ता बांधिला दिल्लीत
आणून सोडला येवल्यात

मानिक मोती त्या बस्त्यात
देवा मानिक मोती त्या बस्त्यात
वरमाय न्हालिया गंगेत
चमक भरावा भांगेत
नवरदेव कलवरी ईमानात की देवा
नवरी कलवरी च्या सीत
वऱ्हाड आल्या लारीत
वरमाया वरमाया गाडीत
पंगली बसल्या ठाण्यात, की देवा
हात धुयाला गाडीत

**– पार्वतीबाई श्रावणा भांगरे,साकिरवाडी**

* *

## (१४) अहो विहीणबाई

अहो अहो विहीणबाई
आमच म्हनन लई नाही
आमच म्हननं आहे थोडं
आमच्या मुलीला पायी तोडं
पायी तोड्याची कडी मोठी
आमच्या मुलीला चिंचपेटी
चिंचपेट्याची कडी रुंद
आमच्या मुलीला बाजीबंद
बाजीबंदाचा खडा लाल
आमच्या मुलीला हिरवी शाल
हिरव्या शालीच्या निळ्या झळ्या
आमच्या मुलीला बोंडबाळ्या
बोंडबाळ्याच खडा मोठा
आमच्या मुलीला हाती मोठा
हातीवरली आंबराई
नवरीमुलगी जाते घरी
आई बघते दारातुनी
बाप बघतो खिडकीतुनी
बहिण बघते ओट्यावूनी
भाऊ बघतो ग ीवूनी
ज्याची व्हती त्यांना नेली
आमची माया व्यर्थ गेली

**– हिराबाई गंगाराम बांबेरे, कोदनी**

* *

## (१५) हळद लाविति कोन कोन

हळद लाविति कोन?
नवऱ्या बाळाची बहिण
हळद लाविली कोना?
नवऱ्या बाळाच्या आईना
हळद लाविति कसी?
नवऱ्या बाळाची भाची
हळद लाविली कोना?
नवऱ्या बाळाच्या चुलतीना
हळद लाविली कोनी कोनी?
नवऱ्या बाळाच्या आत्येनी
हळद लाविली कोनी?
गावाच्या पाटील बाईंनी
हळद यवढ्या अंगी फुलं
कसं सोन्या जोगं खुलं

**– मंदा गंगाधर पिचड, साकिरवाडी**

* *

## (१६) झाड हळदीचं लवं

निळ्या मांडवाच्या दारी
झाड काशीयाचं लव
निळ्या मांडवाच्या दारी
झाड हळदीचं लव ।।

हळदीचा पहिला तोडा
    वरमाईला मूळ धाडा
आमची वरमाय सरस
    भिती लायील आरस ।।
हळदीचा दुसरा तोडा
    वऱ्हाडाला मूळ धाडा
नवरव हाड सरस
    गाडी जुतली सातसं ।।

**– मंदा गंगाधर पिचड, साकिरवाडी**

✻ ✻

## (१७) धुळ राजाना तोडली

धुळ राजाना तोडली
    धूळ तोडूनी डाल्या भरील्या
त्याही डाल्या कोन्या नगरी
त्याही डाल्या का नवशा नगरी
नवशी नगरी काही फाजुरी
तीठ आहे का बाळ कन्या रं
तीला जातो का परनाथा
कशी येईल तुझ्या हाती
राजे बापाचा कमाओती
हाती घोडा का डुलाईती
जी नगर फिरविती

**– आशाबाई नामदेव भांगरे, साकिरवाडी**

✻ ✻

## (१८) खाड्याची कन्या केली

खाड्याची कन्या केली इच्या कानाला
इच्या कानाला आन बाई भल्या बोंडबाळ्या
खाड्याची कन्या केली इच्या दंडाला
इच्या दंडाला आन बाई भल्याभल्या येला
खाड्याची कन्या केली इच्या नाकाला
इच्या नाकाला आनबाई भलीकीव नथ
खाड्याची कन्या केली इच्या गळ्याला
इच्या गळ्याला आन बाई यकवीस पुतळ्या

**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

✻ ✻

## (१९) भीमराजाच अर्धाराज

भीमराजाचं अर्धाराज
नही केला सोनानाणा
नेली नवलाखाची पुतळी
दर्या किनारी उभी केली
त्ये दर्याला भरती आली
उरल्या बाजूचा दादर फुटला
त्या दादरातून कोन गेली
त्या दादरावून सिता गेली
पाची पट्टेची कीला हारावली
असा राम झेरू पेरू
पहल्या उडीत किली काहाडली
धर ही किली उघड पेटी
आपली बाराची गाडी हुकली

**– सखुबाई संतु खाडे, बारी**

✻ ✻

## (२०) इहीनीनो इनविते तुम्हाला

इहीनीनो दंडवत तुम्हाला
    सुखी ठिवा मह्या मुलीला
बापाची माया वाया गेली
    सासऱ्याची सून घरा आली
भावाची माया वाया गेली
    दिराची भावजय घरा आली

आईची माया वाया गेली
सासूची सुन घरा आली
**– पार्वतीबाई गंगाराम बांबेरे, कोदनी**

* *

## (२१) बोळवण

गाडी आली ग मांडवा मधी
वेनू रडू नकू मना मधी
सासरा तुझा ग बापावानी
तुला वागवील लेकीवानी
सासू तुझी ग आईवानी
तुला वागवील लेकीवानी
भाया तुझा ग भावावानी
तुला वागवील बहिनीवानी
**– सिंधुबाई गंगाराम म्हशाळ, भोजदरी**

## (२२) माझ्या बंधवाचा मळा

नदीच्या किऱ्याला
यक सरीचाय झाड
दिशांनी पार येतो
कोथंबरीचा वास
तुरीला आलेय शेंगा
आंबाडीला आलेय बोंडा
मया बंधुचा पिकलाय मळा
अग इडूनच दिसतोय मला
खारीक खोबरा वला नारळ
माझ्या भावानं सवदा केला ग
वानी दुकानदार
मया भावाना पीळलं पार
नदीच्या किऱ्याला
यकसरीचा झाड
**– आशाबाई नामदेव भांगरे, साकिरवाडी**

## (२३) मामाच्या नगरी जावय काय मांगतो

मामाच्या नगरी जावय काय मांगतो
मामाच्या नगरी जावय अंगठी मांगतो
मामाच्या नगरी जावय काय मांगतो
मामाच्या नगरी जावय रुमाल मांगतो
मामाच्या नगरी जावय काय मांगतो
मामाच्या नगरी जावय कपीला मांगतो
मामाच्या नगरी जावय काय मांगतो
मामाच्या नगरी जावय जरी टोपी मांगतो
मामाच्या नगरी जावय काय मांगतो
मामाच्या नगरी जावय वैलजोडी मांगतो
मामाच्या नगरी जावय काय मांगतो
मामाच्या नगरी जावय पोरीला मांगतो
**– ठकुबाई संतु बांबेरे, कोदनी**

* *

## (२४) गाडी बनवरे

गाडी बनवरे बनवरे लाल पडद्याची
बाप आलाय रे आलाय रे माला नियाली ।।
गाडी बनवरे बनवरे लाल पडद्याची
मला नियाला रे नियाला आईची घाई
गाडी बनवरे बनवरे लाल पडद्याची
मला नियाला रे नियाला भावाची घाई ।।
गाडी बनवरे बनवरे लाल पडद्याची
मला नियाला रे नियाला बहिनीची घाई ।।
**– आशाबाई नामदेव भांगरे, साकिरवाडी**

* *

## (२५) गाडी का कलली

इढून गाडी का कलली
टप्प्यावरून खाली दणकली
टप्प्यावरून खाली दणकली

गाडी झाडी वना मंदी गेली
गस्ती वाले जागे झाले
तुमी कुठीले राजे आले
''आम्ही पुण्याचे राजे आले
आम्ही पुण्याचे राजे आले''
''तुमी काय काजवेज आले
तुमी काय काजवेज आले''
''आलो सीताला पनाया
आलो सीताला पनाया''
''कशी येईल तुझ्या हाती
कशी येईल तुझ्या हाती''
राजे बापाचा कमविती
हाती घोडा डुलइती
चौनगरी फिरविती
दाशाबटकीणी वागविती

**– जनाबाई भदु पटेकर, रणद बु.**

* *

## ii) जन्मप्रथेतील गाणी

### (२६) देवयबाई बाळवंतीन

देवयबाई बाळवंतीन वल्या इच्या कुशी
जलमला किसन देवू गोकुळ अष्टमीच्या दिसी ।।
देवयबाई बाळवंतीन पिवळ्या इच्या टाचा
इच्या माताना पाहिला न्हनीव जाताना ।।
देवयबाई बाळवंतीन रक्ता भरली पायरी
नऊ लाख सोनाईना धार रक्ताची वाहिली ।।
देवयबाई बाळवंतीन इला बारावा लोटला
इच्या न्हानीवरी बाई इला पान्हा दाटला ।।
देवयबाई बाळवंतीन गोकुळा लावा बत्ती
जलमिला किसनदेवू मामा मावशीच्या हाती ।।
देवयबाई बाळवंतीन गोकुळी लावा दिवा
जलमिला किसनदेवू मामा मावशीला दावा ।।
जलमिला किसनदेवू दोह्या मांडीव माह्येना
कोणी इसायती पानी कोणी न्हानी किसनाला ।।
जलमी किसनदेवू आडवो घेतो त्याचा बाप
सरकारी शाळाची कुलपा उघडी आपोआप
जलमिला किसनदेवू अडवा येई इचा भाऊ
सरकारी शाळाची कुलपा उघडी किसनदेवू ।।

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

### (२७) माझ्या आंगणी बाई अंगणी

माझ्या अंगणी बाई अंगणी
खेळ चक्रपाणी
आम्ही किसनाच्या बाई किसनाच्या
किसनाच्या गवळणी
बाळी घडावा बाई घडावा
किसनाच्या कानाची
नवूलाखाची बाई लाखाची
बत्तीस तोळ्यांची
माझ्या अंगणी बाई अंगणी
खेळ चक्रपाणी
कडा घडावा बाई घडावा
किसनाच्या हाताचा
नवूलाखाचा बाई लाखाचा
बत्तीस तोळ्यांचा
माझ्या अंगणी बाई अंगणी
खेळ चक्रपाणी
पेटी घडावा बाई घडावा
किसनाच्या कानाची
नवू लाखाची बाई लाखाची
बत्तीस तोळ्यांची

माझ्या अंगणी बाई अंगणी
        खेळ चक्रपाणी
तोडा घडावा बाई घडावा
        किसनाच्या पायाचा
नवू लाखाचा बाई लाखाचा
        बत्तीस तोळ्याचा

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

✻ ✻

## (२८) पाळणा

जुंदरच्या मोघाला हो मोघाला
लांब आदंधिला हो आदंधिला
त्याई खांबाला बाई खांबाला
पाळणी टांगली बाई पाळणी टांगली
त्याई पाळण्यात हो पाळण्यात
        सीताची फडकी सीताची फडकी
त्याई फडकीत बाई फडकीत
नीजे लडुबाळ बाई नीजे लडुबाळ
त्याला हालवाया हालवाया
रामलक्षेमन बाई

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

✻ ✻

## (२९) बाळ टाकिले पाळणी

बाई बाळाला टाकीले पाळणी
झोका दियाला तुमी गवळ्याच्या पोरी
धुणा घेऊनीया डोयीवरी
चालुनीया गेली यमुनेतीरी
गेल्या पळून गवळ्याच्या पोरी
बाळ यकलच राहिलं पाळणी
तीकून आले जेजुरीचे मलारी
त्यांचे हाती पाळण्याची दोरी



झोका देतोय मलारी

**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

✻ ✻

## (३०) विठूच्या दरूज्यावर

विठूच्या दरूज्यावर मोत्याचा पाळणा
हलवा ग सयानव हलवा बाळाचा पाळणा
मी गुतले कामालाग तुमी हलवा रामाला
हालवा रामाला ग राम निजले पाळण्याला
मातेचा पाळणा
        त्याला रेशमाची दोरी
याला झोका देती
        या नगरीच्या सुंदरी
मुका घेतला रामाचा
        देवू निंगाले पायाला
हात दिला पाळण्याला
        पान्हा आला पारवतीला

**– सखुबाई संतु बांबेरे, कोदनी**

✻ ✻

## (३१) झोका देती

किसनबाळ पाळण्यात त्याला रेशमाची दोरी
या किसन देवाला झोका देती पोरीसोरी ।।
किसन देवाला मोठा झोका कोन देतो
हाती दोरीना धरून झोका याचा मामा देतो ।।
        जु जु जूई ।।
पाळण्यात किसनबाळ कसं साजिर गोजिरं
पाळण्याला याच्या बांधिलं मोती हारं
मोतीहाराचा पाळणा हालवितो याच बाप
झोका कृष्णनाथ
        जु जु जुई ।।
या ग रामाचा पाळणा हालवितो दशरथ

कशी कौसल्या हासत जु जु जुई
राम बाळाचा पाळणा याला रेशमाची दोरी
हालविती साऱ्या नारी पाळण्याला जु जुं जुई।।
या ग रानाता वनात जलमिला मलारी
अवल सोन्याची कुडी साजीरी गोजीरी
मलारीचा पाळणा त्याला दोरी येलाची
पाळण्या टांगली मोठी फांदी बेलाची
जु जुं जुई ।।
या ग पाळण्यास सई घातला गणराय
पाळण्याला झोका देती पारवती माय
पाळण्याची दोरी धरितो महादेव
झोपना करना बाई पाळण्यात गणराय
जु जुं जुई ।।

**– ठकुबाई संतु बांबेरे, कोदनी**

* *

## ७) भलरी गीते (श्रमगीते)

### (१) देते तांदळाला घाऊ

राम म्हणू म्हणू संगतीच सजन
माझ्या हृदयात कसं मांडीलेल भजान ।।
राम म्हणू म्हणू राम माझे गुरू भाऊ
सोन्याची सळई देते तांदळाला घावू ।।
चालण चंचल तुझं बोलणं मंजुळ
मुखातील दात जिऱ्यासाळीचं तांदुळ ।।
तांदळाला घावू देती दणा दणा
तांदुळ तांदुळ कसा निघतो दाणा दाणा ।।
तांदुळाचा दाणा कसा निघतो राशी राशी
तांदळाला घावू देती किती बाया घशी घशी ।।

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *



### (२) पाती माग चाली पात

पाती माग चाली पात माझ्या साळी साची
बंधवाच्या माझ्या दारी जोडी पुलीसाची ।।
पाटील पाटील नका म्हणू भलत्याला
बंधवाच नाव माझ्या ग्यालं इलाइताला ।।
गाव गावळ्या पाटलांच्या घोड्या बांधती लिंबाला
बंधवाची माझ्या घोडी कचेरी खांबाला ।।
गाव आकुलच्या कचेरी समयी चल ढनुढन
बंधवाच्या माझ्या वकिलाशी भाऊपणा ।।
गाव आकुलच्या कचेरी समयी जळती लोण्याची
वकीला शेजारी खुर्ची आईच्या तान्ह्याची ।।

**– तुळाबाई भाऊ देशमुख, शेणीत**

* *

### (३) राम राम म्हनू आवण्या करताना

राम राम म्हनू आवण्या करताना
राम राम म्हनू भाता रोप धरीताना ।।
राम म्हनू म्हनू राम कौसल्या आईचा
याच्या बरूबरी झाला निर्भाव देहीचा ।।
राम लक्ष्मण दोघांचे दोघे जन
भरत छत्रगुण अंजेनीचा पहेलवान ।।
यशोदीला झाला देवकीला कामा आला
पिंडाला पानी दिलं धनी वतनाला ।।
मुठी मुठी रोप जसं कानायाचा नाव
यकाच रोपाचा व्हत पोताभर भात ।।
भात ना भात बाई खाला जानकी रामाना
रामाच्या नावाना आलं वरच येंगूना

**– नामदेव गुणाजी खोकले, पाचपट्टे**

* *

### (४) सीताला सासूरवास

सीताला सासुरवास आडवा लई लोट
सीतालानं बोलतो पाप्या दारातून उठ ।।

सीताला सासुरवास आडवा लई पायी
सीता न बोलती पाप्या दारातुनी जाई ।।
सीताला सासुरवास केला केस केशी
वाटून काय दिला सगळा देशोदेशी ।।
सीताला सासुरवास केलाई बहू बहू
वाटून काय दिला सयेली गहू गहू ।।
सीताला सासुरवास अवघ्या डोंगरात
सरज्याची नथ इशटली पेटीत ।।
सीताला सासुरवास कोन्या केगयीना केला
रामासारखा जोडा ईना बघुनही दिला ।।
सीता सांगतेही कन्या राम सांगून देईना
सीता तुझे दुख माझ्या हृदयी माहावेना ।।
फेगईना दिले कान कवाडाची उभीहीन
सीता चालली वनवासा कुंकू कपाळ भरून ।।

**– सिताबाई शिवराम खोकले, पाचकट्टे**

✻ ✻

## (५) सीताला वनवास

सीता चाल वनवासा आडव्या गेल्या म्हशी
बारावर्से वनवासा सीता भोगशील कशी ।।
सीता चाली वनवासा आडव्या गेल्या गायी
बारा वर्से वनवासा सीता भोगशील कायी ।।
सीता चाल वनवासा उभ्या डोंगराना
रामजीच्या रथात सीता माहवेना ।।
सीताला बोळवाया रामसबाच येईना
रामजीचा रथ चाला उभ्या सडकाना ।।
रामाला आला घाम सीता पूस फडकीना
रामाजीचा रथ कसा पुढची हालना ।।

**– विठाबाई गणपत शिळकंदे, पाभुळवंडी**

✻ ✻

## (६) मशा डुबात निघाला

मशा डुबात निघाला ना



मशा तोंडाला बांबराना
मशा डोक्याला चांचराना
मशा शिंगाला कोंबरांना
मशा डोक्याला गारूळाना
मशा शेपीला लांडुराना
मशा चहू पायाला गुरांना

**– पोपट रामा डगळे, पाचपट्टे**

✻ ✻

## (७) जनी जाते ओ शेनाला

जनी जाते ओ शेनाला
उभा पाठीमागे काना
''जने, येऊ दे ग मला,
शाण घेवू लागन तुला
घालून पितांबराची काच
शान येचू चहू बाज
शान येचून बांधली म्वाट
नामदेव देतो गाठ
दिली देवजीच्या शिरी
टाकली जनाचीया दारी
जनी बसली नाहायला
पानी नही यीसाणाला
घेऊन तांब्याचा घागरी
देवू गेले गंगे तीरी
जनाबाई आंधुळ करी
घेऊन तांब्याच्या घागरी

**– अहिल्याबाई सावळेराम सारूक्ते, सोमलवाडी**

✻ ✻

## (८) नामदेव मुसाळ धरी

जनाबाई साळी सडी
नामदेव मुसाळ धरी

''नामदेवा मुसाळ सोड
हाता येतील तुझ्या फोड''
''फोड आले तर येऊद्या
साळी कांडून घेऊद्या''
साळी कांडून केली रास
नामदेव भरीतोय पोत.

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

## (९) गाईख्यारंबाळा

गाईख्यारं बाळा तुझ्या काठीला घुंगरू
घुंगराच्या नादा गाई चालल्या डोंगरू
गाईख्यारं बाळा तुझ्या कंबरी फडका
फडकेच्या नादा गायी चालल्या सडका
गाईख्यारे बाळा तुझ्या खांद्याव घोंगडी
घोंगडीच्या नादा गाया चालल्या बावडी
गायीख्यारं बाळा तुझ्या हातात कुऱ्हाडी
कुराडीच्या नादा गायी चालल्या गडदी

**– वसंत धोंडू रेंगडे, गोंदुशी**

* *

## (१०) नांदया चालुंदी आऊत

नांदया चालूंदी आऊत आऊत
तुझ्या आऊतान मांग नागली चाल मूठ मूठ
नांदया, हो नांदया तुझ्या संग मोईख्या
जोडीना जोडीना चालूंदी आऊताच्या पात्या
नांदया गोंद्याहो चाला चालारं बिगीन
कळसाईवरून आलं ढगाड भरून

**– रघुनाथ संतु खाडे, बारी**

* *

# संकीर्ण :

## (१) आमची गावा

बारी वारनघुशी य दोनी जावा
ह्या दोघी जावा
शेंडी मंधी मटान घ्यावा मटान घ्यावा
बाकी मंधी शिजवून खावा शिजवून खावा
मान्हेरीची र बावडी पहावा बावडी पहावा
अंबेवंगणाला अवघी फुटा रं आवघी फुटा
लाडगावाला पानी मोठा रं पानी मोठा
शेनीताला मकाची ताटा रं मकाची ताटा
देवगावाना फुगावल्या पोटा फुगावल्या पोटा
बाभुळवंडीला पान्याचा तोटा पान्याचा तोटा
उगलेवाडीच्या हातात सुटा हातात सुटा

**– विठ्ठल गणपत शिळकंदे, पाभुळवंडी**

* *

## (२) अस माझ गाव

राम राम घ्या हो पाव्हन
गाव आमच भरविर
ध्यान देऊन ऐका गान हो रसिक जन ।।
वर्णु आणि सांगु किती आमच्या गावाची महती
गुंग होते आमची मती हो रसिक जन ।।
गाव आहे कडवा तीरी
चढून बघावा टेकडीवरी
स्पष्ट दिसती दिशा चारी हो रसिक जन ।।
गावाला दोन वाढे
आहेत पूर्वीकडे
किती सांगू त्याचे पवाडे हो रसिकजन ।।
बाहेर डौल दाविती
घरी उंदीर फारकत घेती
अशा गंमती सांगू किती हो रसिक जन ।।

गावाला चिकार शेती
 परी खायाची पडते भ्रांती
गहाण ठेवून धान्य घेती हो रसिकजन ।।
गावाला विहीर मळे
 परि करिती नाना चाळे
दरसाल वाजती खुळखुळे
 हो रसिक जन ।।
गावाला आहेत शाळा
 त्यांना नेहमीच असतो टाळा
ठेकेदार करतो चाळा
 हो रसिक जन ।।
गावाला नाही पुढारी
 गरिबांचा नाही कैवारी
जो तो आपलीच तुंबडी भरी
 हो रसिक जन ।।
गावाला दुकाना चार
 परि नफा घेती बेसुमार
एक वर्षात होती गबर
 हो रसिक जन ।।
सोसायटीत एक सचीव
 नित घेतो कोंबडीचा जीव
परि भलताच खताला भाव
 हो रसिक जन ।।
गावाला देवळे चार
 परि माळकरी आहेत फार
त्यांचा आचार नाही बरूबर
 हो रसिकजन ।।
काहींनी माळा काढल्यात पार
त्यांना नाही राम सोडनार
शेवटी हालच होतील फार
 हो रसिक जन ।।

**– रामदार संतु बांबेरे, कोदनी**



## (३) आंधळी पुसती पांगळीला

आंधळी पुसती पांगळीला
 हागाया चालतीका खंगळीला ।।
आवडी पुसती सवडीला
 पान्याला चालतीका बावडीला ।।
येसरी पुसती केसरीला
 पोचारा देवू काय ओसरिला ।।
सुली पुसती फुलीला
 पोचारा देऊ काय चुलीला ।।
माळशी पुसती तुळशीला
 घासून काढू काय तुळशीला ।।
पांड्या पुसतो धोंड्याला
 लाकूड आनू काय दांड्याला ।।
येसूबा पुसतो केसुबाला
 नारळ फोडू काय म्हसूबाला ।।
धोंडुबा पुसतो पांडुबाला
 नारळ फोडू का खंडुबाला ।।

**– धोंगडे रामदास हनुमंता, शेणीत**

* *

## (४) डांगाण गावाची ओळख

तातडीचा काम तुला
 लागं आवंढा पट्टा ।।
दगडाचा रान
 तुझी शिनले नखां बोटां ।।
तातडीचा काम तुला
 लागला खिरला
जेठवलीच्या तोंडी
 भाऊ तोडी कवूधरा
तातडीचा काम तुला
 लाग बाभूळवंडी

डोयी वरी मोळी
हळूच उत्तर वांदरनळी ।।
तातडीचा काम तुला
लागे लाडगाव
चावड्या वडाखाली झोपा घ्येतो थोरला भाव ।।
तातडीचा काम तुला
लागला राजूर
शेलूच्या पदरा भाऊ बांधितो खजूर
तातडीचा काम
तुला लागली लबडी
गव्हाळीच्या तोंडी वर्धी निघाली जवळी

**– पोपट रामा डगळे, पाचकट्टे**

* *

## (५) वाड्या

धारवाडी ग धाराखाली
गंभीर गंभीरेची वाडी
पट्टागाव ग किल्याखाली
कोकण वाडी ग खडकावरी
पाचकट्टा ग घुटे वाडी
त्येच्या खालती टेंभुर वाडी
हिरव्या पिवळा मधी
पाशें गाडी
साकूरामधी हे ज्याची जोडी
माळेगाव ग बकरे मोडी

**– दत्ताराम सखाराम गोडे, तीर्ढे**

* *

## (६) बाळ लष्करी गेला

बाळ लष्करी गेला
नको म्हणते
गेला लष्करी गेला ।।
सारी पंचवीर रूपये महिना मजुरी केले



दहा रुपये पातळ घ्येतले बहिणीला लिया
पेरूचा फेटा घ्येतला
मेव्हन्याला लिया
दाजीला लियाला ।।
जवळ आल बहिणीचे गाव
बहिणीने ओळखला
भाऊ आले नियाला ।।
बहिणीना घातली दाळ
जिवाला काळ ।।
बहिणीना लोटल्या पोळ्या
दुःखाच्या गोळा ।।
बहिणीना रांधला भात
जीवाचा घात ।।
बहिणीना रांधला सार
जीवाला घोर ।।
बहिणीना वाहाडला शिरा
जेवान पूरा ।।
बहिणीना वाहाडला दही ।।
जेवान लई ।।
बहिणीना वाहाडला तूप
जेवन रूप ।।
बहिणीना वाहाडला दूध
जेवान स्थिर ।।

**–अहिल्याबाई साबळेराम सारूक्ते, सोमलवाडी.**

* *

## (७) केळी सांगी

केळी सांगी भ दोनी जावा
टाकारी मंधी देऊन पाहवा
समशेरपुरात लंगडा बुवा
सावरगावकरांनी ठिवलत आवा
त्येची बोंब आकुल्याला न्याया

देवगावकरांनी साक्ष दयेचा
अकुल्यांमधी माडी धरावा
राजुरामंधी जाऊन उतरावा ।।

**– सुरेश दुंदा खोबले, पाचपट्टे**

* *

## (८) पाटलाना पैसं खावा

घुटेवाडी ग पेढ्याचा डाबा
मधी सोमटांना कशाला हावा
आंब्येची फुलती लागन ती खावा
पाचपट्याच्या रानीना रातवा घ्यावा
त्येंची बोंब तिरढ्याला न्येवा
तिरब्याच्या पाटलाना पैसं खावा

**– राजाराम सखाराम मोडे, तीढें**

* *

## (९) वाडी

गाव पाचपट्टा घुटेवाडी
त्येच्याखालती टेंभरवाढी
पिपल्यामधी येकज माडी
हातात खुरपा तामकुड वाडी
दंडात येला पाठळवाडी
लांब लांब यावा ठाणभावी
पेढकरणीच्या डोयीवर मोळी

**– नामदेव युगाजी खोकले, पाचपट्टे**

* *

## (१०) कोडे

माझ्या मळ्यातून जाई
गोपाळा तुझ्या मळ्यातून जाई
जाई गुन जाई निरगून जाई
एवढ्यात लहान कायी? गोपाळा
उतर दे मग जाई गोपाळा
उतर दे मग जाई
मळ्यामळ्याची शिंगी गोपाळा
मळ्यामळ्याची शिंगी
एव्हढ्यात लहान मुंगी गोपाळा
एव्हढ्यात लहान मुंगी
माझ्या मळ्याची बावडी, गोपाळा
तुझ्या मळ्याची बावढी
बावडीत बावडी निरगुन बावडी
चार सडाच कायी, गोपाळा
चार सडाच कायी?
उतर दे मंगी जाई गोपाळा उतर दे मंग जाई
चार सडाची गाई, कोपाळा
चार सडाची गाई
आयकून घे मंग जाई गोपाळा आयकून घे मंग जाई
माझ्या मळ्याची झुतरी गोपाळा
तुझ्या मळ्याची झुतरी
झुतरी झुतरी तिरगुन झुतरी
आठ सडाच कायी गोपाळा
आठ सडाच कायी
आठ सडाची कुत्री गोपाळा
आठ सडाची कुत्री
आयकून घे मंग जाई गोपाळा आयकून घे मंग जाई
माझ्या मळ्याची केळी गोपाळा
तुझ्या मळ्याची केळी
केळी गुन केली तिरगुन केली
दोन सडाचा कायी
दोन सडाची कायी गोपाळा
दोन सडाची शेळी
आयकून घे मंग जाई गोपाळा
आयकून घे मंग जाई
माझ्या मळ्याची भोकर गोपाळा

तुझ्या मळ्याची भोकर
भोकर गुन भोकर तिरगुण भोकर
बारा सडाच कायी गोपाळा
बारा सडाच कायी?
बारा सडाच डुकर गोपाळा
बारा सडाच डुकर
आयकून घे मंग जाई गोपाळा
आयकून घे मंग जाई
माझ्या इहीरीच थारूळ गोपाळा
तुझा हहीरीज धारूळ
बारा भोकाच कायी गोपाळा
बारा भोकाच कायी?
बारा भोकाच वारूळ गोपाळा
आरा भोकाज वारूळ
आयकून घे मंग जाई गोपाळा
आयकून घे मंग जाई

**– श्रीराम त्र्यंबक खोकले, पाचपट्टे**

* *

## (११) गावाच्या पिपळा

गावाळ्या पीपळा सिताळ तुझी छाया र
तुझ्या सायाला गोदनी आमच्या गाया र
दुध काढाया गवळी आमचा दादा र
दुध पियाला पियाला किसन बाळा र
तुझ्या सायाला कशी आबाद खेळती र
गावाच्या पीपळा सिताळ तुझी छाया र

**– हरीदास भाऊ बांबेरे, कोदनी**

* *

## (१२) धन्य धन्य लक्षेपती

धन्य धन्य लक्षेपती
    ह्या राजाला मुलां किती
ह्या राजाला मुलां चार
    त्यांची नांवा काय काय?
अभिमान गोपीमान
    अभीगान सखाग मारुती
धन्य धन्य लक्षेपती
    या राजाला सूना किती?
याला सूना चौघ्याजनी
    त्यांची नांव काय काय?
राईबाई, जाईबाई, अंबाबाई, निंबाबाई ग
अंबा न्हाऊ नदी अन् गेली
मंग आरती घेऊन अन् गेली
अव गोसाय बुवा
तुमचा मठ उघडावा
तुमच भोजन लागत नही
आमी मठ उघडत नही
निंबा न्हाऊन नदीऊन गेली
मंग आरती घेऊन गेली
आव आव गोसाय बुवा
तुमचा मठ उघडावा
तुमचा भोजन लागत नही
आमी मठ उघडत नही
राई न्हाऊन नदीऊन गेली
मंग आरती घेऊन गेली
आव आव गोसाय बुवा
तुमचा मठ उघडावा
तुमच भोजन लागत नही
आमी मठ उघडत नही
जाई नदीऊन न्हाऊन गेली
मंग आरती घेऊन गेली
आव आव गोसाय बुवा
तुमचा मठ उघडावा
तुमच भोजन लागत नही

आमी मठ उघडत नही
मंग आली चंद्रावळ
हाती सोनीयाचे थाट
आव आव गोसाय बुवा
तुमचा मठ उघडावा
तुमची चंद्राजवळ आली
आता उघडी कवाडा
आव आव चंद्रबाई
तुमच भोजन लागत
आम्ही मठ उघडीत
चंद्रा धावत पळत
गेली बाबाच्या मठात
नार गेली ना खोलित
धडधडा कवाड उघडित
चेतानी गोविंदानी देखीली
नार चांगाली कोनाची
गोविंदा तुझी मेव्हनी

**– सावळेराम रामा बांबेरे, कोदनी**

* *

**ब) ''भारुड'' प्रसंगीची गीते :– (कथागीते)**

### (१३) श्रावणबाळ

श्रावण बाळ रे चाला काशईला, चाला काशईला ।।
माते–पितेची रे कावड खांदेला, चाला काशीला ।।
कावड उतरून ठुळी बेला साईला, चाला काशीला ।।
श्रावण ताना गेला गेला पानी दियाला, चाला काशीला ।।
आईबापाकारं पानी दियाला, चाला काशीला ।।
आईबाप आंधळ गेला साईला, चाला काशीला ।।
दसरथाना रे बान मारीला, श्रावण बाळाला ।।
श्रावण बाळ रे धरती पडला, चाला काशीला ।।
दसरथना पानी बधा नेला, आईबापाला ।।
आईबाप पडलं धरणीला, चाला काशीला ।।
आईबापानारे संग दिला, श्रावण बाळाला ।।
चाला काशीला चाला काशीला, चाला काशीला ।।

**– देवराम रामा पटेकर, रणद धु.**

* *

### (१४) सिरीयाळ राजेल्या घरी महादेव

सिरीयाळ राजेच्या घरी महादेव
होऊन गेले गोसावी, होऊन गेले गोसावी ।।
हाती चिपळ्या पायी खडावा
भिक्षा वाढा माई ।।
सुवर्नाचा सूप भरून ठिवले गुरूच्या पायी
ठिवले गुरूच्या पायी ।।
तीन दिवसाचा आहे उपासी आन
भिक्षा लागत नाही ।।
साळी डाईचा केला भोजन उठा गुरू जेवाया
उठा गुरू देवाया ।।
रांधशील तुझा चिलयांबाळ तरच जेवल माई
तरच जेवल माई
तरच जेवल माई नाहीतर सत्व घेवून जाई
सत्व घेऊन जाई
पितांबराची काज मारूनी हाक माराया जाई
हाक माराया डाई ।।
मुलावरूनी हात फिरवून अंतर होय ग माई
अंतर होय ग माई
मुखावरूनी हात फिरवून शीर कापिला आई
शीर कापिला आई
दन दन शरीर कांढिले शीराचा केला भोजन
शीराचा केला भोजन
बाळ रांधीला घाटी वाढीला उठा गुरू जेवाया
उठा गुरू जेवाया
संगतींना असल चिल्या बाळ तरीच जेवल माई

नाहीत सत्वच घेऊन जाई
छाती फाटली पानी आटला हाका माराया जाई
चांगुना हाका माराया जाई
ये ये ये चिल्याबाळा कुठ खेळाया गुतसी
आरं कुठ जेवाया गुतसी?
बाळ धावत येई चिल्या आन कडवर उचलून घेई
कडवर उचलून घेई
पांच वसाची माझी ओवी काय बोलल आई
काय बोलल बाई
पाशी पातरा गुरू जेवला सत्व राखीला आई
सत्व राखला आई

**– हिराबाई पांडु पटेकर, रणद खु.**

* *

## (१५) वैराळ रूप

वैराळाचे रूप घेऊनी निघाले भगवान
बाई ग निघाले भगवान
बोलवा बोलवा बोलवा बायानो
आपल्या वाड्यावर
उघड-उघड पेटी तुला दाखवी सोनेरी बाई ग
ह्या जुयेची लेनारीन केंसाची कंबळा रानी ग
चंद्र सूर्याची प्रभा पडली माझ्या वुड्यावरी बाई ग
बा ग बा ग सयांनो कोणी विळा-खिळा सुरू मनगटी
लागली कळी अरे अरे वैराळा माझा चुडा सैल करा बाई ग ।।

**– लिलाबाई सिंधु पटेकर, रणद पु.**

* *

## (१६) ''वाल्मिक झाला''

जेंगल झाढ़ी भेसुर वन
प्रवराचा तीरी ।।
राहयत व्हता कोळी वाळीबा
वाटमारी करी ।।
साती रांजना भरले पापाना
काळ आला बाई ।।
नारद रीणी याच वाटाना
जात व्हते वैकुंठी आई ग जात व्हते वैकुंठी ।।
''आरं जोगड्या काय आसन त्ये
देऊन मंगच जाई जोगड्या
देऊन मंगच जाई ।।
नही दिला त नाव वाळीबा
वाटमाड्या करी
वाटमाऱ्या करी''।।
नारद म्हणे, ''ऐक वाळीबा
जोगड्यापाशी कायी? वाळीबा
जोगड्यापाशी कायी?'' ।।
ऐक वाळीबा, ''उत्तम नरदेही
जगामंदी आपला कोणी नाही
पापाला वाटकरी नाही ।।
पापाला वाटकरी नाही''
''जन्म मिळाला नरदेहाचा
सार्थक कथन घेई ।।
दोन सब्दाच नाम देवाच
राम मुखा मधी घेई''।।
राम नामाची गोडी लागली
वाल्याचा वाल्मिक झालाई ।।
मुनी देवाची अवघी पुण्याई
त्येली कामाला येई ।।
लेक सीता आई जाहली
तातोबाच्या मठी ।।
लवकुसाची जोडी घेतली
या प्रवराच्या तीरी ।।
रामनामाचा डोंगर झाला
फेरा फिटलाई वाळीबा
फेरा फिटलाई ।।

**– जनाबाई मदु पटेकर, रणद खु.**

### (१७) दामुशेटी

पहा पहा पंढरपुरी नगरी
गोपाळपुरी दामुशेटी राहातो वस्तीला
पांडुरंगाची भक्ती त्याला
हो रामा हारी ।।
पतीवर्ता त्याची अस्तरी
सत्वाला खरी हो रामा हारी ।।
चंद्रभागेला नामदेव पोटी पुत्र
नाही घरी खावया अन्न
लाकडं विकितो रस्त्याला
त्यावर निर्भाव चालविला हो रामा हारी ।।
एके दिवशी दोन पारी
मोळी लवकरी दोन पारी
मोळी लवकरी
मिळाली नाही दामु शेटीला
नको म्हणे देवा पार परपरंच मजला हो रामहारी ।।
पांडुरंगाला शरन जयेला आन
परपंच फिटला
दामुशेटीना देव देव केला
चवऱ्यांशीचे फेरा त्येना
अलगद चुकविला हो रामा हारी ।।

**– हरीभाऊ बाघु मोईल, शेणद**

* *

### (१८) नामदेव

नामावलीचा नामदेव आला
पिता नाही आला
निवद घेऊन आले राऊळा
पिता नाही आला हो राम हरी ।।
वय लहान वळक नाही त्येला
आन दरबारी ग्येला
पुंजा झाल्याव त्येना इचारला
म्हणे, ''देवा चला भोजनाला हो राम हरी ।।
रोज येतो माझा पिता
कसा जेवता
आजुच काय झाला
सांगा मजला
नहीत प्राण देईन आपला हो राम हरी
तेंव्हा स्वर्गींचे धनी
विचार केला मनी
पांडुरंग बाहेर निघाला
जेवन कथन गुप्त झाला हो राम हरी ।।

**– राममाऊ दुधा साबळे, शिळवंढी**

* *

## (९) तमाशातील गाणी :–

### (१९) इचारान

इचा रान साताऱ्याला खाली ग
इचा रान साताऱ्याला साली ग
आपण दोघी ममयला जाऊ ग
एक एक कप चिहाचा पेऊ ग
आई आपण खोलीना भाड्याची घेऊ ग
आन पाच रूपये भाड्याचे देऊ ग
सवासांजच फिराला जाऊ ग
सवासांजच फिराया जाऊ ग
आन बांडांगो पोड धनक साऊ ग
बांडांव गोड धनक खाऊ ग
इचारान साताऱ्या खाली ग
इचा रान साताऱ्या खाली

**– सखाराम शिवराम डगळे, चिंचवणे**

* *

## (२०) घरी जायाची लाजा मला वाटली

हाती जरीचा रूमाल नही घरचा सुमार
माझी नथ मोडली घरी जायाची लजा मला वाटली
हाती जरीचा रूमाल नही घरचा सुमार
माझ्या बाळ्या ग बाई मोडत्या घरी जायाची लजा मला वाटली
हाती जरीचा रूमाल नही घरचा सुमार
माझी कंगना बाई ग मोडली
घरी जायाची लजा मला वाटली
हाती जरीचा रूमाल नही घरचा सुमार
माझ्या पुतळ्याची माळ बाई तुटली ग
घरी जायाची लजा मला वाटली
हाती जरीचा रूमाल नही घरचा सुमार
ग फडकी माझी फाटली
घरी जायाची लजा मला वाटली

**– देवराम भाऊ डगळे, चिंचवणे**

* *

## (२१) किती शिकाऊ येमु तुला

किती शिकाऊ येमु ग तुला
चाल मझ्या धरला
मझ्या घरी ना नथवाचे जोड
नथ लियाला देतो ग तुला
चाल मझ्या धरला
मझ्या घरी ग बाळ्याचे जोड
बाळ्या लिवाला देतो ग तुला
चाल मझ्या धरला
मझ्या घरी ग कंबरी पट्टा
पट्टा लियाला देतो ग तुला
चल मझ्या धरला
मझ्या घरी ग मोतीहार
हार लियाला देतो ग तुला
चाल मझ्या धरला
मझ्या घरीग लुगड्याच्या घड्या
लुगडा लियाला देतो ग तुला
चाल मझ्या धरला
अग माह घर न उंच माडीच
माडी रह्याला देतो ग तुला
चाल मझ्या धरला

**– पांडुरंग भगवंता लगड, पिंपळगांव नाकविंदे**

* *

## (२२) उभी राय उभी राय

''उभी राय उभी राय
छन छन बुगडी
किती मारू तुला ग हाका
माग बघावा नवशिका
किती माघून येऊ
किती म्होरून येऊ
उभी राहून बोल राधीला
माग बघावा नवशिका
तुझा बाप ग माझा मामा
मी ग तुझा मेव्हना
तुझ्या माग ना कुणी परका
माग बघावा नवशिका''
''नाथ मेव्हनं, मेव्हनींच लाईता
लोक पाह्यती टका मका
जगाला सौंशय येतो पका
मझ्या आब्रुला बसल धक्का''
''आड रानीना मी तुला धरला
आपल्याला का कोनी हेरला
दोघामंदी ना हायेकोनी तीसरा
मग जगाला सौंशय कसला?''

**– वामन माऊ हीले, गोंदशी**

* *

## (२३) नई आली

''नई नयती आलीग इकून
चालली ग थटून चालली थटून
कोनाची मैना कोनाची मैना? गं जी जी
कुठले रेवाशी आले कशापाई
सोडून घर झाली दैना
मंग कशाला कोनाची मैना? गं जी ग जी
आमी नाशिकचे राहनार
व्यापार करनार सेठ सावकार
दे वचन हातावर घरा चालना ग जी ग जी
किती सांगू येढ्या मुर्खाला
आन लाज नही येला
गाढव कर कुढ्यावानी फुरफरा
मी का येनार नही तुमच्या घरा
चला लागा तुमी रस्त्याला

**– हरीदास भाऊ बांबेरे, कोदनी**

* *

## (२४) बागामंधी पिकली संत्री

बागामंधी पिकली संत्री आली भराला
आली भराला
तोडू दे ग माझी मला भार चालला
भार चालला
नको ग नारी टाकूनी बोलू
छंद लागला ।।
बागामंधी पिकली मोसंबी आली भराला
आली भराला
तोडू दे ग माझी मला भार चालला
भार चालला
नको ग नारी टाकूनी बोलू छंद लागला
बागामंधी पिकली द्राक्षी आली भराला
आली भराला
तोडू दे ग माझी मला भार चालला
नको ग नारी टाकूनी बोलू छंद लागला
बागामंधी पिकले पेरू आले भराला
आले भराला
तोडू दे ग माझी मला भार चालला
नको ग नारी टाकुनी बोलू छंद लागला
बागामंधी पिकलं आंब आली भराला
आला भराला
तोडू दे ग माझी मला भार चालला
भार चालला
नको ग नारी टाकून बोलू छंद लागला

**– रामदास संतु बांबेरे, कोदनी**

* *

## (२५) सुंदरा ग राणी

सुंदरा ग राणी दिसावा चंद्रकोर
अग वेड जीवाला लावी
तू ग शेजघराची पोर ।।
नाव इच चंद्रा मनाला इचार
घेती गी मजवरती आळ
मी हाये बरह्मचारी आन माझ्या गळ्यात तुळसीमाळ
नाव इच चंद्रा केला घोटाळा
वेड लाविले जिवाला
मह्या मनाच केलं वाटूळं
मी हाये बरह्मचारी आन माझ्या गळ्यात तुळसीमाळ
नाव इच चंद्रा घालतीया डोळा
माझ्या अंगात भरतोय चाळा
मनाला लागल्या खूळ
मी हाये बरह्मचारी आन माझ्या गळ्यात तुळसीमाळ
नाव इच चंद्रा कशी भरली अंगा
नर बा बोटान करतो खानाखुना

मदनानी व्हती अंघुळ
मी हाये बरह्मचारी आन माझ्या गळ्यात तुळसीमाळ

**– संपत तुकाराम चव्हाण, शेणीत**

* *

## (२६) गण

शिवसुत नंदना चारी अंगावना निवारी
गणोबा कुरपे गणा
ढोलकरी रंजना चारी अंगाना
ढोलक बाजे झनाझना
सूरकरी रंजना निर्मळमना
पाहून दैत्याची करू दैना
शिवसुत नंदना चारी अंगना निवारी
गणोबा कुरपे गणा

**– लेंडे शंकर अमृता, पाभुळवंडी**

## (२७) गण

नमो नमो श्री गणा नमो श्री गणा
शिवराजसुत शिवहरिशक्ती नंदना जि जी
आज गायाला उभे राह्यलो
आज कलेले उभे राह्यलो
तुमी नाचत नाचत यावे हो
आमाला दरसन द्यावे हो ।।

**– नामदेव पुणाजी खोकले, पाचपट्टे**

* *

## (२८) शुभाचा कंटाळा येतो

शुभाचा कंटाळा येतो
    तर तान्या खोड मोडीतो
सुटकीला रुपाया तोडितो
आपली आयाबहिणीला देतो
अब्रूचे खोबरे मांडितो
हाच तुला कसा आवडतो
शुभाचा कंटाळा येतो



    तर तान्या खोड मोडितो

**– बाबू महादेव हिले, साकिरवाडी**

* *

## (२९) उलटत्या कलीचा न्यायी

आयीका उलटत्या कलीचा न्यायी
जगालमंधी जमील थोडी भांडी झाली लई
यक्या हाटेलीत जेवल्यात बारा भाई
देर काय वळकिन नही सकी भावजयी
दोघा बहिण भावांचा येव्हार चालाई
नका विकू तुमी कसाव्याला गायी
म्हणून येळेवर पाऊस पडत नही
काय करीत अशा पापाला भगवान
    जी जी
जी रामा दाजी ग जी जी ग जी जी
सून तुडवी सासूचे पायी
मला अंधारात दिसत नाही
याला उपाय करावा कायी
आला कामावर जाई
तीठे दोघांट जमाना व्हई

**– राजाराम चिंत्रु बांबेरे, कोदनी**

* *

## (३०) ऐका पंडिता

ऐका पंडिता तुला सांगतो
उत्तम नरदेही
मायाचा बाजार मांडलाई
जगामधी आपलं कोणी नाही
महालमाड्या डागदागिने
द्रव्य हाये लई
मरून ग्येलाव आपल्या संगं
कोनी येत न्हायी
भाऊ रडतो ऐका मित्रानु

पाटीमांगा नही बहीन रडती
चोळीबांगडी अंतरली बाई
घाई घाई कडू लागली
बायकूती खरी
तुटले गळ्याचे मंगळसूत्र
धनी कुणी नाही
आई रडती माझा हिरा
हारपला बाई
लगेच उचलून आनला बाहेरी
रडायची घाई
गावाखालती माडी बांधली
लांबदूर लई
वरशान वर्षा जोगड्या धरूनिच राही
तीन हाताचे फडके घेतले जुलमाच्या पायी
तीन दगडावर पानी ठेवले काळ चाल लई
ओबड धोबड नाव घातले
कुडच भिजला नाही

**– संतु धोंडीबा बांबेरे, कोदनी**

✻ ✻

## (३१) चाकरी सोन्याची सुरी

चाकरी सूरी चाकरी खरी
राव तुमी चाकरी जाऊ नका
राव तुमी चाकरी जाऊ नका
नाकातली नथ ठिवीते गहान
तुम्हाली पुरविते पान
राव तुम्ही चाकरी जाऊ नका
कानातल्या बाळ्या ठिवीते गहान
पुरविते तुम्हाली सुपारी पान
राव तुमी चाकरी जाऊ नका
पुतळ्या ठिवीते गहान
पुरविते तुम्हाली सुपारी पान



राव तुमी चाकरी जाऊ नका
बाजीबंद ठिवीते गहान
पुरविते तुम्हाली सुपारी पान
राव तुमी चाकरी जाऊ नका

**– संतु धोंडीबा बांबेरे, कोदनी**

✻ ✻

## (३२) भाऊ माझा हौशी

भाऊ माझा हावशी बंधु माझा हावशी
शिप्याची चोळी शिवितो नथ मला घडितो ।।
भाऊ माझा हावशी बंधु माझा हौशी
शिप्याची चोळी शिवितो बाळ्या मला घालितो ।।
भाऊ माझा हावशी बंधु माझा हावशी
शिप्याची चोळी शिवितो पुतळ्या मला घडितो ।।
भाऊ माझा हावशी बंधु माझा हावशी
शिप्याची चोळी शिवितो काचळा मला घडितो ।।
भाऊ माझा हावशी बंधु माझा हावशी
शिप्याची चोळी शिवितो काकणा मला घडितो ।।
भाऊ माझा हावशी बंधु माझा हावशी
शिप्याची चोळी शिवितो का जोडी मला धाडितो ।।

**– संतु धोंडीबा बांबेरे, कोदनी**

✻ ✻

## (३३) गुजरातून आला वाणी

गुजरातून आला वाणी कळेना बोली
मानीक चौकात दुकान मांडी
नार गेली दुकानावरी बसना खाली
नाकी सरजेची नथ झुरक मारी
दंडी कुसुबी येला वरवर सारी
जरीचा रुमाला वारा घाली
वाण्याला मुरसड आली पडला खाली
जी ग जी

**– भागा शंकर धाणे, वारनघुशी**

# ३.
# लोककथा

## (१९७६ ते १९७९ च्या क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार प्रातिनिधिक)

## कथा नाम सूची

| क्र. | कथेचे नाव व प्रकार | कथा सांगणारा/ कथा निवेदक संग्राहक | गांव |
|---|---|---|---|
| **१) अदभुत कथा :** | | | |
| (१) | केल्याचा फळ | रघुनाथ संतु खाडे | बारी |
| (२) | राजपुत्र मुंगसाची करामत | शंकर सीमा डगळे | पाचपट्टे |
| (३) | मंत्राची छडी | नाथु तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (४) | सापाची अंडी | धोंडु गोविंदा सारुक्ते | सोमलवाडी |
| (५) | जन्या गायीची गोष्ट | रामदास हनमंता धोंगडे | शेणित |
| (६) | रंकाचा राव | दुदु तुकाराम कोरडे | रणद बु. |
| (७) | अर्ध्या अंगाची स्त्री | तुळाबाई भाऊ देशमुख | शेणित |
| (८) | राजाचा गडी | वत्सलाबाई तुकाराम मुठे | शेलविहीरे |
| (९) | पौल्या भोयाचा पोपट | रखमा गुणाजी भांगरे | मान्हेरे |
| **२) प्राणीकथा :** | | | |
| (१) | उंदराच्या शेपाला काटा | पोपट बोऱ्हाडे (गायल्या) | शेणित (मुटकुंभे) |



| क्र. | कथेचे नाव व प्रकार | कथा सांगणारा/ कथा निवेदक संग्राहक | गांव |
|---|---|---|---|
| (२) | लबाड कोल्हा | देवराम भाऊ डगळे | चिंचवणे |
| (३) | लबाड कोल्हा | सखाराम शिवराम डगळे | चिंचवणे |
| (४) | आपला काम आपून करावा | पोपट शिवरीम डगळे | चिंचवणे |
| (५) | जल्याली तसाच | हरिदास भाऊ बांबेरे | कोदनी |
| (६) | युगतीना काम व्हतं | लका रामा मधे | ठाकरवाडी चिंचोडी |
| (७) | आधाशी कोल्हा | विठ्ठल गणपत शिळकंदे | पाभूळवडी |
| (८) | शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ | रामनाथ अनाजी बांबेरे | कोदनी |
| (९) | गर्वाच घर खाली | काळू गंगाराम गांगड | चिंचोडी |
| (१०) | चालं रं भोपळ्या टुनुक टुनुक | विठाबाई भदु पटेकर | रणद बु. |
| **३) आख्यायिका :** | | | |
| (१) | जटायु आन रावनाचा युध | श्रीराम त्र्यंबक खोकले | पाचपट्टे |
| (२) | सर्वतीर्थ | विठ्ठल बारकू खाडे | कातळापूर |
| (३) | तातोबाचा मठ | अहिलाजी कुवा पट्टेकर | रणद बु. |
| (४) | रीषीशींग रीषी | अहिलाजी कुवा पट्टेकर | रणद बु. |
| (५) | आजुबाजा डोंगर | दशरथ पांडुरंग पट्टेकर | रणद बु. |
| (६) | मुलाचं डोळं आलं | विठ्ठल बारकु खाडे | कातळापूर |
| (७) | यक गाय आन प्रवरा माय | वामन मारुती झडे | रतनवाडी |
| (८) | पेहराची बहीण कृष्णवंती | भागाजी दादाजी घाणे | वारनघुशी |
| (९) | हरिश्चंद्र पान्याचा रांजन | बाबू महादू हिले | साकिरवाडी |
| (१०) | पट्टाआई | नामदेव पुणाजी खोकले | पाचपट्टे |
| (११) | लिंगीतला चोर | पोपट रामा डगळे | पाचपट्टे |
| (१२) | गावठाणचा बाबा | दशरथ पांडुरंग पट्टेकर | रणद बु. |
| (१३) | भुताटक्याचा राज | भागाजी दादाजी घाणे | वारनघुशी |

| | | |
|---|---|---|
| (१४)सोमलवाडीचा गायख्या | भास्कर रामजी सारुक्ते | सोमलवाडी |
| (१५) घोटीचा चकवा | भास्कर रामजी सारुक्ते | सोमलवाडी |
| (१६) कुनीबी जा गुडघ्या इतका पानी | हरीभाऊ गुणाजी भारमल | पाचनयी |
| (१७) अम्रिताच राखान करी शंखराच नाग | वामन मारुती झडे | रतनवाडी |

**४) दैवतकथा :**

| | | |
|---|---|---|
| (१) गवळी देव | रामदास विठोबा करवर | बाभुळवंडी |
| (२) काळुबाचा बळी | भागाजी दादाजी घाणे | वारनघुशी |
| (३) घोरपड्या आई | विठ्ठल बारकू खाडे | कातळापूर |
| (४) कळसुबाई आमुची आई | भागाजी दादाजी घाणे | वारनघुशी |
| (५) देव मसराज | काळू रामा खोकले | पाचपट्टे |
| (६) टहाकारीची देवी | दत्ता सखाराम गोढे | तिर्ढे |

**५) हास्यकथा :**

| | | |
|---|---|---|
| (१) जमलाच गडे | रामदास संतु बांबेरे | कोदनी |
| (२) यडा जावाई | किसन गंगाराम भांडकोळी | अबिरखींड |
| (३) कोल्होबाची खोड मोडली | पोपट शिवराम डगळे | चिंचवणे |
| (४) आस्वलीचा घोळणा फुटला | बाळू श्रीराम खेताडे | घाटघर |
| (५) चिमना चिमनीची गोष्ट | निवृत्ती संतु बांबेरे | कोदनी |
| (६) धेनू | युवराज मारुती डगळे | चिंचवणे |
| (७) कुषमाना खाल लाडू | शंकर अमृता लेंडे | पाभूळवंडी |
| (८) कुंभाराची मौत | धोंडु गोविंदा सारुक्ते | सोमलवाडी |

**६) संकीर्ण :**

| | | |
|---|---|---|
| (१) डिंगऱ्या महा कामाचा | रामदास बाबाजी बांबेरे | कोदनी |
| (२) ठक आन महाठक | दत्तात्रय सखाराम गोढे | तिर्ढे |
| (३) शेतकऱ्याची फजीती | भागुज लखू खेताडे | आंबेबंगला |
| (४) नही सांगला त बा कुत्रा खातोय | रामनात कोंडाजी उघडे | राजूर |
| (५) युक्ती श्रेष्ठ | मधुकर रामभाऊ भिगळे | पिंपरकणे |
| (६) दैवानं दिला आन कर्मान नेला | हहिलाजी बुवा पट्टेकर | रणद बु. |
| (७) सीताची गोष्ट | रामदास संतु बांबेरे | कोदनी |

## (१) अद्‌भुत कथा :

### कथा क्र. १ – ‘‘केल्याचा फळ’’

यक व्हता राजा. त्याली दोन बायका व्हत्या. यकीचा नांव व्हता आवाडती आन दुसरीचा नांव व्हता नावाडती. त्या दोघींलीही मुलबाळ काय नव्हता. त मंग राजा चींता करीत बसला.

तीकून येक गोसावी आला. म्हन ‘‘का रं, राजा, तू चिंता करतोस?’’ राजा म्हन, ‘‘मला मूलबाळ काय नही.’’ त गोसावी म्हन, ‘‘मी तुला एक फळ देतो. तो का मध्यभागी कापून तुझ्या बायकांली खायाला दी.’’

आवाडतीना खाल्ला, नावाडतीना खाल्ला नही. आवाडती गरुदर ऱ्हायली. तीला राम लक्ष्मन दोन मुलगं झालं. त्या पाह्यलाबरूबर नावाडतीना त्यांली उकीरण्यात नेऊन पुरला, आन आवडतीच्या पुढं कुत्रीची पिलां ठियवल्या. काही दिसानं ती उकीरडा राजाना एका कुंभाराला यीकला. तो उकराया ग्येला व मंधून राम लक्ष्मण दोघां निंगाले. त्या कुंभाराना त्यांली आपल्याच घरी ठिवला आन म्हन, ‘‘तुम्ही गाढवां वळा.’’ त्या कुंभाराना राजाला सांगीतला का, ‘‘इट या उकीरण्यात रामलक्ष्मण निंगाल्यात.’’

रामलक्ष्मण गाढवां वळात राजवाड्यात आले. आवाडतीना त्यांली वळाखला का, ‘‘ह्या मुलां मही आह्यात’’. मंग नावाडतीच्या डोक्यात पाच पाट काढून मुंढ्या गाढवाव बसवला.

**– रघुनाथ संतु खाडे, बारी**

* *

## कथा क्र. २ – ''राजपुत्र मुंगसाची करामत''

यक व्हता राजा. त्याली तीन बायका व्हत्या. दिसवंती, आवाडती आन नावाडती. त्याली मुलां नव्हती. राजा लांब लांब भगत पाहू लागला. असा करता करता तो कंटाळला. त्याला यक ठाकूर भेटला. त्या ठाकराना त्याला इचारला, ''का व राजे साहीब लई दीस झालं, तुमी इकडं तीकडं हिंडत्या?'' मंग राजा म्हन, ''मला मूल नही म्हून मग पाह्येला ग्येलो व्हतो.'' त ठाकूर म्हन ''मी याक आवशाद देतो. त्ये तू नी आन तीघींली दी. त्या समूरचा आंबा हायेना, त्या आंब्याच तीन आंब नीयाचं.'' त तो राजा ग्येला त्या आंब्याच तीन आन् आंब खुडून खाली टाकलं. त तो उजुक चढला आनं सारं आंबं खाली ह्येलकावलंय तो खाली आला. त सारं आंबं उजुक वर जाऊन जसन तसच झालं. त्यांनी मंग तीनच आंब आनलं. त आला राजवाड्यात. त यक श्यान टाकीत व्हती. ती व्हती दिसवंती. ती म्हन, ''झाडपानी टाकीत हाये, तीठ ठिवा.'' दुसरी, आवाडती सयपाक करीत व्हती. तीला दिला. त तीना तो खाला. नावाडती पानी आनाया ग्येलती. तीला यक दिला. तीनायबी खाला. आता दिसवंती झाडपानी करीत व्हती. तीनी तो लई येळान खाला.

दिसवंतीला झाला यक मुंगूस आन दोघींली दोन मुलां झाली. व्हता व्हता ते मोठाले झाले. त त्येत्यांच्या बापाली काय म्हनू, ''आमी इकडं तीकडं काही देश पाह्यलं नही. आम्हाली दोन घोडी दी.'' राजाना त्यांली दोन घोडी दिली. आवाडतीचा आन नावाडतीचा घोड्यांव बसून निंगालं. त मुंगूस आईला म्हन, ''मी जातो.'' ती म्हन, ''कह्याला जातो?'' त्याना अयेकला नही आन् घोड्याच्या शेपीव बसून निंगाला.

बराच लांब ग्येलाव त्यांना यक उंबार दिसला. तो उंबार पिकला व्हता. त यक काय म्हनू, ''आपला मुंगुस दास असता तर ती पकी उंबरा आली असती.'' त मुंगूस म्हन, ''मी हाये.'' तर म्हनू, ''वर जा. पिकेल पिकेल उंबरा खाली टाक''. त त्यो ग्येला वर.तो खाई लाल लाल त्यांली टाकी धोदी घोदी. त्यांली आला राग. त्यानी त्या झाडाच्या खोडाली घातल्या काट्या लावून आन बसलं घोड्याव. त मुंगूस दुसऱ्या फाटीना उतरून, घोड्याच्या शेपला येऊन बसलं. त मंग त्ये बराच लांब ग्येलाव जांभळा पिकली व्हती. त म्हन, ''आपला मुंगूस दादा असता त पकी जांभळा खाली असती.'' त मुंगूस म्हन, ''मी हाये'' त म्हन, ''जाय वर आन काढ जांभळा.'' त मुंगूस ग्यालं वर, तो खाई काळी काळी आन त्यानी टाकी लाललाल, त्यांली का आला राग. त्यांनी उजूक काट्या घातल्या आन निंगाल घोड्याव बसून. त मुंगूस दुसऱ्या फाटीनं उतरून बसला शेपीव.

पुढं पक लाम ग्येले. त्याना पडली रात. मुंगूस शेपीवरून म्हन, 'जीठ उजड दिसल तीठ जाऊन रह्याचं.'' त जंगलामंदी यका राक्षेशीनीचा घर दिसला. त्या जाऊन त्या राक्षेशीनीच्या घरात बसलं. त्या राक्षेशीनीली तीन पोरी व्हत्या. दोन मोठाल्या आन यक बारीक. दोन मोठ्या पलंगाव झोपल्या व्हत्या. आन राक्षेशीन आन तीची बारीक प्वार आत व्हती. त मुंगूस जाऊन न्हाणीत बसला. ह्या दोघजन त्या पोरींली खाली उतरून ठिवू लागलं. त्ये राक्षेनीना पाह्यला. ती ग्येली सूऱ्या घासाया. आता मुंगुसाना पाह्यला का आता ह्या सूऱ्यांना राक्षेशीन आपल्या भावांली कापन. त त्यो ग्येला आन त्या दोघांचे पाय खडबडीत राह्यला. त्या दोघां उठला त्यांनी पाह्यला का काय तरी हाये. त्यांनी उजुक त्या पोरींली उचलून पलंगावर ठिवला. आन ग्याल बाह्येर निंगून राक्षेशीन आली आन तीना त्यांची मुंडकी कापली. मंग पाह्यला त तिच्याच पोरी व्हत्या.

मग त्या दोघांनी मुंगसाला घोड्याव घ्येतला आन देश पह्या चाललं.

**– शंकर सोमा डगळे, पाचपट्टे**

* *

## कथा क्र. ३ – ''मंत्राची छडी''

यक व्हता राजा. त्याली व्हत्या दोन बायका. यकीचा नाव व्हता आवाडती आन दुसरीचा नाव व्हता नावाडती. नावाडतीला येक मुलगा व्हता. तो व्हता लंगडा. आवाडतीला दोघजन व्हतं. त्या दोघंबी चांगलं व्हत.

यकदा त्या राजाली सपान पडला की धड उभा ऱ्हायी आन सीर शीरीकुंडात जाऊन गदा गदा हांस. राजा सकाळचा उठलाय त्याना पोरांली बोलावला आन म्हन, ''मला का सपान पडला का धडा उभा हायीत आन सीर शीरीकुंडात जाऊन गदागदा हासं. ह्या सपान पुरा कथन आना. नहीत तुमी घरी येऊ नका. आन जर सपान पुरा कथन आनाल व तुम्हाली अर्धी काठी राज्य देईल.''

त मंग त्ये तीघयबी सपान पुरा कराया निंगालं. त नावाडतीच्या पोराचा घोडा चालाना. मंग तो वज वज मांगून जाऊ लागला. आन आवाडतीचं दोनी पोरां पुढ निघून ग्येलं. हा नावाडतीचा पोऱ्या मांगून आरडत व्हताका, ''दादानु अरं मला येऊं द्या.'' तरीयबी ते आवाडतीची पोरां पुढं निंगून ग्येलं. आन त्ये पक लाम ग्येलं. मंग त्यांची घोडी थकली. त मंग यका वडाखाली जाऊन थांबलं.

नावाडतीचा पोऱ्या मांगून वजवज त्येंच्या पसी आला. आन त्या तीघीय वडाखाली बसलं. त्या वडापून तीन वाटा फुटल्या व्हत्या. त्यांनी यच्यार क्याला का तीन्ही वाटानी तीघानी जायाचा. मंग आवाडतीचा धाकला पोऱ्या व्हता तो मोठ्या भावाली म्हन, ''नही दादा, आपन दोघय संगाच जाऊ.'' नावाडतीचा पोऱ्याचा घोडा दमेल व्हता तो तीठच रयला. आन आवाडतीची पोरां निंगून ग्येली. त्या लाम ग्येलं. तेली यक तळा लागला.

त्या तळ्याजवळ यक हरण चरत व्हती. त्या आवाडतीच्या पोरांनी ही हरण पह्यली. आन हरणी मांग घोडा सोडला. ती हरणी तळ्यात उडाली. घोडी सुदिक या हरणी मांग तळ्यात उडाली. पोरां घोड्याव बसली व्हती. दोन्ही कडाला पानी फाकला आन त्या कोरडच तळ्यात ग्यालं. आन पानी उजूक वरून पसारला. त्यांनी तो पानी निस्ता आकाशासारखा दिसं. मंदी ग्येलाव हरणीनी स्त्रीचा रूप घेतला आन सीऱ्यापुऱ्याचा सयपाक केला. मंग ज्यावलं खावलं. मंग ती स्त्री म्हन का, ''आपल्याली मांजराच्या डोक्याव समय ठिवून आपन पत्यांचा डाव मांडाया हाये. तो डाव तीनदा मांडायचा. जर तीनी डावांला समय पडली त मी तुमची बायकू व्हयीन आन तुमच्यासंग येईन. समय ठिवली आन डाव सुरू झाला. आन यकही बार समय पडली नही. त्या डाव त्येंच्याव आलं. मग त्या स्त्रीना त्या दोघांली यक्या खोलीत कोंडून ठुला.

नावाडतीचा लंगडा पोऱ्या त्याचा घोडा घीऊन निंगाला. ते पका लाम ग्येला. पुढं त्याली बाबाचा मठ लागला. त्या बाबाली सहा महीनं झोप लागली व्हती. त्याचा बाग सुकून चाला व्हता. त्या नावाडतीच्या मुलाना त्या बागाला पानी घालता आन तो बाक टवटवित झाला. सहा महिनं संपली तवा बाबाला जाग आली. आन त्याना उठून पहीला त बाग टवटवीत व्हता. झाडाली फुलं आल्यात. मंग तबाबा खाली बसला आन म्हन्, ''स्त्री असल त डाव्या मांडीव बसल आन् पुरुष असल त उज्या मांडीव बसल.'' त तो नावाडतीचा पोऱ्या उज्या मांडीव बसला. त बाबा म्हन, ''तुला काय पाह्यजेल?'' त म्हन, ''मला काही नका फक्ती पाह्य, सीर, धड उभातऱ्यावर आन सीर शीरीकुंडात जाऊन गदागदा हसला पाह्यजेन.'' आन मंग तो बाबा म्हनं, ''सात डोंगराच्या त्या बाजुला एक मोठा चिंचाचा झाड हाये. त्या चीचाच्या झाडाखाली राक्षेसाचा घर हाये. तू का त्या चीचाच्या झाडावर यंगून बस. मंग पह्य तुझा सपान.'' तो निंगाला आन त्या चीचाच्या झाडाव जाऊन बसला. राक्षेस बारा माणसांची मोळी घ्येऊन आला. आन त्येच्या पोरीला बोलावला. आन ओमनाची छडी काढली. आन त्या



पोरीवुन छडी उतारली. मंग त्या पोरीचा धड खाली पडला. मंग सीर शीरीकुंडात जाऊन गदागदा हसाला लागला. त्येच्या मांगून राक्षेसाना माणसां तळून काढली. तळून झाल्याव राक्षेसाना छडी घेऊन सीजीवंत केली आन राक्षेस मानसा आनाया निंगून ग्येला. नावाडतीचा पोऱ्या चीचाच्या झाडावरून उतरून त्या बाबाच्या मठाक निंगून ग्येला. बाबाक ग्येल्याव, बाबाला म्हन, ''पह्येली?'' मंग तो बाबा म्हन, ''तू आतापरत जाय आन त्या पोरीला इच्यार राक्षेसाचा मरान कह्यात आहे?''

पोऱ्या परत निंगाला. तीठं ग्येलाव त्येला ती राक्षेसाची पोर म्हन, ''तू इठ कहाला आलाय? आता महा बार येईल व तुला खाऊन घेईल.'' तो म्हन, ''तुझ्या बापाला इच्यार का त्येचा मराण कह्यात आहे?'' मंग तो निंगून ग्येला. मुकाट चीचाच्या झाडाव जाऊन बसला. राक्षेस आला बारा माणसांची मोळी घ्येऊन खाली टाकली. ओंमणातून छडी ओढली. त्या पोरीला बोलावला, आन तीच्यावरून छडी उतारली. धड खाली पडला. आन शीर शीरीकुंडात पडला आन गदागदा हसाला लागला. राक्षेसाना माणसां तळून खाली. परत ती छडी घीऊन त्या पोरीला साजीवंत क्येली आन परत मानसां अनाया निंगाला. त त्या पोरीना इच्यारला, ''का बाबा तुहा मरान कहात रं?'' त तो म्हन, ''तुला काय करायचा मह्या मरनाचा?'' त ती पोर म्हन, ''तू रानावनांत जातोय. तीकडं कुढय ग्येलात मला काय माहित व्हयील?'' त म्हन, ''ह्ये पग, आंधाऱ्या खोलीत येक मोठी शीळ आहे. त्या शीळाखाली यक भूयार हाये. त्या भूयारांत यक पीपळाचा झाड आहे. त्या पीपळाच्या झाडाव यक पींजरा आहे. त्या पींजऱ्यात यक पोपट आहे. त्या पोपटाचा हात मोडलाका मये हात मोडतील. त्याचा पाय मोडलाका मये पाय मोडतील. मुंडकी मोडलीका ती मरून जाईल.'' यव्हढा सांगल्याव राक्षेस माणसां आणाया निंगून ग्येला. तवा नावाडतीचा मुलगा खाली उतरून त्या पोरीजवळ ग्येला आन तीला इच्यारला, तीला राक्षेसाना सांगीतला व्हता त्या संमदा तीना त्याला सांगीतला. मंग ती राक्षेसाची पोर आन नावाडतीचा मुलगा अंधाऱ्या खोलीत ग्येली. ती शीळा उचालली. भुयारामंदी ग्येला. आन पीपळाच्या झाडाला हात लावला. त तीकड राक्षेसाच्या अंगाला दरदरा घाम आला. ता राक्षेस पळत सुटला. राक्षेसाच्या तीन टांगा रयल्या व्हत्या. तवा ती पोर म्हनली का, ''पीपळाचा पान धर म्हंजी पिंजरा तुझ्याजवळ येईल.'' त्यानी पीपळाचा पान धरला. त पिंजरा आपाक त्येच्याजवळ आला. त्येनं पोपटाचं पाय मोडलं तव राक्षस लोळत लोळत आला. तो क्या त्येच्या माणसां कढावण्याच्या कढाईजवळ आला तवाच त्या पोराना पोपटाची मुंडकी मोडली. राक्षेस ग्येला मरू न. राक्षेसाची पोर आन

नावाडतीचा मुलगा भूयारामंदून वर आले. आन मंग तो पोऱ्या त्या पोरीला घ्येऊन त्याच्या बापाकड ग्येला. त्येचा गांव जवळ आला तवा सगळ्या गावातली माणसां नावाडतीच्या पोराच्या नावाना ओरडू लागली, का नावाडतीच्या पोराना बायकू आनली. मंग तो त्येच्या बापाक ग्येला. पर राजा म्हनला का, ''तुझ्या भावाली मारून टाकला आन तू यकलाच घरी आला. आता तू परत जाय आनं तुझ्या भावाली घीऊन यी.''

मग तो निंगाला. न वाटात त्याला यक कातड्याची झोपडी लागली. कातवडी कुठं तरी ग्येलं व्हतं. आन त्येची पोरां झोपडीत व्हती. उंदराची पीला घावातून काढीत व्हती. तवा याना इच्यारला, ''पोरानु मला देता रं उंदाराची पीलं पाळाया?'' त ती पोरां म्हनली, ''आम्ही खायासाठी काढीतोय. आमी तुला देणार नाही.'' तो म्हनला, ''तीन रुपयाला तीन पीलां तुमी मला द्या.'' मंग त्यांनी तीन रुपयाला तीन पीलां दिली. ती पीलां त्यानां कोठाच्या खिशात घालून घ्येतली. तो पुढ ग्येला. त्येला यक तळा लागला. त्या तळ्याच्या काठाव यक हरण चरत व्हती. त्या हरणीच्या मांग सोडला घोडा. ती हरण तळ्यात उडाली. दोनी कडाला पानी झाला. आन आत कोरडीच ग्येली. तो तीच्या मांगत व्हता. आत जाऊन हारणीना स्त्रीचा रूप घेतला. आन सीऱ्यापुऱ्याचा सयपाक तयार केला. त्येला ज्येवाया घातला. आन म्हन, ''आता पत्याचा डाव मांडायचा. मांजरीच्या डोक्याव समय ठिवायची. मांजरीच्या डोक्यावरची समय जर पडली त मी तुही बाईल व्हयील जर समय नही पडली व तुला इठच कोंडुन टाकील.'' आन मंग त्येंचा डाव सुरू झाला. डाव पार संपत आला. पर मांजरीच्या डोक्यावून समय काय पडानं. तवा त्येला त्येच्या कोठाच्या खिशातल्या उंदराच्या पिलाचा ध्यान आला. त्याना कोठाच्या खिशात हात घालून, यक उंदराचा पीलू सोडला. त्या मांजरीना पाह्यला. त्या मांजार समय टाकून त्या पीलांच्या मांग पळाला. तो पयला डाव स्त्रीचा आला. असा तीन पीलां सोडून तीनयबी डाव स्त्रीच्या अंगाव ग्येले. आन मंग ती स्त्री त्येची बायकू झाली. मंग तो म्हनला, ''तव महा दादा कोंडून ठूला आहे. काहाड कुठ आह्यात ती.'' मंग ती म्हन, ''ही खोली उघड. त्यांना ती खोली उगघाडली त आत तीन हजार माणसां कोंडून ठुली व्हती. त्यान त्याचं भाव गवसून काढलं मंग त्या स्त्रीनं तीठून शीधापानी सर्व घ्येतला आन मंग चौघयबी त्येंच्या घरी निंगाली.

लांब लांब आली. भूक लागली. वाटात ह्यांली यक इहीर दिसली तीठ सयपाक कराया लागली. तवा तो नावाडतीचा पोऱ्या पानी आनाया गेया आन



आवाडतीचा धाकला पोऱ्या लाकडा आनाया ग्येला. आन थोरला पोऱ्या चुल कराया दगड आनाया ग्येला. नावाडतीचा पोऱ्या बादलीना पानी वढीत व्हता. त आवाडतीची दोन्ही पोरां मांगून लपत लपत आली आन त्याला इहीरीत लोटला. आन त्ये घरी निंगून आले. त गावातली संमदी ल्वाक ओरडू लागली का, ''आवाडतीच्या पोरानी दोघात यक बायकू आनली. पर जवा त्ये राजवाड्यात ग्येलं तवा त्यांना गदागदा हसणारा सीर दावता येईना. तवर नावाडतीचा पोऱ्या इहीरीत कुडकुडत व्हता. तवा गाया चारणारी पोरां आली. त्येंली वाटला का इहीरीत भूता हाये. पर त्यानं सांगला की मी भूत नही. मला वर काढा. पर पोरां भियाली. आन म्हन, ''आमी आमच्या आईबापाला बोलून आनतो. त्येनी आईबापांली आनला. त्यानं त्येंली तसाच सांगीतला. त्येनी त्येला वर काढला आन मंग तो घरी आला. तवा त्येच्या दोनी बायका त्येच्याजवळ आल्या. राजा म्हनला, ''ह्या तुझ्या बायका आहेत हे कयाहून?'' तो म्हन, ''मया दुष्ट भावांली इच्यार.'' त्येनी सगळ्याना पुसला. त्येंली काय छडी उतरवता येना मंग नावाडतीच्या पोराना ती छडी उतरून दावली, आन धड खाली पडला आर सीर शीरीकुंडात जाऊन गदागदा हासाला लागला. मंग त्येच्या दुष्ट भावांली हाकलून दिला. आन त्येला अर्धी काठी राज्य दिला. आन तो सुखाना राज्ये करू लागला.

**– नाथु तुकाराम मुठे, शेलविहीरे**

* *

## कथा क्र. ४ – ''सापाची अंडी''

यक व्हता राजा. त्येली यक बायकु व्हती. त्येला दोन मुलां व्हती. ती मुलां मोठी झाली आन त्यांची आई वारली. आन त्येंली काळजी पडली का आमाली कोन पोहोचनार. आन राजाना दुसरी बायकु केली. ती गर्भार रयली. तिला यक मुलगी झाली. ती प्वार आन ती पोरं गुरांक जायची. आन त्येंची सावतर आई त्येंली कोंड्यारोंड्याची भाकर कथन द्यायची. मंग सावतर आई म्हनली, ''ह्या मुला आपल्या घरी नको.'' राजाला परश्न पडला का त्येंली कुठ पाठवावा. राजाना दोन शिपाई बोलीवलं आन त्येंली म्हण का, ''ह्या मुलां का कुठतरी नेऊन मारून टाका. आन तलवारीला रगत माखल हाये त्ये मला परत दाखवाया आना.'' शिपायांनी का मारला नाही अशा तलवारीला दुसराच कह्याचा तरी रगत माखून न्येला. राजाक आल्याव राज्याली म्हन, ''त्यांली तलवारीना मारला.'' आन मंग तलवाल दावली.

मंग ती मुलां फिरत फिरत यका झाडाखाली आली. आन रडत बसली. तिकून शंकरपारबती जात व्हती व पारबती शंखराला म्हन, ''कोन व रडत?'' ''तीठ चाला.'' त दोन पोरां रडत व्हती. शंकराना त्यांली सांगीतला, ''ह्या दोन खडं घेऊन घरी जा. गाईचा शान आना सारवा. आन खड ठिवा. उदबत्त्या लावा आन काय मनामंदी असल त्ये मांगा. काय लाडुबुंदी लागन त्ये.'' मंग ती पोरां परत मांग आली. त्या दारी पह्येल्याव सावतर आई मनामंदी म्हन, ''ह्यांली मारला नही का?'' मंग तीला पका राग आला. ती उजूक कोंड्यारोंड्याची भाकरी कथन दियाची आन गुरांक लावायची. ती पोरां कोंड्यारोंड्याची भाकर फेकून दियाचे आन काळ्या गायीच्या शेनाना सारवून दोन खडं ठिवायचे मंग लागन त्ये पदार्थ मांगायचे. आन गायन त्या खायचं. आन संध्याकाळी परत घरी यायचं. असा दोनचार दिस झाल्याव त्यांच्या आईला वाटला ''का कोंड्यारोंड्याच्या भाकरीना माजत चालल्यात!'' मंग त्ये दिसी तीची पोर त्यांच्या संग ग्येली. तीना तीच्या पोरीला लाडुबुंदी दिली व्हती आन पोरांली कोंड्यारोंड्याची भाकरी. त्यांना वाटला ''कसा काय खावा? आन कशी काय फेकून द्यावा?'' त्यांनी ती गायीला घातली. त्या पोरीला काय कळून दिला नाय. त्या काळ्या गायीचा श्यान आन खडं घीऊन त्ये लागन त्ये मांगायचं. पोरीना बरूबर गुपचुप पह्यला अन तीच्या आईला सांगितला.

दोघयबी घरी कोंड्यारोंड्याची भाकर खायचं यकाच थाटात ज्येवायचं अन यकाच आथुरनात झोपायचं. त्या सावतर आईला पका राग आलता. तीना सापाची अंडी पह्येली आन ती घरी घीऊन आली. संध्याकाळी पोळ्यांचा सपयाक क्येला आन जेवाया बसली. त्या दोघाली दोन थाटं दिली. त्या म्हन, ''यकाच थाटात ज्येवायचं'' ती काय जेऊन देयना. शेवट ती पोरां यकाच थाटात बसली आन ज्या थाटात सापाची अंडी व्हती त्ये थाट सावरतीच्या पोरीना घ्येतला. पोरा काही मरली नाही. पर पोरीचा प्वाट वर वर येऊ लागला आन सावतर आई ग्येली भिऊन. त म्हन, ''काय व झाला?'' त आवाज आला का, ''सावतर आई पोरांली छळ आण तीची प्वार सापाची अंडी गीळं.'' मंग तीची पोर मरून ग्येली.

**– धोंडु गोविंदा सारुक्ते , सोमलवाडी**

* *



## कथा क्र. ५ – ''वन्या गायीची गोष्ट''

यक व्हता शेतकरी. त्याला यकलाच पोऱ्या व्हता. तो शेळ्या वळायचा, आन शेळ्यांचा दुध पीयाचा. यका दिसी सकाळूच शेळ्या घीऊन तो रानात ग्येला. त्येचा बाप मांगून आला. म्हन, ''सरपन नही.'' ''सरपन घीऊन घरी जा. मी शेळ्यांक जातो.'' मंग तो शेळ्या घीऊन डोंगराला ग्येला. त्याला यक वाळेत अंबा दिसला. तो आंबा खोडापून तोडून आन फांद्यासुदीक खांद्याव टाकला, आन वाटाना चालू लागला. यक वाघ भेटला. तो वाघ म्हन, ''आपन दोघा झोंबी खेळू.'' म्हन, ''मही तयारी आहे. पर मला का दात, नख लावायची नही.'' हा म्हन, ''खेळायची झोंबी.'' झोंबी झाली. वाघाला कड्यावून खाली लोटून दिला. आन आपल्या जवळचा सरपन खांद्याव घीऊन चालाया लागला. घरी आल्याव त्येला काही कळ निंगना. त्याना आईला संमदा सांगीतला.

रातचा वाघ आला आन त्याना घरावरची कवलं उचलून आत उडी मारली आन त्येची बाज डोक्याव घीवून चालू लागला. जंगलातून जाताना वडाखालून वाघ जात व्हता. तवाच त्याना बाजव उठून पह्यला का आपन कुठ आलो. तो लगीच वडाच्या पारंबीना लोमकळून वर ग्येला. आन वाघ तसाच पळून ग्येला.

त्या वडाखाली दोन गाया व्हत्या. त्या वनगायांचा तो श्यान झाडू लागला. त्यांचा दुध काढून खाऊ लागला. बऱ्याच दिसानी डोकी पकी लांबलांब आली. त्याचा का संमदा रूबाब बदालला. मंग यक काळ्या रंगाची वनगाय व्हती ती म्हनली, ''मह्या डाया पायाखाली उकर. त्यानां डाया पायाखाली उकारला. त्याला यक बाजरीचा पोता गवासला. मंग तो डोकी कराया नाह्याकड ग्येला. नावी म्हन, ''यव्हढा पोताभर बाजरी मिळते चांगली व्हईल.'' पोताभर बाजरा दिली आन डोकी कराया बसला. नाह्याना खरवाडून खरवाडून डोकी केली. तो उजुक वनगायांकडे आला. त्या वनगाईला म्हन, ''मह्या डोकीची पकी आग आग झालय.'' ती म्हन, ''मह्या डाया सडाचा दूध पीळ, म्हंजी बरा वाटन.'' त्या गाईना त्येली सुखाचा आन दुखाचा पवा दिला ती म्हन, ''सुख अस त सुखाचा पवा वाजव आन दुख आसन त दुखाचा पवा वाजव, ''यक दिस तो उंबराखाली बसला व्हता त्याना फुटलेले सावरनाचे क्यास कागदाच्या पुडीत बांधले आन नदीला खाली सोडलं. खाली राजाची यक मुलगी धुईत व्हती. तीला त्या सावरनाच्या केसाच्या पुड्या सापडल्या. त्या पुड्या ती घरी घेऊन ग्येली आन तिच्या बापाला म्हन, ''बाबा, मला सावरनाच्या केसाचा नवरा पाहिजे.'' आता बापाला सावरनाच्या क्येसाचा नवरा पह्याची चिंता पडली. मंग त्याना यक

म्हातारी शोधली. तीला शोधाया सांगला. त ती म्हन का मला सापाडला हाये पर त्याला आनाया वैलगाडी आन राजन पहीजे. दुसऱ्या दिसी वैलगाडी व राजन ठिवला आन वैलगाडी घीऊन आली. त्या उंबराच्या झाडाखाली तो बसला व्हता. तीठ आली. तीना तो राजन गाडीच्या खाली गुपचूप ठिवला आन त्येचाक येऊन म्हन ''त्येव्हढा राजन उचलून द्या की.'' आन तो आला. राजन उचलून घ्याया लागला तसीच तीना त्याला राजनात घातला. त्याना दुखाचा पवा वाजीवला. गाया आल्या टकरा द्याया लागल्या तर त्यांची का सींगा मोडली. गायी थकून ग्येली. म्हातारीना त्येली नेला आन राजाच्या पोरीसंग लगीन लावून दिला. पर तो धाई धाई रडू लागला. तीतक्यात गाया आन नंदी आलं. त्याना त्याच्या कपाळी बांधलेली बासींग त्या वैलाच्या कपाळी बांधला. आन बैलाच्या गळ्याला मीठी मारून आन रडाया लागला. मंग राजना त्येली पोरी संग रानात धाडला. आन तो वन्यागायी संग त्यांचा दुध दही खाऊन सुखी रयला. तसी तुमी आमी रहावा.

**– रामदास हणमंता धोंगडे, शेणीत**

* *

## कथा क्र. ६ – ''रंकाचा राव – म्हतारीच्या मुलाची गोष्ट''

यक व्हती म्हतारी. तीला दोन पोरां व्हती. यक दिवस त्या म्हतारीच्या इठ गोसाई आला भीक मांगाया तवा ती म्हन, ''मह्याक तुला दियाला काहीच नाही. पर ह्या दोन पोरां आह्यात.'' मंग तो गोसाई म्हन, ''मवा या गावाच्याखाली मठ आहे. जवा तुझ्याच्यानी काम व्हयाचा नही तवा तु बा मठात यायचा आन जो पोऱ्या तुला पटल तो नीयाचा.'' मंग तो साधू ग्येला त्या पोरांली घीऊन. बरच दिस गेलं. म्हतारी पकी म्हतारी झाली. तीला काम करता येईला मंग ती ग्येली मठात. मंग गोसायाला म्हन, ''मला पोऱ्या दी.'' साधू म्हणं थांब जरूसा त्ये साळात ग्येल्यात.'' मंग त्या साळातून आलं. मंग साधु म्हन, ''म्हतारी तुम्हाली ओळखू येतेय काय?'' त त्ये म्हन, ''नही.'' त मंग गोसाय म्हनं का, 'आरं ही त तुमचा आय हाये.''मंग म्हतारीला म्हनं, ''तुला थोरला पोऱ्या पहीजे का धाकला पोऱ्या पहीजे?'' म्हतारी म्हनं, ''मला थोरला पोऱ्या पहिज्येय'' मंग गोसायानं थोरला पोऱ्या दिला. आन दोनसे आन पन्नास रुपयं दिलं. आन सांगीतला, ''ह्या रुपय घीऊन तुमी धंदा कराया जा.'' ''आपल्या नगरीतल्या मोतीराम सावकाराकाकडं जा.''

मंग म्हतारी आन पोऱ्या निंगाला, मोतीराम सावकाराक. जाता जाता त्येंली यक नदी लागली. तवा त्या पोराला वाटला आपुनी आंघुळ करावा. तवा त्याना बंडी काढली आन नदीत उडाला आन बुडी मारली. लगीच तीन लाल त्याच्या हातामंदी आलं. लगीच यानं घ्येतलं आन पांघुरनामंदी घातलं आन पुढं निंगाला. पुढ जाता जाता ज्या नगरीत मोतीराम व्हता त्याच नगरीत आलं. पर त्येंली मोतीराम सावकाराचा घर माहीत नव्हता. दोघयबी पकी दमली असं, ती त्या मोतीराम सावकाराच्या जोत्यावं बसली. तवा मोतीरामाच्या काय मनात आला, हा मानुस आपल्या इठ गडी ठिवाया पहीजे. तवा त्याला इ ारला तू मह्या इठ गढी रयशील का? आन तुह्या म्हतारीला ठिवील बासना घसाया. मंग तो पोऱ्या म्हणं, ''हा हा चाललं.'' मंग मोतीरामना त्येंली ठीवून घेतला. त्येचा त पका माल खपाया लागला.

यक दिवस न्हायी आला मोतीरामची दाढीडोकी कराया. तवा मोतीराम म्हन, ''आंधी मह्या गढ्याची डोकी कर आन मंग मही.'' तवा न्हायी ग्येला गड्याक. त्येची दाढीडोकी केली. लागला काखा काढाया तवा त्या लाल पढलं खिशातून. तवा न्हायानं घ्येतलं उचलून आन मोतीरामकं दिलं तवा मोतीरामाना गड्याला बोलावला. आन म्हन, ''ह्या काय रं?'' त म्हनं, ''ह्या मह्या खेळायच्या गोट्या आह्यात.'' मंग मोतीरामान यक चीठ्ठी लीवली आन त्याला सांगीतला का ह्या गोट्या आन चीठ्ठी राजाला दाखीव. गडी ग्येला. राजानं पयला लाल. म्हन, ''यव्हढं पैसं नहीत मह्याजवळ. यातला यक लाल त साऱ्या पीरीथुवीचा म्वाल. पर जेव्हढं पैसं आह्यात त्येव्हढं देतो.'' सकाळपून गाड्या पैस्यानी भरून राज्याच्या इठून मोतीरामच्या इठ जात व्हत्या त पार संध्याकाळ पसवर. मंग मोतीरामच्या मनात आला. ''आता ह्या पोराला आन म्हतारीला काय सांगायचा नही. त्येंच्या सतरा पीढीली पुरन तरी हा पैसा खपायचा नही.''

इकड राजान काय केलं असं. त्ये लाल बायकूच्या गळ्यात बाहांदल. त्येची बायकू म्हन, ''राजसरी जर अजून दोन लाल असतं त मी किती सोकून दिलं.'' तवा त्या गड्याला बोलवून घ्येतला मंग राजा म्हनं, ''त्या जर मला अजून दोन लाल आणून दिलं त बरा, नहीत तुला फाशीची शिक्षा मिळल.'' मंग तो पोऱ्या घरी आला आन जायेची तयारी कथन निंगाला. पहिल जीठ लाल गावलं व्हतं तीठव ग्येला, पांगुरना काढली आन बुडी मारली. तवा आल तीन लाल. तवा त्येच्या मनात आलं, ''हे काय शीळच लाल तवा आपम जीठ त्यांचा झाड आहे तीठच ज्यायाचा.'' तवा तो निंगाला नदीनं. जाता जाता एका लांब आला. तवा यका राक्षेसीणीचा मुंडका कापून त्या नदीच्या कडाला झाडाला

बांधून ठिवला व्हता. आन धड खाली व्हता. आत त्या मुंडक्याच्या तोंडातून रक्ताचं गोळं पडत व्हतं त्या रक्तातच लाल व्हत व्हतं. तवा पोराच्या मनात आला की ही काही भानगड आहे. तवा तो यक्या उंबराच्या ढोणकात लंपून बसला. मंग राक्षेस आला. बारा माणसांची मोळी त्यानी आणली व्हती. त्यानी यक झाडा उपाटला चुलांगण घातला. कढई ठिवली. मानसा टाकली. मंग ती पोर सोडली. मुंडका धडाजवळ ठिवला. पायाकून डोक्याकड काठी फीरवली. मुंडका जुळला. मंग दोन्ही ज्येवली. परत दुसऱ्या दिसी. राक्षेस ग्येला मानसा आनाया. त्या पोराना संमदी भानगड पयली. राक्षेस ग्येला, मंग खाली आला. मुंडका सोडला. त्या पोरीला काठीना जीवंत केला. ती म्हन, ''ती तुह्यासंग येते.'' तो म्हन, ''चाल''. ती म्हन, ''मी यव्हढी तरून वयात आली पर मवा बाप लगीन करना. आत रोज मला कापून ठिवीतो. मंग मी आल्ये तुझ्या संग'' त पोऱ्या म्हन का, ''तुह्या बापाला मारल्या बिगर नको. तु तुह्या बापाला त्याचा मरान कह्यात आहे ते पूस.'' परत तीचा बाप आला बारा माणसांची मोळी घीऊन. त्याना त्या पोरीला नीट केला. बारा मानसा शीजवून मंग त्या खाया बसली. तवा ती म्हनं, ''बाबा, तुम चा मरान कह्यात आहे?''तवा त्याला पका राग आला आन म्हन, आजून त्या मला कंधी मरान इचारला नही. आज इचारती?'' तवा ती पोर म्हन, ''तसा काह नही. पर तुमी रोज रानात जाता. तीकड जर काही कमी जास्त झाला आन जर मला वाचवता आला त वाचवीन.'' तवा तो म्हन, ''आपली इहीर आहेना त्या इहीरीमंदी एक पोपट आहे. तो पोपट मारला त मी पर मेलो.'' असा झालेव राक्षेस ग्येला बारा माणसांची मोळी आणाया. ते गेले व हा पोऱ्या खाली उतारला. त्या पोरीला नीट क्येला. मंग दोघयबी निंगाली आन ग्येली इहीरीक.त्या पोरांना त्या पोपटाच्या अंगाला हात लावला. तसाच राक्षेसाला हीव आला. राक्षेस तसाच पळत सुटला. इकड आला. पार त्या पोराला धराया ग्येला त्या पोरानं पोपटाचा मुंडका खुडला. तसाच राक्षेस मरून ग्येला.

मंग तो पोऱ्या आन ती पोर निंगाली. येता येता वाटात हा पोऱ्या म्हंतो, ''मी तुला नीयाला आलो नवतो. मला लाल पाहिजे व्हतं.'' ती म्हन, ''कीतीकं घ्या.'' त्या पोरीना त्येली काही झाडाची पाना आनाया लावली. काहीतरी मंतर म्हनली आन लालाचा ढीग झाला. तो म्हन, ''एवढं कशाला? मला फक्त दोनच लाल लागत्यात.'' त्यानं दोन लाल घ्येतलं. तीना हात फिरीवल्याव बाकीच लाल गुप्त झालं. आन निंगाली. घरी आली. त्ये दोन लाल राजाला दिलं. दुसऱ्या दिसी न्हायी आला दाढी कराया. मोतीरामकं. मोतीराम म्हन, ''अदुगर गड्याची करा. मंग मह्यावाली.'' तवा हा गडी माडीव रमत व्हता. न्हायी माडीव आला. त्यानी त्येची बायकू पयली. ती राक्षेसाची मुगली पघून तो नीसता हसायाच लागला. इतका हासाला लागला, तर तो पार खाली पडायचा. तो दाढी करायचा पार विसरून ग्येला. राज्याला जाऊन म्हन, ''राजसरी काय करत्या तुह्या या घुबडीला ! आव त्या गड्याना लई सुरुपवान बायकू आनली त इचारू नकाय तसी जर तुमाली असलीना त लय भारी.'' तवा राजा म्हन, ''ती जर मिळवायची असल त काय कराया पाहिजे?'' न्हायी म्हनं, ''त्याला असं सांगा का जर गजराहार आणून दिला त बरा नहीत तुला फाशीची शिक्षा.'' मंग राज्याना त्याला बोलावून घेतला. आन सांगीतला, ''त्या मला गजराहार आणून दिलात बरा नहीत फाशीची शिक्षा.'' तवा तो पोऱ्या घरी येऊन चिंता करीत बसला. तवा त्येच्या बायकोना इच्यारला, ''तुमी का चिंतात?'' तो म्हणतो, ''मला राजाना असा असा सांगीतलाय.'' ती म्हन, ''काही काळजी करू नका.'' आपल्या घराच्या पाठीमागच्या रस्त्यानजा. लाम कुठतरी तुम्हा यक मठ लागन. तीठ साधू रयतो. त्येला सही महीनेंची झोप लागली असन. तवा तुमी त्येच्या बागाची सफाय करा. बागाला पानी भरा. साधुच्या उशाला चिलीम भरून ठिवा.'' समदं अयकून निंगाला. मठ लागला. त्यांत त्या मठाची सफाय केली. बागाला पानी भरला. साधुच्या उशाला चिलीम भरून ठिवली. सहा महिनेची झोप संपवून साधू उठला. हा बसला व्हता झाडाव जाऊन. साधु झाडाखाली बसला. साधु म्हण, ''बेटा असशीलत उज्या मांडीव बसन आन पोर असन तर डाव्या मांडीव बसन. आन भूताटक्या असशीलत नींगून जाशील.'' तसा तो पोऱ्या उज्या मांडीव जाऊन बसला. साधूना इचारला, तुला काय पाह्यजे?'' तवा तो म्हन, ''मला गजराहार पाह्यजे.'' तवा साधु म्हन दुसरा काही मांग पर त्या मांगू नको.'' तो म्हन, ''मला दुसरा काहीच नको?'' तो म्हन मला दुसरा काही नको.'' मंग साधूना अर्धा पोता मुरमऱ्या, तांब्याभर दुध, दोन श्यार मांस, टिपरीभर तांदुळ, यव्हढा आनाया सांगितला, आनं म्हन, ''तुला लांडगं भेटतील त्याली मुरमुऱ्या टाकायच्या, वाघ भेटतील त्यॅली मटान टाकायचा आन सांपाली दूध, मोराली तांदुळ.'' मंग त्या सगळा घीऊन निंगाला. पहिल्यांदा लांडग भेटलं. त्याली मुरमऱ्या टाकल्या वाघ भेटल त्याली मांस टाकला. सापाली दूध घातला. पुढ दुधाचा तळा लागला. तीठ देवाच्या रंभा आल्या व्हत्या. नवीन नागड्या आंघुळ करीत व्हत्या. त्येंची पांघुरणा राखाया मोर व्हत्या. त्याना मोराला तांदुळ टाकलं आन पांघुरणा घीऊन पळून ग्येला. मोती तांदुळ झालं तसाच त्याना आवाज काहाडला. तशाच त्या

रंभा पळत सुटल्या. साधूना त्येला सांगेल व्हता का काही झालं तरी मांग पह्याचा नही. त्या जवळ आल्या तसाच त्यानं मांग पाह्यला आन शीळा व्हऊन पडला. साधूला समजला. तसाच साधू आला आन त्याना जीवंत केला. परत संमदा सहित्य आनाथा सांगीतला. फक्त तांदूळ पह्यले टिपरीभर व्हते. आता आठवाभर सांगितलं. परत निंगाला. लांडग्येली मुरमऱ्या टाकल्या. सापाली दुध पाजला. वाघाली मांस टाकलं. मोराला तांदुळ टाकलं. आन पांघुरणा घीऊन पळाला, मोराचं तांदुळ खायाचं झालं तसाच त्यांना आवाज क्येला. रंभा पळत सुटल्या नगीन-नाग्या. हा पळत साधुक आला. साधून त्याला सांगितला, ''जी त्यात सडकी-मडकी, शेंबडी-लेमडी, आऊ आसलना तीलाच हात लाव''. तो म्हन, ''हा.'' त्याला साधूना ठिवला मांग लपून. आवा आल्या तशाच नागड्या उघड्या पळत. लगीनच साधूला इचारला, ''कोणी आलय काय आमची पांघुरणा घीऊन?'' मंग बऱ्याच यळान साधू म्हन, ''तुमची पांघुरणा मिळतील पर त्या मानसाची तुमचेतली यकजन बायकू व्हया पाह्यजे.'' त्या म्हन, ''हां.'' मंग आला पुढं. जी किडकी-मडकी व्हती तीलाच हात लावला आन पांघुरणा दिली. तीच आऊ त्या रंभाची मुख्य व्हती. पोऱ्या आनती नींगाली तवा ती म्हन, ''मला आंघुळ करायची रं.'' ती लागली आंघुळ कराया. खाली कीतनकीती गजराहार बह्याला लागलं. यातला यक याना घेतला. त्या आऊचा सडका रूप ग्येला आन सुरुपवानबाई झाली. मंग घरी आला.

दुसऱ्या दिवशी न्हायी आला मोतीरामची दाडी कराया. मोतीरामक ग्येला. मोतीराम म्हंतो, ''आदी मया गड्याची करा मंग मयी.'' आला वर. आजत दोन बायका पह्यल्या आन पका हासाया लागला. मोकार हसता हसता पंलगावून खाली पडला. परत राज्याक ग्येला आन म्हन, ''राजसरी आजत दोन.'' ''हा काय मरत नही, आन तुमाला सुरुपवान बाईल मिळत नही. आता असी गोट करा. त्याली बोलावा आन म्हनावा का तुझं आज पंज मेल्यात त्ये तुला सत्यावत्याल. तवा त्येनी बोलावला हाये.'' मंग राजानी आज्ञा दिली. पोऱ्या चिंतत पडला. तवा तवा तो राक्षसाची पोर आन रंभा म्हन,''का व चिता करत्या?'' त त्याना सांगीतला असा असा हाये, तवा रंभाना सांगीतला का ''मंतराच्या योगानं सरणाखालून पार ओट्यापहोत भूयर व्हयील काय घाबरू नका. दुसऱ्या दिसी राजाना पोराला बोलावला. सराण रचला. पेटावला. तसाच तो पोऱ्या त्या रस्त्याना घरी नींगाला. खाली तळघरात रयला. रोज त्येच्या बायका त्याली जेवायला दयाच्या. दिवस आला. मंग तो त्या तळवाटातून निंगून राज्याक ग्येला. ''राज्यसरी आला वाडवडिलाला भेटून.'' त्या पोराला समदा समजला व्हता. त्याना सांगीतला, कां, ''न्हायाला त्याच्या आजापंजाना बोलावला आहे. त्यांची दोडी डोकी लय वाढलय.'' मंग त्या न्हाव्याला सरणात चाळला. मंग न्हायी ग्येला मरून आन राजानायबी बायकूचा नाद सोडला. आन त्या पोऱ्याला परधान क्येला. मंग तो पोऱ्या आन म्हतारी आन मोतीराम आन पोऱ्याला परधान केला. मंग तो पोऱ्या आन म्हतारी आन मोतीराम आन पोऱ्यांच्या आवा समदे सुखान रमले. तसे तुमी आमी रावा..

**– दत्तु तुळाराम कोरडे, रणद बुद्रुक**

* *

## कथा क्र७– ''अर्ध्या आंगाची स्त्री''

यक राजा व्हता. त्याला व्हता यक मुलगा. तो मुलगा लग्नाच्या वयामधी आला व्हता. त्या मुलाचे आयबाप त्याचा लगीन करू लागले. त्याच्या बापानं देशोदेशीच्या राज्यांली पत्र पाठावली. तवा त्याचा मुलगा म्हन, ''आय महा वडील कुक ग्येला.'' त्येची आय म्हन का, ''मला जसा तुह्या बापाना इठ कथन आणला तसा तुलायबी लगनाला बायकू पाहायाला गेला आहे.'' तवा त्याच बा घरी आला. तो मुलगा म्हन, ''जेव्हढ्या जगामंदी मुली असतीन तेवढ्याबी मया आयाबहीनी लागत्यात.'' तो बापाला म्हन,''मह्या आंगाच दोन मधुमध भाग कथन काप.'' तवा त्येच्या बापानं तस्कर आनून त्येच्या आंगाच दोन भाग क्येलं. आन उजवा डोका आन धड उज्या राजनात ठुले, आन डावा डोका आन धड डाया राजनात ठुले. ''उजवा धड आन डोका सवा महीन्यानं काहाड आन डावा धड आन डोका यक महिन्यानं काहाड'' असा सांगला. त्या मुलग्याचा उजवा धड आन डोका सवा महीन्याना न काहाडता महीन्यानच काहाडला. तवा तो पुरा मानूस झाला नव्हता. आन त्येच्या नाकातून यक रगताचा टिळा पडला आन त्येचा का सर्प झाला. मंग डाया बाजूचा धड यक महिन्याना काहाडला तवा राजनात लय सुरुवाव पोर झाली. चंद्राला मंन्ती मावळू नको आन सुर्याला मंन्ती का उगू नको. तो मुलगा आन ती पोर, पलंगाव बसली. त्या मुलाच्या नाकातून जो रगताचा टिळा पडला व्हता हांगी त्येचा सर्प झाला आन त्यें दोघ जन पलंगाव बसल्ये व्हते तवा रातीचा तो येऊन कवाडाला धडका द्याया लागला. तवाती कवाड उघडाया गेली तवा तीच्या संगं बोलाया लागला. म्हन, ''ज्यावेळी तुहा नवरा नीमाच अपरा रयला व्हता तवाच त्येच्या बाना त्येला काहाडला आन

त्येच्या नाकातील रगत पडून त्येतून मी झालो. अशा परकारं यका शरीराची तीन शरीरां झाली आन त्येच पुढं नवरा बायकू आन मुलगा झाली.

**– तुळाबाई भाऊ देशमुख– शेणीत**

* *

## कथा क्र. ८ ''राजाचा गडी''

यक व्हता राजा. त्येली खंडीभर गाया व्हत्या. त्येला यक सालाना गडी ठिवला. तो का रोजरोज गुराकं जात अस. राजाची बायकू त्येला रोज कोंड्यारोंड्याची भाकर देत अस. यक दिस तो रानात जाऊन रडाया लागला. आन त्येच्या गुरांमधी काळी कपीली गाय व्हती. तीला वाचा फुटली. ती म्हन, ''का रं पोरा रडतोस?'' त्या पोराना त्या गायीला सांगला का, ''मला राजाची बायकू रोज रोज कोंड्यारोंड्याची भाकर देती.'' आन तीना त्या पोराला शीका आनाया सांगला आन यक टोपला आनाया सांगला, त्या पोराना शीका आन टोपली आनली. मंग त्या गायीना सांगीतला, ''शीका मया गळ्यात बाहांद आन टोपला त्येच्च्यात ठीव, आन त्यो टोपलीत बस.'' तो पोऱ्या टोपलीत बसला आन ती गाय निंगाली लाम. यका वडाच्या झाडाखाली गायीना त्याला यक सुखाचा पवा आन दुसरा दुखाचा पवा दिला. सुख असल का सुखाचा पवा वाजवायचा आन दुख असल का दुखाचा पवा वाजवायचा. तो पोऱ्या रोज रोज वडाच्या झाडाखाली गाया बांधायचा आन गायांचा दूध काढून पीयाचा. आन रायलेला वारूळात नीऊन ओतायचा. असा बराच दिस ग्येला. यका दिसी वारुळातून नाग बाहेर आला तो पोऱ्या घाबरला आन त्येन दुखाचा पवा वाजीवला. तो पवा वाजीवल्या बरुबर गाया त्येच्या जवळ आल्या. आन नागाला माराया लागल्या. नाग म्हन, ''मी त्येली कायबी करत नाही. मला का, त्येच्या उपकाराची फेड करायची हाये.'' तवा समद्या गाया परत आल्या. दुसऱ्या दिसी पोऱ्या दूध घेऊन वारूळाला ग्येला तवा नाग बाहेर आला आन त्येन त्या मुलाला आत बोलावला. तो पोऱ्या आत ग्येला. नाग पोराला म्हनला, ''मया तोंडात शीर.'' तो पोऱ्या त्याच्या तोंडात शिरला, त्येला परत तोंडावाटा बाहेर काहाडला, पोऱ्या संमदा सोन्याचा झाला. तो पोऱ्या यक दिवस आंघुळ कराया नदीत ग्येला, करता करता त्येचा यक सोन्याचा केस पाण्यात पडला आन तो केस त्याना पुडीमंदी बांधुन नदीना खाली सोडला, खाली राजाची पोर अन पारधानाची अशआ दोन मुली धुणी घूत व्हत्या. राजाची पोर म्हन पुडीत ज्ये काय असल ते माह. आन पुडी तुही. राज्याचा पोरीना ती पुडी उघाडली त्येच्या मंदी सोन्याचा केस निंगाला. ती का तो क्यास घीऊन तीच्या बापाक ग्येली. आन म्हन, ''का, मला अशाच केसाचा नवरा पहीजे.'' राजाला पेच पडला, का असा नवरा आनायचा कुठून? त्यानं नोकराला राज्यात दवंडी दयाया सांगला. ''का, जो मह्या मुलीला सोन्याच्या केसाचा नवरा आनून दील त्येला एककाठी राज्य बक्षीस.'' त्येच्याक यक म्हतारी आली. तीना राजाक गाडीवैल आन एक राजन मागू घ्येतला.

आन ती नदीनदीना खाली ग्येली. आन तो पोऱ्या आंघुळ करीत व्हता. तीना तीठं जाऊन गाडी थांबवली. वैलाला पानी पाजला आन गाडी जुपायला सुरवात केली. यक वैल मांगून आन एक पुढून. ती जुपाया लागली. त्या पोराना म्हातारीला सांगितला का, ''आजी वैल असा नही जुपायचा.'' म्हतारीना पोराला सांगला, ''का त्या राजनात काय हाये त्ये तुला खायाला घी.'' तो पह्याला लागला तसाच म्हातारीना त्या पोराला राजनात दडापला आन त्या मुलानं दुखाचा पवा वाजवला. समद्या गाया तीठ आल्या. गाडी मोडून, रांजन फोडून पोराला हळूच बाप काहाडला. आन परत ती म्हतारी राजवाड्यात गेली. यक लोखंडाचा राजन आन गाडी वैल आनलं आन उजुक यक कावळा पाळील. आन त्या मुलाजवळचा दुखाचा पवा पळवून आनायचा असा त्येली सांगला. कावळ्यान दुखाचा पवा आनला. म्हतारी नदीनदीना खाली आली आन तो पोऱ्या आंघुळ करीत व्हता तीठ गाडी सोडल्याव परत उफराटी वैल जुपाया लागली. गाडी जुपल्याव तीना पोराला सांगला जा त्या राजनात काय खायाला हाय ते घी. तो पोऱ्या खायाला ग्येल्याव त्या पोराला राजनात लोटला आन राजाक घीऊन गेली. आन राजाना त्येला विचारला, ''तु मया पोरीसंगा लगीन करनार का नही?'' तो पोऱ्या म्हन ''हा'' त्या पोरानं राजवाड्यात गाया आणल्या आन पोरीचं आन पोराच लगीन झाला. आन तीठ ती राज्य करू लागली.

**– वत्सलाबाई तुकाराम मुठे– शेलविहीरे.**

* *

## कथा क्र. ९– ''पील्या भोयाचा पोपट''

यक व्हता भोई. त्येचा नाव व्हता पील्या. तो रोज रोज मासं धराया जायाचा आन मासं विकून यायाचा. मंग पैसे मिळवून कायतरी पीऊन यायाचा तवा मंग तीठून मोहर त्येची बायकू सयपाक करायची. त्येची पकी गरीबी व्हती. यक दिवसी मासं विकून येत व्हता व त्येला गावला येक पोपट. त्याना काय

केला चांगालं पाखरू म्हून घरी आला आन पिंजऱ्यामंदी ठुऊन दिला. दुसऱ्या दिवशी सकाळच उठून तो मासं धराया निंगून ग्येला. त्येचा बायकूना काय केला, म्हन, ''मह्या नवऱ्याना पाखरू आनलाय त्येली कायतरी खायाला दिलं पायजेल.'' मंग ग्येली खाया घालाया, त त्येच्या मुखातून दोन लाल पडलं व्हत ते त्या बायकून गारगोट्या म्हून घ्येतलं म्हन, ''काय चांगल्या गारा हायेत; आपल्या राजगंभीराला गुणगंभीराला खेळाया व्हतील,'' पन तीना उजुक इच्यार केला. सावकाराच्या बायकूचा आन आपला बरा हाये तवा त्यांचे पोराली खेळाया देवा मंजी आपल्याला कायतरी दील.'' मंग त्येली सावकाराच्या बायकूक त सावकाराच्या बायकून तसाच वळाखला, ''ह्या त रत्ना हायात'' तीना विचार केला का आपन हीला कायतरी दिऊन घ्येवा तवा सावकार घरी नसतां तीना हजार बारास रुपय त्या भोयी बायकोच्या वटीत घातलं. मंगी ती बाई घरी आली. आन वाण्याच्या दुकानामंदी जाऊन तीन जीन्सा आनल्या. आनल्याव तीचा सयपाक चाला. मंग पील्या भोई तिकून मास्यांची पाटी घीऊन येत व्हता. त घराकड त्येची नदर ग्येली त घराच्या आढ्याव धूर पाह्यला. त मंग आपल्या बायकूना कायतरी उसनापासना कथन सयपाक चालावलाय म्हून आज काय मासं इकाया जायचा नाही, मंग घराच्या मोहर ग्येल्याव बायकूला हाक मारली का मला पाटी उतरू लाग. मंग बायकोना पाटी उतारला. मंग ती म्हन, ''का व तुमी मास इकाया का नय ग्येला?''त म्हन आग रानी म्या येतानी घराच्या आढ्याव धुर पह्यला मून मला वाटला का सयपाक झाला असन त जेऊनच जावा.'' त म्हन ''काही हरकत नही. जेवन कथन घ्या आन मंग जावा मासं ईकाया.'' त मंग ज्येवान केल्याव मासं इकाया ग्येला. पर बायकोला पोपटाच्या मुखावाटं रत्न पडल्यात तो सांगला नही. मंग तीका रतन जमवून ठीवाया लागली. मंग तीना ती रतना मोडून आन मोठा महाल बांहादला. त मंग नारेळी पुनव आली व हये टायमाला तीकून यक बामन आला म्हन, ''इठ पील्या भोयाचा घर व्हता. कोना सावकाराचा घर झालाय गडे?'' त त्येका पील्या भोयाच्या नावाना गागाया लागला. त पील्या भोयाची बायकू बाह्येर आली. त बामनाना पाह्यला, ''हीत पील्या भोयाची बायकू!'' मंग तो काय म्हन ''ही त गरीब व्हती आन तीची शीरीमंत कसी काय झाला? '' मंग त्याना यक बाटली काहाडली आन त्या बाटलीव पाह्या लागला. ''हा गुन कोनाचा हाये?'' त मंग त्येला समजला का हा गुन पोपटाचा हाये. जो पोपट खाईल त्येच्या मुखातून लाल पडतील.'' पर आता ही आपल्याली कसी काय पोपट कापून घालील.'' तो त्येच गावात रयला.



आन सकाळचा उठायचा आन तीच्याक जाऊन बसायचा. पील्या भोयी जायचा मास धराया. मंग ती पील्याची बायकू म्हन, ''काव भटजीबुवा तुमी रोज उठता आमच्याक यीऊन बसता?'' आमची जात पडली कहार आमच्या हाताचा तुम्हाला आनपानी चालन काय?'' त म्हन ''कोरी भांडी असतील त चालन.'' मंग त्या बाईना चहा ठुला. आन त्ये दिसापून तीका रोज चहा देया लागली. न हा पक पंदराईस दीस झालं त भोयाची बायकू म्हन, ''काव भटजीबुवा तुमी कामधंदा करीत नही. तुमच्या मनात हाय तरी काय?'' त म्हन ''काय सांगू तुह्याकड पह्यत रहावा वाटतोय. तुझ्यापून उठू य असा वाटतोय, तुझा माझा लोभ जडावा असा मह्या मनात हाये.'' त मंग तीचा आन त्येचा पक्का लोभ जुळला. मंग तो रोज रोज येऊ लागला. पर मंदीच दोन दिस बंद झाला. त ती वाट पह्यत असं. मंग तीना यका म्हातारीप निरोप लावला का, ''भडजीबुवा म्या तुमच्यावाली लय वाट पह्यली मला तुमच्या बिगर काय करमत नही. तुम्हाली काय पायजेन त्ये मी दाया तैयार हाये पर तुमी येया पायजेल.'' त भडजीबुवा मनात म्हन, ''आता गावली गड्या. त्येना निरोप लावला ''मला पोपट कापून घालशील त मंग मी तुह्याक यीन.'' त म्हन ''काय हरकत नही.'' दुसऱ्या दिसी सकाळच उठली आन पोपट कापला आन सयपाक केला. त मंग पोराली सयपाक करावा येळ झाला त पोरां आली आन म्हन,. ''आई आम्हाली जेवाय दी.'' त म्हन ''आजुक सयपाक नही झाल.'' त मंग म्हन ''आम्हाली जेवाया नही आन त्यो सयपाक कोना साठी?'' त मंग ती भटजीबुवाची वाट पह्यत व्हती त इकडा पोरा गुपचुप ग्येली आन त्येंनी यवढाव कालवाण खाला आन त्येच्यात पानी घालून ठूला. मंग भटजीबुवा आलं आलं मंग त्या बाईना त्येली जेवाया घातला आन सुखान पलंगाव ग्येली. पील्या भोयी मास धराया जयाचा तसाच कुठतरी गडप झालता. येंचा इकड सुखाचा चाला व्हता. त मंग गुनगंभीराना कालवान लय खाला व्हता व पोपटाचा जीव ग्येला त्येच्या पोटात आन राजगंभीराली काय मिळाला नही. भडजीबुवा घरी आलं आन पार बोटं घालू घालू वकाऱ्या काढ पर लाल काय पडना. तरगत पडला. ंग म्हन काय तरी भानगड हाये, मंग उजूक बाटली काहाडली आन पाह्यला का हा गून कोणाचा? त त्येली असा दिसला का पोपट गुनगंभीराना त्येली खाला त तोंडातून रत्न पडतील इकडं गुनगंभीर हसला का त्येच्या मुखावाटं लाल पड आन समद्या पोरांली खेळाया दियाचा. त मंग येना पील्याच्या बायकूला सांगला का गुनगंभीर कापून खाया देशीन त बरा. त म्हन ''काय हारकत नही. पर तुमच्याबिगर माला काय करमत नही'' त मंग

म्हन, ''मी उंद्या येतो जेवान कराया हा म्हातारीना आयकला आन तीना गुनगंभीर कापून भटाला खाया देनार हाये, त तूमी काय यकूननाराला सोडू नका. त मंग पोरा गेली घरी त आई म्हन ' तू इठच थांब तुला मांडीव घीऊन नदार काढायची हाये.'' त राजगंभीर म्हन ''मी गुणगंभीराला घेतल्याबीगार जानार नाही.'' त म्हन ''मी त्येला लगुलग पाठविते.'' त मंग राजगंभीर ग्येला बाहीर आन या पील्याच्या बायकून इळा घेतला आन गुनगंभीराला मांडीव घ्येतला. तसाच राजगंभीर मागून ग्येला आन आईला दिला पाडून आन गुनगंभीराली घ्येऊन आन पळत निंगाला. त्ये पळत पळत पार लाम निंगून गेल्ये. दोन दिस ग्येलं, तीन दिस ग्येलं,

इकडं भटजीबा आले. त्या बाईक त त्येली बाईला तिसराच सांगला. त म्हन. ''भटजीबुवा महा नवरा ग्येला आन पोरायं ग्येली आता तुमी मयासंग लगीन करा.'' त भटजीबुवा म्हन का, ''ह्ये पय मी काय तुह्यासंग लगीन करनार नही पर तुला मरी पहोत सोडनार नही. आन तुह्या नवऱ्याच काटा काहाडलाच तर तुह्या पोरांली मारून आन लाल देयनारा पोपट आनीन.''

गुनगंभीर आन राजगंभीर फिरतफिरत यका गावामंदी आलं. त्येंली पकी भूक लागली अस. त गुनगंभीराला राजगंभीराना हासावला तसीच रत्न पडली. त राजगंभीर म्हन मी आपल्याली कायतरी खाया घीऊन येतो. तवर तू इठ राय. मंग त्येनी त्ये लाल यका दुकानदाराला दिल आन लाडूबुंदी माघातल. त मंग त्या दुकानदाराना त्येंली बोलला. खाऊपीऊ घातला. त गुनगंभीराना त्येली सात लाल दिलं आन सीधापानी घ्येतला आन रस्त्याली लागलं. त मंग पक लाम ग्येल रानात. त्ये रानात यक तळा व्हता त्ये तळ्याच्या काठी बसलं. सयपाक पानी क्येला आन जेवाय बसलं त त्येठ यक राक्षेस आलां त्येला तीन डोळ व्हत आन येक सींग व्हता. त्यो राक्षेस म्हन, ''मी तुमाली न्याया आलो मी भटजीबुवाच्या बाटलीतला राक्षेस हाये.'' त म्हन ''आमी काय याचो नही आमाली सात डोंगराच्या त्या आंग जायचा हाये.'' त राक्षेस त्येंच्या जवळ यायला लागला त तसाच त्येंच्या भक्तीना जाळ झाला. तसाच राक्षेस उडाला अभाळात म्हन,''आज इंद्राच्या पऱ्यांनी उडावला पर उंद्या तुमाली न्येया ईन.

इकड भटजी वाट पह्यत व्हता त त्येच्या म्होरं बाटली व्हती आन बाटलीतला राक्षेस आला त्येना सांगला का त्या पोरा इंद्राच्या पऱ्यांच्या ताब्यात आल्यात आन तीठ मही ताकद चालत नही.

इकड राती त्या समद्या पऱ्या त्येंठ परगट झाल्या आन त्येनी गुनगंभीर आन राजगंभीरा भक्तीना नाच केला आन त्येंच्या संग तळ्यात आंघुळ क्येली आन म्हन ''उजुक कोनी आल त परीरानी परीरानी या या असा म्हनायचा. मंग आमी यीऊ.'' त पऱ्यांनी त्येंली यक फडकी दिली आन म्हन, ''तुमाली जेवन करायचा असल त मांगा मंग या फडकीव यील. गुनगंभीराच्या मंदी जवर पोपट हाये तवर आमी येऊ पर जरका त्यो पोपट उडून ग्येला त मंग आमी येनार नही.'' त मंग पऱ्या गेल्या आन येंनी मंग जेवन केला आन बसलं ख्येळत. त्येंनी तीठ यक घर करायचा ठरवला. त तसाच राक्षेस आला आन मोठ्यानं हासं, त मंग पोरांनी पऱ्यांली बोलवाया सुरवात केली म्हन, ''इंद्राच्या पऱ्यानू या या'' पर परीरानी म्हनयचा काय त्येंच्या ध्यानात येईना तसाच राक्षेसांना उचालला आन आकाशामंदू घीऊन चाला. गुनगंभीरच्या पोटातल्या पोपटाला वाचा आली आन तो आतून म्हन. ''परीरानी या या तशाच पऱ्या आल्या आन त्येंनी राक्षेसासी युध केला आन पोराली आन राक्षेसाली इंद्राक घ्येऊन ग्येला, तसाच गुनगंभीराच्या पोटातला पोपट बाह्येर आला. आन सांगाया लागला, ''म्हन इंद्रदेवामी आपल्या शापाना पोपट झालो. पील्या भोयी जीठं मासं धराया यायचा हांगी त्येठच माझी वस्ती व्हती त पील्या भोयी लय चांगला मानूस व्हता मी त्येचा संगा गेलो, त त्याची बायकू पकी चवचाल तीना ठूला चेटक्या भटजी. त्येच्याक हा बऱ्हम राक्षेस हाये, त्येना समदा महागून सांगला आन माला कापाया सांगला. तया पोरानी मला वाचावला आन दिलेलं लाल चांगल्या लोकांली दिलं तवा मला वाच्या आली. आता त्येच्या संग मी यठ आलू महा तुमच्या चरनाजवळ घ्या.'' तवा इंद्रदेवाला खरा परकार समजला, त्येना राक्षेसाला इच्यारला, ''पील्या कुठं हाये.' राक्षेस म्हन ''भटजीना त्येच कोंबड कथन आन त्येच्या बायकूच्या उकीड्यावं सोडलं.'' इंद्रदेव म्हन ''व्हय त्येला घेऊन यी मंजी तुला मुक्ती मीळन त राक्षेसानं त्येली आनला आन मंग इंद्र देवान समद्याना मुक्ती दिली आन गुनगंभीराला आन राजगंभीराला राज दिला.

इकड भटजी आन भोयाची बायकू ग्येली मरून त त्येंच्या आंगात किडं पडलं त म्हन ''का व भटजीबुवा आसा,'' त म्हन जसा करस्याल व्हतो तसाच.

इकड गुनगंभीर आणि राजगंभीराना पऱ्यासंगा लगीन लावला आन सुकान राज्य केला तसा तुमी करा.

**– रखमा गुणाजी भांगरे, मान्हेरे**

* *

## २) प्राणीकथा

### कथा क्र. १. – ‘‘उंदराच्या शेपाला काटा’’

यक व्हता उंदीर. तो हिंडत व्हता कुपाटीकुपाटीना. त्येच्या शेपीला भरला काटा. उंदीर ग्येला न्हायी दादाक. उंदीर म्हनाला, ‘‘न्हायी दादा, येव्हढा काटा काढीतो रं? लय मोटा बक्षीस देल. पर जर का शेप मोडली बिडली त...’’न्हायी म्हनला, ‘‘शेप मोडली बिडली त....’’ शेप मोडली. उंदीर म्हनु लागला, ‘‘माही शेपच दी नाहीतर वस्तराच दी.’’ त मंग न्हयानं वस्तरा दिला. उंदीर ग्येला पुढं.

तीठ यक कामट्या दाताना कामट्या सोलीत व्हतात. उंदीर म्हन, ‘‘का रं कामटदादा, दाताना कामट्या साळीतो?’’ कामटदादा म्हनला, ‘‘काय करतो! इला न्हाय कोयता नायी.’’ त मंग उंदराना वस्तरा दिला. उंदीर म्हन, ‘‘जर वस्तरा मोडला त...?’’ दोन तीन कामट्या साळल्याव ग्येला वस्तरा मोडून, उंदीर म्हन, ‘‘वस्तराव दी नहीत कुरकुलाच दी.’’ दिला कुरकुरला मंग उंदीर ग्येला पुढं.

तीठ व्हता यक कुंभार. तो रोज उठायचा आन लंगोटीना माती वहायचा. उंदीर म्हन,‘‘कार कुंभारदादा लंगोटीना माती वह्यतो?’’ कुंभार म्हनला, ‘‘काय करतो ! कुरकुला नही टोपली नही.’’ त मंग दिला कुरकुला म्हन, ‘‘मोडला-बिडला त...?’’ घेतला कुरकुला दोन टोपल्या माती वह्यली आन कुरकुलाच ग्येला मोडून. उंदीर म्हनला, ‘‘कुरकुलाच दी नहीत मटकाच दी.’’ त मंग दिला मटका, उंदीर पुढे ग्येला.

तीढं येक गायीखं व्हता. रोज उठायचा आन उखळात गायी पाजायचा. त उंदीर म्हनं, ‘‘कारमही घागर’’ दिसी घागर. ‘‘यक गाय पाजायची रयली व्हती. पाजाया लागला. लगीच लाथ मारली. गेली घागर फुटून. त म्हंतो, ‘‘घागरच दी नहीत वैलच दी.’’ तर का दिला वैल. उंदीर पुढं ग्येला.

पुढं व्हता औतकरी दादा. रोज उठायचा दोघी बायका जुपायचा. उंदीर म्हंतो, ‘‘धर महावाला वैल’’ दिला वैल. म्हन, ‘‘मोडला बिडला तं....?’’त वैल ग्येला मोडून. म्हन ‘‘वैल दी नहीत बायकूच दी.’’ त मंग दिली बायकू. पुढ ग्येला.

पुढं व्हता ढुमक्यावाला. ढुमक्यावाला दादा यकटाच ढोलका वाजवायचा आन नाचायचा. त मंग, ‘‘धर मही बायकू’’ घेतली बायकू. तीला लावला ढोलकी वाजवाया. ती लागली वाजवाया. वाळ्यात घातली ढोलकी त लगीच पडली. त उंदीर म्हन, ‘‘बायकूच दी नहीत ढोलकी दी’’ दिली ढोलकी.



पुढ ग्येला यका टेकडीवं आन म्हंतो-

**शेपीव वस्तरा मिळाला ढुम ढुम ढुमाक्**
**वस्तऱ्यात कुरकुला मिळाला**
**कुरकुल्याव मडका मिळाला**
**मडक्याव गाय मिळाली**
**गायीव वैल मिळाला**
**वैलाव बायकू मिळाली**
**बायकूव ढोलकी मिळाली**

**– पोपट बोऱ्हाडे– शेणीत (भडकुंभे)**

* *

### कथा क्र. २ ‘‘लबाड कोल्हा’’

यक कोल्हा व्हता. तो रोज रोज वहाळाला खेकडी खायाला जायाचा. यके दिसी असा झाला, का, तो खेकडी खाया ग्येला. तो या खेकडीच्या धावात शेपूट घाल, त्या धावात शेपूट घाल. असा त्यान मोहरल्या धावात शेपूट घातली. त्या धावात व्हती सुसरबाय. त्या कोल्हान धावात शेपूट घातल्यावं त्या सुसरुनं त्याची शेपूट धरली. आन त्या कोल्ह्याच्या शेपला डसली. पर तो कोल्हा भामटा व्हता. तो तीला म्हन्तो, ‘‘सुसरुबाय भोळी धरी करंजाची मुळी.’’ तीना त्याची शेपूट सोडून दिली. तीना करंजाची मुळी तोंडात धरली आन तीलाच ती डसली. आन कोल्हा तीठून निघून ग्येला. सुसरुबायना असा इचार क्येला का, आता कोल्हा खेकडी खायाला येनार नही. आता तो उंबरा खायाला जात असल. तीना इचार क्येला. कोल्हा उंबरा खायाला आला तवा ती म्हनली, ‘‘त्येची खोड मोडली पह्यजे. सुसरीना उंबरा गोळा केली. तीच्या अंगावरून उंबरा घेतली आन कडाना उंबरा फेकून दिली. उंबरातून पहायला जागा ठुली. कोल्हा उंबरा खायाला आला. त्यानं उंबरातून डोळं पह्यलं आन म्हन, ‘‘कडाकडानं खावा दिवानीच्या राशीला हात लावू नये.’’ सुसरुबाईना इच्यार क्येला आता कोल्हा माशाव पडाकला असन. तीना यका ठिकानी यक कोरडा डव हेरला. आन ती त्या चीखलामंदी जाऊन बसली. तीना ह्येरण्यासाठी डोळं ठुलं. कोल्हा आला मासं खायाला. तवा कोल्हा म्हन, ‘‘गंज हेरल तळमळ्यानी दिवानीच्या राशीला हात लावू नयी. तीला कोल्हा काय गवसला नही.

**– पोपट बोहाडे– शेणीत (भडकुंभे)**

## कथा क्र. ३ ''लबाड कोल्हा''

यक कोल्हा व्हता आन यक कोल्हीन व्हती. ती कोल्हीन जनाया आली व्हती. मंग ती कोल्हीन कोल्ह्याला म्हन, ''आपल्याला जागा पहावं.'' मंग कोल्ह्यानं जागा पयली. ती जागा वाघाच्या ढोल्यात पयली. त्या वाघाच्या ढोलात कोल्हीन विहीली. तो कोल्हा पका काफेर व्हता. तो कोल्हीनीला म्हनं, ''तो वाघ मातेर आपल्याली खानार. पर तू मातेर पीलाच्या अंगाला चिमकुडा घी. मंग तो पिलू रडू लागला का, मी इच्यारीन, का ग, रडविती, मंग तू म्हनायचा, अव तो वाघाचा मास मंगेत. मंग मी म्हनल शीळा असन ती दी. ताजा आल्याव पाहू.'' वाघ ढोल्यात जात व्हता तवा त्याना त्या कोल्ह्याचा बोलणा ऐकला. त्याना काही नीट आयकला नाही. त्याना आयकला का वाघाचा मांस आल्याव पाहू. मंग तो पळत सुटला. त्याला यक आस्वल रस्त्यात भेटली. ती म्हन, ''का रं वाघदादा लय लय घाई घाई पळत सुटलाय. त म्हन, ''आग आस्वल बाय, मह्या ढोल्यात कोन तरी रयतय.'' तवा ती आस्वली म्हनली, ''मी हाय चाल पहू मवा संग.'' तवा वाघ आस्वली संग भिंगाला. ढोल्याम आल्याव कोल्हा आतून त्या आस्वलीला म्हन, ''का ग, आस्वली तुला त बारा वाघ आनाया सांगला तूं यकच घीऊन चालली. तवा तो वाघ लय जोशात पळत सुटला. अजुक त्याला यक आस्वल भेटली. ती म्हन, ''कार वाघदादा लय लय जोरात पळतो.'' तिला पघुन वाघ म्हनला, ''मह्या ढोल्यात कोनतरी रयतय. त्ये म्हंत का वाघाचा मांस पहयजे त दुसरा मंतो का शीळा असल दी आन ताजा आल्याव बघु.'' ती आस्वली म्हन, ''तुला जर भीती वाटत असल त मह्या शेपटीची आन तुह्या शेपटीची गाठ मारून आपुनी जाऊ परत.'' वाघ आन आस्वल ग्येली तरी तो लबाड कोल्हा आन ती कोल्हीन वाघाच्या ढोल्यात रयत व्हती. वाघ आन आस्वल त्या ढोल्या पोहत ग्येली. कोल्हा उजुक तसाच म्हनला. त्या आवकून वाघाला आन आस्वलीला खरा वाटला. आन दोघ पळाया लागली. वाघ म्होरं आन आस्वल मांग.

**– सखाराम निवाराम डगळे– चिंचवणे**

* *

## कथा क्र. ४ ''आपला काम आपून करावा''

यक व्हता पाखरू. तो दर दिवस कुपाटी कुपाटीना हिंडायचा. त्याला यका दिसी गवसली दालमी. तो ग्येला यका आंब्याच्या सोडात. ती दालमी ग्येली सोडात पळून. मंग तो पाखरू ग्येला सुताराकडं. म्हन, ''सुतारदादा सुतारदादा चाल रं, यव्हढा दोन फोडून दी.'' सुतार म्हन, ''आमी का आमच्या ढोनाचा फोडू?'' मंग ग्येला पाटील दादाक. ''पाटील दादा त्या सुताराला मार रं.'' त पाटील म्हन, ''आमी का आमच्या सुताराला मारू?'' पुढ ग्येला त्याला भेटली हरना. त मंतो,''चलारं हरनानो पाटलाचा श्यात खा.'' त्ये म्हण, ''आमी का आमच्या पाटलाचा श्यात खाऊ?'' पुढं ग्येला फार मारध्याक. म्हंत, ''हरणाली गुतवा''. त तो मंतो, ''आमीका आमच्या हरणीली गुतु?'' पुढ ग्वाला उंदराक. म्हंतो, ''चलारं उंदरानव फासेपारध्याचं फार करानडा.'' ते म्हन, ''आम्ही का आमच्या फासपारध्याच फास करान्डू?'' पुढ ग्येला मांजरीक. म्हन्तो, ''चलरं मांजरे उंदराली धरी.'' मांजार म्हन्ती, ''आम्हीका आमच्या उंदराली धरू?'' पुढ ग्याला म्हतारीक. म्हन्तो, ''म्हतारे मांजरीली हान रं.'' म्हतारी म्हन, ''आमी का आमच्या मांजरीला हानू?'' मंग पाखरूला दिसला दिजू. म्हन्तो, ''उठ विचा दी म्हतारीला ठनका.'' विजू उठला. दिला म्हतारीली ठनका. म्हतारी उठली मांजरीली हनीत सुटली. मांजर उंदराली घरीत सुटली. उंदिर उठले फासे करान्डीत सुटले. पारधी उठले, हरणाली गुतवित सुटले. हरणा उठल्या आन पाटलाचा ज्यात सात सुटल्या. पाटील उठला आन सुताराली मारीत सुटला. सुतार उठला आन ढोन फोडित बसला. आन मग पाखरूला दालमी गावली आन पाखरू उडून ग्येला.

**– पोपट शिवराम डगळे – चिंचवणे**

* *

## कथा क्र. ५ ''जस्याली तसाच''

यक व्हता कावळा. तो जंगलात रयत व्हता. त्याला यका दिसी पकी भूक लागली. तवा तो या झाडावून त्या झाडाव त्या झाडाव उडू लागला. पर त्याली काही खाया सापडला नही. तो असाच उडत उडत ग्येला. त्याली यक लहान तलाव दिसला. त्या तलावामंदी लयी मासं व्हत. आन पक्या खेकडी व्हत्या. तो भूकेला कावळा मास्याली आन खेकड्याली म्हन, ''या थोड्या पान्यात रहून काय उपेग? मी का तुम्हाली यका मोठ्या तलावा मंदी नीऊन सोडीतो. चला मह्या बरूबर. यकयक जन, ''कावळ्याना यका खेकड्याली चोचीत धरला आन उडून ग्येला. तवा तो झाडाव जाऊन बसला. आन त्या खेकड्याली खाऊन टाकला. परत तलावाक आला. आन म्हन, ''मी नेऊन सोडला समुद्रात.'' असाच कावळा, यकयक येकडा आन यक यक मासा नीऊन खाऊ लागला.

आता शेवटला यक मोठा येकडा रयत व्हता. कावळा म्हन्तो, ''चाल तू''. आता त्या येकड्याना कावळ्याच्या मानाला दोन्ही शिंगाड्याना धरला. आन कावळा उडून ग्येला. आन यका झाडाव जाऊन बसला. आन म्हन, ''आता माला पकी भूक लागली हाये. आता तुला खानार.'' खेकडा म्हनाला, ''खा बर, कसा खातो?'' तवा कावळ्याना खेकड्याच्या पाठीत चावा घेतला आन खेकड्याना दोनी शिंगाड्याला धरलेली मान कापून टाकली तसाच तो कावळा मरून ग्येला.

**– हरिदास भाऊ बांबेरे– कोदनी**

* *

## कथा क्र. ६ ''युगतीना काम व्हत''

यक वाघ व्हता आन यक गाढाव व्हता. ती दोघा जंगलामंदी रयत असत. यक पान्याचा ढबका व्हता. तीठ रोज वाघ पानी पीयाचा. आन गाढव रोज पान्यात मुतायचा. तवा वाघ म्हन, ''मया पान्यात रोज कोन मुतातय?'' तो लपून रयला. तवा गाढाव मुताया लागला तवा वाघ म्हन, खाव काय तुला?'' गाढाव म्हन, ''मला का दहा दिसाना खा. पर जर मला नाही खालात मी तुला खाईन.'' गाढाव दररोज चिखलात लोळं. तवा त्ये गाढाव चिखलाना लय जाड झाला व्हता. दहा दिस पूर्ण झाले. तवा वाघ पळत आला. गाढाव म्हन, ''आता मला खा. मी तीठ उभा रयतो. तू पळत ये आन मला यकाच घासात खाय.'' तवा वाघ पळत आला आन गाढवाचं लोचकं तोडाया लागला. तवा त्येच्या तोंडामंदी गाढव आला. गाढव म्हन, ''आता तू उभाराय मी तुला खायल.'' तवा वाघ उभा रयला. तीकून गाढाव मोठ्या मोठ्यानं वरडत आला. तवा वाग घाबरला. त्येला वाटला का आता मला खानार. म्हून तो वाघ घाबरून पळाया लागला. पळता पळता रस्त्यात यक श्यातकरी नांगरीत व्हता. तवा वाघ म्हन, ''शेतकरीदादा मला तासामंदी लपव रं. मला का काढाव खार हाये.'' तवा तीकून गाढाव पळत आला. तवा श्यातकरीदादा म्हन्तो, ''तो वाघ तीकून पळत ग्येला.'' तो गाढाव तीकून पळत सुटला. वाघ सोडून पळून ग्येला. दिवस ग्येल्याव शेतकरी आपल्या घरी आला आन पोरास्नी वाघाची गोष्ट सांगाया लागला. तवा वाघ घराच्या लवाला येऊन हो गीष्ट आयकत व्हता. रातचा संमदी माणसं झोपल्या. तो श्येतकरी झोपला व्हता ती खाट घेऊन तो जंगलात पळून ग्येला. त म्हन, ''श्यातकरी दादा खाव काय तुला. तुझं बोचं कसं मिटमिट करत्यात.'' तवा श्यातकरी म्हन, ''मह्या बोच्यातून बारा गाढवा निंघनार हायेत.'' तवा वाघाना आयकला आन गाढवा खात्याल म्हून पळून ग्याला.

**– लका रामा मघे– ठाकरवाडी, चीचोंडी**

* *

## कथा क्र. ७ ''आधाशी कोल्हा''

यक व्हता कोल्हा. आनं यक व्हता कोंबडा. कोल्हा म्हन, ''कोंबड्यादादा वालरं बोरा पाड्या'' कोंबडा म्हन, 'व्हय रं कोल्ह्यादादा बोरा पाडावा.'' मंग कोंबडा ग्येला कोल्ह्यासंग बोरा पाडावा. मंग कोंबडा झाडाव ग्येला. कोंबडा वर पिकेल पिकेल बोरा खायी. आन कोल्ह्याला कची बोरा टाकी. असा करता करता कोंबड्यादादाचा प्वाट भरला. कोंबड्यादादा म्हन, ''काय रं कोल्यादादा मंग उतरू काय?'' मंग कोंबडा उतारला. कोल्हा म्हन, ''का रं कोंबड्यादादा वर जाऊन पीवेल पीवेल बोरां खाली आन कवी बोरां टाकली त आता मी तुला जाऊन घेनार.'' तीकून यक पानेरीन जात व्हती. कोल्हा म्हन, ''यक कोंबडा आलाय तुला खाऊन धील.'' त म्हन, ''सांग कसा खातोय?'' त कोल्हा ग्येला आन पानारनीला खाऊन घ्येतला. आन मंग कोल्हा ग्येला पुढं. तीढं यक इतकरी व्हता. म्हन, ''बा बो, येव्हढा मोठा कोल्हा आलाय'' कोल्हा म्हन, ''यक कोंबडा आन यक पानारीन आलीय. तुलाय धील खाऊन.'' म्हन, ''जाय खरा कसा जातोय'' लगीच कोल्हा ग्येला आन इतकऱ्याला खाऊन घ्येतला. मंग ग्येला पुढ. त्येला भेटली म्हैस. ती म्हन, ''येव्हढा मोठा कोल्हा झालाय.'' त कोल्हा म्हन, ''यक कोंबडा, यक पानेरीन आन यक औतकरी खालाय आता तुला घील खाऊन.'' म्हैस म्हन घी बरा खाऊन.'' कोल्हा ग्येला खायाला त म्हशीना मारला शींग. यव्हढी लोकं पडली बाह्येर आन कोल्हा ग्येला मरून.

**– विठ्ठल गणपत शिळकंदे– पामुळवंडी**

* *

## कथा क्र. ८ ''शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ''

यक बोकड जंगलामंदी रयंत व्हता. ती वाघाची जागा व्हती. तवा तो बोकड आला. आन जाळीव पाय ठिऊन पाला खाया लागला. खालून वाघ पहेतो, सूपाटावाणी दाडी, गाडग्यावाणी आंड, वर पहेतो. तो म्हन्तो, ''मी जंगलाचा राजा.'' हा कोन आला इठ?'' बोकड म्हन, ''तू कोन?'' वाघ म्हन

''आता याची गाठ पडली. हा मला खाल्याशीवाय त राहणार नही.'' वाघ म्हन्तो, ''तू रं कोन??'' बोकड मंतो, ''मह्या पोटात आह्यात आगा आन मी खातोय बारा वाघा.'' त वाघ जाळीत व्हता तो पळत सुटला. पुढ कोल्ह्याची आन वाघाची गाठ पडली. कोल्हा म्हन्तो, ''तू का पळतोय?'' ''अरं जंगलात यक राजा आलाय. ता म्हंतो, मह्या पोटात आह्यात आगा आन मी खातो बारा वाघा. म्हून मी पळतोय.'' त कोल्हा म्हन, ''चाल मला दाखव. कोन मंतोय. मी बारा वाघा खातोय.'' वाघ म्हन, ''मी त येतच नाही. पर तू मंतोय चाल, तवा मी येतो. पर शेपटीची गाठ मारशील त येतो. नहीत नही.'' तवा ग्येले. त बोकड मंत, ''आता कशी नयी रांड फसवून आनलय.'' आन तसाच वाघ पळाला वाघाची कोल्ह्याची शेपटीला गाठ बांधेल व्हती. त कोल्हा चाला आपटत धोपटत. कोल्हा मरून ग्येला.

**– रामनात अनाजी बांबेरे– कोदनी**

* *

## कथा क्र. ९ ''गर्वांचा घर खाली''

यक व्हती म्हातारी. तीला व्हता यक पोऱ्या. म्हातारी पोऱ्याला म्हनं, ''मला का कह्याचीच भीती वाटत नही. पर ते अंधेरीची लय भीती वाटतीया.'' तीच्या घराच्या लवाला वाघ बसलेला व्हता. वाघ म्हन ह्या म्हातारीला वाघाची भीती वाटत नही. नढंगीची भीती वाटत नही. वाघ म्हन, ''म्हातारीला अंधारीची भीती वाटतय. पर आपुनी इचा बेत पघावा.'' वाघ गल्लीमंदी यीऊन अंधारीची वाट पयत बसला. तवा तो वाघ गल्ली मंदी बसला व्हता. त्याला वाटला का त्याचा गाढावच हाये. वाघ वाट पाहून झोपी ग्येला व्हता. कुंभार गाढवाला पयत पयत आला. तवा त्येली वाटला का महान गाढावच तवा त्याना जवळचा पोता त्येवेव टाकला. आन त्येचाव बसून त्येला मारीत मारीत सुटला. तवा वाघ जोरात पळाला. जाता जाता पका वखत झाला. चांदुबा उगावला. कुंभाराला वाटला का गाढाव घरी पळाला. पर गाढव मातेर घरी पळाला नही. तो आरंण्यात पळाला. तवा त्या कुंभाराली वाटला का ह्या आपला गाढव नही. तवा तो गाढव घनदाट अराण्यातून एका वडाच्या झाडाखालून पळू लागला तवा कुंभाराना गाढवातून उडी मारली आन झाडाला यंगला. त्याली त्या झाडाला ढोन दिसला. त्याना मोठा सोटा घ्येतला आन त्या ढोनकात शिरला. वाघ लांब पळून ग्येला. वाघावरला पोता तसाच रयला. वाघ लय जोरानं पळाला. तवा यका झाडाला आडकून पोता खाली पडला तो पुढं ग्येला त त्याला पुढ भेटला नढंग. त तीना इचारला, ''वाघदा तू का पळतो?'' वाघ म्हन, ''आपल्या रानामंदी का अंधेरी आली असं, नढंग म्हन, ''मलाय बी आज खायला काहीच भ्येटला नही. तवा अंधेरी कुठ हाये मला सांग पहू.'' वाघ म्हन, ''आपुनी नही येत जा.'' नढंग वाघाली म्हन, ''येता का नही? नहीत तुलाच खाऊन धीन.'' तवा वाघ म्हन, ''चाल बुवा येतो पर मी मातेर लामच बसून राहीन.'' त नढंग म्हन, ''कुठ आहे तो दाखव.'' मंग वाघाना नेला आन त्येला पोता दावला आन वडाचा झाडबी दावला. कुंभार पका घाबरला. त्याला वाटला का वाघाना त्याची मात्र मंडावळी जमून आनली असन. तवा नढंग वडाव चहाडली. इठ तोंड घाल, तीठ तोंड घाल. तवा कुंभाराना त्येच्या हातातल्या सोटा तीच्या तोंडाव मारला. तवा नढंह खाली पडली त वाघ पका लाम पळून ग्येला. तर नढंगी बी पळून ग्येली. तवा नढंगीला कोल्हा आडवा आला. कोल्हा म्हन, ''नढंगबाई, का रं यव्हढी जोरात पळत चाललय?'' नढंग म्हन, ''अरं भाडखावा वाघ कशासारखा त्येची कंबार मोहडली. आन मी कह्यासारखी त महा तोंड फोडला.'' तवा कोल्हा म्हन, ''आरं नडगुबाई, मला का आज आदुगरच खाया भ्येटला नही. तवा तू का मला तो दाखीव. मी त्याला शेपटीना भीजून काढीन.'' नढंग म्हन, ''आर त्या काय खेकडीच पेंद नही खाया.'' तवा कोल्हा म्हन, ''आरं तू मला दाखव त खरां?'' मंग नढंग आन कोल्हा वडाखाली ग्येली. न नढंगीना त्याला सांगीतला का, इठ आहे. आन कोल्हा वडाव ग्येला. ह्या ढोनकात शेपुट घाल त्या ढोनकात शेपूट घाल. मंग कुंभाराला समाजला का ह्या कोल्हा आहे. मंग त्यांना शेपटीला ठुला धरून. पर मधीच सोडून दिला. त कोल्हा नढंगीला म्हन, ''आहे आहे. धरतय, सोडतय, धरतय सोडतय.'' तवा कुंभाराना यकदा चांगली शेपूट आतमंदी ओढून धरली. तर त्ये कोल्ह ओरडु लागलं तवा कोल्याची शेप ग्येली तुटून. कोल्हा खाली पडतय तसीच नढंग गेली पळून. तुंभार उठून पयतोय बाह्येर उजेड झाला. कुंभार सोटा आन शेपूट घीऊन घरी आला. त बायकू म्हन अव गाढाव त घरी आलाय. मंग त्यानी संमदा सांगला.

**– काळू गंगाराम गांगड – चिचोंडी**

* *

## कथा क्र. १० ''चाल रं भोपळ्या टुनुक टुनुक''

यक व्हती म्हातारी. ती चाली लेकी क. ती चाली जंगला मंदून त तीला का यक लांडगा भ्येटलं. तवा लांडगं म्हन, ''म्हातारे खाव काय तुला?'' त म्हातारी म्हन, ''आरं नक्. लेकीच्या इकून गव्हाच्या पोळ्या भाकर खाऊन माजून यीन आन मंग तू मला खाय. पुढं ग्येली त तीला भ्येटला वाघ. वाघ म्हन, ''म्हातारे खाव काय तुला?'' म्हन, ''नको रं बुवा, मया लेकीकून गव्हाच्या पोळ्या खाऊन आन माजून यीन मंग तू मला खाय.'' पुढ ग्येली त मंग ग्येली लेकीच्या इकडं. ल्येकीच्या इकून गव्हाच्या पोळ्या खाऊन रयली पर माजली नसं. निंगायचा दिस आला. त मंग रडाया लागली. त पोर म्हन, ''का रं आई रडती?'' मंग तीना लांडगं आन वाघ खानार म्हून सांगला. त मंग पोरीना यक युवती सांगली. यक मोठा भोपळा घीऊन तो का खरवंडून काहाडला आन म्हातारीला त्यात बसाया सांगला आन म्हन भोपळ्याला सांगायचा का, चाल रं भोपळ्या टुनुक टुनुक'' मंग म्हातारी भोपळ्यात बसून निंगाली. त मंग वाघ भेटला. म्हन, ''म्हातारे खाव काय तुला?'' त म्हन,''कह्याची म्हातारी? चाल रं भोपळ्या टुनुक टुनुक.'' मंग म्हातारी जंगलातून निंगून धरला ग्येली.

**– विठाबाई भदु पटेकर– रणद बु.**

* *

# (३) आख्यायिका :

## आख्यायिका क्र. १ ''जटायु आन रावनाचा युध'' (लढायी)

**आख्यायिका :**

''ह्या का डोंगर ही. ह्यात जटायु हाये. त्यें त्येच्यावालं पकं आन त्ये त्याच का मुंडका आन चोच.'' यकदा काय झाला का रावन सीताली पंचवटीपून पळून नेत व्हता तवा हांगी इठच या जटायूना पयला का कोन तरी का रडातय तवा त्यांना हेरला आन् ती स्त्री का रामाचा नाव घेत अस. त मंग हा रामाचा भगतव्हता. त्याचा आन् दसरथाचा लय प्रेम व्हता. तो का आकाशात उडलां आन त्येची आन रावनाची पकी झोंबी झाली त रावन ग्येला थकून पर राव काफेर म्हन, ''तू त लय आफाट. तुहा मरन कह्यात हे, तो सांग तुला रामाची आन.'' त म्हन ती मजावाला सांगतो तो पर तू तुह्यावाला सांग.'' रावनाचा हयेरला का हा तसा सांगायचा नही. तवा रावन म्हन, महा मरान मया डाया पायाच्या अंगठ्यामंदी हाये.'' त जटयु म्हन का, महा मरान त मया पकात हाये.'' तसाच जटायुना रावनाचा आंगठा तोडाया झ्याप घ्येतली तसाच रावनाना त्याचं पक उपाटलं. यानायक्षी रावनाचा आंठा तोडला. पर जटायुचा आवसान ग्येला. आन रावान उजुक सीताला घीऊन निंगून ग्येला. ''तो तीठ रावनाचा आंगठा उभा हाये.'' मंग तीकून सीताचा माग काढीत का राम आला. तवा जटायुना त्येला संमदा सांगला. त मंग रामाना इच्यारला, ''तुही आशा काय हाये.'' त म्हन मला का तीरथ करायचा हाये. तवा रामाना का पार त्येच्या चोची समूर बान मारला समंदा तीरत येक्याच टाक्यात आला. ''तो पय तो टाका आन त्ये का ढाकीद गांव हाये.'' त मंग जटायु म्हन का, ''हा काशीचा तीरत कसा?'' त मंग रामाना त्येच्या नावचा झाड आनला. त्येचा नांव रामनल.

**संदर्भ :**

पट्टागड हा डोंगर (नकाशात पहावा) पक्षाच्या आकाराचा आहे. बरोबर चोचीच्या आकाराची जी डोंगराची शीर गेली आहे. त्या शीरे समोरच जवळच टाकेद नावाचे तीर्थक्षेत्र आहे. या पट्टागडजवळ बरोबर अंगठ्याच्या आकाराचा एक डोंगराचा स्वतंत्र खुळका आहे. त्या सुळक्याला ''रावणाचा आंगठा'' व ''लिंगी'' ही दोन नांवे आहेत.

**– श्रीराम त्र्यंबक खोकले – पाचपट्टे**

* *

## आख्यायिका क्र. २ ''सर्वतीर्थ''

**आख्यायिका :**

''ही कुंडा बंदी आटत नही आन कितीक पाऊस झाला तरीही भरत नही.'' ''ही का लक्षेमनाची कुंडा आह्यात.''

यकदा काय झाला का रामाना सीताला वनवासा सोडून यीयाला सांगला. त मंग लक्षेमनाला परश्न पडला का कुक नेवा. तवा तो इठं आला. ती का हांगी इठ निजली. आता लक्षेमनाना इच्यार क्येला का ईला का इठच सोडून जावा. पण म्हन, का ही उठील्याव पानी मांगल व मंग, ''कोन चारं गड्या पानी पील?'' त मंग त्याना डोक्याक यक तीर मारून कुंड वयेला. पर त्येली इळ्यार पडला का ''डोक्याकचा पानी पील का पायाकचा पानी पील?'' तवा त्याना पायाकय बी यक कुंड वयेला. आन म्हन, ''इकीला पीवं नयन तिकीला पीवं.'' आन निंगून ग्येला. सीता उठील्याव पयती त म्हन, ''हा समंदया तीरताचा पानी मयासाठीच

आनला असं. हा कंदीच आटनार नयी.'' आन मंग ती तीठून उठीली आन निंगून ग्येली. ''तवावासून यंठ या तीरताला पक लोक येत्यात आन इठीला पानी प्येत्यात. दुसकाळामंदी बी हा पानी आटत नही.''

**संदर्भ :**

कातळापूर गांवाजवळ तेरूंगणाची वाडी आहे. (नकाशात पहावे) तेथे औदुंबराच्या झाडाखाली ही कुंडे आहेत.

**– विठ्ठल बारकू साडे – कातळापूर**

* *

## आख्यायिका क्र. ३ ''तातोबाचा मठ''

**आख्यायिका :**

यकदा यक कोळी यंठ रयत व्हता. लई दिस झालं. तो का संमदया जाणाऱ्या येऱ्हाऱ्या माणसांली हानीत अस आन त्येंचा धन धीऊन टाकीत अस. त्येचा का नांव वाल्या असं. त मंग यकदा का नारदमुनी आला आन म्हन ''तू कह्याला आसा करतो, पून्याचा वाटा संमदये ध्येत्यात पर पापाचा वाटा ह्या जगामंदी कोनी ध्येत नही. तवा तू का देवाचा भक्ती कर.'' तवा म्हन, ''मही पोराबाळा चांगली आह्यात ती काय तशी करायची नहीत.' त मंग नराद म्हन, ''चा पघु इच्यावरून यी''. त मंग ग्येला त त्येचा पाप कोनी धीयाला तैयार नही. तं मंग आला म्हन, ''तुहा खरा.'' त मंग नाराद म्हन का, ''आता राम राम म्हनत बस.'' ''त मंग या टेकडाव ग्येला आन ध्यान धरला. ह्या त्याचा मठ आहे. यंठ सीता आन तीचं लव आन कुश पाळण्यात व्हते. आन त्येंठ खालती पेहरेव सीता फडकी व त्याला आन धुयाला जयाची.'' अजून सुदीक रातचा पाळण्याचा आवज येतो. यंठ कितीक मोर, वानेर, आन संमदी झाडां. यंठ त्या लवकुश खेळायचं. आन त्येंचा तातुबा वर घ्यान धरित असं. ह्या संमदा कोळी का त्येचा पून झालाय.

**संदर्भ :**

कोदनी आणि रणद या गावांच्या जवळ प्रवरेच्या तीरावर ''तातोबाचा मठ'' म्हणून स्थान आहे.

**– अहिलाजी बुवा पटेकर, रणद बु.**

* *

## आख्यायिका क्र. ४ – ''रीशीशींग रीषी''

**आख्यायिका :**

''ह्या इठ रीशीशींग रीषी ध्यान करीत अस त त्येली काय स्त्रीचा मुख पह्याचा नस.'' त यकदा काय झाला का सीता लव कुशाला पयला त्येंठ आली न तीनाका पयला का मुनीना ध्यान धरला हाये. तीना वाल्मिक रिशीला सांगला, ''त वाल्मिक म्हन का त्यो त मवा भाव हाये.'' त मंग सीता रोज त्येची सेवा कराया जयाची व रीषी काय पयत नसं. त म्हन, ''तू कोन हाये'' त म्हन, ''मी मुनी हाये.'' त म्हन, ''यी मला भेटाया''त सीताला परश्न पडला का काय करावा. त मंग ग्येली त तीची थाना रीशषीच्या हाताला लागलीत रषी म्हन, ''का ह्या काय हाये?'' त म्हन, ''ह्या त्येच हाये.'' त म्हन का ''खरा सांग तू स्त्री हाये का पुरुष हाये.'' त म्हन, ''मी रामाची सीता हाये.'' व मंग रीषी म्हन का, ''तू जर खरी पतिवर्ता असन त या पेहेरेचा ओघ बदलून दाखव.'' मंग तीना पेहेरेचा ओघ बदलून दावला. तवापून नदी यिकील्या बाजुना वहया लागली.

असाच यकदा का लव आन कुश त्यंठ फीरत फीरत आलं. त मंग त्येंनीका शींगरीषीली हयेरला. त म्हन, ''त्यो कोन तातुबासारखा दुसरा आलाय?'' तवा त्यांनी त्येच्या संग युध क्येला आन त्येचा मुंडका कापून आन वाल्मिकीक आनून दिला. त वाल्मिक म्हन, ''आ रं ह्या मह्या भावाचा सीर हाये. ह्या काम्हून तोडला?'' मंग परत बसविला आन लवकुश मंग त्येच्या संग रयले इद्या सिकाया.

**संदर्भ :**

रणद या गावी प्रवरेच्या तीरावर ऋष्यशृंग ऋषींचा आश्रम आहे. आता त्याचे स्वरूप ग्रामदेवते सारखे आहे.

**– अहिलाजी बुवा पटेकर, रणद बु.**

* *

## आख्यायिका क्र. ५ – ''आजुबाचा डोंगर''

**आख्यायिका :**

''ह्या आजुबा ध्यानाला बसलं असं आजुबा म्हंजी वाल्मिक रीषी.'' त्येका तातुबाच्या मठात रयत असत आन त्या यंठ ध्यान धरत असं. तवा तेच हा डोंगर हाये.

**संदर्भ :**

आजुबा नावाचा एक डोंगर आहे. (नकाशा पहावा).

**– दशरथ पांडुरंग पटेकर, रणद बु.**

* *

## आख्यायिका क्र. ६ – ''मूलाचं डोळ आलं''

**आख्यायिका :**

''यकदा काय झाला का प्रवरा नदीला तीच्या बयनीला भेटाया जाआचा व्हता. तवा ह्या दरीतून जायाचा ठरवला. त प्रवराना यकदिस तीला पह्यला नव्हता तवा ती का जोश्यात निंगाली त तसाच कावळा आला आन म्हन का ''जाऊ नको मुळाचं डोळं आल्यात. तू ग्येतील तुझबी येतील. आन दोघी आंधळी व्हाल.'' तव्हा नदीना इच्यार क्येलाका ''दोघी आंधळ्या झाल्याव आपल्या ल्येकरांचा काय?'' तवा तीना ओघ बदलला अन या अंगून जाया लागली. तवापून मुळाचा पामी कंदीमंदी आटतो पर प्रवराचा आटत नाही.

**संदर्भ :**

रंधाफॉल नजिक आणखी एक खोल दरी आहे. त्याविषयी ही आख्यायिका सांगतात.

**– विठ्ठल बारकु खाडे, कातळापूर**

* *

## आख्यायिका क्र. ७ – ''यक गाय आन प्रवरा माय''

**आख्यायिका :**

''लव वर्सा मागं या नदीना अमृत वह्याचं तवा हीचा नाव अम्रितवाहीनी हाये. पुढ द्येवाचा राज ग्येला आन जसा मानसाचा आला तसाच यंठ पानी वह्या लागला. पर ज्याच पुन्य असल त्याला का दुध दिसं आन यव्हढ्याना पानी दिसं. पर पानी पक गुळमाट.

लय दिसा मांग यक गवळण व्हती पर ती का खाह्या गाया चराया नियाची. संमद्या नव्या गायीं तीच्याव परसन झाल्या आन म्हन तू का रातचा या प्रवरा नदीय येत जाय. दुधाच्या धारा निंगतील त्या तू चरीचरीना घीयाच्या आन सकाळच्या वपायच्या. ती का रातची उठ घागर घी आन दुध आनाया जाई. सकाळचा ववायची, तीचा दुध पका गुळमाट. आन येव्हढ्यांचायबी फिका. तवा संमद लोक तीचाच दुध मांगत असं. लोक तीला इचारत असा का, ''यव्हढा दुध रं, कुठून आनती?'' तुझ्या गायात समद्या खाट्या.'' पर ती कहीच बोलत नस. तीना गायींली इचारला का, ''लोकांना काय सांगावा?'' तवा गाया म्हन, ''तू लोकाना काय कळूं देऊ नकू.'' तवा तीला परश्न पडला का आता काय करावा. लोकांली मातेर पका संशय आला का इथे कायतरी चेटुक भूत हाये. यक दिस ती गरबडीना निंगाली त मंग मंदीच यक आव तीला हटकून म्हन का अ ''काग, यव्हढा दुध रं कुठून, तुला तं गायी नही.'' तवा ही का ग्येली गरबडून आन म्हन, ''यक गाय आन प्रवरामाय''. तवा या आवूना संमदा आयकला आन. लोकांनी इचारलाका ही का मंदीच म्हन का ''यकच गाय आन प्रवरा माय'' तवा लोकांनी पार पकाच संशय आला. आन त्यानीका ठरावला का आता हीचा बराबर कडका घीयाचा. त्येका तीचा मागावरच रायलं आन तीच्या मांग मांग रातचं ग्येलं. रातच बारा वाजलं अस. गवळण घागर घीऊन नींगाली तशी नदीव ग्येली त नदीच्या मंदी दुधाच्या धारा दिसं तीना दुध भरला आन निंगाली. तसाच दुध गडाप झाला. सकाळी उठून पह्या लागली त घागरितका पानी. तवा ती रडत सुटली नव्या गायांली वाचा फुटली आन म्हन, ''पहील्या वेळी संगद्या गायांचा दुध धार धार बन आन नदी व्हवून संमद्या लोकांली मीळत असं पर जसा पाप वाढला तसाच बंद झाला. आता तू भाकड जनावरा चारीती तवा तुझ्यासाठी दोन धारा सोडल्या. पर तु दिलेला वचन पाळळा नही. तवा दुध बंद झाल. लोकांचा पाप जसा जसा वाढत आन तसा तसा या नदीचा पानी फिका व्हत जाईल. लोकांचा पुन्य राहील तवर पानी गुलमार राहील.'' तवा त्या गवळणीना समद्या लोकांनी ह्या सांगला का असा असा झाला बा. तवापून लोक प्रवरा नदीची पूजा कराया लागलं.

**संदर्भ :**

प्रवरेला, पेहरा, अमृतवाहिनी, दुग्धवाहिनी अशी नावे आहेत. या भागात गवळी लोक राहत होते असा संदर्भ आहे.

**– वामन मारुती झडे, रतनवाडी**

* *

## आख्यायिका क्र. ८ – ''पेहराची बहीन कृष्णवंती''

**आख्यायिका :**

''कळसुबाईका प्रवराची बहेन हाये. कळसुबाई नदीचा रूप घ्येती आन तीला भेटाया जाआची. त्यांचा यकदा एक भांडान झाला. ती म्हन का, ''मी

मोठी मी लय वरून वाह्यती.'' आन प्रवरा म्हन का, ''मी लय मोठी अंम्रिताचा कुंभ फोडीती.'' दोघांचा भांडन झाला तसा प्रवराना तीला सराप दिला का म्हन ''तू चार महिन व्हयशील आन तुझ्या पोरांचा नुसकान करशील. तुहा नाव कृष्णवंती.'' तसीच कळसुबाईनं ''तुझा अम्रिताचा पानी व्हईल दरीदरीना जाईल.'' तवापून कृष्णवंती चार महीनं जोशात वह्यती आन लोकांच्या श्येतातून जाती. आन मंग प्रवरला मीळती. आन प्रवरा दरीदरीना वह्यती.

**संदर्भ :**

कृष्णवंती नावाची नदी कळसुबाईच्या डोंगराजवळून वाहते आणि शेंडी व रणद या गावांच्या मध्ये प्रवरेला मिळते. प्रवरा खरोखरच शंभर फुटापेक्षा खोल आणि बारा तेरा मैल लांब दरीतून प्रवास करते

**– भागाजी दादाजी धाणे, वारनघुशी**

* *

## आख्यायिका क्र. ९ – ''हरिश्चंद्र पान्याचा रांजन''

**आख्यायिका :**

''ह्या हरिशचंदराचा डोंगर हाये आन ती त्येची रानी तारामती. त्यो लांभ हाये त्यो त्येचा पोऱ्या रोहीदास. ह्या डोंगरामंदी सात राजन अस. ह्या त्येली भराया सांगातल अस. त्याना राजनाली खालून का भोक अस. त्या मंदुन पानी वाहाताय पर हरिशचंदर काय थकला नाही तो मातेर पानी भरत रयला तवा त्यातून यक नदी निंगाली. तीचा मूळ या राजनात हाये तवी तीला मुळा म्हणत्यात. आज पोहत राजा हरिशचंदर पानी भरतो. आन त्ये सारखाच वाह्यतोच. रोह्यदासाला सर्प डसला आन तो का अजून यंठ हिंडतो. आन हरिशचंदराच्या पाया पडाया येतो. आन हरिशचंद्रचा राखन कराया रोज रोज वाघ येत्यात. त्ये का बराबर रातच बारा वाजेला येत्यात.''

**संदर्भ :**

हरिश्चंद्र नावाचा गड आहे. तेथे तीन डोंगर, हरिशचंद्र, तारामती आणि रोहिदास या नावाने दाखवितात. येथून मुळा नदीचा उगम आहे.

**– बाळू महादु हिले, साकिरवाडी**

* *



## आख्यायिका क्र. १० – ''पट्टाआई''

**आख्यायिका :**

यंठ गडाव शिवाजी महाराजाचं राज व्हत त्या टायमाला शीवाजीराज तुळजाभवानीच भगत व्हतं. त्येली एक युध करायचं व्हत त्ये चिंतात पडलेका आता काय करावा तवा तुळजाभवानी इठ आली आन म्हन का इठून मोहरं मी तुह्यावाल रक्षेन करीन पर तू का गडदीच्या आत तळ्याच्या त्या आंग पळत पळत मह्या ठाना व्हनार तीठं आला पायजेल. त मंग त्यांनी ह्या गडदीतून महाराज पळत पळत ग्येलं त त्येंठ भवानी आईचा दरबार. त्येंठ आई परसन झाली आन म्हन हा पट्टा धी आन लढाया जा. तवापून या गडाली पट्टागड आन या देवीली पट्टाई नाव पडला. समद्याला जाता यीयाची नही म्हून गडदीच्या बाहीर यक ठाना क्येला. ''तो हांगी हा.'' आजूक कोनी पळत जाताय त त्येंठ वट्टा हाये. जागा सारवेल त्यानी आजूक पट्टाआई जागृत हाये.

**संदर्भ :**

पट्टागडावर पट्टाआईचे मंदीर आहे. तेथे जवळच पाण्यानी भरलेल्या प्रचंड गुहा आहेत. त्याविषयी ही आख्यायिका हे लोक सांगतात. शिवाजी महाराज येथे काही काळ वास्तव्य कथन होते. त्यांची येथे टांकसाळ असावी व मोरोपंत पिंगळे त्याची व्यवस्था पाहत असावेत असे इतिहासावरून दिसते.

**– नामदेव पुणाजी खोकले, पाचपट्टे**

* *

## आख्यायिका क्र. ११ – ''लिंगीतला चोर''

**आख्यायिका :**

त्या लिंगीव का कोनी यंगू शकत नही. पर लय दिसा मांग यक चोर आन त्येची आवू त्या लिंगीच्या मंदी गडदीत रयत असं. चोर का रातचा त्येचं घोडां काढायचा आन बारा गांव चोरी कथन आन उजुक त्येंठ यीयाचा. तो का, कोनलाच गवसत नस. त्येचा पका तरास समद्या गावांना. पर त्यो काय करी. का शीरीमंताली लुट, आन गरीबांली वाटून दियाचा. पर कोनलाच कळला नही. संमद लोक का त्येच्या मागावं असं, पर त्येंली काय त्यो गवसला नही. पर यक दिस तो कसा कायनु घोड्याव बसून आन चाला व्हता. तो पडला. आन त्येचा मुडदा गवासला पर पोरां आन बायकू काय गवासली नही. लोकांनीका त्याचा त्येंठ स्थान क्येला. अजूनका त्येची सवारी निंगती आन बारा गांव फिरती.

**संदर्भ :**

''रावणाचा अंगठा'' किंवा ''लिंगी'' म्हणून जो डोंगराचा एक मध्येच उगवल्यासारखा एक सूळका दाखवितात त्याच्या संदर्भात ही आख्याकिया आयकवतात. पट्टागडाच्या जवळच हा लिंगीचा डोंगर आहे.

**– पोपट रामा डगळे, पाचपट्टे**

## आख्यायिका क्र. १२ – ''गावठाणचा बाबा''

**आख्यायिका :**

ह्या यंठ हा संमदा गावठाण व्हता. ह्या यंठ गावचा मुख्य बाबा रयत व्हता. त्येच्याक पका बारा गावचा धन व्हता. पर तो गावच्या लोकांली काय देत नसं. गावाकून मातेर भातातला भात, नागल्यातल्या नागल्या आन संमदा घ्येत असं. आना गावाली पका तरास द्येत असं. पर त्येच्या म्होर कोनाची जाआची काय हिंमत नस. त्येला काय पोरसोर नव्हतां. तो का लोकांची पोरासोरा नीट पह्यत नसं. त्यो मंग पका म्हतारा झाला आन त्येला काय कोनी उपेगी पडना. पर त्येनी का त्येचा समदा धन पुरून टाकला. आन त्येच्याक जो जायल त्येली म्हनायचा का, ''जो मह्या उपेगी पडल त्येला मी धनाचा वाटा दीन.'' जो मह्या उपेगी पडनार नही त्येली मी चांगीला पडनार नही. असा करता करता तो का ग्येला मरून. त मंग त्येचा धन जीठ व्हता हांगी यंठच त्येचा स्थान झाला. तीठ का पका मोठा सर्प हाये. काळा जरत. आन त्यो आवसापुनवाला या गावठानात रूपा बदलून हिंडायचा आन लोकांली पका भ्येवडायचा. त मंग लोकानी गावठाण सोडला आन तीकील्या बाजुला रयाला ग्येलं. उजुक त्या बाबालीका हाराभर कोंबडीच्या पीलांचा नीवदं दर वर्साला लागतो. म्हणत्यात का गावामंदी कोनला तरी त्यो धन देनार हाये. हाराभर कोंबडीची पीलां दिली का मंग तो समद्या गावाचं रक्षान करीतो. आन जवा मिळणार नही तवां कोन तरी मरातं. पर त्येचा काय म्या लोकांनी रयला नही आता लय दिस झाल तवा तो गडप झाला असन असा लोक म्हनत्यात.

**संदर्भ :**

रणद (पलिकडचे) तेथे गावठाणाची जागा आहे. तेथे पूर्वीच्या गावाचे अवशेष येव्हढेच नव्हे तर त्याच्या नोंदी आहेत. (नकाशा पहावा).

**– दशरथ पांडुरंग पटेकर, रणद बु.**

* *



## आख्यायिका क्र. १३ – ''भुताटक्याचा राजा''

**आख्यायिका :**

एका लाम कोकनाच्या वाटाव यक वस्ती हाये तीकीली लोक का भूताटक्या करत्यात. त्येंठ यक आव व्हती. ती का कंदी म्हतारीच व्हत नसं तीका अिकील्या बाजूना कोकणात चाली का त्येला मंदीच थांबवायचा आन त्येंच का कोंबड नहीत माकाड कथन दिसभर ठिवायची आन रातचा भोग इच्छा पुरी कथन आन आंधळा कथन सोडून दियाची तो येस वलांडून रस्त्याला लागला की मंग त्येला दिसं. असा लई दिस चाला. यकदाका ठाकरवाडीचा लह्या ठाकर चेटक्या व्हता आन तो का त्या वाटाना वैला घीऊन आन विकाया चाला. त त्या चेटकीना पह्यला तसा त्येला बोलावला. त याना ह्येरला का ही चेटकी हाय इजीका खोडकी जीरवायची. तो त्यंठ ग्येला वैलाबीला बांधली आन ती मंतर म्हनू लागली तसा तीच कोंबडं झाली. त मंग त्याना कोंबड्याचा रूप घ्येतला तीन भोग घेतला आन बगलला मारून आन बरूबर घीऊन ग्येला. बाजार झाल्येव तीला घ्येऊन आन बारीव आला आन बारीच्या खिंडीत दोघानी घर क्येला आन येका झाडाखाली त्येंचा द्येव मांडला आन ती बाई त्याची बटीक झाली आन दोघा यन्हाऱ्या जानऱ्याला लुटाया लागली. लय दिसानं ती का मरून ग्येली पर डांगानाची शीव वलांडायची असली का त्यो देव लागतोच. मंग त्येला सीर द्यावा लागतो. अजून बी तठ त्या आये.

**संदर्भ :**

बारी घाटातून पुढ गेल्यावर इगतपुरीकडे जाताना डोंगर उतरणीवर झाडांच्या सानिध्यात शेंदुर लावलेले दगड दिसतात त्या विषयी अशा आख्यायिका सांगितल्या जातात.

**– भागाजी दादाजी घाणे, वारनघुशी**

* *

## आख्यायिका क्र. १४ – ''सोमलवाडीचा गायख्या''

**आख्यायिका :**

ह्या डोंगराला वरतील्या, त्या आंग गडद्या आह्यात पक शमशंभर जनावर त्यंठ रयतय. गायलं किती क दिस तीठ मुकामाला रयतय. तीठील्या यका गडदीत का य खवीस हाये. हांगे त्येला कोंबड म्हना, बोकड्या म्हना का सीर म्हना दिल्या सिवाय काय तो रहून द्येत नही. यकदाका यक गायक त्यंठ ग्येलं. तो का

म्हनं का मी काय त्येला सीर द्येनार नही. पहू बरा काय व्हताय. त मंग झोपायच्या टायमासला यक शेळी कुठून कायनु त्येंठ आली त गायल्या म्हन, ''कोनाची रं गड्या चुकली त्यान का त्या शेळीला ठून घ्येतली. रातीचा वखत आन पका आंधार. गायल्याना का श्येक केला आन गुरां लावली यक्या बाजुला आन श्येकत असं. त मंग त्यी शेळी आली आन श्येकाव उभी रयली. त गायल्या म्हन, ''कसा र गड्या असा. त्या शेळीला कायच कसा व्हयना. त संमद्या गाया हंबराया लागल्या. संमद्या शेळ्या मेमाया लागल्या, तसाच ती शेळी का पकी मोठी मोठी व्हत ग्येला आन तीना यक श्येळी पार समधी धरली आन यकाच घासात खाली आन तसाच जाळात गडप झाली. त गायख लय जोस्यात वराडलं आन बेसूद पडलं. त्येचा वराडना का गायख्यांनी आयकला व्हता. सकाळच आलं. त गायख बेसुद त त्याना का समदा सांगला. पर उजुक तो काय नीट झाला नही. तयापुन त्यंठ रयच आसला का पयला सीर द्याह्याच आन मंग रयत्यात. मंग कायच व्हत नही. आजुक सुदीक असाच आहे.

**संदर्भ :**

सोमलवाडी गावाजवळ एक डोंगर आहे. त्यात गुरे ठेवण्यासाठी केलेल्या गुहा आहेत. त्या गुहांबद्दल अशी आख्यायिका सांगतात.

**– भास्कर रामजी सारुक्ते , सोमलवाडी**

* *

## आख्यायिका क्र. १५ – ''घोटीजवळचा चकवा''

**आख्यायिका :**

ह्या तीनरस्त आह्यात आन यंठ चकव्याचा राज हाये. त्येच्या फेऱ्यात गवासला का तो कुकयबी फिरीतो. यकदा दोन परवासी या चकव्याच्या फेऱ्यात सापडलं त बारा वर्स फिरत व्हते. त्येंली कुठ जातो आन कुठ नही. काय समजानं. मंग बारा वर्सान त्ये चकव्याच्या फेऱ्यातून निफाटले. सवताभवती तीन फेऱ्या मारल्या का चकव्यातून निफाटता येतो. हा चकवा दोन पक मोठा भुताटक मांत्रीक कोकणातून आलं व्हतं. त्यांच्या पैनी पडल्या कोनाच्या अंगात लय ताकद हाये. तवा त्येंनी ह्यो चकवा कथन ठिवला. यंठ भूताचा राज असतोय.

**संदर्भ :**

घोटी नावाचे कोतुळडांग भागात गाव आहे. तिकडे जाताना असे तीन रस्ते लागतात. तेथे हा चकवा आहे असे सांगितले जाते. नजिकच्या काळात काही असा अनुभव नाही.

**– भास्कर रामजी सारुक्ते , सोमलवाडी**

* *

## आख्यायिका क्र. १६ – ''कुनीबी जा गुडघ्याइतका पानी''

**आख्यायिका :**

गडदीमंदी शंकराचा लिंग हाये. आन त्येचा भवतून समदा पानी हाये. हरिशचंदरावं यक गोसाय रयत व्हता तो का रोज लिंग धुवायचा. पानी लय गार असं. गायखबी तीठं काय जात नसं. त त्या गोसायाला शंखर परसन झालं आन म्हन का काय वर मांगायचा मांग. तवा तो गोसाय म्हन का, ''देवा काय नकु पर भगताला तुह्या पान्यातून तुह्याक काय येता येत नही तवा लहान असु मोठा असु समद्यानी तुह्यापतुर येवा असा कर आन हा पानी हा कवाच आटु दिऊ नकु त्येची छाया रहुंदी.'' तवा देव परसन झालं आन म्हन ''जाय तुहा समदा पूरा क्येला, पर शिवरातीच्या दिसीच फक्त पानी गुडग्याइतका व्हईल कोनी आलतं त्येच्या गुडग्याइतकं लागन आन येरीच कंदी नही. मह्या पान्याची नदी व्हईल आन ती कवाच आटनार नही.'' तवापून दर शिवरातीला पिंडीचा पानी महीन्याच्या पोरालायबी गुडघ्याइतका आन म्हताऱ्या मानसालाबी तीतकीच.

**संदर्भ :**

हरिश्चंद्रगडावर एका प्रचंड गुहेत एक प्रचंड पिंड आहे. तिच्या भोवती पाणी आहे. ती पिंडही खडकातच कोरलेली आहे. तेथे ही आख्यायिका सांगतात. लोक प्रत्यक्ष अनुभव आल्याचे सांगतात.

**– हरिभाऊ गुणाजी भारमल, पाचनयी**

* *

## आख्यायिका क्र. १७ – ''अम्रिताच राखान करी शंखराच नाग''

**आख्यायिका :**

ह्या अम्रितेश्वराच्या मंदीरात लिंगाखाली अम्रिताचा कुंड हाये आन समंद्या महादेवकोळ्यांली त्येचा अम्रित मिळत अस. पर म्होरं पका पाप झाला आन मंग संमदा अम्रित निंगुन ग्येला. तवा संमद्या कोळ्यांनी महादेवाची विनावनी क्येली.

मंग देव परसन झाला आन म्हन ''सारवनातल्या चार सोमवारी राती बारा वाजता अम्रित निंगल आन दिवसा बरूबर जाईल आन संमदा पानी गुळमाट व्हयीन. पर जो पुन्यवंत असन त्येलाच माहं राखणदार अम्रित घेऊन देतील.'' तवापासून सारवनातल्या सोमवारच्या आंदी राती मध्येरात झाली का दोन भलंभलं पीवळ जरत नांग या पिंडी भवताना रयत्यात आन तो अम्रित राखित्यात पुन्यवंत असल त अम्रित घ्येतो. आन पापी जाईल त त्येली काय अम्रित मिळत नही.

**संदर्भ :**

रतनगडच्या पायथ्याशी अमृतेश्वराचे देऊळ आहे. त्या मंदिरात आत गाभाऱ्यात जमीनीलगत महादेवाची पिंड आहे. स्वयंभू आहे असे वाटते. त्या पिंडीच्या शाळुंकेखाली छोटेसे पाण्याचे कुंड आहे. त्यात बाराही महिने पाणी असतेच. ते पाणी वाटीने काढावे लागते. ती शाळूंका पुन्हा ठेऊन देता येते. देऊळ हेमाडपंती आहे असे वाटते. लोक श्रद्धेनं तीर्थ म्हणून ते पाणी पितात. त्याविषयी वरील आख्यायिका सांगितली जाते.

**– वामन मारुती झडे, रतनवाडी**

* *

## (४) दैवत कथा :

### कथा क्र. १ – ''गवळी देव – चेमदेव''

ह्या का चेमदाबाचा डोंगर हाये. आन डोंगराव चेमदावाचा देऊळ त्यानं सवता क्येला हाये.

लय दिसामांग ह्या डोंगराच्या पायाशी यक गवळीदेव रयत व्हता. त्येली दोन मुलां व्हती. आन यक बायकू व्हती. त्येला संसाराचा इट आला तवा त्याना मुलां दिली सोडून आन बायकू संग घीऊन पुढं निंगाला. रात सरली आन वाटातच दिस उगला. त मंग बायकू आन तो जाळीमंदी रयली. परत रात झाल्याव बायकू आन तो पुढं निंगाला तवा बायकूला आली झोप. तवा ती यका झाडाखाली नीजली त मंग गवळीदेवाना इच्यार क्येला का आता जाया पाजेल. मंग बायकूलयबी तीठं सोडून त्यो यकलाच डोंगराच्या टोकावं ग्येला. तीठं उभा रयला मंग त्याना ध्यानासाठी जागा करन्याचा इच्यार केला.

तो मनाशीच म्हन का या डोंगराच्या टोकाला जवा चार दारां पडतील तवाच आत जाऊन बसन. मंग त्याना हाताच्या दोन्ही कोपराना दोन हात मारून दोन दारां केली आन दोन गुडघ्याना दोन गुडघं मारून बरूबर दोन दारां पाडली. तो मंग का बरूबर चार दाराच्या मध्येभागी जाऊन बसला. त्येना ध्यान लावला तवा द्येनावा त्येला सांगला का तू महादेबाचा आवतार अस आन तू संमद्या गवळ्यांचा रक्षेन कर. तवा त्येचा ध्यान मोडला. तवा त्या डोंगराच्या खींडीला यक बाघदेव रयत व्हता. तो गवळीदेवाला भेटला त मंग गवळी देव म्हन, ''आजपून तू गाया खाआच्या नही.'' त मंग तो ''बरा'' म्हनाला. त म्हन ''पर तुहा नाव काय?'' त म्हन, ''चेमदेव.'' तवापून रोज तो वाघ त्येच्या पाया पडाया येत असं आन त्येचा तीरथ पीऊन आन जात असं.

त्यो गवळीदेव संमद्या गवळ्यांच्या सपनात ग्येला आन म्हन, ''मी चेमदेव तुमच्या रक्षेनाला आवतार घीऊन आलो हाये. तवापून संमद्या रानावं त्येची मदार हाये आन संमद्या गायांचा तो रक्षान करतो. संमदे लोक दरसाल त्येची यात्रा करत्यात आन त्येचा दर्सन करतात. समद्या बारा गावचा तो दैवत हाये.

**संदर्भ :**

राजूरडांगाणात शेणीतकडे जाताना चेमदेवाचा डोंगर लागतो त्याला लोक गवळीदेव म्हणतात. विशेषतः तलवार कानड्यांचे ते दैवत आहे.

**– रामदास विठोबा करभर, बाभूळवंडी**

* *

### कथा क्र. २ – ''काळुबाचा बळी''

काळुबा वारंघुशी गावचा दैवत हाये. लय वर्षांमांगची गोठ, संमद लोक त्येची पूजा करायचं यका दिसी त्यानं संमद्या लोकांच्या सपनात जाऊन सांगला का परत्येक तीन वर्सानं मही मोठी जत्रा करा आन या जत्रला यक मुलगा आन यक मुलगी बळी द्या. त मंग गायकी जमली आन सपान सांगला. त मंग देवाचा मांगना पूरा करायचा ठरला. परत्येक तीन वर्सान यक मुलगा आन यक मुलगी बळी दियाची ठरली. आसा कितीक दिवस चालला.

यकदा काय झाला का गावची पोरा नाह्यशी झाल्या म्हून लोक घरूघर तपास घ्याया लागल पर कुढंच गवसनं. ज्या घरली पोरां बळी दियाची ठरली त्येंच्या सगट संमदी नाह्यशी झाली. बळी द्यायचा वकत आला. काळुबाचा वारा आला. तसाच काळुबा म्हन, ''महा निवदं आजुक दिला नही. टिळा झाला नही. तवा आता गावाची बरीगत नही.'' तवा लोक पार घाबरून ग्येलं. त्येंली काय करावां कळना. त्ये काळूबाला म्हन, ''देवा तुहा परसाद गावत नही. आमीत तुहीच ल्येकरं आह्यत त मंग तू सांगशील तसाच करू . आज पहोत करीत आलो.

''काय बी करा आन गावाला सुख द्या.'' तवा वाऱ्या मंदी बोलला. ''ज्या घरी बळी त्याच घरी असं टोपल्या खाली दिसं. आना आन बा बळी.'' लोकां पका आनंद झाला. लोक ग्येलं आन तपास करू लागलं. यका कोपऱ्यात असा टोपलां असं. त टोपला उचाललां, त टोपल्याखाली दोन बकरां असं. त मंग लोकांली उजुक आनंद झाला म्हन. ''काळूबाची किरपा झाली पोराबाळाची येल चढली.'' तवा गांवचा पाटील ती बकरां घ्यऊन आन त्येठं आला. त वाऱ्यात बोलला, ''का, आनला काय बळी?'' लोक म्हन, ''आनला रं द्येवा, पोरा नहीत बकरां आह्यात. तवा काळूबा म्हन, ''आरं मी परसन झालो तुमची पोरां सुकाची हायेत.माही सावली गावावं हाये या गावाली कंदी कशाला भ्या नही.'' लोकांली पका आनंद झाला. तवापून आज पोहोत वर्साला जत्रा व्हती. आन गाव संमदा सुखी हाय. आमचा काळूबा म्हंजी जसा खंडुबाचा आवतार हाये. त्येच्या पोरां वर त्येची सावली हाये. त्येचा भगत रयतोय, त्याचा निवद मांडून घ्येतोय पर गांव कसा सुखात रयतोय.

**संदर्भ :**

वारंघुशी गावचे काळूबा हे दैवत आहे. सभोवतालच्या पंचक्रोशीत त्याला मानणारे लोक आहेत. लोक अत्यंत श्रद्धेने त्याची ही कहाणी सांगतात.

**– भागाजी दादाजी घाणे, वारनघुशी**

* *

## कथा क्र. ३ – ''घोरपड्याआई''

घोरपड्याआईची दोन ठाणा आह्यात यक डोव्हाच्या वर आन तीठून मंग ह्या देवळात. ह्या दोन बहीनी हायात. यक घोरपड्याआई आन दुसरी मुरळा. दुसऱ्या डव्हात मुरळ्याआईचा डव्ह हाये, मुरुळाआई म्हंजी मुळा नदी. ती प्रवराला मीळाया येती. त्या का बहीनी आह्यात.घोरपड्या आईचा देऊळ का शिवाजीराजाच्या आज्ञानं झाला असं सांगत्यात. घोरपड्या आई म्हंजी तुळजापुरच्या भवानीचाच आवतार हाये. इठील्या संमद्या गावांच घोरपडा आई मंजी कुलदैवात हाये. दरसाल तीची जत्रा राहाती आन मंग जत्रला शीर देत्यात. शीर दिलाव म हिनाभर तीच्या शिवत रगत सांडून द्येत नहीत. घोरपड्या आईचा घर डोवात हाये. तसाच मुरुळाचा, ती संमद्या गायांचा आन शिवारांचा रक्षेण करीती. आन संमद्या पेहरा खोरां तीच्या छायेत हाये. परत्येक पोराचा आन पोरीचा जावळ तीला लग्ना आंदी द्यावा लागतो. त्याबिगर लगीन व्हत नही. लोक मंगळवारी तीची जत्रा कराया लाम लांबून येत्यात.

लय दिस झालं तवा तीठं सयंपाक शीजवाया डव्हातून भांडी येयाची आन त्यात परसाद करायचा आन यवढायबी खायाचा आन वाडून दियाचा. पर काही काफेर लोकानी डव्हातून आल्येलं भांड घरी नेला. तसाच भांडा यीयाचा बंद झाला आन त्या लोकं मरून गेली.

घोरपड्या आईचा ठाना लय कठीन हाये. ती पार नवसाला पावतीच पर तीचा नवस पूरा करावा लागतो. आन जरका क्येला नही त मंग त्येच्या घराचा सत्यानास व्हतो. घोरपड्या आईला परसाद लायीत्यात, शिवाजीराज्यानी लावलं व्हत व त्येंली उजी दिली आन त्यांनी यव्हढाय मुलुख जिखला. लोक परत्येक कामाला परसाद लावित्यात.

या घोरपड्या आईची एक गोठ हायो. का यक गायख्या यंठ गुरां चाराया यीयाचा. रोजरोज चारायचा आन उजुक गावात यीयाचा. त मंग यकदा काय झाला का डव्हातून गायी आली आन त्येच्या गुरांत चराया लागली तशाच संमद्या गाया तीच्या भवतीना भवतीना चराया लागल्या. तीनं दिवस गेल्याव पका दूध दिला. गायख्याना प्येला. तसाच ती डव्हाक ग्येली आन गडाप झाली. असा का रोजरोज जाला. त त्यो गायख्या म्हन, ''कारं दादा कुक जाताय गायी मला का पघाया पहीजेल.'' तवा त्याना त्या गायीची शेप धरली आन निंगाला. तशीच गाय डव्हात शिरली. तसा दोन्ही बाजूला पानी झाला आन तीच्यसंगच गायख्या पार आत शिरला. मंदी निसता परकाश आन मोठा राजवाडा आन पक चमचकमरी जसा इज. त मंग गाईना त्येला राऊळात न्येला आन तीचा सरूप पालाटला. ती का यक सुरुपवान देवी झाली. त गायख्या पटापट पाया पड. म्हन, ''आई मी चुकला तुह्या मांग आलो तुला वळाखला नाही.'' त म्हन, ''आरं मी तुह्याव परसन हाये, तुला काय पाहीजेन तो मांगून घे.'' त म्हन, ''मी त गायख्या हाये मला काय लागत नही मह्या गाया फक्ती सुखाना राहुंदी.'' त देवी म्हन, ''आरं मी कड्याकड्यानी घोरपडीवानी ऱ्हाईन आन संमद्या गायांच राखन करीन. आजुक काय पायजेल ते मांगून घी.'' का आमाली शेतीभाती चांगली व्हऊंदी मंजी तुझा परसाद कराया बरा.'' त म्हन, ''तुहा म्हनना पुरा व्हईल.'' तवा घोरपड्या आईना त्येच्या घोंगडीमंदी लाल टाकलं आन म्हन का, ''मी डव्हात हाये आन मही बहेन तीकील्या बाजूना हाये तवा तुला काय पायजेन तो तू मांगून घी आन ऱ्हा.'' तसाच त्यो गायल्या डव्हाच्या बाहीर आला आना पाह्यतो त त्येच्या घोंगडीला जसा डिंगळ लीफाटलाय तसाच त्यानं डव्हात झटाकला. त्ये लाल उजुक डव्हाचत

चमचम करत्यात आन देवीचा ठाना अजून हाये. जाग्रीत दैवत हाये. आन तीची नदार संमद्या डांगानाव हाये.

**संदर्भ :**

रंधाफॉल धबधब्याजवळ वरील कथेतील दोन डोह देऊळ व देवस्थाने आहेत. लोक मनोभावे त्या देवीची पूजा करतात. प्रत्येक शुभ कामाला देवीचा कौल घेतात. परंतु प्रत्यक्ष पुरावा त्या बाबतीत काही सापडत नाही.

**– विठ्ठल बारकू खाडे, कातळापूर**

* *

## कथा क्र. ४ – ''कळसुबाई आमुची आई''

यक शेतकरी व्हता आन त्येला यक बायकू व्हती. तीला यक पोर झाली आन तसाच ती मरून ग्येली. तवा त्या शेतकऱ्याना दुसरी बायकू केली त ती बायकू त्या पोरीचा छळ करीत असं. तीला कोंड्यारोंड्याची भाकर दिऊन गुरांक लावायची. त गाया चाराया तीला बरा वाटत असं. ती पोर शंकराची पकी सेवा करीत अस. ती खडकावं बसं आन मातीचा लींग कथन आन दुधाचा न्हाण त्येला घालित असं. पर घरी आल्याव तीची सावतर आई तीला भांडा घसाया लावायची. त पोर म्हन का मी भांडा घसयची नही. असा रोज भांडान व्हयाचा. त मंग त्या सावतर आईना तीचा लगीन ठरीवला म्हन इली आंधळ्या आन पांगळ्याला दियाची. त मंग पोर बापाक रडत ग्येली आन म्हन मी लगीन करीन त शंकर देवाशीच म्हंजी महादेवाशीच नहीत तशीच ऱ्हाईन. त तिचाका तसाच छळ तीची सावतर आई करीत अस. तीला पका तरास झाला. त मंग तीना गाया घ्येतल्या आन खालतीला कोकनातून घाटाना वर आली. पका रान वलांडला आन रानारानातून तीला पका उच डोंगर दिसला त म्हन, ''इठं म्हादेवाचा ध्यान कराया बरा आहे.'' त मंग त्या डोंगराक आली. आन गाया दिल्या सोडून त तीला यक कोळी दिसला. त म्हन, ''का रं पोरी तू कोनची?'' त म्हन मी ''म्हादेवाची बायकू आहे.'' त म्हन, ''तू रं कसी म्हादेवाची बायकू'' त म्हन, ''माझ त्येच्या संग लगीन व्हयाचा आहे.'' तवा त्या कोळ्याना दिला तीठं त्येच्याक ठिवला. ती रोज दुधभात खायाची आन डोंगराच्या टोकाव रयाची ध्यान करीत. त मंग पका दिस झाला. त यक दिसकोळी मांग मांग ग्येला त तीठ त्येला लय मोठा चमतकार दिसला. त्येची बाई शंखराच्या डाया मांडीव बसली असं त मंग त्येना तीचा पाय धरला आन तसाच ती गडाप झाली. त्याला पका दुख झाला आनत्येना तीचा कळसावं ठाना क्येला. तीला कळसुई नाव ठूला. आन लोकांली म्हन, ''मही कळसुबाई शंकराची पारबती.'' लोकांली त्येचा हसू यायचा. पर संमद कोळी आन ठाकर त्या डोंगराच्या टोकाव जमलं. तवा नवरात्र चालू व्हता त तिठ त्येंली तीचा दर्शन झाला. तयापून संमद म्हन का कळसुबाई आमची आई हाये. तवापून दर वर्साला पाच्या माळला वर्ती तीची यात्रा व्हती. आन समद नवस पुरं व्हत्यात. संमद्या रानात भगताला किडुक नही का मिडूक नही. तीची संमद्या चोहुमुलुकाव नदार आये. तीच्या किरपना संमदे सुखी हाये.

पुढं यक कोळी तीची कायम पुजा करीत असं त त्यो म्हतारा झाल्याव त्येला काय यंगता येईना व त्यो देवीला म्हन, ''आई मह्याना काय गड यंगवत नही तवा तू तुह्या समद्या पोराबाळांसाटी खाली यियाला पायजेल.'' त कळसुबाई परसन जाली. ''म्हन माझा यक देऊळ खाली बांधा मी तीठं येऊन रहीन पर मही यात्रा वरच व्हयाला पायजे.'' त मंग तीचा यक ठाना खाली आला.

संमद्या डांगानाची ती आई हाये. तीच्या कड्यावून कोनी पडत नही. आन संमदी आशा आई पुरी करती. पर कोनी पापी ग्येला मंग मात्येर त्येला जीत ठीवत नही. तीच्या दरसनाला सात वाघ राती येत्यात. त्येंचा नाच वर चालतो आन सकाळचं त्येंका निंगून जात्यात. कवा कवा देयीचा कोप व्हतो आन दुस्काळ येतो पर ती काय डांगानाला उपाशी रहून देत नही.

**संदर्भ :**

कळसुबाई हे सह्याद्रीचे सर्वात उंच शिखर. त्यावर एक छोटे देऊळ आहे. देवीचा तांदळा आहे. खाली एक देवालय आहे. खाली कोळी आणि ठाकर लोकांची वस्ती आहे. साऱ्या कोळी, ठाकर, तलवार कानडे लोकांचे ते दैवत आहे. नवरात्रातल्या पाचव्या माळेला गडावर यात्रा असते. येव्हढी एक आख्यायिका या दैवताविषयी मिळते. डॉ. गोविंद गारे यांनी एक आख्यायिका दिली आहे परंतु ती देखील या आख्यायिकेशी समान आहे. फार क्वचित लोकांच्या तोंडी ही आख्यायिका आहे. पण या दैवताविषयी श्रद्धा मात्र सर्वांची आहे, असे दिसते.

**– भागाजी दादाजी घाणे, वारनघुशी**

* *

## कथा क्र. ५ – ''देव मसराज''

ह्या मसुबाचा ठाना लय कडक हाये. लय दिसापून ह्या ठाना हाये. ह्याची नदर उभ्या बारा वाड्यांव हाये. ह्या डोंगरावरचा गवत कंदी सुकत नही. आन कंदी जनवार पडत नाही. मसुबाची जत्रा दर साली करावाच लागती तवा त्येला कोंबड घ्यावा लागतो. त्येचा तळा बारा महीनं अठकाराळ कंदी आटत नही. कारय भरेल. गोऱ्हा, बोकुड, म्हस रेडा, लोक नवसाला त्येच्या नावाना सोडून देत्यात. पर त्ये जनावर कोनाच्यातरी घरात जाताय मंग त्येला पाळावा लागतो. मसुबाचा परसादम्हून. यंठ माकाडां रमत्यात. त्या रोज रोज मसुबाच्या पाया पडाया येत्यात. तळ्याचा पानी पित्यात आन निंगून जात्यात. मसुबाच्या रानात वाघ हायेत पर याच्या शिवत कंदी जनवार खात नहीत. पह्यलं खात असं पर मसुबाना त्येलीका आन घातली का, ''मही जनवारं तू खालीत मंग तुही बरी गत नही.'' तवापून वाघ मसुबाच्या पाया पडाया येतो आन जनवरां खात नही. देवमसराज संमद्या नवसाला पावतो. बारावाड्यात त्येची सता हाये. कोनताच रोग म्हना का दुस्काळ म्हना या पठाराव येत नाही. रोग आला का तो शीवकून तीकं जातो. लोक मसराजाला, लोळत घोळत येन्याचा, केसाना मंडप झाडन्याचा, दंडवत घालत जानाचा, वल्यावनी डोंगर यंगन्याचा नवस करत्यात. देव समद्या नवसाला पावतो. त्येचा भगत हाये. त्याचा यबी पका कठीन नेम हाये. त्येच्या नेमांत भंग झालात त्येच्या घरातला कोनी मरून जाताय.

लई मांग यकदा यक आंग भरेल म्ह देवाला सोडली. ती काय वर आनली नस. खालूनच सोडून आन दिली. त मंग तीला मालक म्हन का ही द्येवाला दिली आन भंडारा क्येला. तसाच भगताच्या आंगाव आला. आन, ''म्हन माझा परसाद ठान्याव सोडाया पायजेल.'' त मंग आता कसा यंगनार पार म्हस जनाया झाली व्हतीत तशीच म्हस पळत सुटली आन पार डोंगर यंगून वर मसुबापसी क्येली त पार समद्या बारावाड्या बघाया जमला. पर तीला काहीच झालं नाही आन ती उजुक परत पळत आली आन खाली आल्याव जनली. तीला तीन रेडं झालं आन तीचा दुध पार बारावाड्यांना दिलं. मंग त्ये तीन रेड डोंगराला धरायचं. असा जनवार कंदीच मरत नही.

**संदर्भ :**

पाचपट्टे वाडीजवळ म्हसोबाचा डोंगर आहे. त्या डोंगरावर एक शेंदूर लावलेला तांदळा असून त्याच्या समोर छोटे तळे आहे. येथे माकड, वाघ, तरस आदी रानटी प्राणी डोंगर कपारीला राहतात. तीढें हे येथील प्रमुख गाव असून त्याच्या बारा वाड्या आहेत (नकाशा पहा). त्या देवस्थानाविषयी वरील गोष्टी सांगतात.

**– काळू रामा खोलके, पाचपट्टे**

* *

## कथा क्र. ६ – ''टहाकारीची देवी''

यक्या रातीत बांधून काहाडला देऊळ आन निंगुन गेलं. ह्या वाटाना सैना चालली व्हती त मुकाम पडला यंठ. त राजाच्या मनात आला का वनीचा ठाना इठ हाये तो इठ बांधायचा. त म्हन का यक्या रातीत बांधून पूर्ण झालात बरा. त मंग दहा हजार सैना कामाला लावली आन चांगल कारागीर आनलं आन येक्या रातीत संमदा देऊळ पूर्ण केला. दगड पाचपट्यावून आंनलं. कारागिरत पक लांमच व्हत. यंठ पाह्यालाका निसताच यक तांदळा व्हता आन यक त्या देयीचा भगत व्हता. तो म्हन का ह्या वनीची देवी हाये. आपल्या लेकराबाळांली जगवाया इठ आली हाये.

ह्या देवीचा महीमा पका मेठा ही. संमद्या डांगानाचा आन पेहरा भागचा दैवत हाये. ही देवी नवसाल पावती. इठ मारवतीचा देवळ नही पर देवीचा हाये. संमदां लगीन असू कार्ये असू इठ यावाच लागता. इठं अढळा नदीचा पानी कंदीच आटत नही. टहाकारीच्या देवीची जत्रा पकी मोठी. आन देवीचा महीमा असा मोठा का संमदा संसाराचा स्त्रीचरीत इठ पहाया मिळतो. नवीन लगीन झाला का यकदा येवाच लागतो. नहीत मंग इपरित व्हतय. असा म्हणत्यात इठ या दरबारात पार समदं देव जमा झाल्यात.

**संदर्भ :**

या देवीची सविस्तर हकिगत उपलब्ध नसली तरी देऊळ पूर्ण हेमाडपंती असून ते कोणत्या काळात बांधलं गेसं असावं या विषयी संशोधन व्हावयाचे आहे. येथे शिलालेख आहेत. विशेष म्हणजे सर्व संभोगासने येथे मूर्तिच्या स्वरूपात बसविली आहेत. इतर अनेक देवळे येथे आहेत. नदीला घाट आहे. एका रात्रीत देऊळ बांधून होणे अशक्य वाटले. शिवाय देवळाइतके गाव जुने वाटत नाही.

**– दत्ताराम सखाराम गोडे, तिर्ढे**

* *

## (५) हास्यकथा :–

### कथा क्र. १ – ''जमलाच गडे''

यय व्हता गायखा. तो ग्येला सासुरवाडीला. त्येला दिला पोता बसाया. तो म्हण, ''पोता रुतात गडे.'' मंग दिली मिरची आन भाकर खाया. त म्हन, ''तीखाटगडे''. मंग दिली पोळी त म्हनं, ''तीत गुळच्याट गडे''. मंग दिली गादी बसाया त म्हन, ''मी त यकलाच गडे.'' त मंग दिली बायकू त म्हन, आता तं जमलाच गडे.''

**– रामदास संते बांबेरे, कोदनी**

* *

### कथा क्र. १ – ''यडा जावाई''

यक व्हती म्हतारी. तीला व्हता यक पोऱ्या. त्याच बालपणीच लगीन झालता. तो पोऱ्या मोठा मोठा झाल्याव, आईल म्हन, ''आई महा लगीन कर रं.'' तवा त्येची आई म्हन, ''तुझा लगीन तू बारीक व्हता तवाच केलाय. आता तू तुह्या बायकूला आनाया जा.'' तो बायकूला आनाया निंगाला तवा त्येच्या आईना सांगितला का, ''आता तू नवा जावाई हाय तवा लवून जपून जाय.''

त्यो त्येच्या बायकूला आनाया निंगाला व्हता व त्येला आईना सांगीतला त्येचा ध्यान आला का लवून जपून जायाचा त पर त्येला लवून जाय येव्हढाच ध्यान आला आन जपून शब्द ग्येला फाफालला. पुढं जवारीच श्यात लागलं. ते श्यात राखण्यासाठी तीठ यक माणूस व्हता. हा लवून चालत हाय असा त्याने ह्येरला. त्येला असा वाटला का हा जवारीची कणसां तोडीतोय. मंग त्या राखणवाल्याना त्याला जवळ बोयलां आन त्याली पका हानला. आन त्येला सांगला का असा चोरावानी जाऊ नही व्हो व्हो करीत जाय. म्हंजी कणसावं बसेल पाखरा उडून जात्याल. तो का साऱ्या रस्त्याना व्होऽऽ व्होऽऽ करीत निंगाला.

पुढा ठाकरानी सस गुतवाया वाघुर मांडली व्हती. आन ससा गुताया आलता त तीकून हा व्होऽऽ व्होऽऽ करीत करीत आला. ससा ग्येला पळून. तीठ ठाकरानी त्येली पका हानला आन म्हन, ''असाच गुतुदी, असाच गुतुदी असा म्हनत चाल.'' तमंग त्यो साऱ्या रस्त्याना असाच गुतुदी असाच गुतुदी म्हनत चालला.

पुढं का येका मानसाची गाडी गाळात पकी गुतली व्हती. आन ते म्हन, ''असाच गुतुदी, असाच गुतुदी''. त्या गाडीवानानं त्येला जवळ बोयलां आन त्येच्याकून गाडी काढून घेतली आन पका हानला. आन सांगितला का, ''असाच निगुंदी, असाच निगुंदी'' म्हणत जाय. तो साऱ्या रस्त्याना असाच निगुंदी, असाच निगुंदी म्हणत ग्येला.

पुढ यका गावात यक मानूस मरला व्हता आन त्येचा मुडदा घिऊन गावकरी चालं व्हत. त हा म्हंतो, ''असाच निगुंदी, असाच निगंदी''. त मंग त्या गावच्या लोकांनी त्येला पका हानला त हा म्हन का, ''मला का त्या गाडीवानानं म्हनाया सांगता व्हता.'' त गावकऱ्यांनी समजावला आन म्हन, ''वाईट झाला, वाईट झाला म्हनावा.'' त मंग तो साऱ्या वाटाना वाईट झाला, वाईट झाला म्हनत निंगाला.

तवा दुसऱ्या गावात राजाला पोऱ्या झालता. तवा त्या राजाली पका आनंद झालता. आन समद्या गावाला पेढं वाटीत व्हते. तवा हा म्हनत आला का यल वाईट झाला, लय वाईट झाला.'' राजानं त्येली पका हानला. आन दिला सोडून.

मंग तो सासुरवाडीला आला त त्येला का झाली रात. त्येला व्हता रातआंधळा. रातच्या येळी त्येला जेवाया बोयला. त ज्यावन चालू व्हत. यक कुत्रा त्याच्या थाटात खाऊ लागला. तवा सासु म्हन, ''जावाईबुवा कुत्रा थाटात जेवतोय.'' त्याना कुत्र्याला हुसाकला. मंग सासू आली वाढाया त त्येला वाटला का परत कुत्राच आलाय. त्याना सासूच्या मुस्काटात दिली ठून चापाट. आन दुसऱ्या दिसी बायकुला घ्येतला आन बायकू संगतीना घरी आला.

**– किसन गंगाराम भांडकोळी, अबिटाखिंड**

* *

### कथा क्र. ३ – ''कोल्हाची खोड मोडली''

यक व्हती म्हतारी. ती ग्येली झाड्याला त तीठ गवासला यक पैसा. ती ग्येली बाजारला. तीना आनली बोरां. ती बोरां तीना खाली आन ब्या धिल्या उकींड्याव टाकून. तीठ यक बोर उगली. त्या बोरीला आली बोरा. रोज यक कोल्हा यीयाचा आन बोरा खाऊन हागायचा आन म्हतारीच्या दारात बोचा पुसाया जायचा. दर दिवस कोल्हा असाच करू लागला. तवा म्हतारीला आला राग. मंग तीना यकादिसी आहारामंदी लालचरत तवा तापावला आन उमातरे निवून

ठूला. त्या दिसी कोल्ह आलं आन बोरां खाली. हागला. आन बोचा पुसाचा आला. तवा त्येचा बोचा चार चार जळाला. तवा म्हतारी म्हणती, ''कोल्हूबा कोल्हूबा बोरां पिकली'' त मंग कोल्हं म्हनताय, ''नही नही म्हतारे टिर जळाली.''

**– पोपट शिवराम डगळे, पाचपट्टे**

## कथा क्र. ४ – ''आस्वलीचा घोळणा फुटला''

यक व्हता श्यातकरी. त्येच्या घरामंदी पकी मानसा असं. लय दिस झालं पर त्येला काय त्येच्या बायकूजवळ जाया जमना. तवा यकदा काय झाला का त्येच्या घरातली मानसां ग्येली जतरला आन घरी बारीक पोरां रयली. तवा मनात म्हन का आज रातीला जमलाच गड्या. तवा पका जेवला आन पोरांली दारी झोपवाया लागला तवा दोन पोरां निजली आन यक प्वार काय झोपानी. तवा त्याला काय दम पडानं तवा तो पोराला म्हन, ''व्हय तुह्या आईला म्हना का बा म्हंतोय का आज का पका मोठा बांबू काढला आन गावात आस्वल नाचवायची का.'' तवा पोर ग्येलं आन त्येच्या आईला म्हन का, ''आये, बा म्हंतोय का पका मोठा बांबू काहाडलाय आन गावात आस्वल नाचवाया चाल.'' तवा त्येची आई म्हंती का, ''व्हय तुह्या बाला सांग का आज का आस्वल नाच कराया याची नही. आस्वलीचा फुटलाय घोळना.'' तवा पोर ग्येलं का बा ला तसा सांगला. तवा बाला पका राग आला त्यो पोरांली घेऊन आन मुकाट निजला.

**– बाळू श्रीराम सेताडे, घाटघर**

* *

## कथा क्र. ५ – ''चिमना चिमनीची गोष्ट''

यक व्हती चिमणी आन यक व्हता चिमणा. त्येनी घातली खीर. चिमुनबाय ग्येली पान्याला ती म्हन, '' चिमण्यादादा खीर हालवू नकू बर कां.'' पर त्येना काय आयकला नही तो ग्येला खीर हालवाया त तो पडला खीरीत. ती आली पानी घीऊन म्हन, ''चिमन्यादादा चिमन्यादादा ई उतरू लागाया.'' त तो काही येहीनाच. त तीना तसाच उतारला आन ग्येली आत. आनी ती का लागली खीर हालवाया त त्येच्यात आला चीमना त मंग चीमुताय बसली रडत.

त आला कावळा म्हन, ''चिमुताय कह्याला रडती?'' म्हन, ''काय सांगु? तुला सांगुन काय उपेग?''त म्हन सांगच. त म्हन ''खीर खीर खिरावटा खीरीत पडला चिमना, चिमने चिमनेची झावळी कावळा पक मोड्या.'' त कावळ्याचा गेला पक मोडून, त तीठून कावळा ग्येला वडाव त वड म्हन, ''का रं कावळेदादा, तुझा पक मोडलाय?'' म्हन, ''काय सांगू?'' त म्हन सांग, ''त म्हन पाय बरा.'' त म्हन, ''हा'' त मंग कावळा म्हन ''खीर खीर खिरावटा, खिरीत पडला चिमना चिमना चिमनेची झावळी कावळा पक मोड्या वड पान झड्या.'' त मंग ग्येली वडाची पाना झडून तीकून आल्या गायख्या. त्येंनी वड पाह्याला त पाना ग्येली झडून. गायख्या म्हन, ''वडदादा कारं पाना झडल्यात. त वड म्हन, ''कसं सांगू? तुम्हाली सांगून काय उपेग?'' त म्हन ''सांग सांग'' त म्हन ''पाय बरा.'' त म्हन ''हा'' त वडदादा म्हन, ''खीर खीर खिरावटा खीरीत पडला चिमना, चिमनेची झावळी कावळा पक मोड्या वड पान झड्या आन गायी शिंग मोड्या.'' ग्येली गायीची शिंगा मोडून मंग गाया गेल्या डवा कड. लागल्या पानी पियाला त डवाना पाह्यला आन म्हन, ''कारं गायानू तुमची शिंगा मोडली?'' म्हन ''काय सांगू?' तुला सांगून काय उपेग?'' त म्हन ''सांग सांग''त गाया म्हन, ''पह्य बरां'' त म्हन, ''हा'' मंग गाया म्हन ''खीर खीर खिरावटा, खिरीत पडला चिमना चिमना चिमनेची झावळी, कावळा पक मोड्या, वड पान झड्या, गाया शिंग मोड्या डव्ह उचमुळ्या.'' लागला डव उचमळाया. त मंग तीकून आला मोराचा कळप पानी प्याया. त्येंनी पाह्याल का पानी उचमळतोय. त मंग त्ये म्हन, ''का रं डव्हा, का उचमळतोय?'' त म्हन, ''काय सांगू? तुम्हाली सांगून काय उपेग?'' त म्हन ''सांग सांग'' त म्हन, ''पह्य बरां'' त म्हन ''हा'' त म्हन, ''खीर खीर खिरावटा, खिरीत पडला चिमना. चिमना चिमनेची झावळी, कावळा पकमोड्या, वड पान झड्या, गायी शिंग मोड्या, डव्ह डचमळ्या, मोरा पिसा गळ्या.'' ग्येली मोराची पिस गळून.. मोरा पुढं ग्ययेल्या त त्येंली खुरासन्या नद्र पडला. त खुरासन्या म्हन, ''का रं मोरदादा कारं पीसा गळ्याल्यात?'' त म्हन, ''काय सांगू? तुमाली सांगून काय उपेग?'' त म्हन ''सांग सांग'' त मंग म्हन, ''खीर खीर खिरावटा खिरीत पडला चिमना, चिमना चिमनेची झावळी कावळा पक मोड्या, वड पान झड्या, गायी शिंग मोड्या, डव्ह उचमळ्या, मोरा पीस गळ्या आन खुरासन्या तीन शेंड्या.'' फुटल्या तीन शेंड्या खुरासन्याली. तीकून आला त्येंचा धनी. त धनी म्हन, ''का रं खुरासन्यानु तुमाली तीन शेंड्या?'' त म्हन, ''काय सांगू? तुला सांगून काय उपेग?'' त मंग म्हन, सांग सांग'' त म्हन ''पह्य बरा'' त म्हन ''हा'' त म्हन खीर खीर खिरावटा, खिरीत पडला चिमना, चिमनेची झावळी, कावळा पक मोड्या, वड पान झड्या, गायी

शिंग मोड्या, डव्ह उचमळ्या, मोरा पीसा गळ्या, खुरासन्या तीन शेंड्या आन धनी नाक मोड्या.'' ग्येला धन्याचा नाक मोडून. चिमना गेला. समद्या गावाला दुकाळ आला.

**– निवृत्ती संतु बांबेरे, कोदनी**

* *

## कथा क्र. ६ – ''घेतू''

यक व्हता पोऱ्या. तो ग्येला यका म्हतारीच्या घरी, ती म्हतारी पुऱ्या करीत व्हती. तीला यक नात व्हती. ती म्हन का ''पोऱ्या टोपल्यातुन पुऱ्या घेतोय.''' त्येचा नाव व्हता घेतू. त्याना पुऱ्या यव्हढ्या पळवल्या. खाल्या तेव्हढ्या खाल्या आन गठूड बाहांदला आन आला यक्या वाटावं. त्याना गठुडा सोडला आन तो लागला पुऱ्या खाया. तीकून यक घोड्यावाला आला. तो म्हन,''कसारं पोऱ्या पुऱ्या खातोया?''त म्हन,''आर इटल्या गावामंदी यक म्हतारी असं ती का पुऱ्या वाटीती.'' त म्हन, ''महा घोडं सांभाळीतोरं? मी पुऱ्या घीऊन आलो.''पोऱ्या म्हन ''हा'' त मंग ग्येला पुऱ्या आनाया त याना तसाच घोडं पीटाळलं तीकून यक म्हतारी आन तीची पोर चाली व्हती. ती पकी दमेल व्हती. ''मह्यापोरीला घोड्यावं घीतोरं?'' त म्हनं ''हा'' घ्येतला घोड्याव तसाच घोडं पीटाळलं पुढ यक मानूस कपडं धूवीत व्हता. त चांगाल कपड व्हत आन पैका व्हता. त म्हन, ''आर इठल्या गावात लय बायका वाटीत्यात ही पय म्या आनली व्हय घीऊन यी.'' तो तसाच पळत सुटला त मंग याना समदं कपडं घ्येतला आन तसाच घोडं पीटाळून ग्येला.

**– युवराज मारूती डगळे, चिंचवणे**

* *

## कथा क्र. ७ – ''कुत्र्यानी खाल लाडू''

यकदा यक्या गावात नवरा बायकू रयत व्हतं. त मंग दिवाळीचा सण आला. त्येंनी ठरावला का लाडू करायचा. त मंग लाडू झालं पाच. नवरा म्हन, ''म्या रवा आनला तवा तीन दी माला आन दोन घी तुला.'' तवा बायकु म्हन्ती, ''लाडू म्या केलं तवा तीन दी माला आन दोन घी तुला '' असा कवरही म्हनत बसली. तवा शेवट संध्याकाळ झाली तवा त्यांना युगत काहाडली, ''दोघींनायबी गप झोपायचा आन जे बोलल त्येला दोन लाडू आन ज्ये नही बोलणार त्येला तीन लाडू.'' तमंग त्येंनी घेतला झोपूनय दोन दीस झालं तीन दीस झालं. पर कोनी काय उठना. तवा लोकांली काय वाटला का येंचा कायतरी बरावाईट झाला. त्येंनी दार उघडून पाह्यला त मंग त्येंली वाटला का मेलं जनु. त्येंनी लगेच सरान रचला आन त्येच्याव त्येंली निऊन ठुलां आन दिला चेतून. तरी काय त्यें उठानी. पर जाळ लागल्याव नवऱ्याला जाग आला आन तो बायकूला म्हन, ''हय पय तू का तीन घ्ये आन माला दोन दी.'' हा लोकांनी आयकला आन त्येंला वाटला का भुत उठले तसेच त्यें डुराकले आन जोस्यात पळाया लागले. कोन पडत कोनाचा पांघरुन फीट. त तीठ का यक न्हायी दाढी करीत व्हता. न त्येचा वस्ताराच लागला मानसाला आन त्यो तसाच टाकून दिला. त्येली यक घोडं दिसलं खुट्याला बांध्येल त्येला तसाच घोडा उडावला आन जोस्यात हाकीत सुटला त घोड्यानायबी कसा कायनु खुटा उपाटला आन पळत सुटला आसं. त्येच्या टापाखाली का कितीक चिरडावली.

इकड नवराबायकू उठली आन घरी यीऊन पाहात्यात त लाडू सालं कुत्र्याना. आन ती बसली फोकल्या मारीत.

**– शंकर अमृता लेंडे, पाभूळवंडी**

* *

## कथा क्र. ८ – ''कुंभाराची मौत''

यक व्हता कुंभार. त्येली काय काम नव्हता म्हून त्येना भिंतीला तंगड्या लावल्या आन खाली डोक कथन उभारला आन सकाळ झाली तरी काय उठान तवा लोक आपलं आन त्येंनी पाह्यला. त्ये त्येच्या तंगड्या खाली करीत त डोका वर व्हयी आन डोका खाली क्येला का तंगड्या वर व्हयाच्या. तो काय जमिनीला पडना तवा त्येंना असा कव्हरय क्येला त मंग त्येंली इचार पडला का येची मौत कसी रं गड्या करायची. तवा त्येंनी सरान रचला आन कुंभाराली आनाया निंगालं त तीठ आल त कुंभार उजुक खाली डोका वर पायी. त मंग त्ये मन का आपुन आसा करू का येचं दोन तुकडं करू आन त्येला सरनाव ठू. त मंग कुऱ्हाड घ्येतली आन दोहीकून दोन हानायच्या बेताव आलं तसाच कुंभाराना झटक्याच उठून दोघांच्याबी मुंडक्या धरल्या आन म्हन, ''गाभडानु मही मौत करीत? आता तुम्हालाच मारीतो.'' त समदे गेले घाबरून आन तसाच पळाया लागलं कुंभार मांग आन लोक पळ म्होरं, कुंभार म्हन आरं मी का भूत नही त मंग लोक काय मागारी फिरानी तवा हा आला घरी. पर त्येच्याक काय कोनी लोक यीना आन

त्येच्या घरावून जायेना. कुंभार ग्येला उपाशी.

**– धोंडू गोविंदा सारुक्ते, सोमलवाडी**

* *

## ६) संकीर्ण

### कथा क्र. १ – ''डिंगऱ्या महा कामाचा''

यक व्हती म्हातारी, तीना आनला दूध. तो ठिवला तापाया. झाकान काय ठू ना म्हून तीना त्येच्याव हात ठूला. तीच्या हाताला आलं तीन फ्वाड. त्ये तीना फोडलं. त्येंच्यातून तीन जन निंगाले. यकात निंगाली सकू, यकात निंगाली बकू आन यकात निंगाला डिंगऱ्या. म्हतारीचा हात दुखात अस त ती म्हन, ''सकू बकू पानी आन रं'' त सकू म्हन ''मी न्हाय आनित जाय.'' त मंग म्हन, ''बकू पानी आनं रं.''त म्हन, ''मी न्हाय आनित जाय.'' त मंग म्हन ''डिंगऱ्या पानी आनरं '' त म्हन ''हा.'' त त्याना पानी आनला. त मंग म्हातारी म्हनस ''सकू नाही कामाची, बकू नाही कामाची आन डिंगऱ्या महा कामाचा.''.

**– रामदास आबाजी बांबेरे, कोदनी**

* *

### कथा क्र. २ – ''ठक आन महाठक''

यक व्हता महाठक आन यक व्हत ठक. त्ये दोघांची लई दोस्ती व्हती. यकदा काय झालपा का त्येंली यक युगत सुचली का यका राजाच्या नगरीत जायचा. तीठला राजा मरला व्हता. आन त्येचा मुलगा राज्य चालवीत व्हता. त्येंनी ठरावला का त्यो पोऱ्याला ठकवायचा. महाठक ठकाली म्हन, ''तू का राजाली खड्यातून बाहीर काढायचा आन त्या खड्यात जाऊन निजायचा. मी राजाक जातो. त्येंली सांगतो का तुह्या बापाक मह्यावालं पाच हाजार रुपय हाये त्येका तू देऊन टाक नहीत चाल तुला बालाली विचाराया.'' त मंग महाठक ग्येला राजदरबाराला आन म्हन, ''राजसाह्येब तुमी एवढं राज आन तुमाली मह्यावाल पाच हजार रुपय दिन.'' तं म्हन ''कंच पाच हजार?'' त म्हन ''तुमच्या बापान मह्याकून घेतलं व्हतं. देऊन टाका नहीत चाला तुमच्या बापाली इचाराया.'' त मंग राजाली मोठा अचंबा वाटला का बाप कसा बोलल. मंग राजा आन महाठक निंगालं आन आल राजाचा बाप जीठं पुरला व्हता तीठं. त राजा घाबरला आन लांबूनच म्हन. ''कारं बाबा तू ह्येच्याकून पाच हजार रूपय घेतल व्हत काय?'' त खडयात ठक बसेल व्हता. त म्हन, ''हा रं पोरा मी का त्येच्याकून पाच हजार रुपय घ्यातल व्हतं त्ये काय म्या दिलं नही. तू दिऊन टाक नहीत सत्यानास व्हयीन.'' त मंग राजा पकाच घाबारला आन त्येनं महाठकाला पैसं दिल आन महाठक निंगाला. त्यान इचार क्येला. आन तीठून परच्यापर निंगून जातो. ठक म्हन, ''अजुक येत नही, काय बुवा झाला असं'' तो पह्या ग्येल त महाठक तीठून निंगून ग्येला अस. त ठकाला युगात सुससली. तो का चांभाराक ग्येला त्येली म्हन, ''का दोन चांगाली चपल सांदून दी.'' चांभाराना चांगाली वहान सीवून दिली. ठकाना का मोहरं जाऊन महाठकाच्या वाटत दिली टाकून. आन त्येच्या म्होरं यक टाकली असं. महाठक पळत पळत चाला व्हता. त्याला ती नद्र पडली. त त्यो म्हन, ''का आउंची यकच वहान हाये.'' तवा ती सोडून पुढं निंगाला. जाता जाता त्येली दुसरी वहान नद्र पडली असं. त्यानंका पैसाचा वझा ठूला खाली आदुगर सापाडली ती वहान आनाया ग्येला. ठक तीठच लपून बसेल व्हता त्याना त्ये पैस्याचा गुठडा उचालला आन पका पळत सुटला. घरी ग्येला बायकूला म्हन,''ह्य पय महाठक आल्याव त्येली म्हन अजुक घरी आल्या नही.'' आन मंग इहिरीत लपून बसला. त्येची बायकू त्येली रोज सकाळी चांगले पदार्थ नीऊन दियाची. त्याना का पैस पेटीमंदी ठून दिलं व्हतें. आन किली त्येच्याक ठुली व्हती. महाठकाचा समदा धन ग्येला तवा त्येना इचार क्येला का हा धन ठकाशिवयी कोन नीयाचा नही. तवा तो ठकाच्या बायकूक ग्येला आन म्हन, ''आला का ठक घरी?'' त म्हन ''नही.''

मंग महाठकाना त्येचा पका कडका घ्येयाचा ठरीवलाआना ठकाची बायकू ठकाला भाकरमिरची इहिरीत पवऱ्याना सोडीत व्हती तो त्येला हेरला आन त्येला पका कडका लागला का यठंच ठक लपून बसेल हाये. असा दोन तीन दिस ग्येलाव महाठक सकाळचं उठला आन मिरची भाकर घेतली आन पवऱ्यांना खाली सोडली. पवरा ग्येला खाली. त ठकाना भाकर धरली आन मंदून म्हन, '' ये आता मिरची न भाकर आनती?''त महाठकाना आवचा आवाज काहाडला आन म्हन, ''तुमच्याप किली आन कसी आन लाडुपेडं जीलेबी?'' मंग त्या ठकाना पवऱ्याक किली टाकली आन महाठकाना पवरा घ्येतला वढून. आन किली घीऊन पळाला. थोड्या टायमाना ठकाची बायकू आली भाकर घीऊन ग्येली. महाठक घुसला ठकाच्या घरामंदी आन घीऊन ग्येला ठोकून. इकड काय झाला का ठकाच्या बायकून पवरा सोडला त ठक काय पवरा धरीना पका टायम आला पर नहीच. मंग का ठकाची बायकू वराडली म्हनं ''घ्या हो भाकर'' त

ठक मंदून आचंबला आन म्हन हा त बायकूचा आवाज हाये. काय इचका झाला.'' त बायकूला म्हन ''पय पय घरी जा आन आपला धन हेर. तो महाठकान पळावला.'' त म्हन ''आव किली तुमच्याक आन धन कसा निल?'' त मंग ठक पका चीडला. मंग तो इहीरी बाहीर आला.

मंग ठकानाका यक युगत केली का बायकुला म्हन, ''मह्या घरी पूजा हाये तुमच्यावाली सोन्याची थाळी आन तांब्या द्या मह्यावाली घसा टाकली. अस म हाठकाच्या बायकूला सांग आन घिऊन यी.'' तवा ठकाची बायकू महाठकाक ग्येली आन तीना समदा सांगातला त महाठकाना तो आयकला आन म्हन,'' का येच्या मंदी कायतरी इचार हाये.'' त म्हन ''दी पघु तांब्या आन थाळी.'' त म्हन, ''आताका येची पकीच खडकी मोडायची. त मंग ठकाची बायकू आली थाळी आन तांब्या घीऊन. ठकाना काय केला का आढ्याला यक शिका लावला आन शिक्यात पान्याचा तांब्या पका भरून ठुला. त म्हन महाठक थाळी तांब्या नीयाला ईल आन शिक्यामंदून थाळी आन तांब्या घीयाला शिक्याक जाईल हात लावला का तांब्या हेंदकळल आन पानी मह्या आंगाव पडल तसाच मी उठन आन म हाठकाली पकडीन आन त्येचा बेत पाहीन.'' मंग तो शिक्याखाली झोपला. रातचा महाठक आला ह्येना पाह्यला का. येना असा क्येला हाये. त म्हन, ''आसा काय?'' त्याना युगत केली आन चिमुट चिमुट राख तांब्यात सोडली. त पानी ग्येला आटून आन थाळी तांब्या घीऊन ग्येला गैवरात. ठक उठला आन त्येना पयला का हा कुठर गड्या पळून ग्येला थाळी आन तांब्या घीऊन त मंग त्याना घरातला समदा सोना पह्यला व्हता त व्हता इकून गयवरातून महाठक पह्यत व्हता. त्याना सोना घ्येतला आन म्हन, ''महाठक नील म्हून नदीच्या मेटा नीऊन ठूला आन आला परत, त महाठकान मंदून त्येच्यावलं पाय पायलं आन तो नदीला ग्येला आन समदा सोना घ्येतला. त याला काय झोप लाग्येल नव्हती हाय बी उठला आन महाठकाच्या घरात घुसला आन त्येचा धन पळावला. त मंग दोघं वाटाना येत व्हते दोघांची मंदी गाठ पडली महाठकान पह्यला त मंग त्यो ठकाली म्हन, ''आरं कह्यला असा करतो मह्यावाला यकडाव चुकला पर आपन ठकाला महाठक मिळालो त मंग काय पचला नही तवा आपन दोघं मिळून वाटून घीऊ आन उजुक पका धन मिळवू .मंग उजुक राम राम क्येला आन घरला ग्येलं.

**– दत्ताराम सखाराम गोडे, तीर्डे**

* *



## कथा क्र. ३ – ''शेतकऱ्याची फजिती''

यक व्हता शेतकरी आन यक व्हता पाखरूं. यकदा शेतकऱ्यानं यक इहीर उकारली. त पाखरू रोज यायचा आन पानी पीऊन घीयाचा. यकदाका शेतकरी बसला लपून जसा पाखरू येऊन पानी पेयाया लागला तसाच शेतकऱ्याना गपकीन धरला. आन चाला घीऊन रस्त्याना. थ त्येला यक गवळी भेटला म्हन,''आरं पाखराली सोडून दी.'' त म्हन, ''का म्हून सोडू?'' मी त्येली सरकारात घीऊन चालो हाये मी नाई सोडनार.'' रस्त्याना समदं लोक म्हन ''सोडून दी'' पर त्येना आयकला नही. शेवट ग्येला सरकारात सरकारानं समदा आयकला आन पाखराला दिला सोडून आन शेतकऱ्याला बसला कुटीत. म्हन,'' इहीर तू उकारली गोट खरी म्हून काय पानी तू आनला?''

**– भागुजी लखु खेताडे, अंबेवंगण**

* *

## कथा क्र. ४ – ''नही सांगला त कुत्रा खातोय''

यक व्हत घर आन तीठ नवराबायकू आन त्येंचा पोऱ्या रयत व्हते. नवरा दारू प्ययाचा आन मटान खायाचा. आन नही मिळाला का बायकूला पका कुटायचा. त यक दिस असाच दारू प्याया ग्येला. बायकूना कोंबड घ्यातलं आन ग्येली पान्याला. तीकून आलं कुत्रं आन त्येना मटान घ्येतला यव्हढायबी खाऊन कुत्रा खाताय त्ये पोराना पाह्यला. आई पान्याला ग्येलती ती पानी घेऊन आली आन पाह्यला का मटान समदा कुत्र्याना खाला. त मंग तीना कुत्रा मारला आन त्येचा मटान घातला. त पोऱ्याना पह्यला आता त्येली आसा झाला का करावाच काय? ''सांगला त आई मरती आन नही सांगला त बाप कुत्रा खातोय.''

**– रामनाथ कोंडाजी उघडे, राजूर**

* *

## कथा क्र. ५ – ''युक्ती श्रेष्ठ''

यका चोंढीमंधी यक ठाकूर बगा कथन बसला व्हता. तो बगा कथन बसलेव तीठ पानी पियाला यक वाघ आला. आता त्यो काही तरी वयाना बारीक व्हता. त्येच्या मांगून मोठा वाघ आला. तो मोठा वाघ का लहानग्या वाघाव गुरूगुरू करं तं मंग लहाना वाघ बग्याक सरकत आला. त्येची शेपूट का ग्येली बग्यात. बग्यात व्हता ठाकूर तो बेहेला. त्याला वाटला का, ''दोन वाघ आह्यात,

आपलेली खानार.'' त मंग त्येच्या त्येच्या शेपटीच्या खाली घातला टिकरा आन वरून हानला कोयता तशी वाघाची शेप गेली तुटून आन त्या वाघाला राग आला राग तसाच उडाला आन मोठ्या वाघाच्या बोकांडी बसला. बग्यातला ठाकूर गपचीप ग्येला घराकं, दोन वाघांची झोंबी झाली आन दोन्हीयबी चोंढीत पडला आन ग्येलं मरून. सकाळचं ठाकूर उठला आन त्यानं जाऊन पाह्यला त दोन वाघ मेलं. त मंग लोकांली सांगाया लागला का म्या दोन वाघ मारल.

**– मधुकर रामभाऊ थिगळे, पिंपरकणे**

* *

## कथा क्र. ६ – ''दैवानं दिला आन कर्मान नेला''

यक पोऱ्या व्हता तो औताली ग्येलता. त्येचा नांगराला दरव्याचा हांडा लागला. त पैस काहीतरी कान्याकोच्या पडलं अस तो हांडयात भरीत व्हता. तह्येची माय आली म्हन, ''काय रं बा करतोय?'' त मनात म्हन, ''मह्या आईना त दारव्याचा हंडा पह्यला.'' म्हून आईला टाकला मारून आन लागला पुराया. तवा भाऊ आन आई येईना म्हून त्येचा भाऊ धीऱ्या धीऱ्या त्येंठ आला. त मंग पोऱ्याला म्हन्तो ''थोरल्या भावानयबी पाह्यला जनु.'' मंग त्याना थोरला भावय मारला. फक्ती आता हांडा आन त्योच राह्यला. रात झालेव हांडा उचालला आन गावात निघाला लागला. गावात शिरतानाचा चार चोर आलं व्हतं त्ये भेटलं. त्येंली गावात कायच मिळाला नव्हता. आन त्ये परतून येशीक चाल व्हतं. त चोर म्हन ''तू कोन?'' आम्हाली पानी पियाचाय हांडा उतार खाली.'' त मंग हांडा उतारला खाली. चोरांनी पाह्यला त हांड्यात सोनाच नद्र पडला. तमंग त्येलाच टाकला मारून. मंग त्येनी चौघांनी इचार क्येला, ''ह्या पैशाली पाहून काय करता? खाता निस्ते पैस्याली.'' गावात यक हलवायाचा दुकान व्हता. त म्हन काय कायतरी आनुन खावा. दोघं राह्यलं हांड्यापाशी आन दोघं आलं हालवायाच्या तीठं त्येनी घ्येतलं लाडू. त्येंली खायाला चांगलं लाडू घ्येतलं आन हांड्या पसले दोघांली इसाचं लाडू. आन त्येंली वाटला देऊ त्यॅली खायला मग हांड्याधरल्या पोरांली वाटला का त्यें लाडू घीऊन आलं का त्येंली पानी आनाया लावू आन दीऊ इहिरीत लोटून. मंग त्येंनी तसाच क्येला. त मंग त्ये ग्येलं मरून. आन इकडं आल्याव येंनी इसाचं लाडू गपागपा खालं त त्येबी ग्येलं मरून. आन दारव्याचा हंडा तसानतसाच रयला.

**– अहिलाजीबुवा पट्टेकर, रणद बु.**



## कथा क्र. ७ – ''सीताची गोष्ट''

यक व्हता राजा त्येचा नाव व्हता दशरथ. त्येला तीन बायका. यकीचा नाव व्हता कौसल्या, दुसराचा नाव व्हता सुमीतरा, आन तीसरीचा नाव व्हता केकायी. केकायी व्हती आवाडती आन दोघी व्हत्या नावाडत्या. आवडतीला दोन पोरा आन नावाडत्याली यक यक पोऱ्या व्हता. करता करता बराच दिस लोटलं. त दसरथ राजा म्हातारा झाला. त मंग त्येला इचार पडला का गादीव कोनला बसवावा. आवाडतीची पोरां व्हती बारीक आन नावाडतीची पोरां व्हती मोठाली. आन आवाडतीला दसरथ राजाना उदुगर वचन दिला व्हता का तू ज्या मांगशील तो म्या दियाला तैयार हाये. त आवाडतीना सांगीतला का, ''मह्या भरताली बसव गादीव आन शतृगुनाली कर परधान आन नावाडतीची राम लक्षेमन आन रामाची बायकू सीता त्येंली चौदा वर्ष वनवासाता पाठीव.'' तसा राजा पका चिंतात पडला का आता काय करावा. नावाडतीच्या पोरांली गादीव बसवावा त आवाडतीचा वचन मोडतो आन आवडतीच्या पोरांली गादीव बसवावा तर मंग परजेचा दोस लागतो. त्येचा मन असा व्हता का रामाली गादीव बसवावा. तेव्हढ्या गावचा मन तसाच व्हता. त मंग आवाडतीचाच आयकावा लागला. आन राम लक्षेमन आन सीता ग्येली वनामंदी आन तवा भरत आन शतृंगुन ग्येलत्ये त्येच्या मामाकं. त त्ये माघारी आलं. त्येला समाजला का राम आन लक्षेमन वनामंदी त मंग त्ये आईली म्हनाल, ''आग चांडाळणी त्वा त्ये ह्या काय क्येला आता आम्हाली राज नकु.'' मंग भरत ग्येला रामाच्या शोधासाठी, त्येना इठतीठ, इकील्या तिकील्या दिसंना गंज पाह्यला तर त्येली काय दिसंना. मंग त्येली कळला का त्ये चित्रकुट पर्वताव ग्येलं अस. तवा तो त्येंठ ग्येला त मंग त्येली त्यां भेटली. त म्हन, ''तुला गादीव बसण्यासाठी इयाला पायजेल.'' त मंग राम म्हन, ''मी आता येनार नाही.'' मला आईला दिलंला वचन मोडता येनार नही. मह्यावाला वनवास पूर्ण झाल्या तो पतुर मी येनारनही. तवर तू गादीव बस.'' मंग भरत निंगून ग्येला.

इकड राम आन लक्षेमन आन सीता इकडं फळ खाऊन दिवस काढीत व्हते. लक्षेमन वनात जायाचा आन फळं आनायचा. पर तो रानातून खाऊन यीयाचा नही. राम सीताच्या मनात तो खाऊन येतोय. तो दर दिवस उपासीच राह्याा.

असा करता करता रावनाला कळला का रामलक्षेमन आन सीता वनात हायेत. तवा मारीच आन रावन राक्षेसाना ठरावला का सीताला पळून नियाचा.

त मंग मारीच राक्षेसाना घेतला हरनाचा रूप. तो झाला सुंदर हरीन आन रावनाना गोसायाचं रुप घ्येतला. आन सकाळचंच रामाच्या झोपडी म्होरून निंगाला. तथा सीताना पाह्यला आन म्हन,''का या हरनाचा काताडा काढून आना आन माला चोळी शिऊन द्या.'' त मंग रामाला धनुषीबाण घ्येतला आन ग्येला हारनाच्या मांग धावत. त त्ये हारान हातीच लागनी. त मंग राम पळून पळून थकला व्हता. त्याना मारला बान तसाच हरान पडला खाली व त्येचा झाला राक्षेस आन त्येनी रामाचा आवाज काहाडला. म्हन, ''हा सीता हा रामा धाव'' त त्ये ग्येला सीताच्या कानावं. त सीता म्हन का लक्षेमना तुमी रामाली पाह्या जावा, त लक्षेमन म्हन, ''ह्ये मग मी जातो पर मी यंठ यक रेषा आखून ठिवीतो. ती वलांडून जाऊ नको. ग्येलीत इपरीत घडन. आन जो कोन वलाडील त्येची राख होईल. त तसाच यक गोसावी आला लक्षेमन निंगून ग्येल्याव. म्हन, ''भिक्षा वाहाड माई.'' त सीताय गोसायाला द्याया काहीच नव्हता, ती फळ घेऊन आली. म्हन, ''धर'' त तो कुठ पुढ येतोय म्हन, ''मला बाहीर यीऊन भिक्षा दी नहीत इठच जीव दीन आन मरन.'' त मंग ग्येली म्होर आन जवळ जाऊन भिक्षा वाढाया लागली त तसाच गोसायाचा रूप ग्येला पालटून आन दहामुखाचा रावन सीताच्या नद्र पडला. त्याना सीताला घ्येतवा खांद्याव आन घाला लंकाला. तीना लय मागला पर कानी आला नाही. मंग तीना गुडग्याच्या खाल्या पदर फाडला आन समदं डाग त्येच्यात बाहांदलं. आन जीठं वारसेना बसली व्हती हांगी त्यठ टाकून. त मारवतीना केला उड्डान आन नीट आकाशात उडाला आन नीटच ग्येला. पर रावन लई काफेर, त्यो गेला आडवा तवा गाठ व्हतीत सीताला सोडावलांच आसता.

आता राम आन लक्षेमन फिरून येत्यात त तीठ कुठय सीताचा पत्या. सीता पार कुठंच दिसती तथा राम पार सीतासाठी यडा झाला. झुरतमुडात एका घाल झुरात मुडात डोका घाल तरी सीता नद्र पडानी. तवा चालं आसच फिरत तवा त्येंली वचंद्रा दिसली. व त्ये लामच रयलं. इकडं मारवतीना आईला विचारला, ''कारं महा बाप कुठं?'' त्येची आज म्हन का, ''जो तुला म्हनल का त्येपय माकडाची सोनेची लंगुटी.'' तसाच मारवती उडाला आन ''आ'' ''आ'' करीत रामाक आला. तवा रामाना त्येला जवळ घ्येतला आन त्येवा संमदा सांगला. त मारती म्हन, ''यक गोसाई सीता आईली घीऊन वाला व्हता. त मी ग्येलो नीट आम तो ग्येला आडा नहीत तसाच आनला आसता. तवा मारवतीना सीताची खून दावली. मंग रामाना ती कामगीरी मारवतीव सोडून दिली. मारवती ग्येला सीताला शोधाया. त्येना इकतीक पह्यला. त्येला काय सीता मदरं पडनी न



म्हन आता फक्त उरला आशोकबन. तीठ जाया लागला व त्येला पर्वत आडवा आला. तो त्येच्याऊन उडाला आन सीता आईक ग्येला. आन रामाची अंगठी दावली. पाया पडला आन म्हन, ''आये, लय भूक लागली गड्या.'' त म्हन, ''तुला जेवाया काही नही. पर मळ्यात जाय आन खाली पडेल खाय. तीठ एक राक्षेस हायेत तवा नीट जायाचा.'' तवा मारवती ग्येला बायात त शेपचा इळखा घालून तो झाड खाली दिवाचा टाकून पर त्याना काय वरचा खाला नही. त्याना संमदा बगीच्या नासला. तवा त्या माळयाना पाहयला आन तसाच मारवतीना यक झाड आणला आन त्येच्या मांग लागला. सकहढ्यबी माळी ग्येलं पळून. त मोठा माळी ग्येलं पळून. त मोठा माळी म्हन, ''दावारं कुठ्य तो बांदार, मी का त्येली गरागरा फीरून आन खाली आपटीतो.'' तवा मारवतीना ह्येरला आन त्येच्या मांग लागला. मंग ग्येला पळून आन रावनाला सांगला. त रावनाना त्येला बोयला. त्येली जटायूचा अनुभव व्हता त म्हन, ''तुहा मरान कह्यात रं'' त मारवती काफेर व्हता तो म्हन, ''महा मरान मह्या शेपत हावे.'' त मंग रावनाना त्येच्या शेपला चिंध्या बांधाया सांगातल्या. आनजेतून छाया सांगीतला. पर मारूवती गपच व्हता. संमता लंकारी पांघुरना उलागली पर शेप काय आवरना. तवा रावन म्हन का, ''आता सीताच पांघुरन आनारं.'' तवा शेप घेतली आखडून. मंग शेप दिली चेतून व तो तसाच उडाला आन राजवाड्याव ग्येला. त्या राजवाड्यातून त्या राजवाड्याव त्येनी संमदी नगरी टाकली जाळून आन पार आवा आन बापे संपदयांना जाळाया लागला. तवा सीता त्येला जाया सांगला. मंग ग्येला यका नदी व त नदी म्हन, ''मह्यात शेप बुडु नको. मह्यात जीव हायेत त्येव्हेढेबी जातील मरून. मी जोराना यक ढीसाळा हानते आन तुही शेप इझीते.'' तवा मारवतीला दया आली आन म्हन, ''बरां. तवा मारवतीचा यक आसरू पाऱ्यात पडला व तीठ व्हती मगर. तो मगरीना गीळला. आन ती गरवार रयली. त्येवा झाला पोऱ्या त त्येचा नावा मकरधुत व्हता.

सीताना मारधतीला संगला व्हती, ''जवा तुमी रावनाचा नायनाट कराल तवाच मी तुमासंग येईल नहीत येनार नही. मंग ग्येला राम आन लक्षेमनाकड आन त्येनी सांगला का सीतासुखाची हाये, पर रावनाचा नायनाट केल्याबीगर ती काय आया तैयार नही.

त मंग संमदक वानर सैन आन राम लक्षेमन भिंगाले युद्ध खेळाया. मारवती राम लक्षेमन निलवंती जींइवंती हा संमदा वानर निंघाला. तवाच रावनाचा कडका लागला का राम लक्षेमन युध खेळाया आलत. त रावन येऊन ग्येला त लक्षेमनानं

त्येचा नाक कापला तवा त्येना पान्यात पाह्यला व त्येली पका राग आला. मंद येव्हढे रावन आलंत त्येका मरत नसं मुंडका पडलाका परत तसान तसाच व्हयाचा. त्यांचा सात दिस युध चाला पर कोन मरान तवा मारवतीला कडका लागला का काय तरी भानगड हाये. तो ग्येला पाह्या त त्येला यक राक्षेसाचा घर लागला. तो राक्षेस ग्येलता बाहीर त त्येना राक्षेसीनीला इच्यारला का रावनाचा मरान कह्यात हाये?'' तवा ती म्हन, ''काम मह्या पलंगाव यक रात आलं पायजेल?'' त मंग मारनतीना संगातला, ''जर आपशकून झाला त मंग येनार नहीत.'' तवा ती तैयार झाली. ती म्हन, ''त्या रावनानका घोंगारे ठुल्या आसत आन त्यें आम्रित आतून शिपीत्यात. त्यंठ यक अम्रिताची युधधी असं.'' त मंग मारवती गोंगाऱ्यांक ग्येला आन त्येंली म्हन, ''तुमी रामाली साह्य केला पायजेल. तुमचा चांगालं व्हयील. आन नही करान त मी तुमाली मारून टाकीतो.'' त मंग त्ये तैयार झालं. मंग रामाक मारवती आला आन म्हन, ''तुला रावनाच्या पलंगाव यक दिवस जाया पायटेल. पर जर पलांग मोडला त तर मंग मागारी या.' त मंग समदं रावन मारलं त मंग इंद्रजीत रावनाचा पोऱ्या व्हता तो आला. तो का ढंगामंडून लढाय खेळायचा. त्येना लक्षेमनाला पार बेशुध केलता. मंग लक्षेमनाला अजुक सुधीवर आनला झाडपाल्याचा आवखद दिऊन. मंग इंद्रजीताला मारला. तसाच रावन लई रागावला. तसीच त्येची आन रामाची गाठ पडली त रामाना यकाच बानात त्येली मारला. आन मंग सीता रामासंग याया तैयार झाली. मंग राम गादीव बसला त संमदया नगरीला आनंद झाला. तवा रामाला चौदा वर्स झाल्याव घरी जायाचा व्हता. तवा त्याना तो राज रावनाच्या भावला बिभीषनाला दिला आन चवदा वर्स वनवास कथन आन मंग घरी आला. त भरतांना त्येला राज दिला आन मंग त्यें संमद सुकात राज कराया लागला. पर मारवती काय त्यंठ रयला नहीत वा सीता आईला म्हन, ''मला का इठ रायाचा नही.'' तवा सीता आई म्हन, ''का तू संमद्या गांवालीजाय आन रामाचा जय सांग परत्येक गावात तुझा मान पहयला लागन.'' तवापून परत्येक गावातला मारवतीचा देवळ झाला. आन मारवती रामाचा नांव सांगून हिंडतोय.

**– रामदास संतु बांबरे – कोदनी**

* * *



# ४.

# वाक्प्रचार व म्हणी

## (१९७६ ते १९७९ च्या क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार प्रातिनिधिक)

### १. वाक्प्रचार

मेटा देणे – लाथा मारणे
माग चालणे – माग काढून ठेवणे, ओझे उतरणे
लगीन निघणे – लग्न ठरणे
मार्ग धरणे – चालू लागणे, पळ काढले
झुरक मारणे – चमक मारणे, उठून दिसणे, दिमाखाने मिरवणे
धक्का बसणे – घाबरणे
सरण रचणे – मौत करणे
नवर करणे – लग्न ठरविणे, लग्न जुळविणे
याही करणे – लग्न ठरविणे, लग्न जुळविणे
रस्ता बांधणे – रस्ता तयार करणे, रस्ता रोखे
माग लागणे – रस्ता सापडणे, सुगावा लागणे
कामाव जाणे – बातमी समजणे
हाती लागणे – सापडणे, आवाक्यात येणे
कबूल करणे – मान्य करणे, देऊ करणे, नवस करणे
वचन मोडणे – शब्द मोडणे
काट्या घालणे – काटे पसरणे, काटे लागणे
विवित धुसणे – युक्ती सुचणे
विचार करणे – विचार करणे

शा देणे - शिवा देणे, वाईट चिंतणे
युद्ध खेळणे - युद्ध करे, लढाई करणे
पाजाया लागणे - दूध काढणे
लाथ मारणे - झिडकारणे, टाकून देणे, सोडून देणे
कडका लागणे - सुगावा लागणे, बातमी लागणे
ठनका देणे - दंश करणे, आघात करणे
पलंगी जाणे - संभोग करणे, रत होणे
चमक भरणे - चमकी भरणे, भोवळ येणे
पायदळी घालणे - पायाखाली तुडविणे, किंमत न देणे
झाडपानी करणे - बागेची स्वच्छता राखून पाणी भरणे
दिवस काढणे - उदरनिर्वाह करे
जीव सोडणे - जीवावर उदार होणे
पोटुशी होणे - गरोदर राहणे
दणका उठणे - जोरात सुरू होणे
पाट घाट काढणे - चकोटा करणे, चंपी करणे
खोड मोडणे - जिरविणे, वाईट सवय मोडणे
गाय पाजणे - गायीची धार काढणे, दूध काढणे
झुंबड होणे - लढाई होणे, गोंधळ होणे
झोंबी खेळणे - कुस्ती खेळणे
टाकून बोलणे - निर्भत्सना करणे
डोकी करणे - केस कापणे, श्मश्रु करणे
दिवस काढणे- कसाबसा उदरनिर्वाह करणे
दिवस घालणे - उत्तरक्रिया करणे
धर्माच्या माला लागणे - धर्माला काळे फासणे, अधर्म
नद्र पडे - दिसणे, लक्षात येणे
पाना वाटणे - पाहुणचार करणे
पूस घेणे - सल्ला घेणे, विचार घेणे
पावसाची फळी - दाट काळ्या ढगांचे आगमन
बेत पाहणे - नसा उतरविणे
मागे लागणे - त्रास देणे, चिडविणे
राळ होणे - नाश होणे, फज्जा होणे, गाळ होणे



लफड होणे - भानगड होणे, चोरटा शरीरसंबंध होणे
झन्ना करणे - शब्दाला लागणे, नवस फेजणे
झीमते बोलणे - टोचून बोलणे
शिप्याची चोळी - नखरेबाज चोळी, मुद्दाम शिवलेली

## २. म्हणी

(१) गळ्यात नही गडी अन भलताच झील ओढी -
कुणाचा कुणाला मेळ नाही
(२) भरवशाची मॉट अन पहे मही वाट -
भरवशाच्या म्हशीला टोणगा
(३) गवुत्या बसला जेवाया आन ताका बरूवर शेवाया -
गाढवाला गुळाची चव काय
(४) हागून आला, आन तुरी शिजल्या काय -
उतावळेपणा
(५) मी नही खात, आन महा जीव त्यात -
ढोंगीपणा
(६) भामट्याला हानला पिढा, आन तो म्हन बसा दिला -
धूर्तपणा
(७) येईना ना जावना, भाजीभाकर खायना -
उगाच मोठेपणा
(८) हातात नही बांगडी, अन गोसाव्याची रांगडी -
उठवळपणा
(९) घरात नही दाणा, अन बाजीराव म्हणा -
उगाच मोठेपणा
(१०) जवळ नही बाध्याला, आन बायकू कराया नादावला -
नसता छंद
(११) घरात नही आन, आन वाकडीच मान -
नसता मोठेपणा
(१२) खायाला फुटाणं, अन टांग्याला आठानं -
नसता मोठेपणा

(१३) येडी हळद, अन का लवणाचा नाश –
नसती उठाठेव

(१४) सात सुग्रणी, आन भोपळा आळणी –
एक ना धड

(१५) आळ्याचा ना भोळ्याचा, पंढरपूरच्या पोळ्याचा –
निरुपयोगी

(१६) आळदं ना बेरस शिळं ना पारसं –
निरुपयोगी

(१७) आड्यात ना उड्यात, घस गेले खुव्यात –
सगळेच मुसळ केरात

(१८) असला सळ्या एव्हढा तर सांगायचा थाळ्याएवढा –
पराचा कावळा

(१९) एक हात लाकूड, आन नव हात धपली –
काम थोडे बोलणे अधिक

(२०) चव ना धव, आन पोटभर जेव –
निरुपयोगी

(२१) येईना आन जायना, मवा नाव मेवना –
निरुपयोगी, नसता मोठेपणा

(२२) सारव भीती म्हन कोपरे किती –
कामापेक्षा बडबड जास्त

(२३) शू म्हण कान वर –
अतिशय संवेदनशील

(२४) कड्या घ्यातलं खांद्या घ्यातलं पोर लोकाच
हींग घातला जिऱ्या घातल्या पीठल लाखाचं –
लोकाच ते लोकाच

(२५) शेवईना काही, आन जीवाची लाही –
निरुपाय होणे

(२६) इरीवर इवाला, आन चुलीवर देव्हारा –
नको त्या जागी नको त्या गोष्टी

(२७) मोठ घर, आन पोकळ वासा –
दिखाऊपणा

(२८) कधी ना मिळं, आन गटक्यान गिळं –
आहोपीपणा

(२९) आपाई बोल सुभाईला, आन बुगाजी चाली उन्या गलीना –
बोलण्यात अर्थ नसणे

(३०) ज्या नही मह्या गायी, त्याच मला दायी –
नको त्या गोष्टी वाट्यास येणे

(३१) पाळण्यापुढं निजुन दी, नही तं धरावं उळा माजन दी –
बाप दाखव नाहीतर...

(३२) आंबला आंबला आन चट झोंबला –
निरुपायाने करावेच लागणे

(३३) खरा सांग नाऱ्या, म्हण थोडक्या झाल्या साऱ्या –
नाऱ्या शुभ बोल

(३४) उठ रं कड्या मजव पड, आन हातापायाचा चुराडा कर –
येरे उद्योगा आणि बैस माझ्या खांद्यावर

(३५) गाढवा गुळ जनाया लागली मंग कुंभाराला मडकीच घडाया नको
फुकट धन मिळते तर काम कशाला

(३६) आंधळा सांग गोठी, आन बहिरा गाडा कुटी –
निरुपयोगी असणे

(३७) एक बहिऱ्या, म्हन वडाला कैऱ्या –
विपरीत कथन

(३८) मुंड्याखाली आरी, आन चांभार पोर मारी –
काथेत कळसा अन गावाला वळसा

(३९) दी व पाय म्हन लोंबलाय काय –
नसत्या चौकश्या

(४०) एकात एक नाही, आन बापात लेक नही –
कशात काय अन फाटक्यात पाय

# ५.
# शब्दकोश

**संक्षिप्त चिन्हांचे अर्थ**

| | | | |
|---|---|---|---|
| (पु) | : पुल्लिंगी नाम. | (सं) | : संकृत. |
| (स्त्री) | : स्त्रीलिंगी नाम. | (प्रा) | : प्राकृत |
| (न) | : नपुसकलिंगी नाम. | (हिं) | : हिंदी, हिंदुस्तानी. |
| (सना) | : सर्वनाम. | (अर) | : अरबी. |
| (वि) | : विशेषण. | (फा) | : फारशी. |
| (क्रि) | : क्रियापद. | (पोर्तु) | : पोर्तुगीज. |
| (क्रिवि) | : क्रियाविशेषण. | (इं) | : इंग्रजी. |
| (शअ) | : शब्दयोगी अव्यय. | (दे) | : देशी. |
| (उद्गा) | : उद्गारवाचक अव्यय. | (का) | : कानडी. |
| (उअ) | : उभयान्वयी अव्यय. | (ए.व.) | : एकवचन. |
| | | (अ.व.) | : अनेकवचन. |

**अ**

अर्धिकाठी (वि.) – निम्मे, एक मोजण्याचे परिमाण, अर्धा हिस्सा.

अरसं (पु.) – आरसा (ए. व) (अ. व) प्रतिबिंब दाखविणारी काच.

अवं (सना)– (संबोधन) अहो, (उदगा.) मोठ्याने मारावयाची हाक.

अवल (वि.) – पहिला उत्तम, प्रमुख, अतिशय मोठा, उडव. (अर.)

अस्तरी (स्त्री) – अस्तुरी, पत्नी, लग्नाची बायको (सं.)

**आ**

आवू (स्त्री) – अवा, स्त्री, स्त्रीचे आदरार्थी संबोधन.

आकळणे (क्रि.) – ओढणे, निग्रह करणे, ताब्यात ठेवणे, थोपविली जाणे (सं.)

आकाजा (स्त्री) – अक्षयतृतीया (सं.)

आटी (स्त्री) – यत्न, परिश्रम, खटपट, मिठी, रांग, अढी, अडकवण.

आखा (वि.) – आख्खा, अखंड, धड, एकूण, सर्व (सं.)

आखाडी (वि.) – आषाढी (स्त्री), आषाढी एकादशी (सं.)

आखाड्या (वि.) – आषाढातील आग (स्त्री), भुकेचा डोंब, ओढा, जाळ.

आघुळ/आंघुळ (स्त्री) – आंघोळ, स्नान (सं.)

आडा (पु.) – आढा, खांदा, कणा, घराचे आढे.

आदळ (पु. स्त्री) – धक्का, हेलकावा, धाव, झोंबी.

आताच्या (क्रि.वि.) – यावेळी, हल्ली, सांप्रत, येथून पुढे.

आभंड (वि.) – चपळ, चंचल, अमर्याद.

आहार (पु.) – निखारा, विस्तव, फुपाटा (सं.).

**इ**

इज (स्त्री) – वीज.

इठच (स.ना). – इठ, येथे.

इमान (न.) – विमान.

इरणे (न.) – पावसाळ्यात छत्रीसारखा उपयोग होतो असे. पळसाच्या किंवा सागाच्या पानाचे शिवलेले.

इसावणे (क्रि.) – आंघोळीकरिता गरम पाण्यात गार पाणी घालून योग्य पाणी तयार करणे.

इंगीलो (क्रि.) – यंगणे, चढणे.

इंद्रियाई/इंद्री (स्त्री) – निर्गुडीचा पाला.

**ई**

ईज (क्रि.) – ए.

ईख (न.) – विष.

**उ**

उखळी (स्त्री) - तांदूळ सडावयाचे, कांडण्याचे उखळ दगडी साधन.

उगणे (क्रि.) - उगवणे, वर येणे.

उजुक (अ.) - उजुक पुन्हा.

उडणे (क्रि.) - उडी मारणे, संभोग करणे.

उठबसन (क्रि.वि.) - उत्साहाने, उठबस कथन.

उतार (पु.) - नदीचे उथळ पात्र, नदीचा उतार.

उतीव (स्त्री) - लाकडाची एका प्रकारची चौकट, चुलीच्यावर टांगतात, पावसाळ्यात पदार्थ भिजू नयेत म्हणून पदार्थ त्यावर ठेवतात.

उभी सडक (स्त्री) (वि) - राजमार्ग, मोठा रस्ता, हमरस्ता.

उमती (स्त्री) - उमेद, खात्री, उत्साह असलेला.

उमातर (पु.) - उंबरा, घराच्या मुख्य दरवाजाचे खालचे लाकूड.

उरावटी (कि.वि.) - उरावर, छातीवर.

उली (वि.) - लहान, थोडे.

उल्फा (न.) - लग्नानंतरचे भोजन, मेजवानी (अ.र.).

उसरणे (क्रि.) - गळून जाणे, ओसरणे.

उस्तरणे (क्रि.) - उलगडणे.

**ए**

एकसरी (न.) - एक प्रकारचे उंच झाड.

एवढी (वि.) - या एवढी बार, ह्यावेळी.

**ओ**

ओबन (पु.) - ओंबन, घराच्या छपराखालच्या कामट्या, गवत.

**अं**

अंगावर जाणे (क्रि.) - बाजूला येणे, हरणे.

अंबराई (स्त्री) - आंब्याची गर्द झाडी.

**क**

कऊधर/कवधर (स्त्री) - एक प्रकारची वनस्पती तिचा कंद खातात.



कटणे (कंठणे) (क्रि.) - सोसणे.

कडका (पु.) - सुगावा.

कड (स्त्री) - बाजू, तीर.

कढवणे (क्रि.) - तळणे.

कड्याचा रान (पु.वि.) - डोंगराळ रान.

कराड (पु.वि.) - नदीची दरड, सुकलेले रान.

करडा (पु.) - सुकलेले रान.

करांडणे (क्रि.) - कुरतडणे.

कर (क्रि.) करणे, कथन आणणे, लग्न कथन आणणे.

करंज (न.) - एकप्रकारचे झाड.

कवळी (स्त्री) - मोळी, गठ्ठा, गर्दी, दोन हातांच्या विळख्यात मावेल असे.

कसोकशी (वि.) - अतिशय केसोकशी, कसुकसी, खूप.

कस्यापाई (स.ना.) - कोणत्या कारणास्तव.

कळ निघणे (क्रि.) - दम धरणे, चैन पडणे.

कळणे (क्रि.) - समजणे.

काकण (न.) - कंकण, हातातील कडे (सं.).

काकी (स्त्री) - काकवी, कहावी, उसाचा गूळ तयार होताना पाक.

कावळ (स्त्री) - एक प्रकारचा दागिना.

कातवडी (पु.) - काथोडी, कातकरी.

किकळी (स्त्री) - बासरी, पावा.

कामट्या (पु.) - बुरुड.

कुकू (न.) - कुंकू.

कुकाची (वि.) - शुभ.

कुरकुला (पु.) - टोपला.

कुशी (स्त्री) - कुस.

कुसुबी (वि.) - कसबी.

कुंज (पु.) - ताटवा, देवळाभोवतालचा भाग.

कुंदा (पु.) - एक प्रकारचे गवत.

कुंधी (पु.) - कुणबी.

कुलंबी (पु.) - कुणबी.

केसकेशी (क्रि.वि.) – अतिशय.
केळी (स्त्री) – मातीची घागर.
कोचरणे (क्रि.) – खाचा पाडणे.
कोण (स.ना.) – कोण
कोळवाडा (पु.) – कोळीवाडा.

**ख**

खतावणे (क्रि.) – खंतावणे, हूरहूर वाटणे, किळसवाणे.
खण (पु.) – चोळीपुरता कापडाचा तुकडा.
खरवडणे (क्रि.) –ओरखाडणे, खाजवणे.
खिन (पु.) – क्षण, खिनभर, क्षणभर.
खेकड (पु.स्त्री) – एक प्रकारचा दहा पायांचा प्राणी. खेकडी मोडणे (क्रि.) – खेकडे पकडणे, खेकडीचा पेंद (पु.) – खेकडीचा पाय.
खुडणे (क्रि.) – तोडणे.
खुण (स्त्री) – खून.
खोड (स्त्री) – सवय, दुर्गुण. खोड मोडणे, सवय नष्ट करणे, जिरविणे.
खोड (न.) – झाडाचा बुंधा.
खंगळी (स्त्री) – खड्डा, दरी.
खंडार (स्त्री) – रुंद पात्याची तलवार.

**ग**

गजरा (पु.) – पुष्पहार, एक दागिना.
गपकिन (क्रि.वि.) – अचानक.
गायका / गायखा (पु.) – गायींना चरावयास नेणारा.
गारुळा (स्त्री) – गांधी माशी चावल्याने येणारी पुटकुळी.
गा (क्रि.) – गाणे म्हणणे.
गुजर (न.) – गुजराथवाणी.
गुतवणे (क्रि.) – गुंतवणे, अडकवणे.
गेठा (पु.) – वैलाच्या गळ्यातील रंगीबेरंगी माळ.
गेळा/गेळ (न.) – थान, कास, खुराच्या दोन भागांपैकी प्रत्येक भाग.
गंगा (स्त्री) – नदीचे नाव, गंगान– गंगेतून.



गंभीनळा (पु.) – मोठा नळ.
गंभीरे (वि.) – मोठे.

**घ**

घडणे/घडविणे (क्रि.) – तयार करणे.
घवाघवा (क्रि.) – रवीचा ताक घुसळताना येणारा आवाज.
घाऊ (पु.)– घाव, टोला, प्रहार.
घालणे (क्रि.) – शिजवणे. घालणे (क्रि.) – लावणे, अंथरणे.
घियाळ (क्रि.वि.) – घायाळ.
घेणे (क्रि.) – घेणे.
घोळख (पु.) – घोळका, जमाव.
घोंगरा (पु.) – मृंग, (सं.)

**च**

चहरी (वि.) – शहरातील.
चहर (न.) – शहर.
चौबाज (क्रि.वि.) – चारी बाजूंनी.
चाणा (पु.) – चांदणे.
चारे / चोराची (वि.) – चारी चौऱ्यांशी.
चाल (स्त्री) – रीत, रुढी, पद्धती.
चायने (क्रि.) – चावणे. चायला (भू.)
चितुर (पु.) – चोर (न.) एक पक्षी.
चिता (स्त्री) – चिंता.
चिंचपेटी (स्त्री) – स्त्रियांचे एक कंठभूषण.
चुडा (पु.) – काकण, बांगडी. स्त्रियांचे सौभाग्यलक्षण.
चेतवणे (क्रि.) – क्षुब्ध होणे, पेटविणे.
चैत (पु.) – चैत्र महिना.
चोंढी (पु.स्त्री.न.) – खाचर, खाच, खळगा, खंगळ.

**ज**

जग (न.) – लोक, विश्व, पृथ्वी.

जमाना (पु.) - हंगाम, ऋतू, काळ.
जवा (उ.अ.) - जेव्हा.
जळणे (क्रि.) - भाजणे.
जाणे (क्रि.) - जाणे.
जाळी (स्त्री)- कुंजलता गृह.
जुतणे (क्रि.) - जुंपणे.
जुपणे (क्रि.) - जुंपणे.
जोडी (स्त्री) - जोडवे, अंगठ्याशेजारच्या बोटात घालावयाचे चांदीचे वळे.

**झ**

झळई (स्त्री) - दशी.
झाडणे (क्रि.) - स्वच्छता करणे.
झिगझिग (क्रि.वि.) - घासण्याचा आवाज.
झिनानी (क्रि.वि.) - जोरात.
झिरीमिरी (क्रि.वि.) - बारीक, धार, हळूहळू.
झुकणे (क्रि.) - ठुमकणे.
झुतरी (स्त्री) - लहान ओहळ.
झुतरमुड (न.) - लहान झुडुप.
झुरुक (स्त्री) - चमक.
झुंबड (स्त्री) - लढाई, गोंधळ, गर्दी.
झोपाटा (पु.) - ताटी, झोपडीचे दार, कुंपणाचे दार.
झोंबी (स्त्री) - कुस्ती.
झॅप (स्त्री) - झेप.

**ट**

टचकरी (पु.स्त्री.वि.) - कुर्रेबाज, तोऱ्याची.
टाकणे (क्रि.) - सोडणे, कमी लेखणे, टाकून बोलणे, निर्भत्सना करणे.
टिरी (स्त्री) - टेरी, पार्श्वभाग.
टिळा (पु.) - कुंकू लावणे, लग्न जमणे.



**ड**

डवना (पु.) - टेंभा, एक प्रकारचे झुडुप. त्याच्या काड्या टेंभ्यासारख्या उपयोगात आणतात.
डागा (पु.) - दागिना.
डाळ (न.) - वरण, डाळ घालून केलेले कालवण.
डव (पु.) - डोह.
डोका (पु.) - डोके, डोकी करणे, केस कापणे, श्मश्रू करणे.
डोई (स्त्री) - डोके.

**ढ**

ढव (पु.) - डोह.
ढिसाळा (पु.स्त्री.न.) - लाटा, तडाखा, आदळ.
ढोन (न.) - खोड, ढोली.
ढोनक (न.) - ढोली, खोडातील पोकळ जागा.

**त**

त (उ.अ.) - तेव्हा, नंतर.
तर (श.अ., उ.अ) - तेव्हा, मग, नंतर.
तवा (उ.अ.) - तेव्हा.
तसाच (उ.अ.) - त्यावेळीच, त्याबरोबर, लगेच.
तस्कर (पु.) - मारेकरी.
तळा (पु.) - तळे, तलाव.
तास (स्त्री) - पिकांची ओळ.
तिकून (स.ना.) - त्या बाजूने.
तिठ (स.ना.) - तेथे.
तितूर (पु.न.) - एक प्रकारचा पक्षी.
तिरीत (न.) - तीर्थ.
तुबरणे (क्रि.) - उपटणे.
तैली (स्त्री) - तवली, मातीचे पातेल्यासारखे भांडे.
तिरगुन (वि.) - तिनपट.

## थ

थडक (क्रि.वि.) - सरळ सरळ, एकदम.
थटणे (क्रि.) - नटणे.
थोराईन (स्त्री) - महिमा, मोठेपणा.

## द

दरदरा (क्रि.वि.) - भराभर, अतिशय भयंकर.
दरबार (पु.) - सभामंडप.
दमाना (क्रि.वि.) - हळूहळू.
दम (पु.) - श्वास.
दशी (स्त्री) - तार, झळी, धागा.
दाडे (न.) - जाणे.
दाडी (स्त्री) - गर्दी.
दावण (स्त्री) - गुरे खुंटवण्याची जागा.
दाळमी (स्त्री) - डाळीचा एक दाणा.
दी (क्रि.) - देणे
दिंडी (स्त्री) - वारकरी लोकांचा भजन म्हणत चाललेला जमाव, प्रेतयात्रा.
दुडी (स्त्री) - घागर.
देर (पु.) - दीर.
देणे (क्रि.) - देव, देव्या, द्यावी.
दैना (स्त्री) - वाईट स्थिती.
दंड (पु.) - काठ, जोड.
दंडनाळी (स्त्री) - एक प्रकारचा दागिना.

## ध

धाव (न.) - बीळ, भोक.
धावा (पु.) - पदर.
धांगड (वि.) - नाठाळ, बाहेरख्याली, वाट चुकलेली.
धांदल (स्त्री) - तारांबळ.
धुणा (न.) - धुणे, गाठोडे.
धोदी (वि.) - कंचरट, ना पिकलेली.
धोपा (पु.) - वाढण्यास उपयुक्त असे एक भांडे.
ध्यान (न.) - आठवण.

## न

नईमैती (स्त्री) - नवे तारुण्य.
नगीन (वि.) - नम्र.
नढंग (स्त्री) - एक क्रूर जनावर.
नदर (स्त्री) - नजर, नद्र पडणे - दिसणे.
नरस (न) - अद्‌भुत, भीतीदायक, शक्तीविषयी कल्पना.
नवट्या (वि.) - नवखा.
नवर (पु.) - नावेरा.
न्हनी (न्हानी) (स्त्री) - मोरी, स्नान करण्याची जागा.
नळी (स्त्री) - डोंगराला असलेली उभी कपार.
नाच (स्त्री) - नाश.
नाटकी (वि.) - जादुचा.
नाणी (स्त्री) - मोरी.
नाची (क्रि.) - नाही.
नाही (पु.) - न्हावी, नायी.
निघणे (क्रि.) - उगळणे, चालावयास सुरुवात करणे.
नितल (वि.) - स्वच्छ.
नितीव (कि.वि.) - भिंतीला टेकून उकीडवे.
निंबाची कवळी (स्त्री) - अतिशय गर्दी.
निंबार (स्त्री) (पु.) (न.) - एक प्रकारची भाजी, वनस्पती.
निर्माव (पु.) - निर्वाह.
निर्मळ (वि.) - शुद्ध, स्वच्छ.
निराण (न.) - नाक, जनावराची योनी, जननेंद्रिय.
निवद (पु.) - नैवेद्य.
नीघणे (क्रि.) - निजणे, नेघे-निजे.
नेटकूच (क्रि.वि.) - नुकताच.
नेम (पु.) - नवस, रोज, एखादी गोष्ट करण्याचा निश्चय.
नेवरी (न.) - एका शेताचे नाव.

प

पक (पु.) – पंक.

पडकी/मडकी (स्त्री) – छाती झाकण्यासाठी कोळणी बाया स्वतंत्र वस्त्र परिधान करतात.

पडणे (क्रि.) – होणे, येणे.

पडकणे (क्रि.) – सोकावणे.

पन्हा (पु.) – पान्हा.

पयणे (क्रि.) – पाहणे.

पया (पु.) – पावा, बासरी.

परसकांदा (पु.) – एक प्रकारचा कंद.

पर (डअ) – परंतु.

परच्यापर (क्रि.वि.) – परस्पर.

परायाची (वि.) – परक्याची.

पवा (पु.) – पावा, बासरी.

पवू (वि.) – दक्षणेवर लक्ष असणारे, पाकूड देवापुढील पैसे.

प्वार, पोर (स्त्री) – मुलगी.

पावे (क्रि.) – प्रसन्न होणे.

पाऊ (वि.) – पाय.

पाक (वि.) – अगदी, पूर्ण.

पांगरून (न.) – कपडा, वस्त्र.

पाती (स्त्री) – खळ्यातील मळणीसाठी जुंपलेल्या बैलाचा ओढ.

पानेरीन (स्त्री) (वि.) – पाणी आणणारी स्त्री.

पाभरी (स्त्री) – पेरणी करण्यास उपयुक्त अवजर.

पायतान (न.) – वाहाण.

पार (क्रि.वि.) – खूप, अतिशय.

पालवी (स्त्री) – सावली, (क्रि.वि.) जवळ.

पिटाळणे (क्रि.) – पळविणे, घालविणे, हाकलणे.

पिंड (पु.) – शरीर, उत्तरक्रिया करताना केलेली भाताची मुद, उंडी.

पिढे (न.) – बसावयास पाट.

पुतळी (स्त्री) – वर्तुळाकार, पैशाच्या आकाराची पदके, एक दागिनी.

पूस (स्त्री) – सल्ला, विचार.



पेरू (पु.) – एक फळ, पेरूचा – त्या रंगाचा.

पैण (स्त्री) – पैज, शर्यत.

पैस (पु.स्त्री) – उतारा, काटेरी झुडुप.

पोकळ (वि.) – आतून भरीव नसलेले.

पोकळणे (क्रि.) – जाणे, धावणे, उधळणे.

पोनसड (पु.) – नवीन व्यालेल्या जनावराचे सड.

पोता (पु.) – पोते.

पोहोत (डअ) पर्यन्त.

फ

फढी (स्त्री) – दाट गर्दी.

फास (पु.) – फासा (पु.) मासे पकडण्यासाठी जाळे, पाखरे धरण्यासाठी दोरी.

फुगीर (वि.) – शिष्ट, गर्विष्ठ.

फुटा (स्त्री) – झाडाची पाने.

फेगई (वि.) – खाष्ट, एक शिवी.

ब

बटू/बधू (वि.) – तुप, जास्त (अर).

बगा (पु.) – पाणी घेण्यासाठी केलेला खड्डा.

बस्ता (पु.) – गल्ला, थैली, गाठोडे, ठाण, दिंड, लग्नाची कापड खरेदी.

बोलावणे (क्रि.) – बवायलं–बोलाविले.

बहूला (न.) – बोहले, लग्नमौंजीत घातलेली चतुष्कोनी वेदी.

बाजुबंद (पु.) – दंडाला बांधण्याचा स्त्रियांचा दागिना.

बांकू (स्त्री) – पीक, धान्य यांचा नाश करणारा किडा.

बाबुल (स्त्री) – बाभूळ.

बारस (स्त्री) – द्वादशी.

बारी (स्त्री) – रांग, दोन डोंगरामधील दरी.

बाळी (स्त्री) – एक कर्णभूषण.

बी (श.अ.) – सुद्धा, देखील.

बुगडी (स्त्री) – एक कर्ण भूषण.

बेडी (स्त्री) – चोर पकडण्यासाठी वापरावयाचे साखळदंड.

बेलदार (पु.) – पाथरवट, खाणीतील दगड फोडणारा.

बोंडबाळी (स्त्री) – कानात घालण्याचा एक दागिना.

बोचा (पु.) – गुदद्वार, ढुंगण, अपानद्वार.

बोलणे (क्रि.) – मापणे, मागणे, सांगणे, मनोगत कळविणे.

बोली (स्त्री) – करार, ठराव, कबुली.

बोलणे (क्रि.) – फेकणे, दाट होणे, साकळणे.

बोळवण (स्त्री) – पाठवणी, निरोप.

बंडी (स्त्री) – अंगरखा.

**भ**

भगत (पु.) – देवलसी, देव अंगात आणणारी देवता घुमाम्रा.

भडतरी (पु.) – भ्रतार, नवरा.

भरतार (पु.) – नवरा.

भवणे (क्रि.) – त्रास होणे, संकट येणे.

भवा (पु.) – साधु.

भावा (पु.) – दिर.

भांग (पु.) – दोन्ही बाजूला केस सारून मध्ये तयार झालेली रेषा.

भिडणे (क्रि.) – सुरुवात करणे, पोहचणे, शिवणे.

भित (स्त्री) – भींत.

भीम (वि.) – मोठा भीमवाला (वि) मोठा.

भिल (न.) – बेल.

भींग (पु.) – भुंगा.

**म**

मजा (स.ना.) (पु.स्त्री) – माझा म्हणणे/मनणे (क्रि.) सांगणे, बोलणे, दावा करणे, म्हन, मन, म्हणजे भूतकाळी रूप.

मण/मीह (पु.) – एक प्रकारचे वजन, परिमाण.

मशी (स्त्री) – माशी.

महणे (क्रि.) – मावणे.

माखणे (क्रि.) – भरणे, फासले जाणे.

माता (वि.) – कोवळे, भाजलेले.

मातेर (क्रि.वि.) – मात्र, केवळ, फक्त, नसताच, नक्कीच.

मामेद (पु.) – मामा.

माव (स्त्री) – जादू.

माळ (स्त्री) – नवरात्रोत्सव, देवीला अर्पण करावयाची माळ.

माळी/माळ (स्त्री.पु.) – खडकाळ, नापीक असा भूमीचा उंच व विस्तृत प्रदेश.

मागणे (न.) – लग्न करण्यास मागणी.

मांडव (पु.) – उत्सव प्रसंगी केलेली शोभादायक सावली, जनता, लोक, नागरिक.

मांबस (न.) – मांस.

मी (सना) – मह्या – माझ्या.

मिटमिट (क्रि.वि.) – थरथर कापणे.

मुकाट (क्रि.वि.) – गप्प, शांत, मुके.

मुरसड (स्त्री) – मूर्च्छा, झीट.

मुरळी (स्त्री) – खंडोबाला वाहिलेली स्त्री, बोलावणे करावयास आलेला.

मुघडी (स्त्री) – बुगडी, एक कर्ण भूषण.

मुंढा/ळी/ळे (वि.) – शेपूट तुटलेला.

मेटा (स्त्री)– लाथ.

मेवना (पु.) – मेव्हणा, आतेभाऊ.

मेळा (पु.) – जमाव.

मोकार (क्रि.वि.) – खूप, अनिर्बन्ध

मोपाड (स्त्री) – दोन फणी, पाभर, एक शेतीचे अवजार.

मोडा/मोढा (पु.)– गुरांचा व शेतकामाचा सुगीचा दिवस.

मोटा/मोठा (वि.) – घोर, जाडा, जास्त, भयंकर.

मोरं/म्होरं (स्त्री) – अग्रभाग, पुढची जागा.

मोहरी (स्त्री) – तोंडाने वाजवावयाचे एक वाद्य, पुंगी.

मंदिल (पु.) – फेटा.

म्वाट (स्त्री) – गाडीडी.

## य

यकला (वि.) – एकटा.
यला/येला (स्त्री) – स्त्रियांचे एक बाहुभूषण.
यवार (पु.) – व्यवहार, शरीरसंबंध, बाजारपेठ.
यिरा/हरा (पु.) – काठ, नदीचा तीर.
येताळ/वेताळ (पु.) – भूतांचा राजा.
येढा (पु.) – फेरा, वेढा.
येंगणे (क्रि.) – चढणे.
येसावेस (स्त्री) – प्रवेशद्वार.
येव्हढा (वि.) – खूप, संपूर्ण.

## र

रयणे (क्रि.) – राहणे, नांदणे.
राऊळ (न.) – देऊळ, राजाचे राहण्याचे ठिकाण.
राईभोग (पु.) – भाताचा एक प्रकार.
राजहौस (वि.) – मोठी हौस.
रामसबा (स्त्री) – संपूर्ण सभा, सर्व लोक.
राढ (स्त्री) – नाश.
रिघणे (क्रि.) – प्रवेश करणे, घुसणे.

## ल

लगीच (क्रि.वि.) – ताबडतोब.
लढुबाळ (वि.) – गोजीरवाणे, मोहक.
लदा (स्त्री) – ब्याद, फेरा, संकट.
लफड (स्त्री) – भानगड, ब्याद.
लव (स्त्री) – पालवी.
लवू (स्त्री) – वेळाची काठी, खोलगट भाग.
लळीत (न.) – कीर्तन, नृत्य.
लक्षेपति (वि.) – श्रीमंत, लक्षाधिश.
लावणे (क्रि.) – जोडणे.
लागत (स्त्री) – इच्छा.



लाडोर (स्त्री) – लांडोर.
लेणे (न.) – खडकातील कोरीव गुहा.
लोटणे (क्रि.) – संपणे, भरणे, जाणे.
लंगर (पु.) – नांगर.

## व

वचणे (क्रि.) – नीगा राखणे, काळजी घेणे, तयार करणे.
वनवन (क्रि.वि.) – सावकाश, हळूहळू.
वटणे/वडणे (क्रि.) – सुकून जाणे, मरून जाणे.
वणू/वन (न.) – रान.
वाणी (पु.) – व्यापार करणारा गुजराथी.
वर्धी (स्त्री) – वर्दी.
वनवा (पु.) – दावानल, जीवाचा आटापीटा.
वरड (न.) – वऱ्हाड.
वला (वि.) – ओला, भिजलेला.
वसरी (स्त्री) – सोपा, औटी.
वळक (स्त्री) – ओळख.
वाघूर (न.) – जाळे, शिकारी करीता तयार केलेले.
वाढणे (क्रि.) – वाढलेला भाग घाटे.
वानी (स्त्री) – शुद्धाशुद्ध, परीक्षा, वानीचे (वि.) नवसाचे.
वावडी (स्त्री) – लहान विहीर, बावडी.
वावर (स्त्री) – शेत.
वाळा (पु.) – पायातील दागिना.
विचू (पु.) – विंचू.
विरानी/विराणी (पु.) – जात्यात घालावयाचा घास.
विसय (पु.) – विषय, वासन विषयापासून – वासनारहीत.

## श

शन्ना (स्त्री) – जाग, शन्ना करणे – शब्द पाळणे.
शा (स्त्री) – शिव्या (अ.व.)
शात (न.) – शेत.

शिंगी (स्त्री) – घोटी घोडी.
शितसे (क्रि.वि.) – टोचून.
शिनणे (क्रि.) – दमणे.
शिळणे (क्रि.) – फुंकणे, वाजविणे.
शेळदेव (पु.) – तांदळाच्या पिठाचे केलेले दिवे.
शेलू (पु.) – शालू.
शेलू (पु.) – एक धान्य, शालू.
शेहड्या (वि.) – कड्याच्या अरुंद वाटेवरील माती.

**स**

सत (न.) – खरे, सत्य.
समदा (वि.) – सर्व, एकूण, संपूर्ण.
समय (स्त्री) – समयी.
सरजा (स्त्री) – सुंदरी.
सराप (पु.) –शॉप.
समेली (स.ना.) – सर्वांना.
सारणे (क्रि.) – सरकविणे, ढकलणे.
साया (स्त्री) – साळी.
सावतर (वि.) – सावत्र.
सावर (स्त्री) – एक प्रकारचे झाड.
सावळ (स्त्री) – फास, पाश.
साळणे (क्रि.) – तासणे.
सांगणे (क्रि.) – बोलावणे.
सिताळ (वि.) – थंड.
सिपी (पु.) – शिंपी.
सुपाटा (पु.) – सोपट, झावळी.
सुपली (स्त्री) – लहान सूप.
सोद (पु.) – शोध.
सोपा/सोफा (स्त्री.पु.) – पडवी, सप्पर, वाडी.
सोबणे (क्रि.) – शोभणे.



सोगा (पु.) – मोराच्या पीसांचा लांब झुपका.
सौदा (पु.) – मसाल्याचे पदार्थ.
सौंच्छव (पु.) – संशय.
संग (क्रि.वि.) – बरोबर.
संजन (वि.) – सज्जन.
स्वयचा (वि.) – अंगचा.

**ह**

हारा (पु.) – मोठी पाटी, भारा.
हालवणे (क्रि.) – झोके देणे.
हावद (पु.) – कुंड, हौद.
हिरायी (वि.) – चमकदार.
हुकी (स्त्री) – लहर, कोल्ह्याचे ओरडणे.
हेरणे (क्रि.) – पाहणे.
हांडुरणे (क्रि.) – घाबरवणे.

✽ ✽

## चाळीसगाव डांगाण परिशिष्ट गावगन्ना पाटीलकीच्या नक्षीमा मूळ प्रतीची अस्सल नक्कल





## ६.

# परिशिष्टे

देवनागरीत

# ''चाळीसगांव डांगाण विषयी ऐतिहासिक पुरावा''

**श्री**

**सरकार कुंपणी इंग्रजबहादुर**

**श्री । राधो महादेव शेकदार ताा अकोले**

**पुरसीस देशमुख व देशपांडे ताा राजुर पैकी**

**सन १२४१ फसली**

**सवाल**

ऐसाजे तर्फ मजकुर येथील गावगन्ना पाटीलकीच्या तक्षीमा कोणकोणते गावी किती लिहून देणे.

**जबाब**

ऐसाजे तर्फ मजकुरी पाटीलकीच्या तक्षीमा येणे प्रमाणे

१ मौजे शेणित तक्षीम
एक घोंगडे प । । ।

१ मौजे तेरूंगण
कोकतारे पाा तक्षीम

१ मौजे केळुंगण
१ मधे तक्षीम १
१ पीचड पाा तक्षीम १
२

१ मौजे कातळापुर तक्षीमा २
१ ढगे कोळी १
१ सदगीर कानडे १
२

१ मौजे कोहंडी परते
कोळी पाा तक्षीम १

१ मौजे वाकी संगमारे कोळी पाा
तक्षीम १

१ मौजे शेलविहीरे दुटे पाा
कोळी तक्षीम १

१ मौजे साम्रद१
१ हांडे तक्षीम १
१ मौजे घाटघर
ठाकूर प I I I खडके
१ मौजे वारंघुस कडाळी
१ तक्षीम घाणे पाII
१ तक्षीम
१ कानडे भुसनारे प I I I
तक्षीम
३
१ मौजे आंबेवंगण
१ खेताडे तक्षीम १
१ धांडे तक्षीम १
२
१मौजे कोळटेंभे
१ बुळे पाII तक्षीम१
१ मौजे रणद खु.
१ वडे पाII कोळी तक्षीम १
१ मोजे मान्हेरे
१ कोकदरे तक्षीम १
१ गभाले पाII तक्षीम १
१ कानडे पाII तक्षईम १
३
१ मौजे पाभुळवंडी कोळी
१ लेंडे प II तक्षीम १
१ जाधव तक्षीम १
२
१ मोजे माळेगाव कोळी
१ सुकटे तक्षीम १
१ लोहकरे तक्षीम १
१ मौजे गुहीरे कोळी

मौजे मुरशेत असवले पाII
कोळी तक्षीम १
१ मौजे चिंचोडी
१ मधे ठाकूर तक्षीम १
१ मधे कोळी तक्षीम १
१ कानडे बोटनर
३
१ मौजे मुतखेल
१ इदेकोळी तक्षीम १
१ हापफुले कानडे तक्षीम १
२
१ मौजे पेणशेत
१ कोळी पदमिरे तक्षीम १
१ कानडे सदगीर १
२
१ मौजे लाडगांव
१ धोंगडे कोळी तक्षीम १
१ मोजे कोदनी
१ भांबेरे पाII तक्षीम १ कोळी
१ मौजे रणद बु. कोळी
१ कोरडे तक्षीम १
१ पटेकर तक्षीम १
२
१ मोजे भंडारदरा खाडे
तक्षीमदार १ कोळी

१ मौजे टीटवी मुंढे
तक्षीम १ कोळी
१ मौजे दिगंबर आवारीपाII
तक्षीम १ कुणबी



१ शिनवणी तक्षीम १
१ वाखारे तक्षीम १
२
१ मौजे पांधरे ठाकूर
१ झडे तक्षीम १
१ मौजे पिंपरकणे
१ पिचड तक्षीम १
१ मौजे पाडोशी
१ साबळे तक्षीम १ कोळी
१ मौजे शेंडी तक्षीम १
कोळी भांगरे
१ मौजे रतनवाडी कोळी
१ पांढरे तक्षीम १
१ झडे तक्षीम
२
१ मौजे पाभुळवंडी
१ लेंडे कोळी तक्षीम १
१ कानडे करवर तक्षीम १
—
**१९**

१ देवगाव भांगरे तक्षीम
कोळी १
१ मौजे शिंगणवाडी ठाकूर
पोकळे तक्षीम १
१ बारी खाडे
कोळी तक्क्षीम १
१ मौजे उडदावणे ठाकूर
गीऱ्हे तक्षीम १ कोळी
१ मौजे एकदरे भांगरे
तक्षीम १
१ कसबे राजुर तर्फ कोळी
कृष्णा प II तक्षीम १
निम
२
—
**२०**

सदरहुप्रमाणे ३९ व्या तक्षीमा गावपन्ना आहेत हे जबाब लिहून दिला. सही ता. १३ माहे ऑगस्ट सन १८३१ इसवी.

सही

**सवाल**

तक्षीमेप्रमाणे जमिनीच्या वाटण्या आहेत किंवा कसे लिहून देणे. ता. १३ माहे ऑगस्ट सन १८३१ इसवी.

**जबाब**

कसबे राजुर येथे मात्र दुतर्फा दोन वाटण्या झाल्या आहेत. बाकी गावाना जमीन मोघम आहे. वाटण्या काही झाल्या नाहीत. हे सवालाचा जबाब लिहून दिला.

सही–

**सवाल**

तर्फ मजकुरीप्रमाणे कसबे राजुर येथील तक्षीमा प्रमाणे जमिनीची वाटणी झाली म्हणजे हल्ली त्या वाटणी कोणते अमलात झाली व वाटणीची शीवणे अद्याप कायम आहेत किंवा कसे व वाटणीबद्दल कागदपत्र आणोन दाखवणे.

**जबाब**

राजुर येथील वाटण्या दुतर्फा मोगलाई अमलात बहुत दिवस झालेल्या आहेत त्याचा दाखवा कागदपत्री नाही व कागद ही नाही. वहीवाट वाटणी झाले दिवसापासून आज पावेतो चालूच आहे. शेताचे वाटणीचे शीवणे बंद बांदुळी कायम आहेत. रुजु.

लक्ष्मण वाा (वल्लद – बाप) आनंदराव व जीवाजी व ।। (वल्लद – बाप) इदोजी देशमुख तर्फ राजुर.

**त्र्यंबक रघुनाथ देशपांडे**
**तर्फ मजकुर.**

साक्षी

| | |
|---|---|
| १ मल्हारराव राणोजी देशमुख | १ जीवाडी पााा |
| पााा अकोले | सबाजी पााा |
| | मौजे गरदनी |

भगवंत मल्हार देशपांडे दस्तुर दोन्ही साक्षीस आसे.

**टिप** : – त्र्यंबक रघुनाथ देशपांडे यांची **तक्षीम जामगांव** ही यात दिली नाही. ती तक्षीस धरून त्र्यंबक रघुनाथ देशपांडे यांचे तर्फ मजकुरी **चाळीस गांवे** होती.

* *

या देशमुख देशपांडे व चौगुले यांच्या समदा पुढीलप्रमाणे मिळाल्या होत्या.

**इमान**

देशमुख देशपांडे व चौगुले यांनी सनद शहा आलम शहा गाजी महंमदशाहा अहंमदशा दगाजी पिराजी

* *

वरील दोन्ही कागदपत्र मा. श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण टाकळकर यांचेकडून मिळाली. त्यांची अशी कागदपत्रे पुराण वस्तुसंग्रहालय (ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय) अहमदनगर येथे दिलेली आहेत. त्यांनी पुढीलप्रमाणे वंशावळ सांगितली.



त्र्यंबक रघुनाथ देशपांडे (संत)

गंगाधर

अनंत

राधाबाई बाळकृष्ण वासुदेव टाकळकर

(१) वा. बा. टाकळकर हायात वारसदार (२) पु. बा. टाकळकर

* * *